# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण केंद्र

# रशियाचा इतिहास

**(History of Russia)**
**(1900 to 1950)**

(शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून)

**एम. ए. भाग-२**

**इतिहास**

Optional : Paper 310

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)
**प्रथमावृत्ती :** २०१९
एम. ए. भाग - २ करिता (रशियाचा इतिहास)
सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

**प्रती : १,०००**

■

**प्रकाशक :**
**डॉ. व्ही. डी. नांदवडेकर**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

**मुद्रक :**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

ISBN- 978-93-89327-35-9

★ दूरशिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४ (भारत)

★ दूरशिक्षण विभाग-विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांच्या विकसन अनुदानातून या साहित्याची निर्मिती केली आहे.

## दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


■ सल्लागार समिति ■

**प्रा. (डॉ.) डी. बी. शिंदे**
मा. कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के**
प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एम. साळुंखे**
माजी कुलगुरू,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**प्रा. (डॉ.) के. एस. रंगाप्पा**
माजी कुलगुरू,
म्हैसूर विद्यापीठ, म्हैसूर

**प्रा. पी. प्रकाश**
अतिरिक्त सचिव-II,
विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. एस. पाटील**
I/c अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) ए. एम. गुरव**
I/c अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) भारती पाटील**
I/c अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. डी. राऊत**
I/c अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. डी. नांदवडेकर**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. जी. आर. पळसे**
I/c संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. व्ही. टी. पाटील**
वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. ए. अनुसे** (सदस्य सचिव)
संचालक, दूरशिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

### ■ अभ्यासमंडळ : इतिहास ■


अध्यक्ष – **डॉ. अवनिश पाटील**
इतिहास अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- **डॉ. श्रीमती एन. डी. पारेकर**
  इतिहास अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. डी. बी. मासाळ**
  छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा
- **डॉ. श्रीमती संघमित्रा व्ही. सरवदे**
  आण्णासाहेब डांगे कॉलेज, हातकणंगले,
  जि. कोल्हापूर
- **डॉ. दिपक शंकरराव जाधव**
  लाल बहाद्दूर शास्त्री कॉलेज, सातारा
- **डॉ. सुप्रिया चंद्रशेखर खोले**
  चंद्राबाई शांताप्पा शेंडूरे कॉलेज, हुपरी,
  जि. कोल्हापूर
- **डॉ. एम. व्ही. जाधव**
  यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, हलकर्णी,
  जि. कोल्हापूर
- **डॉ. निवासराव अधिकराव वरेकर**
  आदर्श महाविद्यालय, विटा, ता. खानापूर,
  जि. सांगली
- **डॉ. सुरेश मारूती चव्हाण**
  आर्टस, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, गडहिंग्लज,
  जि. कोल्हापूर
- **डॉ. राजश्री दिलीप निकम**
  कृष्णा महाविद्यालय, रेठरे बु।।, शिवनगर,
  ता. कराड, जि. सातारा
- **डॉ. श्रीमती मंजिरी कामत**
  इतिहास अधिविभाग, मुंबई विद्यापीठ, मुंबई.
- **डॉ. चंद्रकांत अभंग**
  सचिव, भारत इतिहास संशोधक मंडळ,
  इमिनंट स्कॉलर ऑफ मराठा हिस्ट्री.
- **डॉ. अरुण भोसले**
  निवृत्त प्राध्यापक, इतिहास अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. भारतभुषण माळी**
  सचिव, शिवाजी विद्यापीठ इतिहास परिषद
- **डॉ. अमर आडके**
  सल्लागार, किल्ले जतन आणि संवर्धन, कोल्हापूर

# प्रस्तावना

शैक्षणिक वर्ष २००७ पासून शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, यांच्या वतीने दूरशिक्षण केंद्रामार्फत बहिःस्थ विद्यार्थ्यांना दूरशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. तसेच यंदाच्या वर्षापासून म्हणजे २०१८-१९ पासून अभ्यासक्रम बदललेला आहे, सत्रपद्धती राबविण्यात येत आहे. त्यानुषंगाने, एम. ए. भाग-२ इतिहास या वर्गाच्या विद्यार्थ्यांसाठी ''रशियाचा इतिहास-१९०० ते १९५०'' या विषयाचे स्वयंःअध्ययनासाठी हे पुस्तक सन २०१९-२० या वर्षात लिहिले आहे. सदर पुस्तकाच्या लेखनासाठी शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील पदव्युत्तर विभागात अध्ययन करणाऱ्या अनुभवी व तज्ज्ञ लेखकांकडून या विषयाच्या अभ्यासक्रमानुसार असलेल्या विविध घटकांचे लेखन करून घेण्यात आले आहे. या पुस्तकातील विविध घटक लिहिताना साधी व सोपी भाषा, संकल्पनात्मक स्पष्टता, विषयाच्या आकलनासाठी तक्ते, इत्यादींचा वापर केलेला आहे. वाचक व विद्यार्थ्यांना समजेल अशी विषयाची सोपी व सुटसुटीत मांडणी करण्यात आलेली आहे. प्रत्येक घटकाच्या शेवटी स्वयंःअध्ययन प्रश्न व त्यांची उत्तरे दिलेली आहेत. तसेच घटकाच्या शेवटी सरावासाठी स्वाध्याय, पारिभाषिक शब्द, विषय व अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथांची सूची दिलेली आहे.

रशियाचा इतिहास-१९०० ते १९५० या स्वयंअध्ययन साहित्यामध्ये शाही रशिया, रशियन राज्यक्रांती, बोल्शेविक सत्तेचे दृढीकरण, स्टॅलिन आणि सोव्हिएत रशियाचा जागतिक महासत्ता म्हणून उदय या घटकांचा समावेश करण्यात आलेला आहे.

या पुस्तकामध्ये विविध घटकांच्या विवेचनात अचूकता आणण्याचा प्रयत्न केलेला आहे. परंतु त्यामध्ये कांही उणिवा असल्यास वाचक व विद्यार्थ्यांनी त्या आमच्या निदर्शनास आणून द्याव्यात. त्याचा उपयोग पुढील आवृत्ती अधिकाधिक सुधारित करण्यासाठी निश्चितपणे होईल. हे पुस्तक पदवी, पदव्युत्तर व विविध स्पर्धा परीक्षांच्या विद्यार्थ्यांना उपयुक्त ठरेल असा आम्हाला विश्वास आहे. सदर पुस्तक पूर्ण करण्यासाठी घटक लेखकांनी जे परिश्रम घेतले. पुस्तक प्रकाशनासाठी शिवाजी विद्यापीठाचे प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी, दूरशिक्षण विभागातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी जे परिश्रम घेतले त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार.


**■ संपादक ■**

**डॉ. सुप्रिया चंद्रशेखर खोले**
चंद्राबाई शांताप्पा शेंडुरे कॉलेज,
हुपरी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर

दूरशिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर

**(रशियाचा इतिहास–१९०० ते १९५०)**
**एम. ए. भाग–२ : इतिहास पेपर ३१० (ऐच्छिक)**

## अभ्यास घटकांचे लेखक

| लेखक | घटक क्रमांक |
|---|---|
| **डॉ. निवासराव अधिकराव वरेकर**<br>इतिहास विभागप्रमुख, आदर्श महाविद्यालय, विटा, जि. सांगली | १ |
| **डॉ. सुप्रिया चंद्रशेखर खोले**<br>सहयोगी प्राध्यापक, चंद्राबाई शांताप्पा शेंडूरे महाविद्यालय, हुपरी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर | २ |
| **प्रा. मुफिद मुजावर**<br>सहाय्यक प्राध्यापक, दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | ३ |
| **प्रा. संदीप महाजन**<br>सहाय्यक प्राध्यापक, राजश्री छत्रपती शाहू कॉलेज, कोल्हापूर | ४ |

**■ संपादक ■**

**डॉ. सुप्रिया चंद्रशेखर खोले**
सहयोगी प्राध्यापक,
चंद्राबाई शांताप्पा शेंडुरे कॉलेज,
हुपरी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर

# अनुक्रमणिका


| घटक क्रमांक | घटकाचे शीर्षक | पान क्रमांक |
|---|---|---|
| १. | शाही रशिया | १ |
| २. | रशियन राज्यक्रांती | २५ |
| ३. | बोल्शेविक सत्तेचे दृढीकरण | ५३ |
| ४. | स्टॅलिन आणि सोव्हिएत रशियाचा जागतिक महासत्ता म्हणून उदय | ७१ |

## ■ विद्यार्थ्यांना सूचना

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरेही देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०१८-१९ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

घटक–१

# शाही रशिया

## (Imperial Russia)

---

अनुक्रमणिका

१.० उद्दिष्टे

१.१ प्रास्ताविक

१.२ विषय विवेचन

१.२.१ मुक्तीचा आदेश (Edict of Emancipation)

१.२.२ झार निकोलस दुसरा याचा कालखंड (Reign of Czar Nicholas-II)

१.२.३ रशिया–जपान युध्दाचे (१९०४–०५) महत्त्व (Significance of Russo-Japan War 1904-05)

१.३ सारांश

१.४ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

१.५ स्वयं–अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१.६ सरावासाठी स्वाध्याय

१.७ अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके

## १.० उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यासानंतर आपणाला,

१. रशियातील १९ व्या शतकाच्या उत्तरार्धातील अंतर्गत राजकारण व झारशाहीचे स्वरूप समजून घेता येईल.

२. भूदास पध्दतीचे उच्चाटन, निहिलिझम व दहशतवाद याचे स्वरूप समजून घेता येईल.

३. झार दुसरा निकोलस याच्या शासनकालाची माहिती (सन १८९४–१९१७) रशियाच्या अनियंत्रित झारशाहीचा शेवट याची माहिती होईल.

४. रशिया–जपान युध्द (१९०४–०५) या युध्दाचे रशियावर तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर झालेल्या परिणामांचा आढावा घेता येईल.

## १.१ प्रास्ताविक

'शाही रशिया' म्हणजे राजसत्तेच्या किंवा झारशाहीच्या नियंत्रणाखालचा क्रांतिपूर्व रशिया. येथे १६१३ पासून रोमोनॉव्ह घराण्याच्या सत्तेला म्हणजेच झारशाहीला सुरुवात झाली. १९१७ च्या क्रांतीनंतर झारशाही पूर्ण नष्ट होऊन नव्या साम्यवादी रशियाचा उदय झाला. एकोणिसाव्या शतकाचा उत्तरार्ध महत्वपूर्ण ठरला. या काळातील रशियाची ओळख ही युरोपातील आकाराने सर्वात मोठे राष्ट्र मात्र इतर युरोपियन राष्ट्रांपेक्षा मागासलेले राष्ट्र अशी होती. युरोप आणि आशिया खंडात पसरलेल्या आणि एक षष्ठांश भूभाग व्यापणाऱ्या या राष्ट्राला कमकुवत राजसत्तेमुळे इतर युरोपियन राष्ट्रांप्रमाणे आधुनिक बनता आले नाही. युरोपात औद्योगिक क्रांतीने खूप पुढचा टप्पा गाठला त्यावेळी रशियात त्याची सुरुवात झाली मात्र युरोपातील वैज्ञानिक प्रगती, आधुनिक विचार याचा परिणाम रशियन जनतेवर होऊ लागला. रशियन विचारवंतांची एक फळीच निर्माण झाली त्यांनी रशियन जनतेला जागृत करण्याचे कार्य केले. रशियाची मागासलेली परिस्थिती ही झारशाहीच्या नाकर्तेपणामुळे आहे याची जाणीव जनतेला झाली. यातूनच झारशाही विरुध्दचा संताप वाढत गेला आणि याची परिणीती पुढे १९१७ च्या क्रांतीत झाली. या दरम्यान अशा अनेक घटना घडल्या त्यांनी झारशाहीच्या विरोधातील शक्तींना बळकट करण्याचे कार्य केले. युरोपातील औद्योगिक क्रांती, आधुनिकीकरण, साम्राज्यवाद, वैचारिक बदल यांचा प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष परिणाम रशियन जनतेवर झाला. रशियाची खालावलेली अंतर्गत परिस्थिती, सामाजिक-शैक्षणिक-आर्थिकदृष्ट्या मागासलेपणामुळे त्रस्त झालेली जनता या सर्व गोष्टी क्रांतीसाठी अनुकूल ठरल्या. या घटकात शाही रशियातील अंतर्गत संघर्ष, झारशाहीचे स्वरूप, रशियातील वाढता असंतोष, भूदास पद्धतीचे उच्चाटन, झार निकोलस दुसऱ्याची कारकिर्द, रशिया-जपान युद्ध या मुद्यांचा आढावा घेणार आहोत.

## १.२ विषय विवेचन

### १.२.१ मुक्तीचा आदेश (Edict of Emancipation)

❋ **रशियाची भौगोलिक परिस्थिती :-**

सन १८७० मध्ये क्षेत्रफळ व लोकसंख्या ह्या दोन्ही दृष्टीने रशिया सर्व युरोपीय राष्ट्रांपेक्षा विशाल होते तोपर्यंत युरोपीय रशियाबरोबरच संपूर्ण सैबेरिया व मध्य आशियाचा विशाल भू-प्रदेश रशियन अंमलाखाली होता. रशियन सीमा दक्षिणेत अफगाणिस्तानला तर पूर्वेला पॅसिफिक समुद्राला जाऊन भिडल्या होत्या. उत्तर पॅसिफिकमधील पूर्वी जपानच्या ताब्यात असलेली व आरमारीदृष्ट्या अत्यंत महत्त्वाची ठरणारी साखलिन बेटे ही सन १८७५ पर्यंत त्या राष्ट्राने मिळवली होती. पीटर द ग्रेट पासून रशियाची नीती साम्राज्य विस्ताराची होती. अफाट प्रादेशिक विस्तार असलेल्या रशियाचा केवळ एकतृतीयांश भूभाग शेतीसाठी योग्य होता. वोल्गा नदीला रशियाची जीवनदायीनी मानले जाते.

❋ **अंतर्गत परिस्थिती :-**

पूर्व-युरोपमध्ये व आशियाच्या उत्तरेस रशिया पसरलेला आहे. अठराव्या शतकापर्यंत युरोपीय रशियास

मास्कोव्ही म्हणत असत. तत्कालीन मास्को या राजधानीच्या ठिकाणावरून हे नाव पडले होते. परंतु एकोणिसाव्या शतकामध्ये झालेल्या राजविस्तारानंतर ह्या प्रांतास सर्वत्र रशिया या नावाने संबोधले जावू लागले. महायुध्दापूर्वीच्या रशियन साम्राज्याचे क्षेत्रफळ ८४१७११८ चौरस मैल इतके होते. देशातील वस्ती विरळ होती. पहिल्या महायुध्दाच्या सुमारास येथील लोकसंख्या (१९१७ साली) १८२१८२६०० इतकी होती. इतर युरोपीय राष्ट्रांच्या तुलनेत रशिया २० व्या शतकाच्या प्रारंभी पाश्चात्य संस्कृती व प्रगती या दृष्टीने मागासलेले होते. मध्ययुगातील समाजव्यवस्था या काळातही रशियात तशीच चालू होती. बहुसंख्य लोक जमीनदारांच्या व अमीरउमरावांच्या शेतीवर गुलामासारखे राबत होते. अमीर उमरावांच्या आणि चर्चच्या अधिकारी वर्गाच्या विशेषाधिकारांना जराही धक्का लागला नव्हता. थोडक्यात युरोपमधील हे सर्वात मोठे साम्राज्य सुधारणेच्या दृष्टीने इतर राष्ट्रापेक्षा शतकाने मागे होते. मध्ययुगीन सरंजामशाही पध्दतीचा सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक व राजकीय जीवनात प्रभाव होता. झारच्या अनियंत्रित सत्तेप्रमाणेच धर्मगुरूंच्या प्रभावाखाली सर्वसामान्य जनता होती. मध्ययुगीन काळातील राजसत्तेच्या दैवी हक्कसिध्दांताच्या कल्पनांना धक्काही बसलेला नव्हता. झारवर नियंत्रण ठेवणारी राज्यघटना तसेच कायदेमंडळ अस्तित्वात नव्हते. मंत्री हे केवळ झारचे मदतनीस असून त्यांची नियुक्ती व पदावरील अस्तित्व केवळ झारच्या मर्जीवर अवलंबून होते. झारचे हुकूम हेच राष्ट्राचे कायदे होते. सरकारी अधिकारी कर्तव्यशून्य व भ्रष्ट असून जुलूम व दडपशाही यांचे सम रशियात अनिर्बंधपणे सर्रास चालू होते. उच्चस्तरीय लोकांच्या हातामध्ये शिक्षण व संस्कृती यांची मक्तेदारी होती. ७०% जनता ही निरक्षर होती. संशोधन, शिक्षण, प्रसारमाध्यमे यावर झारचे पूर्णपणे नियंत्रण होते. धार्मिक क्षेत्रात तर झारचा हस्तक्षेप एवढा होता की चर्चच्या पवित्र सभाप्रमुखाची नेमणूक स्वत: तो करीत होता. याशिवाय रशियात रोमन कॅथलिक, प्रोटेस्टंट, ज्यू, मुस्लीम व अन्यधर्मीयही लोक होते. या निरनिराळ्या धार्मिक गटांचा छळ सतत चालू होता.

मध्य युगातील इतर राष्ट्राप्रमाणेच रशियन साम्राज्यही एकजिनसी नव्हते. त्यातही निरनिराळ्या वांशिक गटाचा समावेश होत होता. ग्रेट रशियन्स, लिटल रशियन्स, युक्रेनियन्स व व्हाईट रशियन्स हे सर्व स्लाव्हवंशीय होते. त्यांच्या भाषाही परस्परांशी मिळत्या-जुळत्या होत्या. याशिवाय पोलंड, लिथुआनिया, युक्रेन या प्रदेशात पोलिश व फिनलंडमध्ये फिनिश व स्विडीश, बाल्टिक प्रांतात जर्मन, लिथुअनियन, लेट् व एस्टीनियन, बेसअरेबियात रूमान, क्रिशिया व आग्रेसेच्या प्रांतात तार्तार, कॉकेशस भागात आर्मेनियन व जॉर्जियन, सैबेरियात मंगोल, मध्य आशियात मुस्लीम जमाती, तर उत्तर सैबेरियात लॅप व एस्किमो यासारखे लोक होते. पोल व फिन् या लोकात व अल्प प्रमाणात रूमानियन, एस्टीनियन व लिथुआनियन या लोकांत झारच्या सत्तेविरुध्द असंतोष धुमसत होता. पश्चिम युरोपातील राष्ट्रवादाचे वारे १९ व्या शतकाच्या मध्यापर्यंत रशियाच्या भूमीपर्यंत येऊन पोहचले होते.

## ❋ झारशाहीचे स्वरूप :-

रशियातील झारशाही ही युरोपातील शेवटची अनियंत्रित राजसत्ता होती. ईश्वरदत्त सत्तेच्या तत्वाला सर्वच झार चिकटून राहिले. झारवर नियंत्रण ठेवू शकणारी कोणतीही राज्यघटना रशियात अस्तित्वात येवू शकली नाही. झारकडूनच मंत्र्याची नेमणूक होत असे व ते झारलाच वैयक्तिकरित्या जबाबदार असत.

वेळोवेळी झारने काढलेले फर्मानि हेच रशियाचे कायदे होते. तत्वत: झारची राजवट ही हुकूमशाही स्वरूपाची होती. अफाट पसरलेल्या व दळणवळणाचा अभाव असलेल्या या साम्राज्यात स्थानिक अधिकाऱ्यांना राज्यकारभारात खूपच मोठे स्थान होते हे अधिकारी प्रामुख्याने सरंजामदार असत.

### ❋ झार दुसरा अलेक्झांडर याचा कालखंड (१८५५-१८८१) :-

क्रिमियन युध्द चालू असतानाच पहिल्या निकोलसचे निधन झाले होते. त्याने मृत्यूशय्येवर असतानाच भावी झारला उद्देशून लिहिले होते. ''मी या निर्बल देशाची धुरा तुमच्या खांद्यावर टाकीत आहे.'' युध्दातील पराजयाने यथार्थत: एकाधिकारशाहीचे दिवाळे काढले होते. क्रिमियाच्या युध्दात एकतंत्री व प्रतिगामी धोरणामुळे रशियाला पाश्चिमात्य राष्ट्रांकडून पराभव पत्करावा लागला होता. रशियाची मुलकी व लष्करी व्यवस्था पूर्णपणे कोलमडून पडली. अलेक्झांडरने या परिस्थितीत विजयी देशांशी त्यांच्याच अटींवर तह करण्याचे मनोधैर्य दाखविले. निकोलसच्या तुलनेत नवीन झार परिस्थितींचा सामना करण्यास अधिक योग्य होता. त्याचे शिक्षण कवी वासिल झुकोव्हस्कीच्या हाताखाली झाल्यामुळे मानवतावादी विचाराकडे त्याचा कल होता. ३६ वर्षाचा हा तरुण झार सुधारणावादी व मुक्तीदाता झार म्हणून प्रसिध्द झाला. त्याने रशियाच्या आधुनिकीकरणाची निकड जाणवून भूदासांची मुक्तता, प्रत्येक परगण्यात जनतेने निवडून दिलेल्या प्रतिनिधींच्या समित्यांची स्थापना, विनाविलंब नि:पक्षपाती न्याय मिळावा याकरिता न्याय खात्यात बदल घडवून आणले. शिक्षणाला उत्तेजन दिले, तांत्रिक विद्यालयांची स्थापना केली. या सर्व सुधारणा त्याने आपल्या कारकिर्दीत घडवून आणल्या.

### ❋ भूदास पध्दतीचे उच्चाटन :-

१९ फेब्रुवारी १८६१ च्या कायद्याने झार दुसरा याने घडून आलेली भूदास पध्दती ही केवळ एक सामाजिक सुधारणा नव्हती, तर राजसत्तेच्या पुढाकाराने घडून आलेली ती एक क्रांतीच होती. रशियाच्या सामाजिक जीवनात शतकानुशतके रुजलेली अन्याय व घातक पध्दती १९ फेब्रुवारीच्या कायद्याने नष्ट केली. अर्थकारण, समाजकारण, कायदा, राजकारण या सर्वच दृष्टीनी भूदासमुक्ती कायद्याने रशियाच्या राष्ट्र जीवनात पूर्ण परिवर्तन घडवून आणले.

### ❋ भूदास :-

भूदास ही श्रमिकांच्या शोषणाची एक पध्दत आहे. ज्या व्यवस्थेत माणसांना कोणाची तरी मालमत्ता समजले जाते आणि बळाचा किंवा धाकाचा वापर करून काम करायला लावले जाते, तिला सर्वसाधारणपणे गुलामगिरी किंवा गुलामी (भूदास) अशी संज्ञा आहे. गुलामांना त्यांच्या इच्छेविरुध्द विकत घेणयात येत असे किंवा ते जन्मापासूनच गुलाम समजले जात असत. काम सोडून जाण्याचा, कामास नकार देण्याचा किंवा कामासाठी मोबदला मागण्याचा अधिकार त्यांना नसे. काही जुन्या गुलामगिरीच्या व्यवस्थामध्ये मालक अशा गुलामांना ठारही मारू शकत असत.

रशियन भाषेतील 'नरोद' हा शब्द अलीकडे 'जनता' किंवा 'राष्ट्र' या अर्थाने वापरला जातो. परंतु

एकोणिसाव्या शतकापर्यंत, तेथील शेतकऱ्यांना (भूदास व स्वतंत्र असलेले शेतकरी) नरोद म्हणत. त्यावेळी समाजात दोनच वर्ग होते. एक वर्ग म्हणजे रशियातील सुमारे ९०% जनता शेतकरी म्हणजे नरोद तर दुसरा नरोदेतर वर्ग अमीर उमराव, जमीनदार, व्यापारी नव्याने उदयाला येणारे मध्यमवर्गीय धंदेवाईक इत्यादीचा. मध्ययुगीन काळात युरोपच्या इतरही राष्ट्रात गुलामीची पध्दती होती त्याप्रमाणे ती रशियातही होती. सरंजामदारांच्या व झारच्या शेतजमीनी कसणाऱ्या भूदासांना मालकाच्या परवानगीशिवाय जमीन सोडून जाता येत नसे. मालक बदलल्यास जमीनीप्रमाणेच या कसणाऱ्यांनाही नव्या मालकाच्या स्वाधीन व्हावे लागे. या भूदासांची परिस्थिती गुलामापेक्षा वाईट होती. सरंजामदार भूदासाकरवी जमीन कसून घेत, परंतु त्यांच्या चरितार्थाची जबाबदारी ते घेतच असत असे नाही. मानवतावादाच्या दृष्टीने ही परिस्थिती निंद्यच होती. पण आर्थिकदृष्ट्याही अकार्यक्षम होती, याच लोकातून रशियाची सैन्यभरती होत असल्याने कार्यक्षमता, बुध्दिमत्ता व नेतृत्व या सर्वच दृष्टीने ते पाश्चात्य राष्ट्रातील स्वतंत्र नागरिकांच्या सैन्याच्या तुलनेने किती कमी पडले याची प्रचीती क्रिमियन युध्दात आलीच होती.

आपल्या प्रचंड साम्राज्याचे संरक्षण करण्याच्या दृष्टीने ही भूदास पध्दती असणे योग्य नाही. हे जाणून दुसऱ्या अलेक्झांडरने भूदास पध्दती नष्ट करण्यासाठी १९ फेब्रुवारी, १८६१ साली मुक्तीचा आदेश दिला. भूदास पध्दती सुधारणेचे स्वरूप ठरविण्यासाठी अलेक्झांडरने समिती नेमली, त्या समितीच्या शिफारशी लक्षात घेऊन या मुक्तीच्या आदेशात तरतुदी केलेल्या होत्या. घरगुती काम करणाऱ्या भूदासांना मुक्त केले. पण त्यांना कोणतेही हक्क मिळाले नाहीत. शेतावर राबणाऱ्या भूदासांना स्वतंत्र करताना जमिनीचा तुकडा व रहाते घर मिळण्याची तरतूद केली. प्रत्येक खेड्यातील कसण्यास योग्य जमिनीपैकी अर्धी जमीन त्या-त्या खेड्याच्या सामुदायिक मालकीची बनविण्यात आली. या सामुदायिक व्यवस्थेमार्फत (मीर) दरवर्षी शेतकऱ्यांना कसण्यासाठी जमिनी वाटून दिल्या जात. या जमिनी उमराव वर्गाकडून काढून घेतलेल्या होत्या. त्यांची किंमत मीरला ठरवून देण्यात आली होती. ती फेडण्यासाठी सरकारकडून कर्ज मिळविण्याची तरतूद होती व ते कर्ज शेतकऱ्यांनी हप्त्याहप्त्याने फेडावयाचे होते. कुटुंबाच्या आकारमानाप्रमाणे जमिनी वाटून दिल्या असल्या तरी दरवर्षी तोच जमिनीचा तुकडा मिळेल ही या मुक्त शेतकऱ्यांना खात्री नव्हती. कर्जफेडीचे हप्ते डोईजड होते व जमिनीचे किंमत पूर्णपणे वसूल झाल्याशिवाय उमराव वर्ग जमिनीवरील आपला हक्क सोडण्यास तयार नव्हता. या परिस्थितीमुळे कायदेशीरदृष्ट्या शेतकरी स्वतंत्र झाला हे खरे असले तरी शेतकऱ्यांच्या परिस्थितीत सुधारणा झालीच नाही. शेतीचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने शेतकरी प्रयत्न करेनात तर, उमराव वर्गाला जमिनी करावयास योग्य मजूर मिळेनात. यामुळे भूदास पध्दती नष्ट करूनही शेतीला वा शेतकऱ्यांना कोणताच विशेष फायदा झाला नाही. ही सुधारणा करतानाही उमराव वर्गाचे फारसे नुकसान होणार नाही ही काळजी घेतली होती. कारण दुसऱ्या अलेक्झांडरला उमराव वर्ग नष्ट करावयाचा नव्हता. मात्र यामुळे स्वतंत्र शेतकरी वर्ग रशियात निर्माण झाला ही गोष्ट रशियाचा नैतिक दर्जा इतर देशात उंचविणाऱ्याच्या दृष्टीने मदत करणारी अशी ठरली. भूदास पध्दती नष्ट करून दुसऱ्या अलेक्झांडरने 'मुक्तीदाता' ही पदवी मिळवली. पण रशियाच्या अंतर्गत व बाह्य विकासाची स्वप्ने पाहणारा हा झार पूर्वीच्या झारपेक्षा वेगळे काही करू शकला नाही.

सर्व सुधारणांचे परिणाम स्वत: अलेक्झांडरला फारसे फायद्याचे ठरले नाहीत. मिळालेल्या स्वातंत्र्याचा फायदा घेऊन विरोधी पक्ष झार सरकारच्या अकार्यक्षमतेवर सडकून टीका करू लागले. त्याचबरोबर अलेक्झांडरची नीतीही बदलली. सन १८६३ मध्ये पोलीश जनतेने केलेल्या उठावामुळे उदारमतवादाबद्दल तो साशंकच होताच. त्यातच सन १८६६ मध्ये एका साम्यवादाने त्याला गोळी घालण्याचा प्रयत्न केल्यामुळे तर सरकारविरोधी कृत्यांच्या भीतीने त्याचा उदारमतवाद कुठल्याकुठे विरून गेला आणि दमण नीतीचा बडगा त्याने उचलला. परगण्यातील स्थानिक समित्या दोन वर्षाच्या आतच तेथील गव्हर्नरच्या ताब्यात देण्यात आल्या. सन १८६८ मध्ये करनिर्धारणाचे अधिकार सीमित करण्यात आले. न्याय खात्यातील सुधारणांची अंमलबजावणीही आखडल्या हातानीच झाली. राजकीय गुन्हे लष्करी न्याय सभेपुढे जावेत अशी तरतूद १८७८ मध्ये करण्यात आली. क्रांतीकारक व लोकशाही कल्पनांच्या प्रसाराला आळा घातला होता. इतिहास, भूगोल, पाश्चिमात्य भाषा, याऐवजी निरुपद्रवी म्हणून लॅटिन, ग्रीक गणित अशा विषयांच्या शिक्षणावर भर देण्यात आला. अभ्यासक्रमातून विज्ञानाची तर जवळजवळ हकालपट्टीच झाली. राष्ट्रवाद व उदारमतवादी विचार प्रवृत्ती नष्ट करण्याकरिता निरनिराळ्या वांशिक गंटावर दडपशाही सुरू झाली.

### ❋ निहिलिझम आणि दहशतवाद :-

झार अलेक्झांडर द्वितीयच्याच काळात रशियात निहिलिझमचा (Nihilism) किंवा शून्यवादाचा उदय झाला. १८६० नंतरच्या रशियातील क्रांतीकारी प्रवृत्तीचा 'निहिलिझम'शी निकटचा संबंध आहे. निहिलिझम म्हणजे हिंसा राज्यहत्या, अज्ञेयवाद (agnosticism) असा अपसमज रूढ झालेला आहे. परंतु खऱ्या अर्थाने पाहता निहिलिझम हा राजकीय कार्यक्रम नसून त्याद्वारा एका विशिष्ट मानसिक अवस्थेची अभिव्यक्ती होते. आंत्यतिक व्यक्तीवादी मनोवृत्ती, कोणत्याही प्रकारची सामाजिक शासकीय अगर कौटुंबिक बंधने ती केवळ परंपरेने चालत आली म्हणून न मानणे, बुध्दीला पटेल तेवढ्याचा स्वीकार करणे अशी निहिलिस्टांची भूमिका होती. जनसामान्यांच्या मुक्तीपेक्षा व्यक्ती स्वातंत्र्यावर त्यांचा भर होता व ते उद्दीष्ट साध्य करणाऱ्या सुधारणांना त्याचा पाठिंबा होता.

पश्चिम युरोपातील विचारवंतांचे साहित्य वाचून रशियातील काही लोक निहिलिस्ट (Nihilist) म्हणजे बुध्दीवादी बनले. नवनिर्मितीसाठी जुने सर्व काही नष्ट झाले पाहिजे असे या बुध्दीवाद्यांचे विचार होते म्हणून जुन्या परंपरा, रितीरिवाज, अंधश्रध्दा म्हणजे पूर्ण जुनी व्यवस्था बदलली पाहिजे असे म्हणून निहिलिस्ट त्या व्यवस्थेवर टीका करू लागले. त्यांच्या ह्या विचारसरणीमुळे रशियातील अधिकारी नाराज झाले. त्यांची वक्रदृष्टी ह्या नवीन विचाराकडे वळली. म्हणून निहिलिस्टांनी आपले कार्य गुप्तपणे सुरू केले. **मायकेल बाकूनिन** हा रशियातील जहालवादाचा जनक मानला जातो. रशियन सरकार जो जो प्रतिगामी बनू लागले तो तो समाजातील गट जास्तीत जास्त सुधारणांची मागणी करू लागला. **अलेक्झांडर हेर्झेन** व **मायकेल बाकूनिन** या दोन लेखकांच्या लिखाणाची छाप उदारमतवादी लोकांवर विशेष पडली. हेर्झेनच्या विचारसरणीचे स्वरूप काहीसे मवाळ होते तर बाकूनिन हा जहाल होता. हेर्झेनचे अनुयायी बुध्दीवादाचा आश्रय घेणारे होते. रशियातील विविध परंपरागत संस्थाचे स्वरूप शास्त्रीय कसोटीवर पारखून घेतले पाहिजे व जर त्या संस्था

कसोटीस उतरत्यानंतरच त्यांना समाजात स्थान असावे. हा विचार अनेकांना क्रांतीकारी मार्गापेक्षा इष्ट वाटत होता. बुध्दीवादी विचारसरणीचे हे लोक निहिलिस्ट या नावाने ओळखले जात. कोणत्याही सत्तेपुढे मान तुकवायची नाही, कोणत्याही तत्वावर आंधळेपणाने श्रध्दा ठेवून त्याचा स्वीकार करायचा नाही, हे त्यांच्या विचारसरणीचे सूत्र होते.

अनेक बुध्दिवादी तरुणांनी यापूर्वीच नोकरशाहीची परंपरा व पुराणमतवादी याना झुगारून देण्याचे प्रयत्न चालविले होते. नागरी समानता, ज्युरीमार्फत चौकशी, **मत स्वातंत्र्य, कायदा व अर्थ** यावर जनतेचे नियंत्रण मंत्र्याची जबाबदारी निवडणूकीच्या तत्वावर राष्ट्रीय विधिमंडळ अशा अनेक सुधारणांचा पुरस्कार या तरुणांनी चालविला होता. तरुण वर्ग लोक शिक्षणासाठी मिळेल ती नोकरी पत्करून खेडोपाडी जात होता व शेतकरीवर्गाशी संपर्क साधीत होता. परंतु शेतकरी वर्गाला राजकारणापेक्षा जास्त जमीन संपादन करण्यात रस होता. त्यामुळे शेतकरी वर्गाला या लोकशिक्षणाच्या चळवळीचे महत्त्वच उगमत नसे. साहजिकच या खेडोपाडी गेलेल्या चळवळ्यांना सरकारी अधिकारी सहजपणे शोधून काढू शकत. तुरुंगवास नाहीतर तो टाळण्यासाठी अज्ञातवास हेच त्याचे नशीब ठरले. निहिलिझमची अराज्यवादाची कल्पना त्यांना रास्त वाटू लागली. यामुळे हेर्झेनच्या मवाळ विचार ऐवजी निराश व संतप्त झालेले तरुण बाकूनिनच्या जहाल विचारांचा आश्रय घेऊ लागले. अराजक, हिंसा यांच्या आधारे सरकारची सत्ता निष्प्रभ करणे हेच त्यांचे ध्येय ठरले. त्यामुळे सरकारचे खबरे, पोलीस, अधिकारी, मंत्री यांना ते ठार करू लागले. सन १८७३ मध्ये दुसऱ्या अलेक्झांडरवर दुसऱ्यांदा खुनी हल्ला झाला. १८७९ मध्ये त्याला क्रिमियातून घेऊन येणारी आगगाडी उडविण्याचा प्रयत्न झाला. तर सन १८९० साली त्यांच्या राहत्या राजवाड्याला आग लावण्यात आली. जो जो दहशतवाद उग्र स्वरूप धारण करू लागला. तो तो अलेक्झांडरची दडपशाही वाढत चालली. दडपशाहीने चळवळी दडपल्या जाणार नाहीत या जाणीवेने **मेलिकोव्ह** या मंत्र्याने झारला उदारमतवादाचा आश्रय घेण्यास सुचविले व एक योजनाही तयार करून दिली. १२ मार्च १८८१ या दिवशी सकाळी झारने या योजनेला मान्यता दिली व त्याच दिवशी **निहिलिस्टांच्या** बॉम्ब हल्यात तो बळी पडला.

शतकानुशतके गुलामगिरीच्या शृंखलानी जखडलेल्या रशियाला जाचक व मानहानीकारक बंधनातून मुक्त करून स्वातंत्र्य देणारा झार म्हणून दुसऱ्या अलेक्झांडरला रशियाच्या इतिहासात महत्वाचे स्थान दिले जाते. स्टीफन ग्रॅहमने लिहिलेल्या अलेक्झांडरच्या परिमानात त्याला 'स्वातंत्र्याचा झार किंवा मुक्तीदाता झार' असे म्हटले आहे. त्याने केलेल्या सुधारणा यामुळे रशियाच्या इतिहासात अलेक्झांडरची कारकीर्द संस्मरणीय ठरली आहे. त्या सुधारणामुळे मागासलेल्या मध्ययुगीन रशियाचे आधुनिक राष्ट्रात परिवर्तन होण्यास प्रारंभ झाला.

### ❋ तिसरा अलेक्झांडर (सन १८८१–९४)

उदारमतवादाकडे वळण्याचा आपल्या वडिलांचा विचार निष्फळ झाला, हाच विचार तिसऱ्या अलेक्झांडरच्या मनात पक्का झाला. त्यामुळे राज्यावर आल्याबरोबर त्याने अनियंत्रित सत्तेचे धोरण स्विकारले. मेलिकोव्हची योजना बारगळली. दुसऱ्या अलेक्झांडरने सुरू केलेल्या अर्धवट सुधारणा ही रद्द

ठरविण्यात आल्या. विद्यापीठामागे गुप्तहेरांचा ससेमिरा लागला. चर्चचा प्रमुख व गुप्त पोलीस खात्याचा प्रमुख या दोघांनी दडपशाहीचे सर्व प्रकार अंमलात आणण्यास झारला मदत केली. धर्मनिष्ठ जनतेमुळे धर्मगुरू उदारमतवादावर टीका करणारी प्रवचने झोडू लागले. झेमस्टोग्हज व ड्यूमा यांच्या सत्तेवर अनेक नियंत्रणे घालून स्थानिक कारभार उमरावांच्या हाती सोपविण्यात आला. तिसरा अलेक्झांडर हा मोठा धाडसी उद्योगी व प्रामाणिक असला तरी अत्यंत संकुचित दृष्टीकोनाचा होता. शिवाय पित्याच्या झालेल्या क्रूर हत्येमुळे उदारमतवादी, मवाळ सुधारणावादी किंवा जहाल क्रांतीवादी या सर्वांविरुध्दतच त्याचे मन खवळून उठले होते. त्याच्या निकटवर्ती सल्लागारांनीही त्याच्या प्रतिक्रियावादी धोरणालाच भर दिली, त्यामुळे मेलिकोव्हने आखलेल्या सुधारणांच्या योजनेला प्रसिध्दी देण्याऐवजी उलट एकतंत्री, सर्वाधिकारी राजसत्तेवरील विश्वास घोषित करण्यात आला. दडपशाहीची प्रतिगामी शासन यंत्रणा नव्या जोमाने कार्य करू लागली. पणिरामी, हाही झार क्रांतीकारकांच्या हल्ल्यात सन १८९४ मध्ये बळी पडला.

## स्वयं-अध्ययन प्रश्न - १

### अ) योग्य पर्याय निवडा.

१. सन १८५६ ............. च्या युध्दात एकतंत्री व प्रतिगामी नीतीच्या रशियाला उदारमतवादी पाश्चिमात्य राष्ट्रांकडून नामुष्की पत्करावी लागली.

*(अ) क्रिमियन* *(ब) पोलंड* *(क) सैबेरिया* *(ड) जॉर्जिया.*

२. झार दुसरा अलेक्झांडर याने भूदास पध्दत नष्ट करण्यासाठी .............. साली मुक्तीचा आदेश दिला.

*(अ) १८६०* *(ब) १८६१* *(क) १८६२* *(ड) १८६३.*

३. .............. ही रशियातील जहाल वादाचा जनक मानला जातो.

*(अ) अलेक्झांडर हेर्झेन* *(क) मेलिकोव्ह*

*(ब) बाकूनिन* *(ड) पोमोव्ह.*

४. झार तिसरा अलेक्झांडर हा ............ मध्ये क्रांतीकारकांच्या हल्ल्यात बळी पडला.

*(अ) १८९३* *(ब) १८९४* *(क) १८९५* *(ड) १९९६.*

### ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.

१. रशियन भाषेतील ‘नरोद’ हा शब्द कोणत्या अर्थाने वापरला जातो?

२. भूदास पध्दती नष्ट करून कोणत्या झारने ‘मुक्तीदाता’ ही पदवी मिळाली?

३. कोणत्या दोन विचारवंत लेखकांची छाप उदारमतवादी लोकांवर रशियात पडली होती?

४. कोणत्या मंत्र्याने झार दुसरा अलेक्झांडरला उदारमतवादाचा आश्रय घेण्यास सुचविले होते?

## १.२.२ झार निकोलस दुसरा याचा कालखंड (१८९४–१९१७)

सम्राट निकोलस द्वितीय हा रशियाचा अखेरचा झार ठरला. झार अलेक्झांडर तृतीय (इ. स. १८८१–१८९४) याचा तो मुलगा होता. झार अलेक्झांडर तृतीय सन १८९४ मध्ये आपल्या दडपशाहीच्या धोरणामुळे क्रांतीकारकांच्या बॉम्ब हल्ल्यात मारला गेला. त्यानंतर त्याचा मुलगा झार दुसरा निकोलस (सन १८९४) मध्ये सत्तेवर आला.

झार निकोलस दुसरा सत्तेवर येताच त्याने दडपशाहीच्या व अनियंत्रित मार्गाने राज्यकारभार करण्यास सुरवात केली. क्रांतीकारी विचार दडपून टाकण्यासाठी त्याने देशात अनेक कडक निर्बंध लावलेत. दुसरा निकोलस स्वभावाने साधा, सरळ, बोलण्यात, वागण्यात मृदू व आकर्षक, कुटुंबाविषयी फार प्रेम, जिव्हाळा असा होता. परंतु रशियाच्या तत्कालीन परिस्थितीत राज्यकर्ता म्हणून राष्ट्राला या गुणांचा कवडीइतकाही उपयोग नव्हता. बदलत्या राजकीय परिस्थितीची गरज ओळखण्याचा डोळसपणा, राजकीय दूरदृष्टी, अडचणीवर व संकटावर योग्य ती उपाययोजना करण्याची कल्पकता किंवा महत्वाच्या प्रश्नाबाबत विनाविलंब निर्णय घेऊन त्यांची ताबडतोब कणखरपणे अंमलबजावणी करण्याची क्षमता हे काहीच निकोलस मध्ये नव्हते. रशियातील तत्कालीन स्फोटक परिस्थितीला यशस्वीपणे तोंड देण्याची कुवत निकालेसमध्ये नव्हती. रशियात होत असलेल्या बदलाचे आकलन कोत्या दृष्टिकोनाच्या व दुबळ्या मनाच्या निकोलसला होवू शकले नाही. रशियाचा सम्राट म्हणून त्याच्या हाती आलेली सर्वाधिकारी राजसत्ता चालविण्याची त्याची जिद्द होती. परंतु त्याकरिता लागणारे खंबीर व्यक्तीमत्व व राजकीय शहाणपणा मात्र त्याच्यात नव्हता. त्याच्यावर त्याची पत्नी **झारिना अलेक्झांड्रा** हिचा मोठा प्रभाव होता. **अलेक्झांड्रा** ही अत्यंत हेकेखोर स्वभावाची असून चैनी व विलासी होती. तिला रशियन जनतेबद्दल अजिबात प्रेम व सहानुभूती नव्हती. ती मूळची जर्मन कन्या तसेच व इंग्लंडच्या राणी व्हिक्टोरियाच्या मुलगीची मुलगी होती. निकोलसपेक्षा तिचे व्यक्तीमत्व कणखर होते. त्यामुळे निकोलस लवकरच तिच्या प्रभावाखाली गेला. निकोलसपेक्षा ती प्रतिगामी मतांची होती.

रशियात **ग्रेगरी रासपुटीन** नावाच्या धर्मगुरूचे चांगलेच प्रस्थ होते. लोक त्याला **'भ्रष्ट धर्मगुरू'** किंवा **'पवित्र सैतान'** म्हणून ओळखीत. या रासपुटीनचा झार व झारिनावर जबरदस्त पगडा होता. त्याच्याजवळ दैवी शक्ती आहे अशी झारची समजूत होती. अशा प्रकारे तत्कालीन रशिया झार निकोलस द्वितीय, त्याची पत्नी व रासपुटीन ह्या जुलमी मनोवृत्तीच्या त्रिकुटाच्या तावडीत सापडली होती. स्वत: सम्राटच अविचारी असल्याने त्याचे अधिकारीही तसेच होते. निकोलसच्या कारकिर्दीच्या पूर्वार्धात त्याच्या सल्लागारापैकी प्रमुख होते ते **पबेदनोत्सेव** व **प्लेहवी**. या अधिकाऱ्यानी आपल्या मर्जीतील भ्रष्टाचारी, स्वार्थी लोकांना महत्त्वाची पदे दिली. या अधिकाऱ्यांनी आपल्या पदाचा दुरुपयोग करून स्वत:च्या चैनीसाठी प्रचंड प्रमाणात भ्रष्टाचार केला.

झार निकोलस दुसरा याच्या काळात एकीकडे राज्यकर्त्याची दडपशाही सुरू होती तर दुसरीकडे रशियाचा विकासही घडून येत होता. देशाच्या औद्योगिकीकरणाला गती मिळून कोळसा, लोखंड, पेट्रोल ह्यांचे उत्पादन वाढू लगले. जहाज बांधणीचा कार्यक्रम सुरू झाला. रशियाच्या ह्या विकासाला फ्रान्स

आर्थिक हातभार लावत होता. सन १९०२ मध्ये ट्रान्ससैबेरियन रेल्वेचे काम पूर्ण झाल्याने उद्योगांची व व्यापाराची वाढ झाली. ह्याच काळात रशियात क्रांतीकारी विचारांचाही प्रसार होत होता. त्याचा परिणाम म्हणून की काय सम्राट निकोलसने सुरवातीला उदार धोरणाचा अवलंब करण्याचा निर्णय घेतला. सन १९०४ साली **पिलन्ही** मारला गेला. त्याचवर्षी सम्राटाने उदारमतवादी राजपुत्र मिरस्कीला गृहमंत्री बनविले, तसेच **झेमस्टोन्हज**च्या प्रतिनिधींची बैठक बोलाविली. ह्या प्रतिनिधींनी देशात धर्म स्वातंत्र्य, विचार स्वातंत्र्य इत्यादी मागणी करून राष्ट्रीय संविधानाची तसेच कायदे बनविणाऱ्या आणि सरकारवर नियंत्रण ठेवणाऱ्या कायदे मंडळाची आवश्यकता प्रतिपादन केली. ह्या मागण्या झार ने मान्य न केल्याने देशातील असंतोष वाढला व त्यातूनच रशियन क्रांतीचा जन्म झाला.

## ❋ झार निकोलस दुसरा याचे अंतर्गत प्रशासन आणि शासकीय धोरणे :-

### १. दडपशाही व रूसीकरण :-

आपली अनियंत्रित सत्ता कायम टिकविण्यासाठी दुसरा निकोलसने प्रतिगामी दडपशाहीच्या व रुसीकरणाच्या तंत्राचा वापर केला. दडपशाहीचे शस्त्र शैक्षणिक संस्था व वृत्तपत्रे याविरुध्द विशेष तत्परतेने व कठोरपणे वापरण्यात आले. समाजातील खालच्या मुलांनी माध्यमिक शाळेत जावू नये आणि प्राथमिक शाळा स्थानिक समित्याकडून काढून घेऊन चर्चच्या हाती दिल्या जाव्यात असे प्रयत्न करण्यात आले. विश्वविद्यालयाची स्वायत्तता रद्द करून विद्यार्थी संघटनानाही बंदी घालण्यात आली. सरकारी हुकुमानुसार अभ्यासक्रमात बदल करण्यात आले. एवढेच नव्हे तर सुप्रसिध्द परदेशी लेखकांची पुस्तके रशियन बुध्दिवाद्यांपर्यंत पोहचू नयेत अशीही तरतूद करण्यात आली. सशस्त्र सैनिकांच्या साहाय्याने विद्यार्थ्यांच्या चळवळी व निदर्शने क्रूरतेने दडपून टाकण्यात आली. अनेक विद्यार्थ्यांना विद्यापीठातून हाकलून लावले गेले तर कित्येकांची रशियातूनच हकालपट्टी झाली. क्रांतीकरक मताच्या नुसत्या संशयावरून पोलीस देखरेख होऊ लागली तर वृत्तपत्रे व नियतकालिके यावर सरकारी नियंत्रणे लादली जावून त्यांची पूर्ण मुस्कटदाबी करण्यात आली.

याबरोबरच रुसीकरणाची नीतीही झार सरकारने तितक्याच कडकपणे राबविली. धर्म, संस्कृती, भाषा या सर्व बाबतीत ऐक्य साधण्याचे निमित्त करून फिनलंड, पोलंड, बाल्टिक प्रांत यांतील निरनिराळ्या वांशिक गटातील राष्ट्रीय भावना चिरडून टाकण्याचा चंग सरकारने बांधला. सन १८९० नंतर फिनलंडमध्ये रुसीकरण नीतीचे अविष्कार निरनिराळ्या स्वरूपात दिसू लागले. फिनलंडमध्ये उच्चशासकीय पदावरून फिनिश लोकांना काढून रशियनाचा भरणा करण्यात आला. कनिष्ठ दर्जाच्या नोकऱ्याकरिताही रशियन भाषेचे ज्ञान अनिवार्य मानले गेले. फिनलंडची राज्यघटना धाब्यावर बसवून तिथे सेक्रेटरी ऑफ स्टेटची नियुक्ती करण्यात आली. सन १९०० मध्ये रशियन भाषा फिनलंडची शासकीय भाषा घोषित केली. फिनिश लष्कर विसर्जित करण्यात येऊन त्याऐवजी रशियन लष्कर उभारले गेले. हेरगिरी, अकारण अटक, विनाचौकशी तुरुंगवास यांचे सत्र फिनलंडमध्ये सुरू झाले. पोलंडमध्येही व्यापार, उद्योगधंदे, शिक्षण या सर्व क्षेत्रात रशियन भाषा सक्तीची करण्यात आली. सार्वजनिक ठिकाणी जर्मन ऐवजी रशियन नावे दिली.

धर्मक्षेत्रातही याचे पडसाद उमटले. सनातन रशियन (रशियन ऑर्थाडॉक्सी) धर्माव्यतिरिक्त सर्व धर्माच्या अनुयायांवर दडपशाहीचा वरवंटा फिरविण्यात आला. रशियातील ज्यूनाही या नीतीचा जबरदस्त तडाखा बसला. ज्यूवर निर्बंध घालण्याकरिता एका पाठोपाठ एक कायदे करण्यात आले. विशिष्ट क्षेत्राबाहेर त्यांनी राहू नये सहजपणे देखरेख शक्य होईल अशा शहरातूनच रहावे असा नियम करण्यात आला. ड्यूमा निवडणूकीकरिता मतदानाचा अधिकार त्यांना नव्हता. माध्यमिक शाळा व विद्यापीठे यातील ज्यूंची संख्या मर्यादित ठेवण्यात आली. उच्च शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या ज्यूंना तर रशियाबाहेरच जावेच लागे. जमीन विकण्याचे व विकत घेण्याचे अधिकार ज्यूंना नव्हते. निरनिराळ्या धंद्यातील ज्यूंची संख्या मर्यादित असावी असे सरकारी धोरण होते. लष्करातील उच्च पदी त्यांची नेमणूक होत नसे. ज्यूवर अन्याय होत असतानाही रशियन पोलीस स्वस्थ होते. यामुळे मोठ्या संख्येने रशिया सोडून ज्यू अमेरिकेत जावून स्थायिक झाले.

## ❋ औद्योगीकरणाची सुरवात :-

एकोणिसाव्या शतकाच्या शेवटच्या दशकात रशियाची औद्योगिक प्रगती घडून आली. या औद्योगीकरणाबरोबरच निर्माण झालेल्या नव्या कामगार वर्गानेच अखेर झारशाहीला आव्हान देऊन त्या राजवटीचा शेवट घडवून आणला. फ्रान्सच्या सहकार्याने रशियाचे औद्योगीकरण द्रूत गतीने आकारास आले. ट्रान्स-सैबेरियन रेल्वेची निर्मिती रशियन भांडवलदारांनी आणि सरकारने गुंतविलेल्या रक्कमेतून करण्यात आली. सन १८९७ मध्ये सुवर्णप्रमाण वापरात आल्यानंतर फ्रान्स, बेल्जियम आणि ब्रिटन ह्या राष्ट्रांनी रशियाला भांडवल पुरविले. खाण उद्योग या भांडवलातूनच उभारले गेले. औद्योगीकरणाचा प्रत्यक्ष परिणाम राजकीय क्षेत्रात लवकरच दिसून आला. पिट्र्सबर्ग, मॉस्को इत्यादी शहरात कामगार वर्गाचे एकत्रीकरण होत गेले. साम्यवादी विचारांचा प्रभाव वाढू लागला.

२०व्या शतकाच्या सुरवातीला युरोपात आर्थिक मंदी आली. त्याचा परिणाम रशियातही झाला. पक्क्या मालाचे उत्पादन घटले आणि कित्येक कारखाने बंद पडले. त्यामुळे ठिकठिकाणी शेतकऱ्यांचे आणि कामगारांचे उठाव झाले. या उठावांना राजकीय रंग येवू देवू नये म्हणून शासनाने संपवाल्याना आर्थिक साहाय्य केले. अनेक प्रमुख विकसनशील उद्योग शासनाच्या पूर्ण नियंत्रणात होते. सेना, नौदल, रेल्वे मार्ग, आंतरिक जलमार्ग व सार्वजनिक बांधकाम यांच्या क्षमतेवर राष्ट्राचे भवितव्य निर्भर असल्याने कामगारवर्गाला आर्थिक जीवनात महत्त्व प्राप्त झाले. रशियाचा आर्थिक विकास जलद होत गेला. तथापि, अकार्यक्षम नोकरशाहीमुळे सुदृढ, स्वतंत्र अशा औद्योगिक व व्यापारी वर्गाच्या मार्गात अडचणी येत गेल्या. रशियातील लोकसंख्या साधन संपत्ती आणि यंत्रोद्योगाला आवश्यक अशी जलशक्ती ह्या सर्व गोष्टी असूनसुद्धा प्रशासकीय, भ्रष्टाचार, अक्षमता आणि स्वच्छंदता रशियाच्या विकास कार्याला हानीकारक ठरल्या.

## ❋ परराष्ट्रीय धोरण :-

औद्योगिकरण व परदेशी कर्जे यामुळे रशियन सरकारच्या परराष्ट्र धोरणावरही परिणाम झाला. रशियाला जर्मनीऐवजी फ्रान्सकडून कर्ज मिळू लागल्याने त्या दोन्ही राष्ट्रात सलोखा निर्माण होऊन त्याची परिणीती सन १८९४ च्या रशिया-फ्रान्स करारात झाली. शेजारील राष्ट्रातून आर्थिक शिरकाव करून

घेण्याचेही आटोकाट प्रयत्न १८९० नंतर रशियाने केले. इराणमध्ये रूसो-पर्शियन बँक उघडण्यात येऊन त्याद्वारा तेथील रशियांच्या व्यापाराला चालना मिळाली. रशियाचे जपान समुद्रावरील पूर्व टोक व्लादिवस्तोक युरोपीय रशियाशी जोडणाऱ्या ट्रान्स-सैबेरियन रेल्वेचे कामही सुरू करण्यात आले. या लोहमार्गाकरिता लागणारा बहुतांश पैसा रशियाला फ्रान्सकडून कर्ज रूपाने मिळाला होता. ५००० मैलापेक्षाही जास्त लांबीचा हा लोहमार्ग सन १९०५ मध्ये तयार झाला.

रशियाला स्वत:चे बारमाही खुले बंदर पाहिजे होते. हाच हेतू झार निकोलसच्या काळात परराष्ट्रीय धोरणाचा पाया ठरला. हा हेतू साध्य करण्यासाठी दार्दानेल्स व बॉस्फरस या सामुद्र धुण्यावर ताबा मिळविण्यासाठी आग्नेय युरोपमध्ये रशियाने कारवाया केल्या. तसेच पॅसिफिक महासागरातून संचार करता यावा या हेतूने आशियातील रशियाचा विकास घडवून आणला. त्याचवेळी मध्य आशिया चीनच्या भागातील मांचूरिया व कोटिया या भागामध्ये रशियाच्या साम्राज्यवादी कारवाया चालू राहिल्या. रशियाला आपल्या मैत्रीच्या जाळ्यात ओढण्याचे बिस्मार्कचे प्रयत्न काहीसे सफल झाले तरी नंतर विसाव्या शतकात फ्रान्स व ब्रिटन यांच्या गोटात रशिया सामील झाला.

## ❋ राजकीय पक्ष :-

औद्योगीकरणामुळे रशियातील शहरांमधून औद्योगिक कामगारांचा वर्ग तयार झाला, तसाच मध्यमवर्गीय भांडवलदार वर्गही तयार झाला. या दोन वर्गाचे संबंध समाजवादाच्या प्रसारामुळे सुरवातीपासूनच चांगले नव्हते. नव्या औद्योगिक व्यवस्थेत कामगारांना संघटना करण्यास बंदी होती व सरकार दरबारी आवाज उठविण्यास त्यांना प्रतिनिधीत्व नव्हते. समाजवादाच्या प्रसारास ही भूमिका अनुकूलच होती. मार्क्सवादाचा प्रसार जसाजसा होत गेला तसतसा कामगार संघटना राजकीय पक्षाच्या आश्रयाने स्थापन होऊ लागल्या. सन १८९८ साली **सोशॅलिस्ट डेमोक्रेटिक** पक्ष स्थापन झाला. जनतेला राजकीय हक्क मिळवून देणे, भांडवलदारांची हकालपट्टी, कामगारांना कमी तास व जास्त वेतन, हा त्यांचा प्रमुख कार्यक्रम होता व समाजवादी प्रजासत्ताक, स्थापन करण्यासाठी झारची साम्राज्यशाही उलथण्याची तयारी हवी होती. सन १९०३ साली या पक्षाचे रशिया बाहेर अधिवेशन भरले होते. पक्षाची संघटना कशी असावी. या प्रश्नावरून या अधिवेशनात दोन गट पडले. नंतर पक्षाच्या कार्यक्रमावरून या अधिवेशनात दोन गट पडले. नंतर पक्षाच्या कार्यक्रमावरून या गटातील मतभेद वाढत गेले. लेनिनच्या नेतृत्वाखाली बोल्शेविक गटाने क्रांतीकारी मार्गाचा आग्रह धरला, कामगार राज्य ताबडतोब निर्माण व्हावे, मध्यमवर्गाशी सहकार्य करण्याची जरूर नाही, सुधारणा ताबडतोब आल्या पाहिजेत, असे या गटास वाटत होते. प्लेखानोव्ह याच्या नेतृत्वाखाली मेन्शेव्हिक गट, हळूहळू ध्येय साध्य करावे, समाज शिक्षणातून समाजवादी राजवट निर्माण व्हावी, जरूर तर मध्यम वर्गीयांचे सहकार्य घ्यावे असे मानणारा होता.

सन **१९००** साली सोशलिस्ट **रिव्हॉल्यूशनरी पार्टी** हा दुसरा पक्ष स्थापन झाला. त्याचे लक्ष प्रामुख्याने जमिनीविषयी समस्यांकडे होते व शेतकऱ्यांच्या हितासाठी झटणारा पक्ष होता. शेतकरी वर्ग मुक्त झालेला असला तरी वाढली लोकसंख्या, जमीनीचा अपुरेपणा, उमराव वर्ग व मीर यांच्या कारवायांनी व

सरकारी अधिकाऱ्यांच्या दंडेलीने जमिनीची मालकी मिळण्यात येणाऱ्या अडचणी वगैरे परिस्थिती या पक्षाला नाहीशी करावयाची होती. शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी रशियाची राजकीय व आर्थिक व्यवस्था उखडण्याची या पक्षाची इच्छा होती.

संसदीय लोकशाहीचा पुरस्कार करणाऱ्या गटानेही रशिया बाहेर सन १९०३ मध्ये आपल्या पक्षाचे गुप्त अधिवेशन भरविले व **युनियन ऑफ लिबरेशन** हे नाव धारण केले. शहरामधील वेगवेगळ्या व्यवसायांमधील लोक व प्रगत विचाराचे उमराव या पक्षात होते. जमिनीच्या प्रश्नात त्यांना रस होताच, परंतु रशियाचे राष्ट्रीय ऐक्य टिकविण्यासाठी त्यांना झारचे अस्तित्व आवश्यक वाटत होते.

## ❋ १९०५ ची क्रांती :-

रशियातील अंतर्गत स्थिती स्फोटक बनलेली असताना परराष्ट्र आघाडीवरही रशियाला अपयश आले. रशियाच्या बाल्कन प्रदेशातील हालचालींना आळा बसल्याने झार ने आपले लक्ष अतिपूर्वेकडे वळविले. आशिवाच्या पूर्व किनाऱ्यावर उष्ण बंदर मिळावे ह्यासाठी रशिया प्रयत्न करीत होता. त्याद्वारे लेनिन ग्राड व पॅसिफिक महासागरातील पूर्वेकडचे उष्ण बंदर ब्लाडिओस्टॉक ही दोन टोके जोडली जाऊन व्यापारी व लष्करी हालचाली करणे रशियाला सोयीस्कर जाणार होते. ह्यावेळी युरोपीय साम्राज्यवाद चीनमध्ये थैमान घालीत होता. पण दुर्बल चीनचे लचके युरोपीय राष्ट्राकडून तोडले जात होते. रशिया ही या स्पर्धेत मागे राहिला नाही. त्याने **डेरियन** व **पोर्ट ऑर्थर** ही बंदरे पंचवीस वर्षाच्या कराराने चीनकडून मिळविली. तसेच ट्रान्स-सैबेरियन रेल्वे मांचूरियातून नेण्याची संमती प्राप्त करून घेतली. पोर्ट ऑर्थर म्हणजे रशियाचा पूर्वेकडील आरमारी तळ बनला. तसेच रेल्वे मार्गाच्या निमित्ताने मांचुरिया व कोरियात रशियाचा प्रभाव वाढू लागला. ही गोष्ट जपानच्या दृष्टीने धोक्याची होती, म्हणूनच १९०४ मध्ये रशिया-जपान युध्द झाले. त्यात रशियाचा पराभव होवू लागल्यामुळे असंतोष वाढला. जपानविरुध्द लढा तडकाफडकी बंद करणे रशियाला आवश्यक वाटले. त्याचे प्रमुख कारण १९०५ मध्ये रशियात झालेली क्रांती. झार निकोलसच्या रुसीकरणांच्या धोरणामुळे अल्पसंख्यांक प्रजा सरकारला तीव्र विरोध करू पहात होती. एक केंद्री, अकार्यक्षम व लोकविन्मुख झारशाहीविरुध्दचा असंतोष, मार्क्स प्रणित समाजवादी तत्वप्रणालीचा प्रचार व प्रभाव राजकीय व सामाजिक आर्थिक सुधारणांची मागणी, क्रांतीकारकांनी सुरू ठेवलेलं दहशतवादी सत्र, सरकारी अधिकाऱ्यांच्या हल्ला. यामुळे १९०५ च्या क्रांतीला वातावरण पोषक झाले. सन १९०५ मध्ये सेंट पीटर्सबर्गमध्ये हजारो कामगारांचा संप घडवून आणण्यात आला. राज्यशासन खिळखिळे झाले. संपवाल्यांनी फादर **गॅपोन** याच्या नेतृत्वाखाली निकोलसला आपल्या मागण्यासंबंधी अर्ज केला. शांततेने आलेल्या या मोर्चावर झारच्या राजवाड्यापाशी बेफाम गोळीबार झाल्याने शेकडो लोक मरण पावले. या **रक्तरंजित रविवार** ची बातमी देशभर पसरताच सर्वत्र संप आणि राजकीय निदर्शने यांना ऊत आला. देशात माजलेला हा प्रचंड सार्वत्रिक प्रक्षोभ व रूस-जपान युध्दात झालेला पराभवामुळे रशियाच्या साम्राज्याला धोका निर्माण झाल्यामुळे झारला आपले अस्तित्व टिकविण्यासाठी काहीतरी करणे भाग होते. झार दुसरा निकोलसने स्थानिक स्वराज्यसंस्थाच्या अधिकारात वाढ, वैयक्तिक स्वातंत्र्याची हमी, अशा जुजबी सुधारणा देऊ केल्या.

पण यामुळे कोणत्याच गटाचे समाधान झाले नाही. प्रत्येक क्षेत्रातील कामगार संप करू लागला. जमीनदारावर हल्ले होवू लागले. धान्याची दुकाने लुटली जावू लागली. या सर्व वादळापुढे नमते घेण्याचे निकोलसने ठरविले.

## ❋ दुसऱ्या निकोलसचा उदारमतवाद (१९०५–१९०७)

लागोपाठ अनेक फर्माने काढून निकोलसने अनेक सुधारणा जाहीर केल्या. धार्मिक सहिष्णुतेचे तत्व मान्य करून ज्यू लोकांवरील निर्बंध सैल केले. शेतकऱ्यांचा शेतसारा माफ केला. अल्पसंख्यांकांना स्वभाषेतून शिक्षण घेण्याची मुभा मिळाली. राजकीय गुन्हेगारांचे खटले नागरी न्यायालयापुढे चालण्यास सुरवात झाली. दडपशाहीचा सल्ला देणारे मंत्री काढून टाकण्यात आले. राष्ट्रीय विधीमंडळ निर्माण करण्याचे आवश्वासन दिले गेले. विटे सारखा उदारमतवादी मुख्यमंत्री म्हणून नेमला गेला. या घोषणांनीही वादळ शमेना म्हणून जास्त भरीव स्वरूपाच्या सुधारणा करणे निकोलसला भाग पडले. भाषण स्वातंत्र्य, मुद्रण स्वातंत्र्य, संघटना स्वातंत्र्य मान्य करण्यात आले. राष्ट्रीय विधीमंडळात (ड्युमामध्ये) सर्व वर्गाच्या प्रतिनिधीत्वासाठी प्रौढ मतदानाचे तत्व बव्हंशी मान्य झाले. ड्युमाच्या संमतीखेरीज कोणताही कायदा जनतेला बंधनकारक ठरणार नाही, सरकारी अधिकाऱ्यांच्या कामावर लोक प्रतिनिधींची देखरेख राहील. हे मुद्देही निकोलसच्या जाहीरनाम्यात होते. १९०६ साली शेतसारा निम्मा माफ केला, तर १९०७ पासून सर्व शेतजमिनी करमुक्त करण्यात आल्या. फिनलंडला परत स्वत:ची राज्यघटना बनविण्यास संमती देऊन पूर्वीचे स्वायत्ततेचे हक्क बहाल करण्यात आले.

## ❋ संविधानिक शासनाचा कालखंड :–

झारच्या घोषणेनुसार सन १९०६ मध्ये निवडणूक होऊन पहिली ड्यूमा अस्तित्वात आली. त्यात केडेट नावाच्या पक्षाला बहुमत मिळाले. ड्यूमाने रशियात सुधारणा आणण्याची इच्छा प्रकट केली. त्याचबरोबर राजकीय गुन्हेगारांना क्षमा दिली जावी, देशातील लष्करी कायदे मागे घेतला जावा, मंत्रीमंडळ ड्युमाला जबाबदार असावे, झार व धर्मसंस्थेच्या जमिनी दीर्घ मुदतीसाठी शेतकऱ्यांना दिल्या जाव्यात अशा मागण्या होत्या. ह्या मागण्यांवरून विशेषत: मंत्रीमंडळ ड्यूमाला जबाबदार असण्याच्या प्रश्नावरून ड्यूमाचे कामकाज जवळ जवळ बंद पडले आणि जुलै १९०६ मध्ये झार निकोलसने ड्यूमा बरखास्त केली. ह्या ड्यूमाने आपल्या केवळ दोन महिन्याच्या (मे, जुलै १९०६) कारकिर्दीत चांगली कामगिरी बजावून शासनाच्या कार्यपध्दतीवर टीका केली. ह्यानंतर मार्च १९०७ मध्ये द्वितीय ड्यूमा अस्तित्वात आली. ह्यावेळी प्रधानमंत्री पदावर स्टॉलिपीनची नियुक्ती करण्यात आली. ह्या ड्यूमाने पहिल्या ड्यूमाच्या बरखास्तीबद्दल असंतोष व्यक्त केल्याने प्रारंभापासून ड्यूमा व मंत्रीमंडळात मतभेद उद्‌भवले. परिणामी क्रांतीकारी विचारांच्या प्रसाराचा आरोप ठेवून ड्यूमाच्या १६ सदस्यांना अटक करण्यात आली. त्यामुळे ड्यूमा झारशी संघर्ष करण्याची तयारी करू लागली. त्याची परिणती अखेर जून १९०७ मध्ये ड्यूमा बरखास्त होण्यात झाली. नवीन ड्यूमाच्या निवडणूकीची घोषणा तयार करताना झारने निवडणूक कायद्यात बदल करून अधिकांश

सदस्य जमीनदारांकडून निर्वाचीत होण्याची व्यवस्था केली. जनतेने त्याला विरोध दर्शविला. अशा स्थितीत नोव्हेंबर १९०७ मध्ये तृतीय ड्यूमाचे अधिवेशन सुरू झाले. त्यात जमीनदारांचे व प्रतिगामींचे प्रतिनिधीत्व जास्त असल्याने ही ड्यूमा सारख्या इच्छेप्रमाणे कार्य करणारी होती. साहजिकच रशियात पुन्हा प्रतिगाम्यांचा वरचष्मा प्रस्थापित झाला व सुधारणावादी चळवळ मागे पडली. पाच वर्षांच्या कार्यकाळानंतर १९१२ मध्ये निवडून आलेले शेवटचे ड्यूमाही असेच झारला अनुकूल होते व ही निवडून आलेली चौथी ड्यूमा ही पहिल्या महायुद्धाच्या काळापर्यंत अस्तित्वात होती. एकंदरीत १९१४ पर्यंत अनियंत्रित राजसत्तेऐवजी संसदीय राज्यपद्धती रशियात रूढ करण्याचे झार विरोधी गटाचे सर्व प्रयत्न विफलच ठरले.

## ❋ पहिल्या महायुद्धाच्या उंबरठ्यावरील रशिया व अनियंत्रित झारशाहीचा शेवट :-

सन १९०५ ते १९१४ या काळात रशियाची अंतर्गत परिस्थिती स्फोटकच होती. झारशाहीच्या कटोर दडपशाहीमुळे शेकडो क्रांतीकारकांना व विरोधकांना मृत्यूदंडाच्या शिक्षा दिल्या जात होत्या. कित्येक क्रांतीकारक रशिया सोडून परदेशात जाऊन राहिले होते. तर दुसरीकडे जहाल विरोधकांनीही सरकार उलथून पाडण्याकरिता कारस्थाने करण्याचे व सहानुभूतीशून्य सरकारी अधिकाऱ्यांचे खून करण्याचे सत्र चालू ठेवले होते. राजकीय व आर्थिक उद्दिष्टांच्या सिध्दीकरता सोशल डेमॉक्रॅटिक पक्षाचा कामगार वर्गात अविरत व प्रभावी प्रचार चालूच होता. कामगार वर्गातील असंतोषही वाढतच गेला. संप व राजकीय हत्या मोठ्या प्रमाणावर होवू लागल्या. सन १९११ तर प्रधानमंत्री **स्टोलिपिन**ही मारला गेला. त्याच्यानंतर आलेले मंत्रीही प्रतिगामी प्रवृत्तीचे होते. १९१४ पर्यंत सेंट पीट्सबर्गच्या कामगार वर्गात क्रांतीच्या तत्वज्ञानाचा प्रचार फार मोठ्या प्रमाणात झालेला होता. राजधानीचे वातावरण क्रांतीकारक संपानी व रस्त्या-रस्त्यावर घडणाऱ्या उघड चकमकींनी प्रशुब्ध झाले होते. मोर्चे, निदर्शने, सभा, घोषणा यांना ऊत आला होता. सन १९१४ मध्ये पहिले महायुद्ध भडकले नसते तर क्रांतीचा डोंब जो पुढे सन १९१७ मध्ये उसळला तो अगोदर सन १९१५ च्या पूर्वार्धात उसळला असता. बाल्कन प्रदेशातील साम्राज्य विस्ताराच्या अपेक्षेने रशियाने सर्बियाला पाठिंबा देऊन पहिल्या जागतिक युद्धात पदार्पण केले होते. परंतु सुरवातीचे काही दिवस विजयाचे सोडले तर सर्वत्रपराभवाला तोंड देण्याची नामुष्की आली. मुळातच युध्द खेळण्याची ताकद व सामर्थ्य रशियन सैन्यात नसल्यामुळे जर्मनीकडून रशियाला युध्द आघाडीवर पराभवामागून पराभव पत्करावे लागले होते. सर्वच आघाड्यावर रशियाची पीछेहाट झाली. यातच झारने नवीन लष्करी भरती सुरू करून हजारो शेतकरी व कामगारांना लष्करात भरतीची सक्ती केली. परिणामी कृषी उत्पादनात घट होऊन जीवनावश्यक वस्तूंची टंचाई निर्माण झाली. शेतकरी व कामगारांना लढाईचे प्रशिक्षण नसल्यामुळे हकनाक त्यांचा बळी पडू लागला. पहिल्या महायुद्धात जवळजवळ १७ लक्ष रशियन सैन्य ठार झाले तर ५० लक्ष जखमी झाले. युध्दात कोट्यावधी रूबल्सची आर्थिक हानी झाली. याचबरोबर जर्मनीकडून युध्दात होत असलेल्या पराभवामुळे जागतिक राजकारणात रशियाची नामुष्की झाली. साहजिकच युध्दातील या नामुष्कीला झार निकोलस दुसऱ्याची अकार्यक्षमता व दुर्बलता कारणीभूत आहे, अशी भावना रशियन जनतेत वाढीस लागली. या संधीचा फायदा घेणारा लेनिनसारखा कुशल नेता नियतीने रशियाला दिला आणि लवकरच लेनिने क्रांतीचे

नेतृत्व स्वीकारून योजनाबध्द १९१७ मार्चची क्रांती घडवून आणली. परिस्थिती हाताबाहेर गेल्यामुळे १५ मार्च १९१७ रोजी झारने सत्ता त्याग केला; परंतु क्रांतीकारकांनी झार निकोलस दुसरा व त्याच्या कुटुंबियांना सैबेरियातील उरल पर्वताच्या पायथ्याशी असलेल्या **तोबोल्कस** येथील तुरुंगात रवाना केले. रशियातील ही राज्यक्रांती यशस्वी होवून तीनशे वर्षांपासून सत्तेवर असलेल्या **रोमॅनोव्ह** घराण्याची राजवट अस्तास गेली. झार व त्याच्या कुटुंबियांना तुरुंगात ठेवणे धोकादायक वाटल्याने १६ जुलै १९१८ रोजी त्यांना गोळ्या घालून ठार मारण्यात आले. झार व त्याच्या कुटुंबियांची हत्या केल्याने रशियातील झारची सत्ता संपुष्टात येऊन नवीन प्रजासत्ताकांचे युग रशियात सुरू झाले.

## स्वयं-अध्ययन प्रश्न - २

### अ) योग्य पर्याय निवडा.

१. रशियाच्या ट्रान्स-सैबेरियन रेल्वेचे काम पूर्ण करण्यासाठी युरोपातील ........... या राष्ट्राने आर्थिक मदत केली.

*(अ) फ्रान्स* *(ब) जर्मनी* *(क) इंग्लंड* *(ड) इटली.*

२. सोशॅलिस्ट डेमोक्रॅटिक पक्षाची स्थापना ........... झाली.

*(अ) १८९०* *(ब) १८९५* *(क) १८९८* *(ड) १९००.*

३. रशियामध्ये द्वितीय ड्युमा ............. अस्तित्वात आली.

*(अ) १९०६* *(ब) १९०७* *(क) १९०८* *(ड) १९०९.*

४. डेरियन व पोर्ट ऑर्थर ही बंदरे पंचवीस वर्षाच्या कराराने रशियाने ........... कडून मिळविली.

*(अ) कोरिया* *(ब) जपान* *(क) चीन* *(ड) अमेरिका.*

### ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.

१. झार निकोलस दुसरा याच्यावर कोणत्या धर्मगुरूचा प्रभाव होता?

२. रशियामध्ये पहिली ड्यूमा कधी अस्तित्वात आली?

३. झार निकोलस दुसरा याच्या वडिलांचे नाव काय?

४. रशियाने चीनकडून पंचवीस वर्षाच्या करारावर कोणती बंदरे मिळविली?

## १.२.३ रशिया-जपान युध्द (१९०४-०५) व त्याचे महत्त्व

इ.स. १९०४-०५ मध्ये रशिया व जपान मधील झालेले युध्द हे झार च्या साम्राज्यवादी धोरणामुळेच घडून आले. हे युध्द जपानच्या भूमीवर किंवा रशियाच्या भूमीवर न होता, चीनच्या भूमीवर लढले गेले. कोरियाच्या प्रश्नावरून या दोन्ही देशात हे युध्द झाले. कोरिया भौगोलिकदृष्ट्या चीन, रशिया व

जपानच्या दरम्यान असून जपानपासून तो फारच जवळ आहे. कोरिया हा चीनचा मांडलिक असून अंतर्गत बाबतीत स्वायत्तता असला तरी पुढे चीनच्या माचू राजांनी कोरियावर आपले वर्चस्व प्रस्थापित केले होते. परंतु जपानने कोरिया हे चीनचे मांडलिक राष्ट्र आहे, यास कधीच मान्यता दिली नाही. जपान व चीन यांच्यातील राजकीय मतभेद वाढीस जावून इ.स. १८९४-१८९५ मध्ये युध्द घडून आले. या युध्दात जपानचा विजय झाला. १७ एप्रिल १८९५ मध्ये शिमोनोस्की येथे तह होवून चीनने शरणागती स्वीकारली. या तहानुसार चीनने कोरियाचे सार्वभौमत्व मान्य केले, तसेच चीनने जपानला फार्मोसा, पेस्कोडोरेसा व दक्षिण मांचुरियातील.लिआतुंग द्वीकल्प इत्यादी प्रदेश द्यावेत, त्याशिवाय चीनने जपानला २० कोटी टायल इतकी युध्दखंडणी देण्याचे ठरले. चीनने जपानला जी प्रचंड रक्कम द्यावयाची होती, त्यासाठी रशियाकडून प्रचंड आर्थिक मदत घेतली.

रशियाने दिलेल्या आर्थिक मदतीमुळे चीनमध्ये रशियाचा हस्तक्षेप वाढला. लवकरच रशियाने डेरियन व पोर्ट ऑर्थर ही बंदरे काही वर्षाच्या कराराने चीनकडून मिळवली. तसेच ट्रान्स सैबेयिन रेल्वे मांचुरिया प्रांतातून नेण्याची चीनकडून परवानगी मिळविली. रशियाला रेल्वे मार्गाच्या निमित्ताने मांचुरिया व द. कोरियात हस्तक्षेप करण्याची संधी मिळाल्याने जपानच्या साम्राज्यवादाला धोका निर्माण झाला. जपानला मांचुरिया हा भौगोलिक व सांपत्तिक दृष्टीने आवश्यक असल्याने रशियाच्या वाढत्या हस्तक्षेपाला रोखण्यासाठी जपानने सन १९०२ मध्ये इंग्लंडबरोबर मैत्रीचा तह केला. या तहामुळे जपानचा आत्मविश्वास वाढून ८ फेब्रुवारी १९०४ रोजी जपानने पोर्ट ऑर्थर बंदरावर हल्ला केला आणि रशिया-जपान युध्दाला सुरवात झाली.

हे युध्द एक पाश्चिमात्य शक्तीशाली रशिया व एक पौर्वात्य, चिमुकला जपान यातील असल्याचे दिसत असले तरी वस्तुस्थिती मात्र त्यापेक्षा निराळीच ठरली. लष्करसंख्या व साधनसामुग्री असूनही सर्व शक्तीनिशी लढणे रशियाला शक्य झाले नाही. कारण युध्दक्षेत्र रशियापासून फार दूर होते. ते हजारो मैलांचे अंतर कापून सैन्य. शस्त्रास्त्रे, दारूगोळा व इतर युध्द साहित्य एकेरी ट्रान्स सैबेरियन रेल्वेद्वारा पूर्वेकडे रणक्षेत्रापर्यंत पोहोचविणे हे रशियाला अत्यंत अवघड गेले. १९०४ च्या हिवाळ्यात लिओयांगच्या युध्दात मुख्य रशियन फौजेचा दणदणीत पराभव जपानने केला. १९०५ या प्रारंभी पोर्ट ऑर्थर जपानने जिंकले.

सागरी युध्दातही रशियाला हार खावी लागली. सप्टेंबर १९०४ मध्ये बाल्टिक समुद्रातून निघालेल्या ३६ मोठ्या रशियन युध्दनौका १९०५ च्या उन्हाळ्यात युध्द क्षेत्रापर्यंत येऊन पोहचल्या. जपानच्या समुद्रावर नियंत्रण प्रस्थापित करण्यात या आरमाराला यश मिळाले असते तर जपान व मंच्युरियातील जपानी लष्कर यांचा संपर्क तोडणे व किनाऱ्यावरील जपानी शहरावर तोफांचे हल्ले करणे रशियाला शक्य झाले असते. परंतु आत्मविश्वासाचा पूर्ण अभाव असलेल्या या रशियन आरमाराचा ॲडमिरल **टोगोच्या** नेतृत्वाखालील जपानी आरमाराने सपशेल पराभव केला. बऱ्याच रशियन युध्द नौकांना जलसमाधी मिळाली. तर उरलेली जपान्यांनी पकडल्या. जेमतेम ६ नौका निसटल्या. त्या बंदरातून अडकून पडल्या तर ३ अगदीच छोट्या बोटी ब्लादिवस्तोकला येऊन पोहचल्या. या सागरी पराभवामुळे युध्दाचा निकालच लागला. पराभवामुळे रशियन सेनापती जनरल **कुरोपाटकिन** ने राजीनामा दिला.

या परिस्थितीत जर्मन कैसर दुसरा विलियम व अमेरिकेचा अध्यक्ष रुझवेल्ट यांनी मध्यस्थी केली. जास्तीचे सैन्य व साधनसामुग्री पूर्वेकडे पाठवून युध्द चालू ठेवणे रशियाला अगदी अशक्य होते असे नाही परंतु जपानविरुध्द झालेल्या पराजयाने रशियात वर्षानुवर्षे धुमसणाऱ्या झार सरकार विरोधी असंतोषाचा भडका उडालेला होता. त्यामुळे त्या राष्ट्रांनी लावलेली मध्यस्थीची व युध्दबंदीची बोलणी रशियाला स्वागतार्हच वाटली. युध्दात झालेला बेसुमार खर्च जपानलाही डोईजड झाला होता. त्यामुळे जपानही तहाला अनुकूल होते. त्यानुसार रशियन व जपानी प्रतिनिधींच्या भेटी होवून चर्चा झाली, वाटाघाटी झाल्या व त्याप्रमाणे **'पोर्टस माऊथ'**चा तह झाला (५ सप्टेंबर १९०५).

## ❋ 'पोर्टस माऊथ'चा तह (१९०५)

अमेरिकन प्रेसिडेंट थिओडोर रूझवेल्ट त्यानी ३१ मे रोजी मध्यस्थी केली. अमेरिकन राष्ट्राध्यक्षाने अमेरिकेत येवून तह करावा असे उभय राष्ट्रांना सुचविले. रशियाने वाटाघाटीसाठी दोन प्रतिनिधी पाठविले आणि जपाननेही आपले दोन प्रतिनिधी पाठविले. २० दिवसापर्यंत वाटाघाटी होऊन तहाची कलमे ठरली ती पुढीलप्रमाणे :-

१. कोरियाला जपानचे प्रभाव क्षेत्र मानण्यास रशियाने संमती दिली.

२. साखालिन बेटाचा दक्षिण भाग जपानला मिळाला.

३. लियाओ-तुंग प्रदेश पुन्हा जपानला प्राप्त झाला.

४. मांचूरिया रेल्वेमार्गाची दक्षिण शाखा जपानला मिळाली.

५. मांचूरियातील आपापले सैन्य काढून घेण्यास रशिया व जपान दोन्ही राष्ट्रांनी मान्यता दिली.

६. मांचूरियातील रेल्वेमार्गाचा उपयोग लष्करी हालचालीसाठी केला जाणार नाही.

७. मांचूरियाच्या आर्थिक विकासाच्यादृष्टीने चीन जे काही करील त्यात अडथळे न आणण्याचे रशिया व चीनने कबूल केले.

वरील कलमाशिवाय बेअरिंगच्या समुद्रात मासेमारीचा हक्कही जपानला दिला गेला. युध्द खर्च देण्याचे रशियाने साफ टाळले.

## ❋ रशिया जपान युध्दाचे महत्त्व-परिणाम :-

१. हे युध्द रशिया जपानमध्ये झाले असले तरी त्याचे परिणाम हया दोन राष्ट्रापुरतेच मर्यादित न राहता पौर्वात्य आणि पाश्चिमात्य हयांच्या राजकारणावर पडले. अतिपूर्व क्षेत्रात आपला प्रभाव वाढविण्याच्या रशियाच्या महत्वाकांक्षेमुळे हे युध्द उद्‌भवले. परंतु रशियाचा पराभव झाल्याने रशियाच्या सामर्थ्याची लक्तरे वेशीवर टांगली गेली. त्यामुळे रशियातील क्रांतीकारकाना बळ मिळून तेथील कामगारांनी २२ जानेवारी १९०५ रोजी सेंट-पिट्र्स बर्ग येथे एक विशाल मोर्चाचे

आयोजन केले. पोलिसांनी मोर्चावर केलेल्या गोळीबारात शेकडो कामगार ठार झाले. परिणामी रशियात जागोजागी उठाव झाले.

२. रशियाच्या पराभवामुळे दुसरी एक गोष्ट सिध्द झाली आणि ती म्हणजे झारच्या सत्तेची दुर्बलता! आधीच रशियात झार विरोधी वातावरण होते. हयातून येथे १९०५ चा प्रसिध्द उठाव झाला. आपल्या लष्करी सामर्थ्याच्या जोरावर झारने आपल्या विरुध्दचा हा उठाव मोडून काढला तरी त्याला देशात काही सुधारणा करणे भाग पडले. पुढे हयातूनच १९१७ ची रशियन क्रांती होऊन झारची सत्ता समाप्त करण्यात आली.

३. युध्दातील पराभवाने स्वत:ला असुरक्षित समजून रशिया मित्र शोधू लागला. युध्दकाळातच रशियाला मित्र बनविण्याचे जर्मन सम्राट कैसर विल्यम द्वितीयचे प्रयत्न सुरू होते, त्यादृष्टीने जुलै १९०५ मध्ये विल्यम द्वितीय व रशियाचा झार निकोलस द्वितीय हयांची भेट होऊन त्यात असे ठरले की, कोणत्याही युरोपियन शक्तीच्या आक्रमणाच्या स्थितीत दोघांनीही परस्परांच्या मदतीला धावून जावयाचे. युरोपातील हया दोन मोठ्या राष्ट्रांच्या समझोत्यामुळे हॉलंड, बेल्जियम, डेन्मार्क, नॉर्वे, स्विडनसारखी राष्ट्रे त्यांना येवून मिळतील अशी आशा निर्माण झाली. परंतु वरील तहाला रशियाच्या परराष्ट्र मंत्र्याने विरोध दर्शविला. फ्रान्सनेही विरोध केला. लवकरच केलेल्या कृत्याचा झारला पश्चाताप होऊ लागला. त्याने जर्मनीशी झालेला तह नाकारला. हया घटनेनंतर मैत्री तहाबाबत रशिया व इंग्लंडमध्ये वाटाघाटी सुरू झाल्या, त्यात यश येवून १९०७ मध्ये रशिया व इंग्लंड यामध्ये तह होवून युरोपमध्ये जर्मनीच्या विरोधात **इंग्लंड, फ्रान्स, रशिया** असा नवा शक्तिशाली मित्रसंघ अस्तित्वात आला. युरोप अशाप्रकारे दोन गटात विभागला गेला.

४. युध्दानंतर झालेल्या पोर्टसमाऊथच्या तहामुळे पूर्व आशियात जपानचे स्थान अतिशय बळकट झाले. कोरियात जपानचे प्रभुत्व निर्माण झाले. जपान साम्राज्यवादी शक्ती मानला जावू लागला. त्याच्याइतका शक्तिशाली व प्रगत देश संपूर्ण आशियात दुसरा कोणताच नसल्याने आशियाचे नेतृत्व करण्याची अभिलाषा जपानमध्ये उदयास आली. लवकरच जपानने कोरिया गिळंकृत केला (१९१०) व मांचुरियावर पाश आवळण्यास सुरवात केली.

५. रशिया-जपान युध्द कोरिया व मांचुरियाच्या प्रदेशात लढले गेले. हा प्रदेश चीनचा संरक्षित असूनही आपल्या दुर्बल स्थितीमुळे त्याला काहीच करता आले नाही. मात्र त्यामुळे चीनचे डोळे उघडून तो पूर्णत: जागा झाला. येथूनच चीनमध्ये राष्ट्रभावना जागृत झाली. त्याचबरोबर मांचू शासनाला देशात काही सुधारणा कराव्या लागल्यात. मात्र राष्ट्रवाद्यांचा जोर वाढत जाऊन १९११ मध्ये चीनमधून मांचू राजवट समाप्त झाली व चीन प्रजासत्ताक बनला.

६. युरोपीय देश अजिंक्य मानल्या जाण्याचा तो काळ होता. अशा अवस्थेत जपानसारख्या एका आशियाई राष्ट्राने रशियासारख्या पाश्चिमात्य शक्तीचा पराभव करताच संपूर्ण जग आश्चर्यचकित

झाले. त्याचे पूर्वेच्या इतिहासावर दूरगामी परिणाम झाले. जवळजवळ सर्वच आशिया पश्चिमेच्या साम्राज्यवाद्यांचे भक्ष बनला होता. हया साम्राज्यवाद्यांना पराभूत करता येऊ शकते हा नवा धडा मिळाला. त्यामुळे आशियात विशेषत: पूर्व भागात चैतन्य निर्माण झाले. भारत, इंडोनेशिया वैगरे प्रदेशात राष्ट्रीय आंदोलने सुरू होतीच. परंतु रशिया, जपान युध्दानंतरच्या काळात त्यांना जोरदार चालना मिळाली.

७. 'आशियाची लोकांसाठी आशिया' हे घोषवाक्य, पाश्चात्यांच्या वसाहतवाद आणि साम्राज्यवाद नष्ट करण्याचे ध्येय राष्ट्रवाद्यांनी जनतेसमोर ठेवले. जपानचा हा पराक्रम आशियाच्या राजकीय जागृतीचा प्रारंभ होता.

## स्वयं-अध्ययन प्रश्न - ३

### अ) योग्य पर्याय निवडा.

१. रशिया-जपान युध्द (१९०४-१९०५) .......... या प्रदेशावरून लढले गेले.

*(अ) **कोरियन*** *(ब) फ्रान्स* *(क) इटली* *(ड) इंग्लंड.*

२. रशिया-जपान युध्दात जपानचा ॲडमिरल ........... याने महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडली.

*(अ) कुरोपाटकिन* *(क) किम्-ओ-क्युम*

*(ब) **टोगो*** *(ड) कोमुरा जुतारो.*

३. रशिया-जपान युध्दात ............. या अमेरिकन राष्ट्राध्यक्षाने मध्यस्थी केली.

*(अ) **थिओडोर रूझवेल्ट*** *(क) लिंडन बी जॉन्सन*

*(ब) हॅरीट्रमन* *(ड) रिचर्ड निक्सन.*

४. ............ च्या तहानुसार रशिया-जपान युध्द वाटाघाटी होऊन युध्द समाप्ती झाली.

*(अ) साखलिनचा तह* *(क) मांचुरियाचा तह*

*(ब) **पोर्ट्समाऊथचा तह*** *(ड) लिआओचा तह.*

### ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.

१. रशियाने कोणती बंदरे चीनकडून काही वर्षाच्या कराराने मिळविली होती?

२. ८ फेब्रुवारी १९०४ रोजी जपानने कोणत्या बंदरावर हल्ला करून रशिया-जपान युध्दास सुरवात केली?

३. रशिया-जपान युध्दा रशियन सेनापती कोण होता?

४. रशिया-जपान युध्दाच्यावेळी रशियात कोणाची राजवट होती?

## १.३ सारांश

युरोपमधील सर्वात मोठे रशिया हे राष्ट्र एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात राजकीय, सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिकदृष्ट्या सुधारणेच्या दृष्टीने इतर राष्ट्रांच्या तुलनेने मागासलेले होते. एककेंद्री अकार्यक्षम व लोकविन्मुख झारशाहीबद्दलचा असंतोष, मार्क्सप्रणीत समाजवादी तत्वप्रणालीचा प्रचार व प्रभाव राजकीय, साामजिक व आर्थिक सुधारणांची सर्वच पक्षाकडून अधिकाधिक अट्टाहासाने मांडली जात असणारी मागणी, क्रांतीकारकांनी सुरू ठेवलेले दहशतवादाचे सत्र सरकारी अधिकारी यांच्या हत्या अशा अनेक कारणांमुळे नव्या शतकाच्या प्रारंभी संपूर्ण रशियन राष्ट्र ढवळून निघाले होते. झारशाहीविरुधद उठावांचा प्रक्षोभ दिवसेंदिवस उग्र होत गेला. झारच्या आंधळ्या सरकारला बदलत्या काळाची पाऊले ओळखता आली नाही व ही संधी निघून गेली यामुळे सुधारणावादी चळवळीने क्रांतीचे रूप धारण केले. या क्रांतीने केवळ राजसत्ता नव्हे तर रशियन समाजाचा चेहरा मोहराच बदलला. दुसऱ्या अलेक्झांडरने केलेल्या सुधारणामुळे मागासलेल्या मध्ययुगीन रशियाचे सुधारणामुळे आधुनिक राष्ट्रात परिवर्तन होण्यास प्रारंभ झाला. तर तिसऱ्या अलेक्झांडरच्या काळातही दडपशाही आणि प्रतिगामी शासन यंत्रणा जोमाने कार्यरत राहिली. परिणामी दहशतवादी हल्यात दुसरा व तिसरा अलेक्झांडर बळी पडले.

झार निकोलस दुसरा याच्या काळात तर एकीकडे दडपशाही सुरू होती तर दुसरीकडे रशियाचा विकासही घडून येत होता. याच काळात रशियात क्रांतिकारी विचारांचा प्रसार होत गेला. क्रांतीपर्यंत प्रतिगामी दडपशाहीच्या व रूसीकरणाच्या तंत्राचा अवलंब रशियात होत राहिला. जनतेच्या असंतोषाचा क्रांतीच्या रूपाने स्फोट होण्याची लक्षणे दिसत असूनही आडमुठ्या व अदूरदृष्टीच्या झारच्या धोरणात काहीही बदल घडून आला नाही. त्यातच १९०४-०५ झालेल्या रशिया-जपान युध्दात बलाढ्य रशियाचा जपानसारख्या एका छोट्या पौर्वात्य राष्ट्राने पराभव करताच संपूर्ण जग आश्चर्यचकीत झाले. त्याचे पूर्वेच्या इतिहासावर दूरगामी परिणाम झाले. जवळजवळ सर्वच आशिया पाश्चिमात्य साम्राज्यवाद्यांचे भक्ष बनलेला असताना हया साम्राज्यवाद्यांना पराभूत करता येवू शकते हा नवा धडा मिळाला. त्यामुळे आशिया विशेषत: पूर्व भागात चैतन्य निर्माण झाले. भारत, इंडोनेशिया वगैरे प्रदेशात राष्ट्रीय आंदोलने सुरूच होतीच. परंतु रशिया-जपान युध्दानंतर त्यांना जोरदार चालना मिळाली.

## १.४ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

- **नरोद** – रशियन भाषेतील हा शब्द अलीकडे जनता किंवा राष्ट्र या नावाने वापरला जातो. भूदास व स्वतंत्र असलेले शेतकरी यांना नरोद म्हणत.
- **निहिलिझम** – बुध्दीवादी, नवनिर्मिती करणारा, जुन्या रूढी, रिवाज, अंधश्रध्दा बदलणारा वर्ग.
- **रोमॅनोव्ह** – १७ व्या शतकापासून रशियात 'रोमॅनोव्ह' घराणे राज्यकारभार करीत होते. रशियन सम्राटाला 'झार' असे म्हणत.

- **रूसीकरण –** धर्म, संस्कृती, भाषा या सर्व बाबतीत ऐक्य साधण्याचे निमित्त करून फिनलंड, पोलंड, बाल्टीक प्रांतातील निरनिराळ्या वांशिक गटातील राष्ट्रीय भावना चिरडून, प्रतिगामी दंडनितीचा अवलंब करून रशियनकरण करणे.
- **डयुमा –** रशियाचे राष्ट्रीय विधीमंडळ.
- **भूदास प्रथा –** पंधराव्या शतकातील रशियन सरंजामदारांनी अनेक लहान शेतकऱ्यांना आपल्या शेतावर राबवायला सुरुवात केली यातूनच भूदास प्रथा विकसित झाली. भूदासाची मूलेही भूदासच बनत. त्यांची परिस्थिती अतिशय वाईट होती, एकाप्रकारे ते गुलामच होते.

## १.५ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

### स्वयं-अध्ययन प्रश्न – १ उत्तरे :-

**अ)** १. *(अ) क्रिमियन.*

२. *(ब) १८६१.*

३. *(ब) बाकूनिन.*

४. *(ब) १८९४.*

**ब)** १. *जनता किंवा राष्ट्र.*

२. *झार दुसरा अलेक्झांडर.*

३. *अलेक्झांडर हेर्सेन व मायकेल बुकानिन.*

४. *मेलिकोव्ह.*

### स्वयं-अध्ययन प्रश्न – २ उत्तरे :-

**अ)** १. *(अ) फ्रान्स.*

२. *(क) १८९८.*

३. *(ब) १९०७.*

४. *(क) चीन.*

**ब)** १. *ग्रेगरी रासपुटीन.*

२. *१९०६ साली.*

३. *झार अलेक्झांडर तृतीय.*

४. *डेरियन व पोर्टऑर्थर.*

❋ **स्वयं-अध्ययन प्रश्न - ३ उत्तरे :-**

**अ)** *१. (अ) कोरियन.*

*२. (ब) टोगो.*

*३. (अ) थिओडोर रूझवेल्ट.*

*४. (ब) पोर्ट्समाऊथचा तह.*

**ब)** *१. डेरियन व पोर्टऑर्थर*

*२. पोर्ट ऑर्थर.*

*३. कुरोपाटकिन.*

*४. झार निकोलस दुसऱ्याची.*

## १.६ सरावासाठी स्वाध्याय

❋ **दीर्घोत्तरी प्रश्न.**

१. झार दुसरा अलेक्झांडर याच्या काळातील रशियाच्या अंतर्गत परिस्थितीचा आढावा घ्या.

२. 'निहिलिझम व दहशतवाद' यावर सविस्तर माहिती द्या.

३. झार निकोलस दुसरा याच्या अंतर्गत धोरणाची चर्चा करा.

४. झार निकोलस दुसरा हा रशियन क्रांतीला कितपत जबाबदार होता चर्चा करा.

५. रशिया-जपान युध्दाबद्दल माहिती देऊन (१९०४-०५) त्याचे परिणाम स्पष्ट करा.

❋ **टीपा लिहा.**

१. झार दुसरा अलेक्झांडर.

२. भूदास पध्दतीचे उच्चाटन.

३. निहिलिझम.

४. झार निकोलस दुसरा.

५. झार निकोलस याचे रुसीकरण.

६. झार निकोलस दुसरा याचा संविधानात्मक कालखंड.

७. रशिया-जपान युध्द (१९०४-०५)

८. पोर्ट्समाऊथचा तह (१९०५)

९. रशिया-जपान युध्दाचे परिणाम.

## १.७ अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके

१. Black, C. E. Rewriting Russian History (1962).

२. Ellison, H. J. History of Russia (1964).

३. डॉ. सुमन वैद्य, रशियाचा इतिहास, (१८६०-१८६४), साईनाथ प्रकाशन, नागपूर १९९७.

४. डॉ. मु. बा. देवपुजारी, आधुनिक रशियाचा इतिहास, श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर १९९५.

५. नी. सी. दीक्षित, आधुनिक युरोप, पिंपळापुरे प्रकाशन, नागपूर, २००७.

६. डॉ. सुमन वैद्य, आधुनिक जग (१८९४-१९१४), साईनाथ प्रकाशन, नागपूर २०००.

७. Michael Kort, The Soviet Colossus; History and Aftermath (M. E. Sharpe, 2001).

❋ ❋ ❋

घटक–२

# रशियन राज्यक्रांती

## ( The Russian Revolution )

---

अनुक्रमणिका


२.० उद्दिष्ट्ये

२.१ प्रस्तावना

२.२ विषय विवेचन

  २.२.१ १९०५ ची राज्यक्रांती

  २.२.२ १९१७ ची राज्यक्रांती

  २.२.३ लेनिनची भूमिका

२.३ पारिभाषिक शब्द

२.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

२.५ सारांश

२.६ सरावासाठी स्वाध्याय

२.७ संदर्भ ग्रंथ


## २.० उद्दिष्ट्ये

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला–

१. १९०५ ची क्रांती कशी झाली हे समजेल

२. १९०५ च्या क्रांतीमागची कारणे व परिणाम या विषयी माहिती मिळेल.

३. १९१७ च्या बोल्शेव्हीक क्रांती विषयी माहिती मिळेल.

४. १९१७ च्या क्रांतीमागची कारणे, क्रांती काळातील घटना, क्रांतीचे रशियावर आणि जागतिक राजकारणावर नेमके काय परिणाम झाले याची माहिती मिळेल.

५. १९१७ च्या रशियन राज्यक्रांतीतील लेनिनची भूमिका याविषयी माहिती मिळेल.

## २.१ प्रस्तावना

विसाव्या शतकाच्या जडण-घडणीस हातभार लावणारी महत्वपूर्ण घटना म्हणजे रशियात १९१७ मध्ये

घडून आलेली बोल्शेव्हिक राज्यक्रांती. जगातील पहिली साम्यवादी क्रांती म्हणूनही या क्रांतीचा उल्लेख केला जातो. या राज्यक्रांतीने संपूर्ण जगाला साम्यवादी तत्त्वज्ञानावर आधारित नव्या राज्यव्यवस्थेचा आदर्श घालून दिला. या क्रांतीने उदयास आलेली नवी विचारसरणी आजही जागतिक राजकारणात महत्वाची ठरत आहे. या क्रांतीची तत्वे एकविसाव्या शतकातही टिकून राहिली आहेत. जागतिक पातळीवर राजकीय बदलांबरोबर लोकांच्या सामाजिक-आर्थिक परिस्थितीवर या क्रांतीमुळे परिणाम झाला. एकोणिसाव्या शतकात कार्ल मार्क्सने मांडलेले साम्यवादी विचार प्रत्यक्षात आणण्याचे आणि या विचारांवर आधारित राज्यव्यवस्थेचे कार्य या क्रांतीमुळे झाले. समाजवाद रुजविण्याचे आणि मानवी जीवनात परिवर्तन घडविण्याचे कार्य या क्रांतीने केले. झारशाही उलथवून टाकणारी ही क्रांती अचानक घडलेली नव्हती त्यापूर्वी घडलेल्या अनेक गोष्टींमुळे क्रांतीस योग्य परिस्थिती तयार होत गेली. सदर घटकात अशा महत्त्वाच्या टप्प्यांचा आढावा घेतलेला आहे

## २.२ विषय विवेचन

### २.२.१ १९०५ ची राज्यक्रांती :-

रशियात विसाव्या शतकाची सुरुवात क्रांतीने झाली. रशियाची या काळातील राजकीय, सामाजिक, आर्थिक परिस्थिती ही विरोधाभासाने भरलेली होती. एकीकडे जगातील सर्वात मोठे राष्ट्र म्हणून रशियाला आंतरराष्ट्रीय जगतात महत्त्व होते तर अंतर्गतदृष्ट्या मात्र इतर यूरोपियन राष्ट्रांच्या तुलनेने रशिया मागासलेले राहिले. युरोपीय राष्ट्रांत नवी उदारमतवादी मूल्ये रुजत असताना रशियाच्या प्रतिगामी झारशाहीने या बदलांची दखल न घेता स्वतःची निरंकुश एकाधिकारशाही ही कशी राबविता येईल याची काळजी घेतली. देशाच्या प्रगतीकडे लक्ष न देता वैयक्तिक फायद्याकडे लक्ष देणाऱ्या झारशाही विरोधातला असंतोष तीव्र बनत गेला. रशियात अनेक ठिकाणी उठाव झाले. विशेषतः शेतकरी वर्ग यात आघाडीवर होता मात्र त्याचे स्वरूप राष्ट्रव्यापी नव्हते. सरकारने या उठावांचे दमन केले. या प्रक्षुब्ध वातावरणात ऑक्टोबर १९०५ मध्ये झारविरोधात व्यापक क्रांती घडून आली. यामध्ये शेतकऱ्यांबरोबर कामगारांनीही भाग घेतला. ही क्रांती पूर्णतः यशस्वी झाली नाही पण १९१७ च्या क्रांतीची बीजे याच काळात पेरली गेली. लोकांच्या संघटित शक्तीचा प्रत्यय यावेळी आला यामुळे या क्रांतीला रशियन इतिहासात खूपच महत्व प्राप्त झाले. या क्रांतीची कारणे पुढीलप्रमाणे :-

**१) झार निकोलसचा दुबळेपणा –** तिसऱ्या अलेक्झांडरच्या मृत्यूनंतर निकोलस दुसरा हा १८८४ मध्ये झारपदी आला. दुबळ्या निकोलसवर त्याची राणी व तांत्रिक रासपुटीन याचा खूप प्रभाव होता. याची कारकीर्दही सर्वसामान्य जनतेसाठी हालअपेष्टांची ठरली. शेतकरी, कामगारांबरोबर शिक्षक व इतर मध्यमवर्गावर अनेक बंधने घालण्यात आली. युरोपात आधुनिक विचारांचे वारे वाहत असताना रशियात मात्र झार निकोलसची प्रतिगामी राजवट जुलुम - जबरदस्ती करू लागली.

**२) आर्थिक आरिष्ट –** निकोलसच्या राजवटीने आर्थिक सुधारणांकडे पूर्णतः दुर्लक्ष केले होते.

१९०२-१९०३ ही वर्ष दुष्काळाची होती. शेतीतल्या उत्पादनात घट झाली. अन्नधान्याची तीव्र टंचाई निर्माण होऊन गोरगरीब जनतेची उपासमार होऊ लागली. यावर योग्य उपाय योजना केल्या गेल्या नाहीत. रशियाच्या पोल्तावा, उरल, कॉकेशस इत्यादी प्रांतातील शेतकऱ्यांनी उठाव केले मात्र ते दडपले गेले, मूळ प्रश्न तसाच राहिला.

**३) निहिलीझम किंवा राजकीय शून्यवाद –** झारची दडपशाही वाढत गेली तसतसे रशियन समाजात प्रतिक्रिया उमटत गेली. नवा विचारप्रवाह रशियात उदयास आला तो होता निहिलीझम किंवा राजकीय शून्यवादाचा ! या विचाराचा गट पूर्ण व्यक्ति स्वातंत्र्याचा पुरस्कार करणारा होता, त्यांना कोणाचीच सामाजिक बंधने मान्य नव्हती. प्रस्थापित सर्व अर्थव्यवस्था बदलून त्यांना नवसमाज निर्माण करायचा होता. अन्यायी झारशाही उलथवून लावायची होती, त्यासाठी दहशतवादी मार्ग त्यांनी स्वीकारला. देशभर त्यांच्या क्रांतिकारी कारवाया सुरू होत्या. या कारवाया झारने लष्करचा वापर करून दडपल्या. हीच मंडळी नंतर समाजवादाकडे वळली आणि झारशाहीची विरोधक बनली .

**४) रशिया जपान युद्ध –** आर्थिक अरिष्टात जनता असतानाच १९०४ मध्ये रशिया आणि जपान मध्ये युद्ध सुरू झाले. युद्धकाळात सामान्य जनतेवरचे कर वाढविण्यात आले. जीवनावश्यक वस्तूंचे यामुळे दर वाढले. युद्ध साहित्यांच्या उत्पादनासाठी कामगारांना जादा वेळ राबविले जाऊ लागले. त्यांचा पगार मात्र जैसे थे होता. बलाढ्य रशिया चिमुकल्या जपान समोर कमकुवत ठरला आणि युद्धात रशियाला कार्यक्षम जपानने हरविले. रशियाचा पराभव हा सर्व युरोपियन जगतासाठी धक्कादायक होता. तत्कालीन अमेरिकन अध्यक्ष रूझवेल्टनी मध्यस्थी केली. पोर्ट्‌समाऊथचा तह होऊन युद्ध थांबविण्यात आले. पोर्ट ऑर्थर बंदर, लिओतुंग द्वीपकल्प जपानला द्यावे लागले. अत्यंत हानिकारक पराभवामुळे रशियात झारशाहीच्या नाकर्तेपणाच्या विरोधात संतापाची लाट उसळली

**५) फादर गॅपोनचे नेतृत्व –** सेंट पीटर्सबर्ग मध्ये धर्मोपदेशक म्हणून काम करणारा फादर गॅपोन या काळात रशियात विशेषतः कामगार वर्गात लोकप्रिय बनला होता. कामगारांचे आर्थिक कल्याण झाले पाहिजे त्यासाठी त्यांच्या संघटना उभारल्या पाहिजेत मात्र कामगारांनी राजकीय मागण्या करू नयेत अशा विचारांचा तो होता. त्याच्या प्रभावी व्यक्तिमत्त्वामुळे आणि वाणीमुळे कामगार वर्गात लोकप्रिय बनला होता. काही कामगार नेत्यांना तो झारचा हस्तक आहे अशीही शंका होती. त्याच्याभोवती अनेक कामगार जमा झाले होते. त्याने स्थापन केलेल्या कामगार संघटनेच्या माध्यमातून सरकारला अथवा कारखानदारांना न दुखवता कामगारांच्या परिस्थितीत सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न झाला. राजकारणात सहभागी झाले पाहिजे असे मानणारे कामगार नेते मात्र त्याच्यापासून दूरच राहिले.

**६) रक्तरंजित रविवारची घटना –** रशिया आणि जपान यांच्यामधील युद्धाच्या बातम्या जसजशा येऊन धडकू लागल्या तसतसे वातावरण प्रक्षुब्ध होत गेले. पिटर्सबर्ग येथील जवळपास दोन लाख कामगार स्त्री-पुरुष एकत्र झाले. आपला मागणी अर्ज त्यांना झारसमोर सादर करायचा होता. या गोष्टीस सुरुवातीस गॅपोनने विरोध केला पण बहुसंख्य कामगारांच्या दबावामुळे त्याचे काही चालले नाही. त्याने त्या मोर्चाचे

नेतृत्व करण्याचे मान्य केले. शांतपणे जाऊन झारला मागण्यांचे निवेदन सादर करणे एवढाच उद्देश होता. या मोर्चाची सर्व खबर झारला होती. परिस्थितीची गरज लक्षात न घेता झारने विरोधाची तयारी केली. सैनिकांच्या जादा तुकड्या सेंट पिटर्सबर्ग येथे मागविण्यात आल्या. तो स्वतः राजवाड्यातून आपल्या कुटुंबियासमवेत निघून गेला. थोडक्यात त्याने पलायन केले.

२२ जानेवारी १९०५ रोजी सकाळी मोर्चा राजवाड्याच्या दिशेने निघाला. स्त्री-पुरुष, वृद्ध-लहान सर्वजण यामध्ये सहभागी झाले होते. विंटर पॅलेससमोर आल्यावर झारने निवेदन स्वीकारावे अशी मागणी त्यांनी केली. झार तेथे नाही म्हटल्यावर जमाव प्रक्षुब्ध झाला. जमावाने घरी निघून जावे असा हुकुम लष्करी अधिकाऱ्यांनी दिला. मात्र जमावाने तो मानला नाही. लष्करी अधिकाऱ्यांनी ताबडतोब गोळीबार सुरू केला. या गोळीबारात शेकडो जण मारले गेले तर हजारो जखमी झाले. राजवाड्यासमोर रक्ताचा सडा पडला. ही घटना रशियाच्या इतिहासात **'रक्तरंजित रविवार'** (Bloody Sunday) म्हणून ओळखली जाते. झार विरूद्धचे वातावरण आणखी तापत गेले. सर्वत्र या घटनेचा निषेध करण्यात आला. सर्वसामान्यांच्या अडचणी झार सोडवेल हा विश्वास पूर्णपणे संपला. थोडक्यात लोकांची झारशाहीवरची निष्ठा नष्ट झाली. या घटनेचा फटका फादर गॅपोनलाही बसला. तो सरकारचा हस्तक आहे असे वाटून त्यालाही १९०६ मध्ये फासावर लटकवले गेले. झारशाहीची वाटचाल अंताच्या दिशेने होऊ लागली.

### ❋ क्रांतिच्या दिशेने वाटचाल :-

**१) रक्तरंजित रविवार नंतरचा सार्वत्रिक संप –** झारशाही विरोधातले वातावरण तप्त होत गेले. रशियातील चार लाख कामगारांनी मोर्चे काढले, निदर्शने केली. असंतोषाचा वणवा लष्करातही पसरला. जून १९०५ मध्ये नौदलातल्या सैनिकांनी बंड करत नौकेवर लाल झेंडा फडकविला. ऑक्टोबर महिन्याच्या सुरवातीला संपूर्ण रशियातले रेल्वे कामगार संपावर गेले. रेल्वे वाहतूक थांबल्याने त्याचा परिणाम व्यापारावर झाला. व्यापार ठप्प झाला. देशांतर्गत अन्नधान्य पुरवठा विस्कळीत झाल्याने जनतेवर उपासमारीची वेळ आली. उद्योग क्षेत्रातील कामगार, विद्यार्थी, शिक्षकसुद्धा यामध्ये सामील झाले. संपूर्ण रशियातील वातावरण यामुळे तप्त झाले. या सर्वांचा फटका सरकारला बसू लागला.

**२) पहिल्या सोविएतची स्थापना –** कामगारांना योग्य मार्गदर्शन व्हावे यासाठी काही नेत्यांनी एकत्र येवून कामगारांकडून निवडलेल्या प्रतिनिधींचे एक सोविएत ( केंद्रीय समिती ) स्थापन करावी असे ठरले. त्यानुसार १३ ऑक्टोबर १९०५ रोजी पिटर्सबर्ग येथे रशियातील पहिले सोविएत स्थापन झाले. यामध्ये २६ कामगार प्रतिनिधी होते. या सोविएतने नवीन घटना समिती स्थापन करण्याची मागणी केली. मात्र ही मागणी अमान्य झाली. यानंतर सोविएतने देशभर अशा प्रकारची सोविएत स्थापन करण्याचे आणि लाल ध्वजाखाली संघटित होण्याचे आवाहन केले. याला भरभरून प्रतिसाद मिळाला. कामगारांनीही त्याचप्रमाणे शेतकर्यांनी आपआपली सोविएत स्थापन केली. नोव्हेंबर १९०५ पर्यंत अशी ५६२ सोविएत स्थापन झाल्यामुळे झारशाहीवरचा दबाव वाढला. कामगारवर्गाचीही एकीकरणाच्या दिशेने वाटचाल सुरू झाली. अशाप्रकारे भावी क्रांतीची बीजे रूजली गेली.

**३) ऑक्टोबर जाहीरनामा आणि दुसरा संप –** देशातील कामगारांनी केलेला संप, झारशाही विरूद्धचे उठाव, सोविएतची निर्मिती, नियंत्रणाबाहेर चाललेले सैन्य अशा स्फोटक परिस्थितीत झारने ३० ऑक्टोबर १९०५ रोजी जाहीरनामा प्रसिद्ध करून जनतेस व्यक्ती स्वातंत्र्य, धार्मिक स्वातंत्र्य, भाषण स्वातंत्र्य, सभा स्वातंत्र्य त्याचप्रमाणे मतदानाचा अधिकार देण्यात येईल, राष्ट्रीय कायदेमंडळ स्थापन करण्यासाठी राष्ट्रीय पातळीवर निवडणूक घेतली जाईल असे सांगितले. जनतेच्या प्रतिनिधींच्या संमतीने कायदे केले जातील असेही सांगितले. या जाहीरनाम्यानंतर पिटर्सबर्ग सोविएतने सुरू असलेला सार्वत्रिक संप मागे घेण्याचे ठरविले. तत्पूर्वी राजबंद्यांच्या मुक्ततेचा हुकूम काढण्यासाठी झारशाहीला भाग पाडले.

**४) मॉस्कोवर ताबा आणि क्रांतिकारकांचे अपयश –** झारने जरी जाहीरनामा प्रसिद्ध केला असला तरी त्यावर विश्वास नसणाऱ्यांची संख्या जास्त होती. या काळात काही ठिकाणी नाविक दलात उठाव झाले. खलाशांना अटक केली गेली होती.त्या खलाशांचे खटले लष्करी न्यायालया ऐवजी सामान्य न्यायालयात चालविले जावेत यासाठी संपाची हाक दिली गेली. मात्र पहिल्या संपाइतका उत्साह यावेळी उरला नव्हता. पहिल्यासारखी शासन यंत्रणा किंवा औद्योगिक यंत्रणा विस्कळीत झाली नाही. हळूहळू अनेक कामगार संपातून बाहेर पडू लागले. संपाचा जोर ओसरला. या गोष्टीचा फायदा घेत सरकारने २६ नोव्हेंबर मध्ये पिटर्सबर्ग सोविएत अध्यक्ष क्रूस्लालेव याला अटक केली. पिटर्सबर्ग सोविएतच्या इतर सदस्यांनाही अटक झाली. या सोविएतचे अस्तित्व नष्ट झाले. या गोष्टीचा निषेध करण्यात आला. यावेळी संपाचे नेतृत्व मॉस्को सोविएतने केले. त्यांनी सार्वत्रिक राजकीय संपाचे आवाहन केले. ७ डिसेंबर १९०५ पासून कारखाने बंद होऊ लागले. थोडक्यात ही क्रांतीच होती. सरकार सैनिक बोलावू शकते याचा अंदाज घेतलेल्या कामगारांनीही सशस्त्र दले उभारली. मॉस्को शहर क्रांतीकारकांच्या ताब्यात गेले. सरकारने मोठे लष्कर मागविले. लष्कराच्या मदतीने सरकारने मॉस्कोवर पुन्हा ताबा मिळविला. अनेक क्रांतीकारकांना ठार मारण्यात आले. या उठावात सोशल डेमोक्रेटिक व सोशल रिव्हॉल्युशनरी पक्षाची महत्वाची भूमिका होती. सरकार विरोधातला उठाव अयशस्वी झाला तरी कामगारांच्या संघटित शक्तीचा अनुभव सगळ्यांना आला.

### ❋ १९०५ च्या क्रांतीचे महत्व :-

१९०५ च्या क्रांतीच्या अपयशास अनेक गोष्टी कारणीभूत ठरल्या. प्रभावी नेतृत्वाचा अभाव, लष्कराचे क्रांतिकारकांबरोबर असहकार्य, झारशाहीचा प्रभाव, क्रांतीच्या तत्वज्ञानाचा म्हणावा तितका न झालेला प्रसार, यामुळे १९०५ ची क्रांती अयशस्वी झाली असली तरी संघटित होण्याचे महत्त्व क्रांतिकारकांना कळले. सोविएतच्या रूपाने कामगारांचे संघटन - नेतृत्व उदयास आले. क्रांतीचा अनुभव कामगारांना मिळाला, जो नंतरच्या क्रांतीसाठी उपयुक्त ठरला. झारला कर्मठपणा बाजूला सारत जनतेच्या दृष्टीने महत्वाचे निर्णय घ्यावे लागले. लोकप्रतिनिधीगृह म्हणजेच ड्युमा स्थापण्याचा निर्णय त्याला घ्यावा लागला. झारचे वर्चस्व जरी पूर्वीप्रमाणेच कायम राहिले तर रशियन जनतेत जागृती घडवून आणण्याचे महत्त्वपूर्ण कार्य या क्रांतीमुळे झाले. १९१७ च्या क्रांतीची जणू ही रंगीत तालीमच ठरली आणि यामुळेच रशियाच्या इतिहासात या क्रांतीलाही महत्त्व प्राप्त झाले आहे. शेकडो वर्ष राज्य करणाऱ्या निरंकुश झारशाहीची या घटनेनंतर शेवटाकडे वाटचाल सुरु झाली.

## स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न-१

❋ **योग्य पर्याय निवडा.**

१) १९०५ मध्ये ............ हा झार होता

*अ) रासपूतीन ब) निकोलस क) अलेक्झांडर ड) पुष्किन.*

२) फादरच्या .......... च्या नेतृत्वाखाली कामगारांचा मोर्चा निघाला.

*अ) दिब्रिटो ब) निकोलस क) गॅपोन ड) लेनिन.*

३) १९०५ मध्ये .............. ने बलाढ्य रशियाचा पराभव केला.

*अ) जपान ब) पोलंड क) कोरिया ड) अमेरिका.*

४) कामगारांच्या केंद्रीय समितीला ............ असे म्हटले जात असे.

*अ) मेन्शोविक ब) सोविएत क) प्रावदा ड) ड्युमा.*

५) १९०५ मध्ये ............. ही पहिली सोविएत स्थापन झाली.

*अ) मॉस्को सोविएत ब) रोस्तोव सोविएत*

*क) ओडेसा सोविएत ड) पीटर्सबर्ग सोविएत.*

❋ **१९०५ च्या क्रांतीनंतरचा घटनाक्रम :-**

झार निकोलसने संतप्त जनतेला चुचकारण्यासाठी जाहीरनामा प्रसिद्ध करून राजकीय सुधारणा करण्याचे आश्वासन दिले होते. प्रत्यक्षात तो आणि त्याचे सरदार हे जनतेला राजकीय अधिकार मिळाले पाहिजेत या विचारांच्या विरोधात होते. जनतेच्या दडपणाखाली त्याने सुधारणा जाहीर केल्या. राष्ट्रीय विधिमंडळाची निर्मिती (ड्युमा), त्याचबरोबर भाषण स्वातंत्र्य, मुद्रण स्वातंत्र्य, संघटना स्वातंत्र्य, ड्युमासाठी प्रौढ मतदान पद्धतीने निवड, सर्व कायदे ड्युमाच्या संमतीने मंजूर केले जातील अशी आश्वासने त्यांने दिली. १९०६ मध्ये शेतकऱ्यांचा अर्धा शेतसारा माफ करुन १९०७ पासून सर्व शेतजमिनी करमुक्त करण्यात आल्या. या सर्व गोष्टीमुळे झारला केला जाणारा विरोध बोथट झाला.

१९०६ मध्ये पहिल्या ड्युमाची निवडणूक झाली. या निवडणुकावर सोशल डेमॉक्रेटिक आणि सोशल रिव्हॉल्युशनरी या पक्षांनी बहिष्कार टाकला तर उर्वरित पक्षांपैकी कॅडेट्स या पक्षाचे सर्वात जास्त सदस्य ड्युमासाठी निर्वाचित झाले. कॅडेट पक्षाचा आग्रह होता की धार्मिक संस्था, अमीर-उमरावांकडच्या जमिनी काढून त्या सामान्य शेतकऱ्यांच्या द्याव्यात, एक जबाबदार राज्यपद्धती आणावी अर्थात हे झारला मान्य नव्हते. त्याने ही ड्युमा बरखास्त केली. दुसऱ्या ड्युमाची हीच अवस्था झाली. यावेळी अधिक जहाल सदस्य निवडून आले होते. झारला ड्युमावर नियंत्रण ठेवणे अशक्य होऊ लागले. १९०७ मध्ये ही ड्युमाही त्याने बरखास्त केली. तिसऱ्या वेळी निवडणूक घेतली गेली मात्र तत्पूर्वी निवडणुकीच्या नियमात बदल केले गेले. सामान्यांच्या म्हणजेच शेतकरी आणि कामगारांच्या प्रतिनिधींची संख्या खूप कमी केली गेली.

अल्पसंख्यांकांचे हक्कही रद्द केले गेले. यामुळे झारला अपेक्षित असलेली तिसरी ड्युमा अस्तित्वात आली, ज्यावर त्याचे वर्चस्व होते. म्हणजेच १९०५ मध्ये लोकांना सुधारणांसाठी झारने दिलेले आश्वासन निव्वळ थापा होत्या हे लोकांच्या लक्षात आले. झारशाही विरुद्धची भावना तीव्र होत गेली. तिसऱ्या ड्युमाने आपला पाच वर्षाचा कार्यकाळ पूर्ण केला. १९१२ मध्ये चौथ्या ड्युमासाठी निवडणुका झाल्या. या ड्युमात ऑक्टोबिस्ट या पक्षाचे प्रतिनिधी जास्त होते. ही ड्युमा पहिल्या महायुद्धापर्यंत अस्तित्वात होती.

याच कालावधीत युरोपची पहिल्या महायुद्धाकडे वाटचाल सुरू होती. ऑस्ट्रियाने २८ जुलै १९१४ रोजी सर्बियावर हल्ला केला आणि पहिल्या महायुद्धाला सुरवात झाली. रशियाने स्लॉव वंशियांच्या संरक्षणासाठी सर्बियाच्या बाजूने युद्धात प्रवेश केला. ऑस्ट्रियाच्या बाजूने जर्मनी युद्धात उतरले होते. जर्मनी आणि रशियाच्या संघर्षाला सुरवात झाली. या युद्धाच्या कालखंडातच रशियात बोल्शेव्हिक क्रांती झाली.

## २.२.२ १९१७ ची राज्यक्रांती (बोल्शेविक राज्यक्रांती)

### ❋ प्रस्तावना :-

झारशाही विरुद्धची १९०५ मध्ये झालेली पहिली क्रांती यशस्वी ठरली नाही मात्र झारशाहीला मुळापासून हलविण्याचे काम या क्रांतीने केले होते. यानंतरच्या कालखंडात राजेशाहीचा जनमानसांवरील प्रभाव कमी होत गेला. दुसरीकडे कार्ल मार्क्स व इतर तत्वज्ञाच्या विचारांचा रशियात प्रसार झाला. बदलत्या परिस्थितीचे भान नसणाऱ्या झार निकोलसच्या अनेक गोष्टी चुकत गेल्या. अखेरीस १९१७ मध्ये क्रांती होऊन झारशाही संपुष्टात आली, किंबहुना जनतेने ती नष्ट केली. अर्थात ही अचानक घडलेली घटना नव्हती अनेक गोष्टींचा तो परिपाक होता. या राज्यक्रांतीचा परिणाम केवळ रशियापुरताच मर्यादित नव्हता तर तो जागतिक होता. या क्रांतीमागची कारणे पुढीलप्रमाणे :-

### १) अनियंत्रित आणि अकार्यक्षम झारशाही :-

रशियात सुमारे तीनशे वर्षापासून रोमोनॉव्ह घराणे राज्य करत होते. या घराण्यातील राजांचा उल्लेख झार आणि राणीचा उल्लेख झरिना असा केला जात असे. संपूर्ण सत्ता आपल्या हातात केंद्रित करताना या घराण्यातील झारनी जनतेच्या कल्याणाकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले. पीटर-द -ग्रेट या झारचा अपवाद वगळता इतरांनी दडपशाहीचा वापर करत जनतेवर अन्याय केला. सामान्य रशियन जनतेला राजकीय व्यवस्थेत कोणतेच हक्क नव्हते. झार निकोलस दुसऱ्याच्या कालखंडात तर परिस्थिती अधिकच बिघडली होती. दुर्बल मनाचा झार निकोलस आणि त्याची पत्नी झरिना अलेक्झांड्रा हे ऐषोआरामात जीवन जगत होते.या दोघांवर रासपुटीन नावाचा अत्यंत धूर्त आणि कपटी असलेल्या धर्ममहंतांचा मोठा प्रभाव होता.रासपुटीन याने राजपुत्राला आजारातून बरे केले होते. यामुळे झरिनाचा त्याच्यावर विश्वास बसला होता.रासपुटीनच्या सल्ल्याने झार-झरीना राज्यकारभारातले अनेक निर्णय घेत होते. त्याच्यामुळे अनेक अकार्यक्षम संधिसाधू लोकांचा दरबारात भरणा झाला होता. जनतेच्या पैशावर झार - झरिना आणि त्यांच्या सग्यासोयऱ्यांची चैन चालली होती. राज्यकारभारात प्रचंड भ्रष्टाचार वाढला होता. याला विरोध करणाऱ्या बुद्धीजीवी वर्गामधील लेखक,

विचारवंत, शिक्षक, कामगार नेते आणि क्रांतीकारकांना तुरुंगात डांबण्यात येत होते किंवा हद्दपार केले जात होते. उदारमतवादी विचार रशियात पसरू नयेत याची दक्षता झार घेत होता. या काळात मुद्रण स्वातंत्र्यावरही बंधने घालण्यात आली होती. अशा या झारच्या राजवटीविरुद्ध जनतेत असंतोष अधिक वाढला आणि क्रांतीस योग्य असे वातावरण निर्माण झाले.

## २) सामाजिक विषमता :-

या कालखंडात सरंजामशाही असलेल्या रशियातील समाजात दोन वर्ग तयार झाले होते. यामध्ये अमीर-उमरावांचा एक आणि सर्वसामान्य जनता-शेतकऱ्यांचा दुसरा वर्ग होता. औद्योगिक क्रांती नंतर येथे भांडवलदार आणि कामगार - मजूर असे दोन वर्गही अस्तित्वात आले होते. रशियातील सर्व उत्पादनाची साधने म्हणजे कारखाने, शेती इ. पहिल्या वर्गाच्या ताब्यात होती आणि उर्वरित शेतकरी - कामगार वर्ग हा अमीर -उमरावांच्या, भांडवलदारांच्या पदरी राबत होता. यामध्ये त्याला त्याच्या श्रमाचा योग्य तो मोबदला मिळत नव्हता. मिळणारा फायदा हा उमराव - भांडवलदारांच्याच घशात जात होता. शेतकरी आणि कामगारवर्गाचे प्रचंड प्रमाणात आर्थिक शोषण होत असल्याने दारिद्र्य, उपासमारी आणि रोगराईमूळे त्यांची अवस्था अत्यंत वाईट झाली होती. समाजाची विभागणी **'आहे रे वर्ग'** आणि **'नाही रे वर्ग'** (have's and have's not) अशी झाली. रशियात सामाजिक विषमता वाढतच गेली. हीच विषमता राज्यक्रांतीस कारणीभूत ठरली.

१) आहे रे वर्गाकडे सर्व उत्पादनाच्या साधनांची मालकी होती.
२) नाही रे वर्गाच्या हातात काहीच नव्हते. या वर्गामध्ये मुख्यत: कामगार आणि शेतकऱ्यांचा समावेश होता.

## ३) कामगारांची दुरावस्था :-

औद्योगिक क्रांतीनंतर पाश्चात्य राष्ट्रात बरेच बदल घडून आले. रशियातही उद्योगधंदे सुरु झाले मात्र म्हणावी इतकी वेगाने प्रगती झाली नाही. परकीय भांडवलदारांनी इथल्या कारखान्यांमध्ये पैसा गुंतवला. लोखंड, कोळसा यांची खाणकामे सुरु झाली. या कारखान्यांमध्ये आणि खाणीमध्ये काम करणाऱ्या कामगारांचा एक नवा वर्ग तयार झाला. त्यांची संख्या वाढत गेली. खेड्यातून शहरात येवून राहिलेल्या या कामगार वर्गाची अवस्था अत्यंत वाईट होती. मजूरीचे कोणतेही नियम अस्तित्वात नव्हते. त्यांना बारा ते अठरा तास अत्यंत कमी मजुरीवर राबावे लागत होते. त्यामुळे त्यांचे आयुष्य हालअपेष्टांचे बनले होते. आपली परिस्थिती बदलली पाहिजे, आपल्याला न्याय हक्क मिळायला पाहिजेत अशी तीव्र भावना या कामगार वर्गात वाढत गेली ते संघटीत झाले. प्रस्थापित व्यवस्थेविरुद्धचा त्यांचा असंतोष राज्यक्रांतीस कारणीभूत ठरला.

## ४) अल्पसंख्याक वांशिकावर अन्याय :-

विस्तृत रशियात स्लॉव्ह वंशियाबरोबरच ज्यू, पोलिश, युक्रेनियन इ. वंशाचे लोकही राहत होते. मात्र

झार स्लॉव्ह वंशीय आणि सनातनी ग्रीक चर्चचा (ऑर्थोडॉक्स) अनुयायी असल्याने इतर वंशीयावर अन्याय करायला सुरवात केली. रशियन ऑर्थोडॉक्सिला अधिकृत धर्माचा दर्जा दिला गेला. रशियन भाषेचा वापर करण्याचे बंधन लादण्यात आले. विशेषतः ज्यूंना जमिनी विकत घेण्यास, शैक्षणिक संस्थात प्रवेश घेण्यास मनाई करण्यात आली. त्यांच्या मालमत्ता जप्त करण्यात येऊ लागल्या. अल्पसंख्यांकी यांच्या धर्म, भाषा, संस्कृती इ. प्रत्येक क्षेत्रात झारने जबरदस्ती करायला सुरवात केली. या अल्पसंख्यांकांनी पुढे झारशाही उलथवून लावण्यासाठी क्रांतीकारकांना मदत केली.

### ५) जपानकडून रशियाचा पराभव (१९०५) :-

झार दुसरा निकोलसने साम्राज्य वाढविण्याच्या दृष्टीने चीनच्या मांचुरिया प्रांतात आणि कोरियाची राजधानी असलेल्या सेऊल मध्ये आपला प्रभाव निर्माण केला होता. जपान यामुळे अस्वस्थ झाला आणि रशियाच्या या हस्तक्षेपाला थेट आव्हान देत जपानने ८ फेब्रुवारी १९०४ ला रशियाच्या नौदलावर हल्ला करत युद्धास तोंड फोडले. या युद्धात तुलनेने चिमुकल्या असलेल्या जपानने बलाढ्य असलेल्या रशियाचा पराभव केला. पराभव झालेल्या रशियाची अकार्यक्षम सेना, प्रशासनातील भ्रष्टाचार आणि सैन्यातील असलेला बेशिस्तपणा, झारची दडपशाही या सर्व गोष्टी जनतेसमोर आल्याने त्यांच्यामध्ये असंतोषाची लाट पसरली. या सर्वाचा परिणाम म्हणजे रशियन जनतेच्या मनात राज्यक्रांतीची बीजे रोवली गेली.

### ६) १९०५ मध्ये झालेली क्रांती :-

रशिया आणि जपान युद्धाचा विपरीत परिणाम समाज जीवनावर होऊ लागला. जनतेवरचे कराचे प्रमाण वाढविले. जीवनोपयोगी वस्तूंची टंचाई निर्माण झाली. झारने या सर्व गोष्टीकडे दुर्लक्ष केले. २२ जानेवारी १९०५ मध्ये फादर गॅपोन यांच्या नेतृत्वाखाली कामगारांनी सेंट पिटसबर्ग येथील राजवाड्यावर मोर्चा काढला. त्याच्यांवर गोळीबार करण्यात आला. शेकडो निष्पाप कामगार मारले गेले. ही घटना घडली त्यावेळी रविवार होता. त्यामुळे ही घटना रशियन इतिहासात **रक्तरंजित रविवार (Bloody Sunday)** म्हणून ओळखली जाते. या अमानुष कृत्याने रशियात सर्वत्र संतापाची लाट उसळली, याचे निषेध मोर्चे निघू लागले. संप होऊ लागले. जाळपोळ लुटालूट होऊ लागली. कामगारांनी स्वत:च्या संघटना म्हणजेच सोव्हिएत स्थापन केल्या. या माध्यमातून संघटित होऊन त्यांनी संपूर्ण रशियात संप, मोर्चे घडवून आणले. झारला सशस्त्र विरोध केला. ही झारच्या विरोधातली अयशस्वी झालेली क्रांतीच होती. असे उद्रेक वारंवार होत राहिले. अखेरीस झारने डयुमाची (रशियन कायदे मंडळ) बैठक बोलविण्याचे मान्य केले. त्यानुसार १९०६ मध्ये निवडणुका होऊन नवीन ड्युमा अस्तित्वात आली. मात्र झारच्या विरोधामुळे ती विसर्जित करण्यात आली. दुसऱ्या आणि तिसऱ्या ड्युमाची अशीच अवस्था झाली. एकूणच १९०५ ची क्रांती अयशस्वी झाली असली तरीही स्वतःच्या संघटीत शक्तीची जाणीव रशियन जनतेला झाली. १९१७ च्या क्रांतीसाठी ही घटना प्रेरक ठरली.

### ७) ढासळती आर्थिक परिस्थिती :-

रशियन राज्यक्रांतीचे मूळ रशियाच्या आर्थिक दुरावस्थेत होते. विस्ताराने मोठा असलेला रशिया

आर्थिक विपन्नावस्थेत पोहोचला होता. संपूर्ण युरोपची आधुनिक युगाकडे वाटचाल सुरु असताना रशिया मात्र मध्ययुगीन सरंजामशाही युगातच होता. रशियातील जमिनींचा ताबा सरंजामदाराकडे होता. या जमिनीत राबणाऱ्या सामान्य शेतकऱ्यांची अवस्था अत्यंत वाईट झाली होती, दोन वेळचे पुरेसे अन्नही त्यांना मिळत नव्हते. कामगारवर्गाची अवस्था अशीच दयनीय झाली होती. झार निकोलसच्या युद्धखोर धोरणामुळे युद्धाच्या खर्चाचा बोजाही जनतेवर लादला जात होता. उपजीविकेचे दुसरे कोणतेच साधन नसलेने या वर्गाची अवस्था बिकट झाली होती. रशियावर क्रांतीपूर्व काळात विदेशी राष्ट्रीय कर्जाची रक्कम तीनशे कोटी डॉलर्स इतकी झाली होती. अशा सर्व परिस्थितीमुळे रशियाची आर्थिक दुरावस्था झाली होती. त्यातच सामान्य जनतेवर लादलेले बोजड कर, मंदगतीने होणारे औद्योगिकरण, कमी उत्पन्न आणि जास्त खर्च या सर्व गोष्टीना जनता त्रस्त झाली होती, लोकांना बदल पाहिजे होते यामुळे क्रांतीच्या दिशेने रशियाची वाटचाल होऊ लागली.

## ८) पहिल्या महायुद्धात रशियाचा पराभव :-

जुलै १९१४ मध्ये युरोपात पहिले महायुद्ध सुरु झाले. रशियाने जर्मनी-ऑस्ट्रियाच्या विरोधात तर सर्बिया, इंग्लंड, फ्रान्स या दोस्त राष्ट्रांच्या बाजूने युद्धात प्रवेश केला. मात्र रशियाने युद्धासाठीची आवश्यक ती तयारी केलेली नव्हती. रशियातील विविध व्यवसायातील, उद्योगातील आणि शेतीत काम करणाऱ्या सुमारे एक कोटी चाळीस लाख अप्रशिक्षित तरुणांना सक्तीने सैन्यात भरती करण्यात आले होते. जवळपास तीस टक्के रशियन सैनिकाकडे शत्रास्त्रे नव्हती. अशा या विपरीत परिस्थितीत पूर्व प्रशियात रशियन सैन्य घुसले. त्यामुळे फ्रान्सच्या विरोधात लढणारे काही सैन्य जर्मनीला या भागात आणावे लागले. फ्रान्सला याचा फायदा झाला. सुरवातीच्या काळात रशियन सैन्यास जर्मनीविरुद्ध काही विजय मिळाले. १९१५ नंतर मात्र रशियन सैन्याची अवस्था वाईट होऊ लागली. त्यांना पुरेशी युद्ध सामुग्रीही मिळेनाशी झाली. जर्मनीने अनेक आघाड्यांवर रशियाचा पराभव करत बराच मोठा भूभाग स्वत: च्या ताब्यात घेतला. या युद्धात सुमारे सदतीस लाख सामान्य नागरिक आणि रशियन सैन्याचा बळी गेला. कडक हिवाळा, दुष्काळ आणि जीवनावश्यक वस्तूंची टंचाई यामुळे रशियन जनता बेजार झाली होती. त्यातच युद्धात झालेल्या खर्चाचा भार कररूपाने जनतेवर टाकण्यात आला. रशियाची अर्थव्यवस्था पूर्णपणे खिळखिळी झाली होती. अशा या सर्व गोष्टीस झार जबाबदार आहे याची जनतेला खात्री झाली. जनतेत असंतोष वाढत गेला. इकडे पहिले महायुद्ध सुरु असतानाच १९१७ मध्ये रशियात राज्यक्रांती घडून आली.

## ९) रशियन विचारवंतांचे कार्य :-

रशियन समाजाला त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाबद्दल जागृत करण्याचे आणि वैचारिक बदल घडवून आणण्याचे कार्य रशियातील साहित्यिक, तत्वज्ञानी आणि विचारवंतानी केले. कथा, कादंबरी, ललित साहित्य यांच्या माध्यमातूनही प्रगत विचारांचे लोण सामान्य जनतेपर्यंत पोहोचल्याने क्रांतीसाठीची आवश्यक पार्श्वभूमी तयार झाली.

**१. लिओ टॉलस्टॉय (१८२८-१९१०) :** या कादंबरीकाराने एकोणिसाव्या शतकातील रशियन समाजाच्या विदारक परिस्थितीचे वर्णन आपल्या ललित साहित्यात केले. *Anna Kareneena,* (ॲना

कॅरेनिना) *The Power of Darkness, Master and Man, Fruits of Enlightement, War and Peace, The Living Corps* अशा कादंबऱ्यातून सरंजामशाही व्यवस्थेचे, नैतिक मूल्यांचे अध:पतन इ.चे वर्णन केले. टॉलस्टायने व्यक्तिविकास, व्यक्ती स्वातंत्र्याची मागणी केली होती.

**२. इवान तुर्जेनिव्ह (१८१८–१८८३) :** या लेखकाने रशियातील भूदास पद्दत आणि त्यामुळे झालेली शेतकर्यांची दैन्यावस्था *Sportsman Sketches* या लेखमालेतून केली. असे हे विदारक चित्र पाहून रशियातील समाज हादरला. *Rudin* (रदिन), *A House of Gentle Folk, Fathers and Children, Virgin Soil* अशा कलाकृतीतून त्याने रशियन समाजाच्या मानसिक अवस्थेचा बौद्धिक शोध घेवून दुखा:ला वाचा फोडली.

**३. मॅक्झिम गॉर्की (१८६८–१९३६) :** १९०५ च्या राज्यक्रांतीत सहभागी झालेल्या गॉर्कीने कामगार वर्गाच्या जीवनाचे चित्रण कादंबऱ्यात करून रशियन जनतेचे दुखः जगासमोर आणले. मार्क्सचा साम्यवाद प्रत्यक्षात उतरविण्याचे आवाहन त्याने त्याच्या *Confession* आणि *Mother* (आई) या कादंबऱ्यातून केले. यामुळे रशियात सर्वच थरात बौद्धिक जागृती झाली .

**४. फेडर मिखायलोविश डोस्टोव्हस्की (१८२२–१८८१) :** या प्रतिभा संपन्न लेखकास त्याच्या क्रांतीकार्यामुळे तुरुंगवास सोसावा लागला. क्रांतीसाठीचे जनमत तयार करण्याचे कार्य त्याने केले. *Idiot Gambler, Poor Folk, Letters From The Underground,* इत्यादी कादंबऱ्यातून क्रांतीची मुलभूत तत्वे जनतेपर्यंत पोहोचवली.

अशा रशियन विचारवंतानी आपल्या लिखाणातून क्रांतीसाठी आवश्यक समाजमन तयार केले . रशियन समाजाला त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाची जाणीव करून दिली.

### १०) कार्ल मार्क्सच्या तत्वज्ञानातून मिळालेली प्रेरणा :–

रशियन राज्यक्रांतीचा उद्गाता म्हणून कार्ल मार्क्सचा उल्लेख केला जातो. प्रशियातील (जर्मनी) एका ज्यू कुटुंबात १८१८ मध्ये कार्ल मार्क्सचा जन्म झाला. या कुटुंबाने नंतर ख्रिश्चन धर्माचा स्वीकार केला. कार्ल मार्क्सने बॉन आणि बर्लिन विद्यापीठातून आपले शिक्षण पूर्ण केले.कायदा आणि तत्वज्ञानाचे शिक्षण घेतल्यानंतर मार्क्सने पत्रकार म्हणून काम सुरु केले. या काळात हेगेल यांच्या तत्वज्ञानाचा प्रभाव कार्ल मार्क्सवर होता. जहाल क्रांतिकारक लिखाणामुळे त्याला जर्मनी सोडून इंग्लंडला आश्रय घ्यावा लागला. तेथील विचारवंत फ्रेडरिक एंजेल्स (Friedrich Engels) यांच्याशी त्याची मैत्री झाली. कार्ल मार्क्सने वर्गकलहाचा सिद्धांत मांडला. भांडवलदार आपल्या आर्थिक आणि राजकीय वर्चस्वाच्याद्वारे कामगारांचे शोषण करतो हा वर्गकलह थांबवायचा असेल तर कामगारांनी संघटीत होऊन या शोषक वर्गाविरुद्ध क्रांती करावी असे सांगितले. उत्पादनाची साधने खाजगी मालकीची न ठेवता ती सरकारच्या मालकीची करावीत यामुळे शोषक वर्ग नष्ट होईल आणि वर्गविहीन समाज निर्माण होऊन प्रत्येकाला आपल्या श्रमाचा मोबदला मिळेल असे त्याने प्रतिपादित केले. कामगारांची हुकुमशाही हे त्याचे स्वप्न होते. १८४८ मध्ये फ्रेडरिक एंजेल्स आणि कार्ल मार्क्स यांनी कम्युनिस्टांचा जाहीरनामा (कम्युनिस्ट मॅनिफॅस्टो) प्रसिद्ध केला. याद्वारे त्याने

जगातील सर्व कामगारांना एकत्र येण्याचे आणि क्रांती घडविण्याचे आवाहन केले. **'जगातील कामगारांनो एक व्हा'** हे त्याने केलेले आवाहन रशियन राज्यक्रांतीला प्रेरणा देणारे ठरले. १८६७ मध्ये प्रसिद्ध झालेला **'दास कॅपिटल'** हा ग्रंथ जगभरातील साम्यवाद्यांचा बायबल ठरला. कार्ल मार्क्सचे तत्वज्ञान रशियात लोकप्रिय होत गेले. रशियात डेमोक्रॅटिक पार्टी, रिव्होल्युशनरी पार्टी स्थापन झाल्या. सामान्य वर्ग या माध्यमातून झारशाही विरुद्ध संघटित होत गेला.

## ❋ क्रांती काळातील घडामोडी :-

१९१७ मध्ये झालेली क्रांतीची सुरवात ते बोल्शेविक सरकारची स्थापना या दरम्यान अनेक महत्वाच्या घडामोडी रशियात घडून आल्या. त्या पुढीलप्रमाणे :-

## १) पेट्रोग्राडची क्रांती :-

पहिल्या महायुद्धातील रशियाचा पराभव, रशियातील ढासळलेली अर्थव्यवस्था, रशियात निर्माण झालेली अराजकतेची परिस्थिती याला झारशाही जबाबदार आहे अशी रशियन जनतेची खात्री पटली होती. सर्वत्र असंतोषाचा भडका उडाला होता तरीही झार या परिस्थितीकडे दुर्लक्ष करत होता. या परिस्थितीत पेट्रोग्राड मधील सुमारे एक लाख कामगार ८ मार्च १९१७ रोजी संपावर गेले. झार विरोधात त्यांनी आंदोलने सुरु केली. याच काळात युद्ध आघाडीवरील बारा लाख सैनिकांनी युद्ध क्षेत्र सोडले आणि ते ही या आंदोलनात सहभागी झाले. आंदोलनाने उग्र स्वरूप धारण केले. झारने लष्कराच्या सहाय्याने आंदोलन दडपण्याचा प्रयत्न केला, मात्र सैनिकांनी गोळीबार करण्यास नकार दिला व तेही आंदोलनकर्त्यांना येवून मिळाले. हे आंदोलन रशियात सर्वत्र पसरले. सरकारी कचेऱ्यावर हल्ले केले जावू लागले. तुरुंग फोडून अनेक राजबंद्यांना मुक्त केले. इकडे शेतकऱ्यांनी जमीनदारांच्या मालमत्तावर हल्ले केले. झारने ड्युमा बरखास्तीचा निर्णय घेतला मात्र ड्युमाच्या सदस्यांनी याला नकार दिला. परिस्थिती पूर्णपणे हाताबाहेर गेलेली आहे हे पाहून १५ मार्च १९१७ रोजी झार निकोलस दुसरा याने राज्यत्याग केला. त्याने आपला भाऊ ड्यूक मायकेल याच्याकडे सत्ता सोपविली मात्र जनतेने त्याला नाकारले. झारला आणि त्याच्या कुटुंबीयांना अटक करून पूर्व रशियातील उरल पर्वताच्या पायथ्याशी असलेल्या तुरुंगात ठेवण्यात आले. अशारीतीने पहिल्या टप्यात क्रांतीकारकांना यश मिळाले.

## २) हंगामी सरकारची स्थापना (१५ मार्च ते २१ जुलै १९१७) :-

ड्युमाने हंगामी सरकारची स्थापना केली. त्याचे पंतप्रधानपद प्रिन्स जॉर्ज एलवॉव (Lvov) यांच्याकडे देण्यात आले. याच्या मंत्री मंडळात उच्चवर्गीय, सरदार, भांडवलदार यांच्या प्रतिनिधींचा मंत्री म्हणून सहभाग होता. यामुळे काही इतिहासकार या घटनेचे वर्णन **'बुझ्र्वा क्रांती'** असेही करतात. या सरकारने जनतेला भाषण, मुद्रण स्वातंत्र्य, संघटन स्वातंत्र्य इत्यादी घटनात्मक स्वातंत्र्ये बहाल केली. देशाबाहेर पाठविलेल्या क्रांतीकारकांना मायदेशी बोलाविले. अमेरिका, इंग्लंड, फ्रान्स या राष्ट्रांनी या सरकारला मान्यता दिली. याच काळात लेनिन, ट्रॉटस्की, स्टॅलीन हे हद्दपारी भोगत असलेले नेते रशियात

परतले. एलवॉवचे सरकार फार काळ टिकू शकले नाही. रशियन जनता महायुद्धातून माघार घेण्याबाबत आग्रही होती तर या सरकारने युद्धातील सहभाग तसाच चालू ठेवला. रशियात परतलेल्या क्रांतिकारी नेत्यांनी सैनिक, कामगार, शेतकऱ्यांच्या संघटना म्हणजेच सोव्हिएत स्थापन केल्या. या संघटना सरकारच्या मवाळ धोरणास जोरदार विरोध करू लागल्या. अखेरीस या हंगामी सरकारने राजीनामा दिला.

## ३) केरेन्स्कीच्या नेतृत्वाखाली सरकारची स्थापना (जुलै १९१७ ते नोव्हेंबर १९१७) :-

रशियात झारच्या सत्ता त्यागानंतर ड्युमातील प्रागतिक पक्षाच्या नेतृत्वाखाली हंगामी सरकार स्थापन झाले परंतु या सरकारने जमिनीचे वाटप, पहिल्या युद्धातून माघार याबाबत कोणताच निर्णय घेतला नाही. यामुळे देशाची अर्थव्यवस्था ढासळली. या संधीचा फायदा जहाल बोल्शेविकांनी घेतला. हंगामी सरकारचा पंतप्रधान प्रिन्स जॉर्ज एलवॉव सत्ता सांभाळण्यात अपयशी ठरल्याने यांच्याच सरकारमध्ये युद्धमंत्री म्हणून काम करणाया मेन्शेव्हिक गटाचा नेता केरेन्स्कीकडे सरकारचे प्रमुख पद देण्यात आले. त्याने आपले सरकार स्थापन करत सुरवातीपासूनच तडजोडीचे धोरण ठेवले. भांडवलदार - कामगार, जमीनदार - शेतकरी यांच्यातील मतभेद कमी करण्याचे प्रयत्न केले. शेतकरी, कामगारांना केरेन्स्की हा क्रांती विरोधक वाटू लागला. देशासाठी नवीन राज्यघटना निर्माण करण्यासाठी त्याने प्रयत्न केले. पहिल्या महायुद्धातून रशियाला बाहेर काढण्यात मात्र त्याला अपयश आले. इंग्लंड आणि फ्रान्सच्या आग्रहामुळे केरेन्स्कीने युद्ध सुरु ठेवले. सप्टेंबर १९१७ मध्ये रशियाच्या ताब्यातील रिंगा शहर जर्मनीने जिंकून घेतले. गलेशियाही त्यांच्या ताब्यातून गेला. रशियन जनतेला युद्ध नको होते त्यामुळे केरेन्स्की सरकारविरोधात असंतोष वाढू लागला. बोल्शेविक गटाचा विरोध वाढत आहे हे पाहून केरेन्स्कीने कॉर्नीलॉव्ह (Kornilov) या आपल्या सरसेनापतीस बोल्शेविकांचा बंदोबस्त करण्याचा आदेश दिला. मात्र कॉर्नीलॉव्हने लष्कराच्या मदतीने सत्ता स्वतःच्या ताब्यात घेण्याचा प्रयत्न सुरु केला. सत्ता लष्कराच्या ताब्यात जाणे बोल्शेविक गटास योग्य वाटत नव्हते. त्यांनी पाठिंबा देणाऱ्या कामगार आणि सैनिकांच्या मदतीने कॉर्नीलॉव्हचा मुकाबला केला. एकूणच अराजकतेची परिस्थिती रशियात निर्माण झाली. केरेन्स्की सरकार परिस्थिती हाताळण्यात अपयशी ठरले.

## ४) बोल्शेविक राज्यक्रांती (नोव्हेंबर १९१७) :-

मार्च १८९८ मध्ये समाजवादी क्रांती या संकल्पनेने प्रेरित झालेले विचारवंत एकत्र आले. त्यांनी **''द रशियन सोशल डेमोक्रेटिक लेबर पार्टीची''** स्थापना केली. लेनिन या पक्षाचा सदस्य बनला. या पक्षाचे मुखपत्र असलेल्या इस्क्रा या पत्रकाचे तो संपादकपदही सांभाळत होता. कामगारांना क्रांतीसाठी प्रेरित केले पाहिजे या मताच्या लेनिनने, पक्षाचे नेतृत्व एककेंद्री असावे याबरोबरच सर्व निर्णय बहुमतांनी घ्यावेत आणि ते सर्वांनी मान्य करावेत असे मत मांडले. लेनिनच्या या मताला मार्तोव- ट्रॉटस्की इ. चा विरोध होता. पक्षनेतृत्व एककेंद्री असू नये त्याचप्रमाणे निर्णय सर्वावर बंधनकारक असू नयेत अशी त्यांची मागणी होती. त्यांच्यातील मतभेद वाढत गेले. बहुमत असलेला लेनिनचा समर्थक गट **'बोल्शेविक'** आणि अल्पमतात असलेला गट **'मेन्शेविक'** या नावाने ओळखला जावू लागला. हे गट नंतर स्वतंत्र पक्ष म्हणून कार्यरत झाले. लेनिनला त्याच्या क्रांतीकार्यामुळे रशियातून हद्दपार व्हावे लागले होते. मात्र रशियातील राज्यक्रांतीची बातमी

कळल्याबरोबर तो रशियात परतला. त्याने बोल्शेविक पक्षाची बांधणी केली. सर्व रशियाभर संघटनेचे जाळे पसरले. ट्रॉटस्कीही त्याला येऊन मिळाला. शेतकरी आणि कामगारांच्या मंडळावर (सोविएतस) नियंत्रण आणण्याचेही त्याने प्रयत्न केले. **'शांतता, जमिनीचे फेरवाटप आणि प्रत्येकाला भाकरी'** ही त्याची घोषणा लोकप्रिय झाली. कार्ल मार्क्सच्या कामगारांचे राज्य या संकल्पनेस प्रत्यक्षात आणण्यासाठी त्याने प्रयत्न सुरु केले. त्यासाठी क्रांतिकारी मार्गाचा अवलंब करणे त्याला आवश्यक वाटत होते. या काळात त्याला सामान्य जनतेचा मिळत असलेला पाठिंबा वाढत गेला.

केरेन्स्की सरकारला रशियातील परिस्थितीवर नियंत्रण ठेवता आले नाही. विशेषतः कॉर्नीलॉव्हच्या आक्रमणानंतर परिस्थिती अधिकच बिघडली. या परिस्थितीचा फायदा घेत बोल्शेविकांनी ७ नोव्हेंबर १९१७ या दिवशी सरकारी कचेऱ्या, पोस्ट, टेलिग्राफ, रेल्वे, बँका अशी शासकीय महत्वाची केंद्रे स्वतःच्या ताब्यात घेतली. केरेन्स्की सरकारच्या सदस्यांना अटक करण्यात आली आणि त्याला सत्ता त्याग करण्यास भाग पाडण्यात आले. आता सर्व सत्ता बोल्शेविक पक्षाच्या हाती आली. ८ नोव्हेंबरला लेनिनने अध्यक्षपदाची सूत्रे आपल्या हातात घेतली. परराष्ट्रमंत्री म्हणून ट्रॉट्स्की, शिक्षणमंत्री म्हणून लुनाचरस्की, गृहमंत्री म्हणून रिकोव्ह तर अल्पसंख्याक गटांचे मंत्री म्हणून स्टॅलिन यांना कार्यभार देण्यात आला. अशा रीतीने रक्तपात न होता बोल्शेविकांच्या हातात सत्ता आली.

### ❋ रशियन सोशल डेमोक्रेटिक लेबर पार्टी या पक्षात दोन गट पडले :-

१. **बोल्शेविक :** (बहुसंख्य) क्रांतिकारी विचारांचा समाजवादी गट, जो क्रांतिद्वारे निरंकुश सत्तेचा अंत करण्याची इच्छा असणारा, लेनिन, प्लेखानोव आणि त्याच्या अनुयायांना बोल्शेविक म्हटले जाऊ लागले.

२. **मेन्शेव्हीक :** (अल्पसंख्य) उदारमतवाद समर्थक, हा गट संवैधानिक शासनाचे समर्थन करणारा होता. मार्तोव, ट्रॉटस्की या विचारांचे होते. मेन्शेव्हिकांच्या विचारसरणीनुसार संसदीय लोकशाही शासनपद्धतीच्या माध्यमातून संपूर्ण समाजवादाचे ध्येय प्राप्त केले जाऊ शकते. त्यासाठी त्यांना मध्यमवर्गीय लोकांचे (बुर्झ्वा वर्ग) सहकार्य अपेक्षित होते.

## ❋ बोल्शेविक सरकारचे कार्य :-

पहिल्या महायुद्धातील सहभागामुळे रशियाची अर्थव्यवस्था मोडकळीस आली होती. जर्मनीबरोबर १९१८ मध्ये लेनिनने ब्रेस्ट लिटोव्हास्कचा तह करून पहिल्या महायुद्धातून माघार घेतली. या तहाने युद्धखंडणी बरोबरच युक्रेन, पोलंड व सीमेवरचे काही प्रदेश जर्मनीला द्यावे लागले. शिवाय दोस्त राष्ट्रांचा रोषही पत्करावा लागला. ही माघार अंतर्गत शांततेसाठी आणि प्रगतीसाठी लेनिनला आवश्यक वाटत होती. रशियासाठी नवीन राज्यघटना तयार केली गेली. २३ जानेवारी १९१८ रोजी राष्ट्राचे नाव **'रशियन सोशॅलिस्ट फेडरेटेड सोव्हिएट रिपब्लिक'** (R.S.F.S.R.) असे केले गेले नंतरच्या काळात हेच नाव **'युनियन ऑफ सोव्हिएत सोशॅलिस्ट रिपब्लिक'** (U.S.S.R.) असे झाले. बोल्शेविक सरकारने देशातील

सर्व उद्योगधंद्याचे राष्ट्रीयीकरण करून सर्व कारखाने कामगार सोव्हिएतसच्या ताब्यात दिले. जमिनीचे वाटप भूमिहीन शेतकऱ्यांमध्ये करण्यात आले. धर्म आणि राजकारण याची फारकत करताना चर्चची सर्व मालमत्ता जप्त केली. शेतकऱ्यांनी सर्व अतिरिक्त उत्पादन सरकार जमा करावे अशी सक्ती केली. अंतर्गत विरोधकांचा बंदोबस्त करण्यासाठी **'चेका'** या विशेष समितीची स्थापना करण्यात आली. अनेक विरोधकांना या चेकाच्या माध्यमातून हद्पार करण्यात आले किंवा फाशीची शिक्षा देण्यात आली. क्रांती स्थिर करण्यासाठी लेनिनला हे आवश्यक वाटत होते. रशियातील भांडवलदार, जमीनदार आणि काही लष्करी अधिकाऱ्यांनी बोल्शेविक शासन उलथवून टाकण्यासाठी प्रयत्न केले. काही युरोपीय राष्ट्रांनीही या लोकांना मदत केली कारण त्यांना साम्यवादी तत्वज्ञान आणि त्यावर आधारित रशियाचे सरकार नको होते. मात्र हा सर्व विरोध लेनिन आणि त्याच्या सहकाऱ्यांनी मोडून काढला आणि क्रांती यशस्वी केली.

### ❋ बोल्शेविक राज्यक्रांतीचे परिणाम :-

रशियात घडून आलेल्या या राज्यक्रांतीचे परिणाम हे केवळ रशिया पुरतेच मर्यादित न राहता जगाच्या राजकीय, आर्थिक आणि वैचारिक पातळीवरही झाले. ही क्रांती ७ नोव्हेंबर १९१७ रोजी घडली, रशियन दिनदर्शिकीप्रमाणे ही क्रांती २४, २५ ऑक्टोबर १९१७ रोजी झाल्याने **'ऑक्टोबर राज्यक्रांती'** या नावानेही ओळखली जाते. या क्रांतीचे परिणाम पुढीलप्रमाणे :-

**१. झारशाहीचा अंत :** क्रांतीच्या सुरवातीच्या टप्यात झारला आपली सत्ता सोडावी लागली. नंतर शेवटचा झार निकोलस दुसरा आणि त्याच्या कुटुंबियांना क्रांतिकारकांनी गोळ्या घालून ठार केले. झार वंशियाच्या अत्याचाराला कंटाळून रशियन जनतेने झारशाही पूर्णपणे उखडून टाकली. सुमारे तीनशे वर्ष निरंकुशपणे राज्य करणाऱ्या रोमोनॉव्ह घराण्याचा झारशाहीस या १९१७ च्या या रशियन राज्यक्रांतीने कायमस्वरूपी संपवले.

**२. महासत्ता म्हणून रशियाची वाटचाल :** १९१७ पूर्वी रशिया सर्वच क्षेत्रात एक मागासलेला देश होता. युरोपात झालेल्या प्रगतीचे वारे इथंपर्यंत पोहोचले नव्हते.१९०५ मध्ये चिमुकल्या जपाननेही रशियाचा पराभव केला होता. त्यावेळी युरोपीय राजकारणातही रशियास तसे दुय्यम स्थान होते. मात्र क्रांतीनंतर स्वीकारलेल्या नव्या धोरणांमुळे रशियाचा कायापालट झाला. रशियाने खऱ्या अर्थाने आधुनिक युगात प्रवेश केला. राजकारण, उद्योग, विज्ञान, तंत्रज्ञान अशा सर्वच क्षेत्रात प्रगती घडून आली. यामुळेच थोड्याच कालावधीत रशिया हे जगातील आघाडीचे राष्ट्र बनले. अमेरिकेच्या बरोबरीने महासत्ता म्हणून त्याचा उल्लेख केला जाऊ लागला.

**३. वर्गविहीन समाज रचना :** सामाजिक विषमता हे क्रांतीपूर्व काळातील रशियन समाजाचे एक वैशिष्ट्य बनले होते. १९१७ च्या क्रांतीनंतर मात्र ही विषमता नष्ट झाली. इथे झारशाहीबरोबरच सरंजामदारांचा वर्गही नष्ट झाला. राष्ट्रीयीकरणाच्याद्वारे इथल्या सर्व जमिनी सरकारने स्वतःच्या ताब्यात घेतल्या. उद्योगपती त्याचबरोबर भांडवलदारांचा वर्ग नष्ट करून चर्चच्या मालमत्ताही जप्त केल्या. विशेषतः वर्गविरहीत समाजरचनेसाठी येथे मोठ्या प्रमाणावर प्रयत्न झाले. डॉक्टर, इंजिनियर, संशोधक,

तत्वज्ञ, लेखक, कारागीर, कलावंत असा समावेश असलेल्या मध्यमवर्गास यामुळे महत्व प्राप्त झाले. कामगारवर्गाची होणारी पिळवणूक थांबली. उत्पादनाची साधने ही सरकारच्या मालकीची झाली. प्रत्येकाला त्याच्या योग्यतेप्रमाणे काम आणि योग्य तो मोबदला मिळाल्यामुळे बेकारी आणि दारिद्र्याचे प्रमाण कमी झाले.

**४. रशियाचे औद्योगिकरण :** क्रांतीपूर्व काळात रशियात उद्योगधंदे सुरु झाले होते मात्र औद्योगिकरणाचा वेग अत्यंत मंद होता. बोल्शेविक राज्यक्रांतीनंतर मात्र औद्योगिकरणाचा वेग वाढला. नियोजनबद्धरित्या आर्थिक विकास घडवून आणताना लेनिन – स्टॅलिन यांनी उद्योगधंद्याकडे विशेष लक्ष दिले. वीज, लोखंड, कोळसा, पेट्रोलियम, सिमेंट, शस्त्रास्त्रे यांच्या उत्पादनाबरोबच विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातही प्रगती केली. अगदी कमी कालावधीत रशियाने अवकाश संशोधनात मोठी झेप घेतल्याने आंतरराष्ट्रीय स्तरावर मानाचे स्थान मिळविले.

**५. साम्यवादी तत्वज्ञानाचा प्रसार :** कार्ल मार्क्सच्या साम्यवादी तत्वज्ञानाचा स्वीकार करत ही क्रांती घडून आली. याच तत्वज्ञानामुळे रशियाने आर्थिक प्रगतीही साधली. अनेक मागासलेल्या शोषित आणि पारतंत्र्यात असलेल्या राष्ट्रांना रशियाने स्वतःच्या रूपाने एक नवा मार्ग दाखविला. यानंतरच्या काळात रशियाचा आदर्श समोर ठेवत अनेक राष्ट्रांमध्ये साम्यवादी क्रांती घडून आली. जगभरात साम्यवादी तत्वज्ञानाचा प्रसार होत गेला. पोलंड, रुमानिया, बल्गेरिया, हंगेरी, पूर्व जर्मनी, क्युबा अशी अनेक राष्ट्रे साम्यवादी बनली.जागतिक पातळीवर या तत्त्वज्ञांनाला विशिष्ट स्थान मिळाले. या तत्वज्ञानाने भांडवलशाही समोर मोठे आव्हान उभे केले.

**६. शैक्षणिक प्रगती :** क्रांतीपूर्व रशियात सरासरी ऐंशी टक्के जनता निरक्षर होती. राज्यक्रांतीनंतर रशियाने शिक्षण विकासाकडे विशेष लक्ष दिले.धर्मसंस्थेचा शिक्षणावर असलेला पगडा पूर्णपणे नष्ट करण्यात आला. प्राथमिक शिक्षण सक्तीचे केले गेले. प्रौढ लोकांसाठी रात्र शाळा सुरु करण्यात आल्या. विज्ञान आणि तांत्रिक शिक्षणावर विशेष भर दिला गेला. शैक्षणिक संस्थांची संख्या वाढविण्यात आली. उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना अनेक सोयी सवलती उपलब्ध करून देण्यात आल्या. या सर्व प्रयत्नामुळे उच्च शिक्षण घेणाऱ्यांचे प्रमाण अधिक वाढले. १९३३ पर्यंत पंचाऐंशी टक्के रशियन जनता साक्षर झाली. याच काळात साम्यवादी सरकारकडून बुद्धिवादी वर्गावर मात्र नियंत्रण आणले होते. विचार आणि लेखन स्वातंत्र्यावर बंधने घातली होती एकीकडे पाश्च्यात्यांच्या तोडीचे शास्त्रज्ञ रशियात निर्माण झाले तर दुसरीकडे कला,साहित्य, तत्वज्ञानाच्या प्रगतीस मर्यादा आल्या. शिक्षणातून साम्यवादी तत्वज्ञान विचारांचा मोठ्या प्रमाणावर प्रसार होईल याकडे रशियाने लक्ष दिले.

**७. जागतिक पातळीवर श्रमिकांना मिळालेली प्रतिष्ठा :** जगभरात श्रमिकांची, कष्टकऱ्यांची परिस्थिती हलाखीची होती. भांडवलदार वर्ग त्यांची खूप पिळवणूक करत होता. रशियन राज्यक्रांतीनंतर मात्र केवळ रशियाच्याच नव्हे तर जगभरातल्या श्रमिकांना प्रतिष्ठा मिळाली. रशियातील कामगारवर्ग, शेतकरी यांना राज्यक्रांती म्हणजे स्वतःचा विजय वाटू लागला. रशियात या श्रमजीवी वर्गासाठी अनेक कल्याणकारी

योजना राबविण्यात आल्या. यामध्ये मोफत वैद्यकीय मदत, भरपगारी वार्षिक सुट्या यांचा समावेश होता यामुळे श्रमिकांचे जीवनमान सुधारले. याचे आणखीन फलित म्हणजे इतर देशातील श्रमिक वर्ग जागृत होऊन तो सुधारणांची मागणी करू लागला. काही देशांनी सुधारणा घडवून आणल्या. एकूणच रशियन राज्यक्रांतीने श्रमिकांना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला.

**८. स्त्रियांच्या परिस्थितीत सुधारणा :** क्रांतीपूर्व रशियातील स्त्रियांची परिस्थिती अत्यंत वाईट होती. घराच्या चौकटीत बंदिस्त असलेल्या स्त्रियांना सामाजिक रूढी, परंपरांचे पालन करावे लागे. बोल्शेविक सरकार सत्तारूढ झाल्यावर त्यांनी स्त्रियांच्या उन्नतीसाठी प्रयत्न केले. राज्यघटनेत स्त्रियांना पुरुषांबरोबरीचे हक्क दिले. शिक्षणाबरोबरच नोकरी करण्याची मुभा  देण्यात आली. काम करणाऱ्या स्त्रियांना अनेक सवलती देण्यात आल्या. त्यांच्या मुलांच्या संगोपनाची जबाबदारी सरकारकडून उचलली गेली. या सर्वामुळे  सार्वजनिक क्षेत्रात काम करणाऱ्या स्त्रियांची संख्या वाढली.त्याचबरोबर डॉक्टर, तंत्रज्ञ म्हणूनही स्त्रिया काम करू लागल्या. राज्यक्रांतीमुळेच हे बदल शक्य झाले.

**९. साम्यवादी हुकुमशाहीचा उदय :** १९१७ च्या राज्यक्रांतीने निरंकुश झारशाही उलथून लावली मात्र रशियात बोल्शेविकांची हुकुमशाही सुरु झाली. क्रांती यशस्वी करण्यासाठी लेनिन यांनी अनेक निर्णय जनमताचा विचार न करता घेतले. जनतेच्या मुलभूत स्वातंत्र्यावरही बंधने घालण्यात आली. विरोधकांचा बिमोड करण्यासाठी लेनिन आणि त्यानंतर सत्तेवर आलेल्या स्टॅलिनने दहशतीच्या मार्गाचा वापर केला. विरोध करणाऱ्या अनेकांना तुरुंगात टाकले तर काहीना ठार मारले. थोडक्यात झारशाही नष्ट झाली पण रशियाला साम्यवादी हुकुमशाहीला सामोरे जावे लागले.

**१०. जागतिक राजकारणात शीतयुद्धाची सुरवात :** पहिल्या महायुद्धापर्यंत जागतिक राजकारणात अमेरिका, इंग्लंड आणि फ्रान्स या भांडवलशाही राष्ट्रांचा खूप प्रभाव होता. क्रांतीनंतर रशियाने अल्पावधीत प्रगती केली त्यामुळे भांडवलशाही राष्ट्रांना तुल्यबळ प्रतिस्पर्धी निर्माण झाला. जगातल्या इतर काही राष्ट्रामध्ये ही साम्यवादी क्रांती घडून आली होती. त्यामुळे जागतिक राजकारणात अमेरिकाप्रणीत  भांडवलशाही देशांचा एक गट तर रशियाप्रणीत साम्यवादी राष्ट्रांचा दुसरा गट असे दोन परस्परविरोधी विचारसरणीचे गट कार्यरत झाले. राजकीय, आर्थिक आणि लष्करी क्षेत्रातही त्यांच्यात स्पर्धा सुरु झाली. दुसऱ्या महायुद्धानंतर दोन्ही गटातील स्पर्धेने उग्र रूप धारण केले. कुरघोडीचे राजकारण होऊ लागले. शस्त्रास्त्र स्पर्धा वाढली. या सर्वामुळे जागतिक पातळीवर अशांततेचे वातावरण निर्माण झाले. अप्रत्यक्षरित्या सुरु झालेले हे युद्ध **'शीतयुद्ध'** म्हणून ओळखले गेले. संपूर्ण जगाची जणू तिसऱ्या महायुद्धाकडे वाटचालच सुरु झाली. रशियन राज्यक्रांतीचाच हा एक विपरीत परिणाम होता.

जगातल्या पहिल्या साम्यवादी विचारांवर आधारित रशियन राज्यक्रांतीने झारशाही उखडून लावत कष्टकऱ्यांचे राज्य अस्तित्वात आणण्याचा प्रयत्न केला. उदारमतवाद, व्यक्ती स्वातंत्र्य, लोकशाही, भांडवलशाही, साम्राज्यवाद या सर्व प्रस्थापित संकल्पनांना आव्हान देण्याचे कार्य या साम्यवादी क्रांतीने केले. कष्टकऱ्यांना त्यांच्या अधिकाराची जाणीव करून दिली पण साम्यवादी हुकुमशाहीस जन्मही दिला.

❋ **रशियन राज्यक्रांतीचे महत्व :-**

१) कार्ल मार्क्सच्या तत्वज्ञानावर आधारित ही जगातील पहिली साम्यवादी क्रांती होती.

२) या क्रांतीमुळे श्रमजीवी वर्गाला महत्वाचे स्थान मिळाले.

३) धर्मविरहित, वर्गविरहित आणि शोषणरहित नवी समाजरचना प्रत्यक्षात आणण्याचे कार्य या क्रांतीने केले.

४) या क्रांतीचे परिणाम केवळ रशियापुरते मर्यादित न राहता जागतिक पातळीवरही झाले.

## स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न-२

❋ **योग्य पर्याय निवडा.**

१. रशियन राज्यक्रांतीने .............. घराण्याची सत्ता उलथवून लावली

*अ) ट्यूडर ब) रोमोनॉव क) ब्युरबॉन ड) बोनापार्ट.*

२. मदर (आई) या कादंबरीचे लेखन ............... याने केले

*अ) ट्रॉटस्की ब) डोटोव्हस्की क) टॉलस्टॉय ड) मॉक्झिम गॉर्की.*

३. दास कॅपिटल या ग्रंथाचे लेखन ................ यांनी केले.

*अ) कार्ल मार्क्स ब) रॉबर्ट ओवेन क) टॉलस्टॉय ड) सेंट सायमन.*

४. ............... च्या तहाने रशियाने पहिल्या महायुद्धातून माघार घेतली.

*अ) व्हर्साय ब) ब्रेस्ट लिटोव्हास्क*

*क) ट्रॉयनॉन ड) पॅरिस.*

५. मेन्शेविक नेता .............. हा सुरवातीला रशियाचा अध्यक्ष बनला.

*अ) स्टॅलिन ब) ट्रॉटस्की क) केरेन्स्की ड) गॅपोन.*

## २.२.३ लेनिनची भूमिका :-

१९ वे शतक सामाजिक बदलांचे आणि स्थित्यंतराचे शतक होते. औद्योगिक क्रांतीनंतर झालेल्या नव्या सामाजिक वर्गांचा उदय हे या शतकाचे वैशिष्ट्य ठरले. विशेषतः कामगार वर्गाचा उदय आणि या वर्गाला मध्यवर्ती ठेवत कार्ल मार्क्सने मांडलेले तत्वज्ञान की जे साम्यवाद म्हणून प्रसिद्ध झाले. या तत्वज्ञानाने प्रचलित राजकीय-सामाजिक व्यवस्थाना जोरदार धक्का देण्याचे कार्य केले. कामगारांचे राज्य, वर्गविहीन समाजाची निर्मिती हे त्याचे स्वप्न होते. हे स्वप्न प्रत्यक्षात आले ते १९१७ च्या रशियन राज्यक्रांतीच्या

रूपाने. १९१७ पूर्वी झारशाहीच्या विरोधात रशियात विविध ठिकाणी उठाव झाले. त्याला यश आले नाही. १९१७ ची बोल्शेव्हीक क्रांती पुर्णपणे यशस्वी ठरली. यामध्ये झारशाहीचा अंत घडून आला. या क्रांतीचा एक शिल्पकार म्हणून लेनिनचे नाव घ्यावे लागते. अंतर्गत त्याचप्रमाणे बाह्य शक्तीचा या क्रांतीला आणि साम्यवादाला असलेला विरोध मोडून काढत त्याने रशियात साम्यवादाचे तत्वज्ञान यशस्वीपणे रुजविले. कामगारांचे राज्य प्रस्थापित केले.

## ❋ लेनिनचे पूर्वायुष्य (इ.स. २२ एप्रिल १८७०–२१ जानेवारी १९२४)

लेनीनचे पूर्ण नाव व्लादिमीर इलिच उल्यानोव उर्फ लेनिन. (Vladimir ilyich ulyanov alias Lenin) व्होल्गा नदीच्याकाठी असलेल्या सिंबिर्स्क (Simbirsk ) नावाच्या शहरात २२ एप्रिल १८७० मध्ये त्याचा जन्म झाला. त्याचे कुटुंब क्रांतीकारी विचारांचे होते. त्याचे वडील शिक्षण क्षेत्रात कार्यरत होते तर आईही सुशिक्षित होती. तिने लेनिनला लिहायला – वाचायला शिकविले. वयाच्या दहाव्या वर्षी तो शाळेत जाऊ लागला. १८८६ मध्ये त्याच्या वडिलांचा मृत्यू झाला तर १८८७ मध्ये त्याच्या मोठ्या भावाला झार तिसरा अलेक्झांडर याच्या हत्येच्या कटात सहभागी असल्याचा आरोप ठेवून फाशी दिले गेले. लेनीनची मोठी बहीण ॲना हिला सुद्धा तुरुंगवासाची शिक्षा झाली. अशा क्रांतीकारी वातावरणात लेनिन वाढला. विद्यार्थीदशेत असतानाच त्याने भरपूर वाचन केले होते. रशिया या काळात स्थित्यंतराच्या अवस्थेत होता. समाजातील अस्वस्था खूप वाढली होती. या घडामोडींचा दूरगामी परिणाम लेनींनवर झाला. शालेय शिक्षण पूर्ण झाल्यावर तो कझान विद्यापीठात उच्च शिक्षणासाठी दाखल झाला. तेथील विद्यार्थ्यानी लेनीनच्या मोठ्या भावाला फाशी दिली गेली या घटनेविरोधात निदर्शने केली. यामुळे लेनीन आणि इतर ४५ विद्यार्थ्यांना विद्यापीठातून काढले गेले. इतर विद्यापीठातूनही त्याला प्रवेश मिळाला नाही. तो आई भावंडासह सामरा या ठिकाणी वास्तव्यास गेला. या कालखंडात त्याने खूप वाचन केले. कार्ल मार्क्सचे प्रसिद्ध पुस्तक दास कॅपिटल याच्या वाचनात आले. या पुस्तकाने त्याचा दृष्टिकोन बदलला. रशियात नव्याने उदयास आलेल्या समाजवादी गटाच्या तो संपर्कात आला. लेनीनच्या आईने प्रयत्न करून त्याला सेंट पिटर्सबर्ग विद्यापीठातून परीक्षा देण्याची परवानगी मिळवली. या काळात त्याचे लिखाणही प्रसिद्ध झाले. पिटर्सबर्ग मध्ये त्याने कामगारांची एक संघटना स्थापन केली. या कामगारांकडून त्याने संप घडवून आणला. यामुळे त्याला तीन वर्षासाठी सैबेरियात हद्दपार करण्यात आले. या काळातही त्याचे वाचन – लेखन सुरू होते. राजकीय कारणांनी हद्दपार झालेल्या त्याच्या सारख्याच क्रांतीकारी विचारांच्या नेत्याच्या तो संपर्कात आला. त्याची पूर्वीची सहकारी नादेझ्दा क्रुपस्काया (Nadezhda Krupskaya) ही सुद्धा त्यावेळी सैबेरियात हद्दपारीची शिक्षा भोगत होती. तिच्याशी लेनीनने विवाह केला. याच काळात त्याचा प्रसिद्ध ग्रंथ **'रशियातील भांडवलशाहीचा विकास'** (Development of Capitalism in Russia) हा ग्रंथ लिहून पूर्ण झाला. हद्दपारीचा कालखंड संपल्यानंतर रशियाबाहेर जाण्याची योजना त्याने आखली. कारण रशियात राहून आवश्यक ते कार्य त्याला करता येणार नव्हते.

रशियातील मार्क्सवादी विचारांच्या लोकांना वैचारिकदृष्ट्या एकत्र करण्यासाठी त्याने गुप्तपणे 'इस्क्रा' नावाचे वृतपत्र सुरू केले. डिसेंबर १९०० मध्ये त्याचा पहिला अंक प्रसिद्ध झाला. त्याच्या वैचारिक लिखाणामुळे समाजवादी विचारांच्या वर्तुळात त्याला मान मिळू लागला. रशिया सोडून तो पश्चिम युरोपात गेला. दरम्यान रशियात सोशल डेमोक्रेटिक पक्ष १८९८ मध्ये स्थापन झाला होता. लेनीनही या पक्षाचा सदस्य बनला. या पक्षाचा प्रभाव वाढत गेला. विशेषत: रशियातील कामगारांची संख्या वाढत चालली होती. त्यांच्या समस्याही वाढत चाललेल्या होत्या. डेमोक्रेटिक पक्षाने आपली विचारसरणी या वर्गात रुजवायला सुरवात केली. राजकीय अधिकार मिळविण्यासाठी क्रांती असे त्यांच्या मनावर बिंबविले जाऊ लागले. यामुळे कामगारवर्गात पक्षाचा प्रभाव वाढला.

### ❋ लेनिनची हद्दपारी :-

पक्षाची कार्यपद्धती कशी असावी यावरून नेत्यात मतभेद वाढीस लागले. कामगार क्रांतीची वाट न बघता त्यांना क्रांतीस प्रेरित करावे, पक्षाचे एक नेतृत्व आणि शिस्त असावी, बहुमताने निर्णय घ्यावेत असे लेनिनचे मत होते. त्याला प्लेखोनेवने पाठिंबा दिला होता मात्र मार्तोव - ट्रॉटस्की इ. नेत्यांच्या या विचारधारेस विरोध होता. धोरणाबाबत सदस्यांना स्वातंत्र्य असावे , एखादा निर्णय सदस्यांना मान्य नसेल तर तो त्यांच्यावर बंधनकारक असू नये असे त्यांचे मत होते. हे मतभेद तीव्र होत गेले. मार्तोव विचारसरणीचा गट मेन्शेविक तर लेनिनचा गट बोल्शेविक म्हणून ओळखला जाऊ लागला. पक्षातली ही फुट वाढतच गेली. पुढे १९१७ च्या क्रांतीनंतर बोल्शेविक गटाने रशियाची सर्व सत्ता ताब्यात घेवून कामगारांची हुकुमशाही प्रस्थापित करण्याचे मार्क्सचे स्वप्न पूर्ण केले. १९०५ च्या क्रांतीनंतर लेनिनला पुन्हा एकदा रशिया बाहेर जावे लागले. त्याचा बराच काळ बाहेरचं व्यतीत झाला. १९१७ च्या क्रांतीच्या सुरवातीच्या टप्प्यातही तो स्वित्झर्लंड मध्ये होता. तेथून त्याचे लिखाण आणि अनुयायांना प्रेरित करण्याचे कार्य सुरू होते. पहिल्या महायुद्धात रशियाने सहभागी व्हावे या गोष्टीला त्याचा विरोध होता. हे युद्ध भांडवलशाही राष्ट्रांमधील असून कामगारांच्या हिताशी त्यांना काही देणे - घेणे नाही, तेंव्हा कोणत्याही राष्ट्रातील समाजवादी पक्षाने या युद्धाला पाठींबा देवू नये असे त्याचे मत होते. या मुद्यावरून सोशल डेमोक्रटिक पक्षातील इतर सदस्यांबरोबर त्याचे मतभेद झाले. रशियन कामगारामध्ये युद्ध विरोधी प्रचार त्याने केला. भांडवलशाही विरूद्धचे त्याचे विचार जर्मनीला महत्वाचे वाटत होते. यामुळे रशियात परतण्यासाठी जर्मनीने त्याला मदत केली.

लेनिन आणि त्याच्या इतर सहकाऱ्याचे झारशाही उलथवण्याचे प्रयत्न सुरू होते. इकडे पहिल्या महायुद्धात प्रवेश केलेल्या रशियाची परिस्थिती अधिकाधिक बिकट बनत गेली. क्रांतीच्या दिशेने वाटचाल सुरू झाली. १९१७ मध्ये रोमोनॉव घराण्याच्या सत्तेची अखेर होऊन रशियातील राजसत्ता नष्ट झाली. जॉर्ज एलवॉवच्या नेतृत्वाखालील सरकार स्थापन झाले परंतु ते पूर्णत: अपयशी ठरले. यानंतर सत्तेवर आलेल्या केरेन्स्कीच्या नेतृत्वाखालील सरकारला देशासमोरचे प्रश्न सोडविता आले नाहीत.

## ❋ केरेन्स्की सरकारचे अपयश आणि लेनींनचे मायदेशी आगमन :-

मवाळवादी नेता केरेन्स्कीच्या सरकारला युद्ध परिस्थिती हाताळण्यात अपयश आले. विशेषतः रशियाला युद्धातून बाहेर काढणे जमले नाही. या सरकार विरूद्धचा असंतोष वाढत गेला. सेनापती कोर्निलोवने केरेन्स्की सरकार विरुद्ध बंड करत राजधानीवर आक्रमण केले. दुबळे केरेन्स्की सरकार उलथवून लावून पुन्हा राजसत्ता स्थापन करण्याचे स्वप्न तो बघत होता. शेवटी बोल्शेवीकांच्या मदतीने केरेन्स्कीला हे आक्रमण थोपवावे लागले. केरेन्स्कीच्या दृष्टीने ही नामुष्की होती. या घटनेनंतर बोल्शेवीक पक्ष रशियन समाजात अत्यंत लोकप्रिय झाला. त्यांच्यावर समाजाचा विश्वास वाढला. परिणामी १९१७ मध्ये आलेल्या पेत्रोग्राद सोव्हियतच्या निवडणुकीत बोल्शेवीकांना बहुमत मिळाले.

ऑक्टोबर १९१७ मध्ये लेनिन आणि त्याचा सहकारी ट्रॉटस्की रशियात परतले. पेट्रोग्राड येथील क्रांतिकारी सशस्त्र दल त्यांनी ताब्यात घेतले. अनेक सरकारी गोष्टीवर त्याचप्रमाणे सैन्यावरही त्याने नियंत्रण मिळविले. सरकारी कचेऱ्या त्यांनी ताब्यात घ्यायला सुरवात केली. ७ नोव्हेंबरला सत्ता हातात घेतल्याचे लेनिनने जाहीर केले. केरेन्स्कीने परदेशात पलायन केले. पाठोपाठ मास्को व इतर भागावरही बोल्शेवीकांचा कब्जा झाला. १९१८ मध्ये लेनिनने ड्यूमा कायमची विसर्जित केली.

## ❋ राष्ट्रप्रमुख म्हणून लेनीनचे कार्य :-

सत्तेत आल्याबरोबर लेनिनने रशियाला युद्धातून बाहेर काढण्यासाठी हालचाली सुरू केल्या. ३ मार्च १९१८ मध्ये ब्रेस्ट-लिटोव्हस्क या ठिकाणी जर्मनी आणि रशिया यांच्यात तह झाला. या तहामुळे रशियाला आपला बराच भूभाग गमवावा लागला. रशियाने या गोष्टीचा निषेध केला. मात्र कोणत्याही परिस्थितीत लेनिनला युद्ध नको होते. 'भुकेलेल्यांना अन्न, भूमिहीनांना जमीन, सर्वांसाठी शांतता' हे लेनिनने सुरवातीलाच जाहीर केले होते. याला रशियन जनता पाठींबा देत होती. पहिल्या टप्प्यात फारसा रक्तपात न होता लेनिनने केरेन्स्कीकडून सत्ता स्वत:च्या ताब्यात घेतली होती. मात्र ही सत्ता टिकविणे ही तारेवरची कसरत होती. अनेक समस्या लेनिनसमोर होत्या. या क्रांतीला अंतर्गत तसेच परकीय विरोधक खूप होते. या सर्व विरोधकांना तोंड देत लेनिनने क्रांती यशस्वी केली. मात्र यासाठी त्याला खूप रक्तपात घडवून आणावा लागला. १९१८ मध्ये बोल्शेविक पक्षाचे नामांतर कम्युनिस्ट पक्ष असे करण्यात आले. रशियातील इतर राजकीय पक्ष बरखास्त केले गेले. शासन प्रमुख आणि कम्युनिस्ट पक्षाचा प्रमुख म्हणून सर्व सत्ता लेनिनच्या हातात एकवटली. राजधानी पेट्रोग्राडवर जलमार्गाने आक्रमणाची शक्यता होती यामुळे राजधानीचे ठिकाण मॉस्कोला स्थलांतरित करण्यात आले.

## ❋ लेनिनच्या कारकीर्दीतील महत्वाच्या घटना :-

### १. विरोधकांचा बंदोबस्त :-

लेनिनच्या साम्यवादी क्रांतीला अंतर्गत विरोधकांबरोबरच भांडवलशाही राष्ट्रेही विरोध करत होती. त्यांनी रशियातील प्रतिक्रांतीवाद्यांना चिथवायला सुरवात केली. विशेषत: झारच्या काळातील सेनापती की

जे आता सत्तेपासून दूर झाले होते त्यांनी उठाव केले. त्यांना झारशाही पुन्हा आणायची होती. हा गट प्रतिक्रांतीवादी म्हणजेच साम्यवादी क्रांतीला विरोध करणारा गट म्हणून ओळखला गेला. लेनिनला ठार मारण्याचेही प्रयत्न झाले. या प्रतिक्रांतीवाद्यांना ब्रिटन, जर्मनी, झेकोस्लोव्हाकिया या राष्ट्रांची फूस होती. झेक सैन्य रशियात घुसले. पूर्व रशियात उरल पर्वताच्या पायथ्याशी झार आणि त्यांच्या कुटुंबियांना कैदेत ठेवले होते त्या दिशेने ते जाऊ लागले. झारला सोडवून त्यांना पुन्हा सत्तेवर आणण्याचा त्यांचा प्रयत्न होता. हे पाहून रशियन सैन्यांनी १६ जुलै १९१८ रोजी झार व त्याच्या कुटुंबियांना गोळ्या घालून ठार केले त्याचबरोबर झेक सैन्यास परतवण्यात त्यांना यश आले. यानंतरच्या काळात लेनिनची धोरणे अधिकाधिक कडक होत गेली. प्रचलित सरकारच्या विरोधात चळवळ करण्याचा प्रयत्न करणाऱ्यांना देशद्रोही ठरवून त्यांना देहांताची शिक्षा देण्यात येईल असे जाहीर करण्यात आले. बोल्शेविक क्रांतीच्यावेळी झाला नाही इतका रक्तपात ही क्रांती टिकविण्यासाठी झाला. परकीयांशी लढत असताना लाखो रशियन सैनिक मारले गेले. या क्रांतीनंतरच्या काळातील घटनांमुळे ही क्रांती रक्तरंजित क्रांती (Bloody Revolution) म्हणून ओळखली गेली. लेनिनला कामगारांची हुकुमशाही प्रस्थापित करायची होती म्हणूनच त्याने आणि त्याच्या अनुयायांनी खंबीरपणे या संकटांचा सामना केला.

### २. ट्रॉटस्कीची भूमिका :-

लेनिनच्या सरकारला स्वकीयांच्या विरोधाचा सामना करावा लागत होता. एका अर्थी ही रशियातील यादवीच होती. ही मोडून काढण्यात ट्रॉटस्कीची भूमिका महत्वाची ठरली. प्रभावी व्यक्तिमत्वाच्या ट्रॉटस्कीने उत्तम वक्तृत्व आणि योजनाबद्ध वाटचाल या जोरावर त्याने लाल सेना उभी केली. झारकालीन लष्करी सेनानींना आपल्या बाजूला वळविण्यात तो यशस्वी झाला. सैनिकांच्या मनावर क्रांतीचे महत्व त्याने बिंबविले. असे पाच लाख प्रशिक्षित निष्ठावान सैनिक प्रतिक्रांतीवाद्यांनी स्थापन केलेल्या धवल सेनेविरुद्ध लढले. त्याचप्रमाणे परकीय सैन्याच्या वाटचालीस त्यांनी प्रतिबंध घातला. परकीयांनी प्रतिक्रांतीवाद्यांच्या सैन्यास मदत केली पण नंतर हळूहळू ते ही माघारी फिरले. १९२१ पर्यंत त्यांच्या ताब्यातील रशिया स्वतंत्र होऊ लागला. लाल सेनेस रशियातील कामगार - शेतकऱ्यांचाही पाठिंबा मिळाला.

### ३. उद्योगांचे राष्ट्रीयीकरण :-

खाणी, तेलविहीरी, रेल्वे इ. महत्वाचे उद्योग सरकारच्या ताब्यात घेण्यात आले. सरकारी उद्योग व्यवसायासाठी योजना तयार करण्यात आल्या. अन्नधान्य आणि इतर गरजांच्या वस्तूंचे वाटपही सरकारने स्वतच्या ताब्यात घेवून नियंत्रित वाटपाची पद्धत सुरू केली. आयात - निर्यातही सरकारने ताब्यात घेतली. वारसा हक्क नष्ट करून श्रमास महत्व देणारा कायदा करण्यात आला.

### ४. शेतजमिनीचे राष्ट्रीयीकरण :-

सत्तेत आल्याबरोबर लेनिनने शेतजमिनी विषयक अनेक कायदे पास केले. जमीन राष्ट्राच्या मालकीची राहील हे जाहीर केले. जमीन केवळ कसण्याचा अधिकार शेतकऱ्याला राहील त्याला ती विक्री करता येणार

नाही किंवा कर्जतारण म्हणून वापरता येणार नाही. अथवा भाडेपट्टीने दुसऱ्याला देता येणार नाही असे सांगितले गेल्याने शेतकरी वर्गात असमाधानाचे वातावरण तयार झाले. धान्य व्यवहाराची मक्तेदारी पद्धत स्वीकारण्यात येऊन भावनियंत्रण आणि धान्य वितरणासाठी मध्यवर्ती समिती नियुक्त करण्यात आली. कोणाला किती जमीन कसण्यासाठी द्यायची हे स्थानिक सोव्हिएतस ठरवणार होते. शेतकऱ्यांनी गरजेपुरते धान्य ठेवून उर्वरित सरकारकडे द्यावे असे बंधन घालण्यात आले. या बदल्यात शेतकऱ्यांना जमीन महसूल द्यावा लागणार नव्हता. सर्व जनतेला जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा सरकारमार्फत करण्यात येणार होता.

### ५. **नवे आर्थिक धोरण** (NEP - New Economic Policy) :-

लेनिनने प्रचलित अर्थव्यवस्थेत अनेक बदल करत उत्पादनाची साधने सरकारच्या ताब्यात घेतली. मात्र या गोष्टीचा विपरीत परिणाम होऊन आर्थिक परिस्थिती आणखीनच घसरली. जमिनीची मालकी नसल्यामुळे आणि उत्पादित धान्याचा मोठा हिस्सा सरकारला द्यावा लागत असल्यामुळे शेती कसणाऱ्या शेतकरी वर्गात नाराजी पसरली. शेती उत्पादन वाढविणे त्यांनी बंद केले. त्यामुळे १९१३ च्या धान्य उत्पादनाच्या तुलनेत १९२० साली केवळ दोन पंचमांश इतकेच उत्पादन झाले. दुष्काळामुळे उपासमार, रोगराई वाढली. धान्य आयात करावे लागले. शेतकऱ्यांचा संताप उठावाच्यारूपाने बाहेर पडू लागला. उद्योग क्षेत्रातही अशीच परिस्थिती होती. कारखाने स्वबळावर चालविण्याचा अनुभव नसणाऱ्या कामगारांना योग्य प्रकारे कारखाने चालविणे अशक्य बनले. उत्पादनाचा वेग आणि दर्जा घसरला. ते बेशिस्त वर्तन करू लागले. अन्नधान्याची तीव्र टंचाई, वेतन मिळण्याची अनिश्चितता यामुळे संप होऊ लागले. उत्पादनात खूप घट झाली.

अशी ही सर्व परिस्थिती पाहून साम्यवादाचा कट्टर पुरस्कर्ता असलेल्या लेनिनने अर्थव्यवस्थेच्या बाबतीत माघार घेत नवे आर्थिक धोरण (NEP) स्वीकारले. यामध्ये साम्यवाद आणि भांडवलशाहीतील मध्यम मार्ग स्वीकारला होता. यामध्ये शेतकऱ्यांकडून केली जाणारी सक्तीची धान्य वसूली रद्द केली आणि त्याऐवजी जमीन महसूल सुरू केला. शेतकऱ्याला त्याचे उत्पादन बाजारात विकण्याची, नफा घेण्याची परवानगी देण्यात आली. खाजगी पातळीवर जनावरे पाळण्याची परवानगी देण्यात आली. अवजड उद्योग सरकारच्या ताब्यात तर लहान उद्योग खाजगी पातळीवर चालविण्यास परवानगी देण्यात आली. भांडवलशाहीप्रमाणे कामगारांना कामाप्रमाणे वेतन दिले जाणार होते. लघुउद्योजकांना उत्पादन बाजारपेठेत विकण्याची परवानगी मिळाली. मुक्त बाजारपद्धत स्वीकारली. बँकामार्फत भांडवल कर्जाऊ देण्याची परवानगी देण्यात आली. बँकांचे अधिकार वाढवले. यानंतर उत्पादनात लक्षणीय वाढ झाली. लागवडीखाली जमीनीचे क्षेत्र वाढले. खुल्या बाजारात आवश्यक वस्तु मिळू लागल्यामुळे जनतेतला असंतोष कमी होऊ लागला, लेनिन सरकारला असलेला धोका कमी झाला. भांडवलशाही तत्वांशी करावी लागलेली ही तात्पुरती तडजोड असून भविष्यात पुन्हा पुर्णपणे साम्यवादी सत्ता प्रस्थापित होईल अशी लेनिनची खात्री होती.

### ६. **नवीन राज्यघटनेची निर्मिती :–**

१९१७ च्या राज्यक्रांतीनंतर सोव्हिएत महासभेने पूर्वीची घटना रद्द केली. १० जुलै १९१८ रोजी नवी राज्यघटना अंमलात आणली गेली. रशियात यानुसार रशियन सोशॅलिस्ट फेडरेटेड सोव्हिएत रिपब्लिक

(RSFSR) अस्तित्वात आले. सोव्हिएत गणराज्याची कार्यकारी सत्ता केंद्रीय समितीच्या ताब्यात दिली गेली. सत्ता स्थिर झाल्यावर दुसरी राज्यघटना ६ जुलै १९२३ रोजी अंमलात आणली गेली. त्यानुसार सर्व गणराज्ये एकत्रित करून युनियन ऑफ सोशॅलिस्ट सोव्हिएत रिपब्लिक (USSR) ची स्थापना करण्यात आली. यामध्ये कम्युनिस्ट पक्षाचे वर्चस्व सर्व पातळीवर राहील याची काळजी घेण्यात आली होती.

रशियन राज्यक्रांतीचा शिल्पकार म्हणून लेनीनचे नाव घेतले जाते. कट्टर मार्क्सवादी, देशप्रेमी, सुज्ञ व्यवहारी, तत्वज्ञ लेनिनने त्याचे सर्व आयुष्यच देशासाठी वाहून घेतले. मुलगामी विचारांच्या लेनीनने केलेले ग्रंथलिखाण महत्वपूर्ण होते. 'इंपिरीअलिझम', 'द लास्ट स्टेज ऑफ कॅपिटॅलीझम', 'स्टेट अँड रिव्हॉल्युशन' ही त्याची पुस्तके क्रांतीकारकांना प्रेरणा देणारी ठरली. त्याचे विचार लेनिनवाद म्हणून प्रसिद्ध झाले. कामगारांची हुकुमशाही अस्तित्वात यावी यासाठी त्याने प्रयत्न केले. क्रांतीनंतर रशियात जणू लेनिनची हुकूमशाहीच प्रस्थापित झाली होती. मात्र यामागची विचारधारा वेगळी होती. कामगारांचे राज्य त्याला प्रस्थापित करायचे होते त्यासाठी ज्या ज्या गोष्टी कराव्या लागल्या त्या त्याने केल्या. तो जरी पक्का साम्यवादी असला तरी योग्य वेळी माघार घेण्याचा शहाणपणा त्याने दाखविला. नवे आर्थिक धोरण हे त्याचे मुख्य उदाहरण सांगता येईल. क्रांती टिकविण्यासाठी त्याने केलेली दडपशाही, झालेला रक्तपात, चेकाची निर्मिती यामुळे त्याच्यावर टीकाही खूप झाली. त्याचवेळी सामान्य जनतेकडून त्याला प्रेमही मिळाले. त्याचे कार्य नव्या इतिहासाला घडविणारे ठरले. कार्ल मार्क्सचे कामगारांच्या हुकुमशाहीचे स्वप्न लेनिनने प्रत्यक्षात आणले.

## स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न-३

❋ **योग्य पर्याय निवडा.**

१. भांडवलशाही विरोधात ......... या राष्ट्राने लेनिनला मदत केली .

*अ) चीन ब) जर्मनी क) ब्रिटन ड) फ्रान्स.*

२. बोल्शेव्हिकांची सेना ............... या नावाने ओळखली जात असे.

*अ) हरितसेना ब) लाल सेना क) पिवळी सेना ड) व्हाईट आर्मी.*

३. ................. याचे सरकार उलथवून लेनिनने स्वत: कडे सत्ता घेतली.

*अ) जॉर्ज एलवॉव ब) झार निकोलस क) केरेन्स्की ड) ट्रॉटस्की.*

४. लेनिनच्या काळात दुसरी राज्यघटना ............ या दिवशी अंमलात आली.

*अ) ११ ऑक्टोबर १९१८ ब) ६ जुलै १९२३*

*क) २० जुलै १९२२ ड) १५ ऑक्टोबर १९२०.*

५. अंतर्गत विरोधकांना संपविण्यासाठी ........... ही संघटना लेनिनने निर्माण केली.

*अ) चेका ब) गेस्टपो क) सोविएत ड) रिपब्लिक.*

## २.३ पारिभाषिक शब्द

१. **झार, झरीना –** रोमोनॉव्ह घराण्यातील राजांस झार आणि राणीस झरीना असे म्हटले जात होते.

२. **डयुमा –** १९०६ मध्ये रशियात द्विगृही केंद्रीय कायदे मंडळ स्थापन झाले. त्यातील लोकनिर्वाचित कनिष्टगृहाला डयुमा (संसद) असे म्हटले जात असे.

३. **भूदास –** क्रांतीपूर्व काळातील रशियातील शेतीत काम करणारा वर्ग, भूदासांजवळ स्वत:ची शेती नव्हती, उमरावांच्या शेतीवर यांना राबावे लागे.

४. **सोव्हिएत –** कामगारांना मार्गदर्शन करण्यासाठी स्थापन झालेली कामगार प्रतिनिधींची केंद्रीय समिती

५. **कार्ल मार्क्स –** जगप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ आणि कामगार राज्याचा पहिला पुरस्कर्ता, कार्ल मार्क्स याने भांडवलशाही व्यवस्थेचे विश्लेषण करून दास कॅपिटल या ग्रंथाची निर्मिती केली.

६. **साम्यवाद** (Communism) – समाजातील संपत्ती सर्वांच्या मालकीची असावी, संघटित श्रमांद्वारे निर्मित उत्पादन आणि तिचे वितरण प्रत्येकाच्या गरजेप्रमाणे व्हावे, समाजाच्या शक्तींचा विकास व्हावा व अंतिमतः वैश्विक स्तरावर वर्गविहीन समाज स्थापन व्हावा, की जेथे मनुष्य आपल्या सर्व प्रकारच्या क्षमतांचा विकास करावयास मुक्त असेल असे सांगणारी विचारप्रणाली होय.

७. **लाल सेना** (Red Guards) – प्रतिक्रांतीवाद्यांचा सामना करण्यासाठी ट्रॉटस्कीने उभा केलेली सेना . यामध्ये सामान्य शेतकरी , कामगार सहभागी झाले होते . साम्यवादी पक्षाच्या झेंड्याचा रंग लाल असल्याने या सेनेस लाल सेना असे नाव दिले गेले.

८. **चेका –** युद्धकालीन परिस्थितीत लेनिनने स्थापन केलेली गुप्तहेर संघटना.

९. **बुझ्र्वा क्रांती –** मार्च १९१७ मध्ये जॉर्ज एलवॉवचे सरकार सत्तेवर आले. त्याच्या मंत्रिमंडळात सरदार, भांडवलदार, धनिक व्यापारी वर्गाचे प्रतिनिधी होते. केवळ केरेन्स्की हाच सोशालिस्ट रिव्हाल्युशनरी पक्षाचा नेता यामध्ये होता. म्हणून या सत्ताबदलाचे वर्णन काही इतिहासकार बुझ्र्वा क्रांती असे करतात. म्हणजेच राजसत्ता जाऊन सत्तासूत्रे ही समाजातील श्रीमंत मध्यम वर्गाच्या हाती आली. कार्ल मार्क्सच्या मते, 'छोटे कारखानदार, दुकानदार, कारागीर, शेतकरी वर्ग हे सगळे बुझ्र्वा वर्गातील होत. बुझ्र्वा हे क्रांतीकारी नसतात. किंबहूना ते प्रतिगामी असतात. इथल्या लोकांच ते नुकसान करतात, कामगार मात्र या बुझ्र्वांपेक्षा वेगळा आहे. तो खरा क्रांतीकारी आहे. मात्र बुझ्र्वा वर्ग तसा नाही.

१०. **रासपुटीन :** रासपुटीन उर्फ ग्रेगरी एफीमोव्हिच (१८७० ते १९१६) मूळचा सैबेरियाचा निवासी होता. बोलीभाषेत रासपुटीन या नावाचा अर्थ व्याभिचारी असा होतो. स्वत:ला धर्मोपदेशक म्हणून घेणारा रासपुटीन झार-झरिनाच्या एकुलत्या एक आजारी मुलाला दैवी शक्तीच्या जोरावर बरे करण्याच्या बहाण्याने राजवाड्यात आला. झार-झरिनावर त्याचा विलक्षण प्रभाव पडला. ते दोघे त्याच्या सल्ल्याने वर्तन करू लागले. महत्त्वाचे निर्णय सुध्दा त्याला विचारून घेतले जात असत. त्याला दरबारातून हाकलवणे कोणालाही जमले नाही. दरबारातील काही मंडळीनी त्याला ३० डिसेंबर १९५६ मध्ये ठार केले.

## २.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

### ❋ स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न-१ ची उत्तरे :-

*१) निकोलस.*

*२) गॅपोन.*

*३) जपान.*

*४) सोविएत.*

*५) पिटर्सबर्ग सोविएत.*

### ❋ स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न-२ ची उत्तरे :-

*१) रोमोनॉव.*

*२) मॅक्झिम गॉर्की.*

*३) कार्ल मार्क्स.*

*४) ब्रेस्ट लिटोव्हास्क.*

*५) केरेन्स्की.*

### ❋ स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न-३ ची उत्तरे :-

*१) जर्मनी.*

*२) लाल सेना.*

*३) केरेन्स्की.*

*४) ६ जुलै १९२३.*

*५) चेका.*

## २.५ सारांश

रशियावर सुमारे तीनशे वर्ष रोमोनॉव्ह घराण्याची सत्ता होती. झार हे दैवी सिद्धातांचे आणि अंनियंत्रित राजसत्तेचे समर्थक होते. स्वत:च्या अमर्याद अधिकारांचा वापर करत त्यांनी सर्वसामान्य जनतेवर अन्याय केला. रशियात विसाव्या शतकाची सुरवात याच झारशाही विरुद्धच्या क्रांतीने झाली.१९०५ मध्ये झालेली क्रांती अयशस्वी झाली तरी अन्यायाविरुद्ध एकत्रित होण्याचे महत्व रशियन जनतेला कळले. या क्रांतीने झारला जनतेसाठी निर्णय घेणे भाग पडले. सोविएतची स्थापना ही या काळातली महत्वाची घटना होती. कामगारवर्ग यामुळे संघटित होत गेला. या संघटित शक्तिसमोर झारला माघार घ्यावी लागली. यामुळे १९१७ च्या राज्यक्रांतीची ही जणू रंगीत तालीमच ठरली.

कार्ल मार्क्सच्या साम्यवादी तत्वज्ञानावर आधारित १९१७ ची रशियात झालेली राज्यक्रांती ही केवळ रशियातल्याच नव्हे तर जगातल्या प्रस्थापित व्यवस्थांना आणि विचारांना आव्हान देणारी ठरली. वर्षानुवर्ष झारशाहीचा अन्याय सहन करणाऱ्या रशियन समाजास क्रांतीसाठी उद्युक्त करण्याचे कार्य लेनिन आणि त्यांच्या सहकाऱ्यानी केले. राजेशाही उलथऊन लावत कामगारांचे राज्य आणणारे आणि साम्यवाद प्रस्थापित करणारे रशिया हे जगातील पहिलेच राष्ट्र ठरले. यानंतरच्या काळात रशियाचा चेहरा मोहराच बदलला. अमेरिकेच्या तोडीचे रशिया हे राष्ट्र तयार झाले. उदारमतवादी धोरण, व्यक्ती स्वातंत्र्य, लोकशाही, संसदीय राज्यपद्धती, त्याचबरोबर भांडवलशाही अर्थव्यवस्थेला आणि या अर्थव्यवस्थेतून निर्माण झालेल्या समाजव्यवस्थेलाही आव्हान देण्याचे कार्य रशियन साम्यवादाने केले. भांडवलशाही विरुद्ध साम्यवाद असा संघर्ष जगाच्या राजकारणात या क्रांतीनंतर सुरु झाला. जागतिक परिणामांचा आढावा घेतला तर इतर कोणत्याही क्रांतीपेक्षा या क्रांतीला महत्वपूर्ण स्थान प्राप्त झाले आहे.

१९१७ च्या बोल्शेविक राज्यक्रांतीचा शिल्पकार म्हणून लेनिनचा उल्लेख करावा लागतो. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत त्याने आखलेल्या योजना, क्रांती प्रत्यक्षात येण्यासाठी आणि ती स्थिर करण्यासाठी त्याचे प्रयत्न यामुळे क्रांती यशस्वी होऊ शकली. स्वत:चे पूर्ण आयुष्यच त्याने या क्रांतीसाठी वाहून घेतले. सर्वसामान्य रशियन जनतेचे त्याला भरभरून प्रेम मिळाले. त्याच्या प्रेरक नेतृत्वामुळेच कामगारांची जगातील पहिली सत्ता रशियात स्थापन झाली. त्याने घेतलेल्या विविध निर्णयामुळे रशियाची महासत्ता होण्याकडे वाटचाल सुरू झाली. भांडवलशाही राष्ट्रांच्या ताब्यात असणाऱ्या अनेक राष्ट्रांना स्वातंत्र्य लढ्यासाठी प्रेरणा देण्याचे कार्य रशियन राज्यक्रांतीने केले.

## २.६ सरावासाठी स्वाध्याय

### २.६.१ दीर्घोत्तरी प्रश्न.

१. रशियातील १९०५ मधील क्रांतीच्या महत्वाच्या टप्प्यांचा आढावा घ्या .

२. १९१७ च्या रशियातील बोल्शेवीक क्रांतीस कारणीभूत ठरलेल्या परिस्थितीचे वर्णन करा.

३. १९१७ च्या रशियन राज्यक्रांतीचे परिणाम लिहा.

४. १९१७ च्या बोल्शेवीक क्रांतीतील लेनिनच्या भूमिकेचे मूल्यांकन करा.

**२.६.२ टिपा लिहा.**

१. रक्तरंजित रविवार.

२. लेनिन.

२. रशियातील हंगामी सरकार.

३. बोल्शेवीक क्रांती.

४. रशिया आणि पहिले महायुद्ध.

## २.७ संदर्भ ग्रंथ


१. वैद्य सुमन, रशियाचा इतिहास (इ. स. १८६० ते १९६४), महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ, आशय प्रकाशन नागपूर, १९८०.

२. के. सागर, आधुनिक जगाचा इतिहास, के सागर पब्लिकेशन, पुणे, १९९५.

३. गायकवाड, कदम, थोरात, आधुनिक जगाचा इतिहास, (१८९० ते १९२०) मंगेश प्रकाशन, नागपूर.

४. कदम य. ना., आधुनिक जग- भाग २, फडके प्रकाशन, कोल्हापूर, २०१०.

५. जोशी पी. जी., विसाव्या शतकाचा इतिहास, विद्या प्रकाशन, नागपूर, २००३.

६. मराठी विश्वकोश, डॉ. विजया वाड (संपा.) महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई.

७. शिरगावकर शरावती, आधुनिक युरोप (इ. स. १७८९ ते १९६०) महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ, श्री विद्या प्रकाशन, पुणे, १९८८.

८. केशट्टीवार के.मु., अर्वाचीन युरोप (इ.स.१७८९ ते १९४५) पडगीलवार प्रकाशन, नागपुर, १९७१.

९. गर्गे स. मा. (संपा.) भारतीय समाज विज्ञान कोश-२, मेहता पब्लिशिंग हाऊस, कोल्हापूर, २०१७.


❋ ❋ ❋

घटक–३

# बोल्शेविक सत्तेचे दृढीकरण

## ( Bolshevik Consolidation of Power : 1917-1922 )

---

अनुक्रमणिका


३.० उद्दिष्ट्ये

३.१ प्रास्ताविक

३.२ विषय विवेचन

 ३.२.१ विचारधारा

 ३.२.२ सोव्हियत शासनाची धोरणे (१९१८–२१)

 ३.२.३ युद्धकालीन साम्यवाद आणि नवे आर्थिक धोरण

३.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

३.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

३.५ सारांश

३.६ सरावासाठी स्वाध्याय

३.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


## ३.० उद्दिष्ट्ये

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला –

- बोल्शेविक पक्षाच्या विचारसरणीची ओळख होईल.
- सन १९१८ ते १९२१ या काळातील सोव्हियत शासनाच्या धोरणांची माहिती मिळेल.
- सोव्हियत शासनाच्या युद्धकालिनसाम्यवादाची माहिती मिळेल.
- लेनिनच्या नव्या आर्थिक धोरणाचे ज्ञान होईल.

## ३.१ प्रास्ताविक

मागील घटकामध्ये आपण रशियातील ऑक्टोबर क्रांती आणि त्यातील लेनिनची भूमिका अभ्यासली. प्रस्तुत घटकामध्ये आपण ऑक्टोबर क्रांतीनंतर सत्तेवर आलेल्या बोल्शेविक पक्षाच्या विचारसरणीचा, सन १९१८ ते १९२१ या काळातील सोव्हियत शासनाचे धोरण, युद्धकालीन साम्यवाद आणि नवे आर्थिक धोरण

यांचा अभ्यास करणार आहोत. फेब्रुवारी आणि ऑक्टोबर क्रांतीच्या दरम्यान झालेल्या घडामोडींमुळे रशियामधील शासन व्यवस्था पूर्णतः कोलमडली होती. लेनिनच्या नेतृत्वाखालील रशियन साम्यवाद्यांच्या बोल्शेविक गटाने रशियाची सत्ता हाती घेऊन त्यात आमूलाग्र बदल करत १९२१–२२ पर्यंत रशियामध्ये स्थैर्य आणले. सन १९१८–१९२१ मधील या घडामोडींनी सशक्त सोव्हियत संघाची पायाभरणी केली, ज्याने संपूर्ण विसाव्या शतकात एक महासत्ता म्हणून आपला प्रभाव गाजवला.

## ३.२ विषय विवेचन

### ३.२.१ विचारधारा

जगातील कोणतीही क्रांती होताना तिला तात्विक आणि वैचारिक बैठक असणे आवश्यक असते. आधुनिक युगातील पहिली क्रांती ठरलेल्या फ्रेंच राज्यक्रांतीमध्ये रुसो, व्हॉल्टेअर यांच्या विचारांची तात्विक बैठक महत्त्वपूर्ण ठरली. तशाच पद्धतीने रशियन राज्यक्रांतीमध्ये देखील कार्ल मार्क्सचे साम्यवादी तत्वज्ञान हे महत्वपूर्ण ठरले. १८ व्या शतकापासून विविध क्रांतिकारी विचारवंतानी संपत्तीचे राष्ट्रीयीकरण करणे, खाजगी संपत्तीची संकल्पना रद्द करणे, समाजात सामाजिक व आर्थिक समता प्रस्थापित करणे अशा क्रांतिकारी आणि आदर्शवादी कल्पनांची मांडणी केली. फ्रान्सिस बेबूफ, सेंट सायमन, रॉबर्ट ओवेन, चार्ल्स फ्युरीयर, लुई ब्लँक यांच्यासारख्या तत्ववेत्त्यांनी देखील समाजवादी विचारसरणीचा जोरात प्रसार केला. मात्र, हा समाजवाद स्वप्नाळू स्वरूपाचा होता. अस्तित्वात असलेली व्यवस्था बदलून समाजवादी व्यवस्था असावी असे मत हे समाजवादी विचारक मांडत असले तरी ती व्यवस्था कशी बदलायची याच्या मार्गांची चर्चा त्यांनी केली नव्हती.

मात्र, १८१८ मध्ये प्रशियामध्ये (म्हणजे आजच्या जर्मनीमध्ये) जन्मलेल्या कार्ल मार्क्सने जगात अस्तित्वात असलेल्या व्यवस्थेला बदलण्याचा मार्ग सांगितला, त्यामुळे कार्ल मार्क्सच्या तत्वज्ञानाला म्हणजेच मार्क्स वादाला 'क्रांतीचे तत्त्वज्ञान' म्हटले जाते. कार्ल मार्क्सने बॉन आणि बर्लिन विद्यापीठात तत्त्वज्ञानाचे उच्च शिक्षण घेतले होते. कार्ल मार्क्सच्या जहाल क्रांतिकारी लिखाणामुळे त्याला पहिल्यांदा प्रशियातून आणि नंतर फ्रान्समधून हद्दपार करण्यात आले. त्यानंतर लंडनमध्ये आश्रय घेतलेल्या कार्ल मार्क्सने आपले उर्वरित आयुष्य लंडनमध्येच व्यतीत केले. याकाळात फ्रेडरिक एंजल्स याच्याशी कार्ल मार्क्सची मैत्री झाली, जी आयुष्यभर टिकली. लंडनमधील आपल्या वास्तव्याच्या काळात कार्ल मार्क्सने ब्रिटीश म्युझियम येथील ग्रंथालयात वाचन, चिंतन आणि लेखन केले. औद्योगिक क्रांतीनंतर कामगार वर्गांच्या हलाखीच्या परिस्थितीचा अभ्यास कार्ल मार्क्सने केला. गिरण्या, कारखाने यांच्या मालकांची राजकीय आणि आर्थिक शक्ती प्रचंड असते आणि त्यांच्यासमोर कामगार हे अत्यंत अगतिक, असहाय्य असे मार्क्सच्या लक्षात आले. १८४८ मध्ये कार्ल मार्क्स आणि फ्रेडरिक एंजल्स यांनी 'कम्युनिस्ट मॅन्युफेस्टो' म्हणजे 'कम्युनिस्ट जाहीरनामा' तयार करून प्रकाशित केला. या जाहीरनाम्यामध्ये मार्क्स आणि एंजल्सने जगातील कामगारांना एक होऊन सत्ता काबीज करण्याचे आवाहन केले. कष्टकरी कामगार जनतेजवळ बंधक बनवणाऱ्या

साखळदंडाशिवाय गमावण्यासारखे काहीच नाही, त्यामुळे जगभरातील कामगारांनी संघटीत होऊन नफा कमवण्यासाठी अमानवी शोषण करणारी भांडवलशाही उलथून टाकावी आणि कामगारांची हुकूमशाही प्रस्थापित करावी, असे आवाहन कम्युनिस्ट जाहीरनाम्याद्वारे केले गेले. भांडवलशाही व्यवस्थेची चिकित्सा करणारा 'दास कॅपिटल' हा ग्रंथ १८६७ मध्ये प्रकाशित केला. भांडवलशाही शोषणात कामगारांच्या श्रमाचे कसे शोषण होती याची मुलभूत मांडणी मार्क्सने या ग्रंथात केली. साम्यवादी विचारसरणीमध्ये मार्क्सने लिहिलेल्या 'कम्युनिस्ट जाहीरनामा' आणि 'दास कॅपिटल' या दोहोंना पायाभूत स्थान आहे.

उत्पादनाच्या साधनांची मालकी असलेल्या वर्गाला कार्ल मार्क्सने 'आहे रे' वर्ग असे संबोधले, तर उत्पादनाची साधने नसलेल्या कष्टकरी-श्रमिकांच्या वर्गाला कार्ल मार्क्सने 'नाही रे' वर्ग असे संबोधले. मानवी इतिहासाच्या विविध टप्प्यांमध्ये या 'आहे रे' आणि 'नाही रे' वर्गांमध्ये सतत संघर्ष होत आला आहे, त्याला 'वर्गसंघर्ष' म्हटले जाते. औद्योगिक क्रांतीमुळे कारखान्यांचे मालक आणि कारखान्यात काम करणारे कामगार असे दोन वर्ग निर्माण झाले. ज्यांच्या हाती भांडवल होते अशा लोकांकडे कारखान्यांची म्हणजेच उत्पादन साधनांची मालकी होती त्या वर्गाला मार्क्सने 'आहे रे' वर्ग मानले. औद्योगिक काळात उत्पादन साधनांची मालकी नसलेल्या, भांडवल हाताशी नसलेल्या आणि कारखान्यात श्रम करणाऱ्या कामगारांना मार्क्सने 'नाही रे' वर्गातील मानले. मार्क्सने मांडलेल्या सिद्धांतानुसार 'आहे रे' आणि 'नाही रे' या दोन वर्गांतील 'वर्गसंघर्ष' अटळ होतात. जास्तीतजास्त नफा कमविण्यासाठी भांडवलदार हे कामगारांचे अतोनात शोषण करत होते. कामगाराला त्याच्या श्रमाचा योग्य व न्याय मोबदला देण्यास भांडवलदार तयार नसतात. 'शोषक' भांडवलदार आणि 'शोषित' कामगार यांच्यातील विषमतेची दरी वाढत जाते. कामगारांना या शोषणातून मुक्त होण्यासाठी भांडवलदारांविरुद्ध सशस्त्र संघर्ष करण्याशिवाय पर्याय नसतो असे कार्ल मार्क्स मानतो. भांडवलदार आपली सत्ता सोडण्यास सहजासहजी तयार होणार नसल्याने जगभरातील कामगारांनी संघटित होऊन भांडवलदारांच्या विरोधात सशस्त्र क्रांती करून भांडवलदार आणि त्यांची सत्ता उलथून टाकावी असे आवाहन कार्ल मार्क्स यांनी केले.

कार्ल मार्क्सने मांडलेल्या तत्त्वज्ञानाचा म्हणजेच 'मार्क्सवाद'चा रशियात मोठ्या प्रमाणात प्रसार झाला. लेनिन आणि त्याच्या समविचारी सहकाऱ्यांनी रशियात मार्क्सवादाचा प्रसार केला आणि कामगारांच्या संघटना बांधल्या. यातूनच पुढे लेनिनच्या नेतृत्वाखालील 'बोल्शेविक' पक्षाने रशियात ऑक्टोबर १९१७ ची क्रांती घडवून आणली.

ऑक्टोबर १९१७ च्या क्रांतीमध्ये लेनिनच्या नेतृत्वाखाली रशियाची सत्ता काबीज करणाऱ्या गटाला बोल्शेविक म्हणून ओळखले जाते. बोल्शेविक गट हा रशियन सोशालिस्ट डेमोक्रॅटिक वर्कर्स पार्टीचा एक गट होता. बोल्शेविक शब्दाचा अर्थ बहुमताचे असा होतो. ऑक्टोबर क्रांतीनंतर बोल्शेविक गट हा साम्यवादी पक्ष म्हणून ओळखला जाऊ लागला.

सन १९०३ मधील रशियन सोशालिस्ट डेमोक्रॅटिक वर्कर्स पार्टीच्या दुसऱ्या अधिवेशनात लेनिनच्या अनुयायीनी पक्षाचे सदस्यत्व फक्त पूर्णवेळ क्रांतिकारकांनाच द्यावे अशी मागणी लावून धरली आणि पक्षाच्या

केंद्रीय समितीमध्ये बहुमत मिळवत पक्षाच्या इस्करा या वृत्तपत्राच्या संपादक मंडळावर स्थान मिळवले. यावेळी त्यांनी स्वत: ला बोल्शेविक म्हणजे बहुमत असणारे आणि आपल्या विरोधकांना मेन्शेविक म्हणजे अल्पमत असणारे म्हणण्यास सुरवात केली. सन १९०५ च्या क्रांतीत दोन्ही गटांनी एकत्रितपणे भाग घेतला आणि त्यांच्यात दोन वेळा मतभेद मिटवण्याचे प्रयत्न झाले. दोन्ही गटांत समझोत्याचे प्रयत्न होऊन देखील त्यांचातील मतभेद आणि दुरावा वाढतच गेला.

बोल्शेविक विचारसरणी कार्ल मार्क्सच्या विचारसरणीवर आधारलेली होती. बोल्शेविक विचारसरणी अतिकेंद्रित, शिस्तबद्ध आणि पूर्णवेळ पक्षाचा आग्रह धरत असे. पहिल्या ड्युमा साठी १९०६ मध्ये झालेल्या निवडणुकांवर त्यांनी बहिष्कार टाकला होता. बोल्शेविकांनी सरकार सोबत आणि दुसऱ्या राजकीय पक्षांसोबत सहकार्य करण्यास नकार दिला. बोल्शेविक पक्षाच्या खर्चासाठी दरोडे घालण्यास देखील गैर मानत नव्हते. मेन्शेविक आणि इतर सामाजिक लोकशाहीवाद्यांना बोल्शेविकांची पैसे उभे करण्याची ही पद्धत मान्य नव्हती.

सन १९१२ मध्ये लेनिनने आपल्या थोड्या साथीदारांना घेऊन एक वेगळी बोल्शेविक संघटना बनवली. आपल्या गटाला एकत्रित ठेवण्याचा लेनिनचा प्रयत्न होता. मात्र लेनिनच्या राजनैतिक डावपेचांशी आणि विचारधारेशी असहमत असणारे आणि पोथीनिष्ठ मार्क्सवादी असणारे काही बोल्शेविक त्याच्यापासून दुरावले. तरीदेखील बोल्शेविकांची लोकप्रियता शहरी कामगारांच्या आणि सैनिकांच्या मध्ये वाढत गेली. फेब्रुवारी १९१७ च्या क्रांतीनंतर लेनिनच्या रशियातील पुनरागमनानंतर बोल्शेविकांची लोकप्रियता प्रचंड वाढली. लेनिनने रशियात परत आल्यानंतर शांततेची आणि कामगारांच्या समित्या किंवा सोव्हियत यांनी सत्ता हाती घ्यावी अशी मागणी केली. कामगारांची हुकूमशाही प्रस्थापित होईल असे मार्क्सने म्हंटले होते. मात्र, कामगार आणि एकूणच सर्व शोषित-कष्टकरी जागृत होऊन संघटित होण्याची शक्यता खूप कमी होती आणि झाली तरी त्यास खूप वेळ लागला असता म्हणून लेनिन ने मार्क्सवादमध्ये सुधारणा म्हणून वेनगॉर्ड पार्टी (Vanguard Party) ची संकल्पना पुढे आणली. त्यानुसार कामगार पूर्णत: जागृत आणि संघटित झाले नसताना (वेनगॉर्ड पार्टी) पुढे होऊन क्रांतीसाठी हस्तक्षेप करेल. त्याप्रमाणेच १९१७ च्या ऑक्टोबर क्रांतीमध्ये मोजक्या संख्येने असलेल्या बोल्शेविक पार्टीच्या सदस्यांनी विद्यमान राजकीय परिस्थितीत हस्तक्षेप करून क्रांती घडवून आणली. अशा प्रकारच्या कम्युनिस्ट पार्टी संदर्भांच्या विचारसरणीला आणि पार्टीच्या संरचनेला लेनिनवादी विचारसरणी आणि संरचना म्हणून ओळखले जाते. ऑक्टोबर महिन्यात पेट्रोग्राड आणि मॉस्को येथील सोव्हियत मध्ये बोल्शेविकांचे वर्चस्व प्रस्थापित झाले होते. ऑक्टोबर १९१७ च्या क्रांतीनंतर हंगामी सरकार उलथवून टाकल्यानंतर सोव्हियतनी सत्तेवर आणि प्रशासनावर नियंत्रण मिळवले.

ऑक्टोबर क्रांतीनंतर बोल्शेविकांनी डाव्या समाजवादी क्रांतीकारकांना वगळून इतर क्रांतिकारी पक्षांना आणि गटांना सत्तेत सहभागी करुन घेण्यास नकार दिला. बोल्शेविकांनी सत्ता काबीज केल्यानंतर आपल्या प्रतिस्पर्ध्यांना नामोहरण करून रशियावर आपल्या पक्षाचे वर्चस्व प्रस्थापित केले. मार्च १९१८ मध्ये

त्यांनी आपल्या पक्षाचे नामकरण रशियन कम्युनिस्ट पार्टी (बोल्शेविक) असे केले. पुढे १९२५ मध्ये ते नाव बदलून 'ऑल यूनियन कम्युनिस्ट पार्टी' (बोल्शेविक) असे नाव धारण केले. शेवटी ऑक्टोबर १९५२ रोजी कम्युनिस्ट पार्टी ऑफ सोव्हियत यूनियन असे नाव धारण केले.

## स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न - १

### (अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.

१) बोल्शेविक या शब्दाचा अर्थ काय?

२) बोल्शेविक विचारसरणी कोणाच्या विचारांवर आधारलेली होती?

३) ऑक्टोबर महिन्यात कोणत्या सोव्हियत मध्ये बोल्शेविकांचे वर्चस्व प्रस्थापित झाले होते?

४) सन १९०३ मधील रशियन सोशालिस्ट डेमोक्रॅटिक वर्कर्स पार्टीच्या दुसऱ्या अधिवेशनात लेनिनच्या अनुयायांनी कोणती मागणी लावून धरली?

५) लेनिनने रशियात परत आल्यानंतर कोणत्या मागण्या केल्या?

### (ब) योग्य पर्याय निवडा.

१) बोल्शेविक गट हा ................. चा एक गट होता.

*अ) रिव्हॉल्युशनरी पार्टी* *क) रशियन सोशॅलिस्ट डेबोक्रेटिक वर्कर्स पार्टी*

*ब) कॅडेट* *ड) ब्लॅक पार्टी.*

२) बोल्शेविक आपल्या विरोधकांना ................. म्हणजे अल्पमत असणारे म्हणत असत.

*अ) मेन्शेविक* *ब) लिबरल* *क) फॅसिस्ट* *ड) टोरी.*

३) ................. विचारसरणी अतिकेंद्रित, शिस्तबद्ध आणि पूर्णवेळ पक्षाचा आग्रह धरत असे.

*अ) डेमोक्रेटिक* *ब) मेन्शेविक* *क) कॅडेट* *ड) बोल्शेविक.*

४) फेब्रुवारी १९१७ च्या क्रांतीनंतर ............... च्या रशियातील पुनरागमनानंतर बोल्शेविकांची लोकप्रियता प्रचंड वाढली.

*अ) रासपुटीन* *ब) लेनिन* *क) गॅपोन* *ड) अलेक्झांडर.*

५) ऑक्टोबर क्रांतीनंतर बोल्शेविकांनी ................ क्रांतीकारकांना वगळून इतर क्रांतिकारी पक्षांना आणि गटांना सत्तेत सहभागी करुन घेण्यास नकार दिला.

*अ) उजव्या समाजवादी* *क) डाव्या समाजवादी*

*ब) झार समर्थक* *ड) लिबरल.*

## ३.२.२ सोव्हियत शासनाची धोरणे (१९१८–२१)

सन १९१७ च्या ऑक्टोबर क्रांतीनंतर रशियाची सत्ता बोल्शेविक पक्षाच्या ताब्यात आली. सन १९१८ च्या राज्यघटनेनुसार सोव्हियत संघाची स्थापना झाली. सन १९१८ च्या घटनेने रशियातील श्रमिकांना रशियाचा सत्ताधारी वर्ग म्हणून घोषित केले आणि सर्वहाराची हुकुमशाही प्रस्थापित झाल्याची घोषणा केली. रशियातील सोव्हियत संघ हे जगातील पहिले राज्य घटनात्मक समाजवादी शासन म्हणून ओळखले जाते. रशियात साम्यवाद प्रस्थापित व्हावा यासाठी लेनिनने सर्वोतोपरी प्रयत्न केले. कार्ल मार्क्सने सांगितलेली 'कामगारांची हुकूमशाही' रशियात स्थिर व्हावी या दृष्टीनेच त्याने धोरणे आखली. रशियात सोव्हियत शासन पद्धती दृढ करण्याबरोबरच साम्यवादी तत्वज्ञानाचा जगात प्रसार करणे हेही त्याचे स्वप्न होते. साम्यवादाला त्याने व्यवहारवादाची जोड दिली आणि नवी धोरणे आखली.

### ❋ क्रांतीनंतर सोव्हियत संघासमोरील समस्या :–

क्रांतीनंतर सोव्हियत संघासमोर अनेक समस्या उभ्या राहिल्या होत्या. ऑक्टोबर १९१७ मध्ये क्रांती झाली असली तरी रशिया अजून पहिल्या महायुद्धातून बाहेर पडला नव्हता. युद्धातून अंग काढून घेण्यासाठी शत्रू राष्ट्रांशी सन्मानजनक शांती संधी करून युद्धबंदी करणे आवश्यक होते.

**(अ) औद्योगिक संकट :** युद्धात गुंतल्यामुळे रशियाच्या अर्थव्यवस्थेवर मोठ्या प्रमाणात ताण पडला होता. रशियातील कामगारांच्या असंतोषामुळे रशियाचे औद्योगिक उत्पादन घटले होते. जीवनावश्यक वस्तूंचे उत्पादन करणारे रशियातील अनेक कारखाने हे युद्धासाठी लागणाऱ्या साहित्याच्या उत्पादनासाठी वापरले जात होते. त्यामुळे रशियात जीवनावश्यक वस्तूंचा तुटवडा निर्माण झाला.

**(ब) कृषी संकट :** रशियाची कृषीव्यवस्था देखील मोठ्या संकटातून जात होती. क्रांतीनंतर शेतकऱ्यांनी जमिनी स्वत:च्या ताब्यात घेतल्या असल्या तरी शेतीचे उत्पादन मोठ्या प्रमाणात घटले होते. शेतीच्या घटलेल्या उत्पादनासोबतच शेतमालाच्या वितरणाची व्यवस्था कोलमडली होती. शेतमालाच्या बदल्यात शेतकऱ्यांना कारखान्यात तयार होणाऱ्या जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा करण्याची सोव्हियत सरकारची योजना होती. मात्र, कारखान्यात उत्पादनच कमी झाल्यामुळे ही योजना कोलमडून पडली.

**(क) महागाई :** शेतमालाचे घटलेले उत्पादन, कारखान्यात तयार होणाऱ्या जीवनावश्यक वस्तूंच्या उत्पादनातील घट, अन्नधान्य आणि जीवनावश्यक वस्तूंच्या वितरणाची कोलमडलेली व्यवस्था यांच्या एकत्रित परिणामातून रशियात अन्न टंचाई आणि जीवनावश्यक वस्तूंचा तुटवडा निर्माण झाला. परिणामी संपूर्ण रशियात मोठ्या प्रमाणात महागाई वाढली.

या समस्यांमुळे सोव्हियत संघात आर्थिक आणि राजकीय अस्थैर्य निर्माण झाले होते. सन १९१८–१९२१ दरम्यान सोव्हियत शासनाने लेनिनच्या नेतृत्वाखाली आपल्या समोरील अनेक संकटांचा सामना विविध धोरणे राबवून यशस्वीपणे केला. या धोरणांमुळे सोव्हियत संघाला स्थिरता आणि दृढता प्राप्त झाली.

## ❋ रशियातील यादवी युद्ध :-

लेनिनच्या नेतृत्वाखाली बोल्शेविक पक्षाने (जो पुढे जाऊन साम्यवादी पक्ष म्हणून ओळखला जाऊ लागला) पेट्रोग्राड ते मॉस्को या प्रदेशाचा ताबा मिळवला होता. रशियासारख्या आवाढव्य देशातील फक्त एवढाच प्रदेश त्यांच्या नियंत्रणात होता. सत्तेवर आल्यानंतर बोल्शेविकानी जमिनीच्या पुर्नवाटपास सुरवात केली. त्यामुळे रशियन सैन्यात फुटीस सुरवात झाली. सैन्यामध्ये मोठ्या संख्येने शेतकरी होते त्यांना जमीन मिळवण्यासाठी घरी जायचे होते. बोल्शेविक सोडून इतर समाजवादी, उदारमतवादी आणि राजेशाहीच्या समर्थकांनी बोल्शेविक क्रांतीचा धिक्कार केला. कम्युनिस्ट विरोधी आणि झार समर्थकांची एकजूट होऊन त्यांनी सोव्हियत शासनाविरुद्ध यादवी युद्ध सुरु केले. सोव्हियत संघाच्या 'लाल सैन्य' विरोधात लढणाऱ्या झार समर्थकाना 'धवल सैन्य' किंवा 'श्वेत सैन्य' म्हणून ओळखले जाऊ लागले. या धवल सैन्याला फ्रेंच, अमेरिकन, ब्रिटीश, जपान अशा जवळ जवळ आठ भांडवलशाही राष्ट्रांची रसद मिळत होती. 'लाल सैन्य' आणि 'धवल सैन्य' यांच्या युद्धामुळे लूटमार, दरोडेखोरी आणि दुष्काळ या सामान्य बाबी बनल्या. धवल सैन्यात जमिनीच्या खाजगी मालकीचे समर्थन करणारे मोठ्या प्रमाणात होते. त्यांनी रशियन शेतकऱ्यांवर मोठ्या प्रमाणात अत्याचार केले. धवल सैन्याच्या या कृत्यांमुळे जनतेमध्ये त्यांच्या विरोधात असंतोष माजला. धवल सैन्याला लोकांचा पाठिंबा मिळेनासा झाला. याउलट बोल्शेविकांच्या लाल सैन्याला सर्वसामान्य लोकांनी मोठ्या प्रमाणात पाठिंबा दिला. यादवी युद्ध सुरू झाले त्यावेळी देखील रशिया हा पहिल्या महायुद्धात सहभागी होता. सोव्हियत शासनाने सर्व प्रथम महायुद्धातून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला.

महायुद्धाच्या आघाडीवर शांतता प्रस्थापित झाल्यानंतर सोव्हियत शासनाने आपले पूर्ण लक्ष्य यादवी यादवी युद्धावर केंद्रित केले. लिओन ट्रोट्स्कीच्या नेतृत्वाखाली लाल सैन्याने एक एक करून विविध गटात विभागलेल्या धवल सैन्याचा संपूर्ण पराभव करून यादवी युद्ध संपुष्टात आणले. यादवी युद्धादरम्यान लाल सैन्याला मोठ्या प्रमाणात जनतेचा पाठिंबा मिळाला.

यादवी युद्ध चालू असताना पोलंडने रशियाचा काही प्रदेश आपल्या वर्चस्वाखाली आणण्याचा प्रयत्न केला. सोव्हियत संघाने आक्रमक धोरण स्वीकारून पोलंडचे आक्रमण परतवून लावत पोलंडच्या वॉर्सा शहरापर्यंत धडक दिली. पोलंड आणि सोव्हियत संघ यांच्यात शांतता करार होऊन बेलारूस आणि युक्रेन या दोन प्रदेशांची दोन्ही राष्ट्रात विभागणी झाली.

क्रांती आणि यादवी युद्धानंतर निर्माण झालेल्या आर्थिक संकटांवर सोव्हियत शासनाने प्रथम 'अत्याग्रही साम्यवाद'चे धोरण स्वीकारून मात करण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्यात त्यांना अपयश आले. पुढे लेनिनने मांडलेल्या 'नव्या आर्थिक धोरणा'ची अंमलबजावणी करून सोव्हियत संघाने आर्थिक स्थैर्य प्राप्त केले.

## ❋ ब्रेस्ट लिटोव्हस्कचा तह (मार्च, १९१८) :-

रशियामध्ये क्रांती होवून अधिकार सूत्रे बोल्शेविकांच्या हाती आली असली तरी त्यांच्यासमोर अनेक मोठमोठ्या समस्या आ-वासून उभ्या होत्या. जनतेच्या पाठिंब्याने झारशाही उलथवून जी क्रांती झाली होती,

त्या क्रांतीला चिरस्थायी बनवण्याकरिता रशियाच्या अर्थव्यवस्थेला स्थैर्य प्रदान करणे आवश्यक होते. समाजवादी तत्त्वप्रणालीच्या आधारावर रशियाची अर्थव्यवस्था उभारण्याकरिता आणि रशियाचे राजकीय व सामाजिक जीवन स्थिरावरून सर्वांगीण प्रगती होण्याकरिता लेनिन आणि त्याच्या सहकारी बोल्शेविकांना सर्व आघाड्यांवर शांततेची नितांत गरज भासत होती.

जर्मनी आणि त्याच्या मित्र राष्ट्रांविरुध्दच्या युद्धात रशियाला विजय मिळेल अशी कोणतीही आशा नव्हती. विविध आघाड्यांवर होणाऱ्या सततच्या पराभवांना सोसून अधिकाधिक नुकसान करून घेण्यात अर्थ नव्हता. त्यामुळे सत्तेवर येताच लेनिनच्या नेतृत्वाखालील बोल्शेविकांनी युद्धबंदी करण्याचा निर्णय घेतला. क्रांतीपूर्वीच जाहीर केलेल्या 'शांततेसाठी त्वरित वाटाघाटी' या घोषणेनुसार लेनिनने २२ नोव्हेंबर १९१७ मध्ये जर्मनीसोबत युद्धविरामाबाबत बोलणी सुरू केली. रशिया आणि जर्मनीमध्ये २ डिसेंबर १९१७ मध्ये युद्धविराम अंमलात आला. तहाची कलमे ठरविण्याकरिता २२ डिसेंबरला रशिया आणि जर्मनी यांच्यातील वाटाघाटींना प्रारंभ झाला. या वाटाघाटी सुमारे तीन महिने रेंगाळल्या. जर्मनीने रशियावर कठोर कलमे लादण्याचा प्रयत्न केला, त्यामुळे बोल्शेविकांनी तहामध्ये शक्य तितकी दिरंगाई करण्याचा प्रयत्न केला. रशियावर दबाव आणण्यासाठी १८ फेब्रुवारी १९१८ मध्ये जर्मन सैन्याने रशियावर चढाई केली. अशा परिस्थितीत कोणताही अन्य पर्याय उपलब्ध न राहिल्यामुळे बोल्शेविकांनी तहाला मान्यता दिली. ३ मार्च १९१८ रोजी जर्मनी आणि रशिया यांच्यात ब्रेस्टलिटोव्हस्क येथे तह झाला.

ब्रेस्ट लिटोव्हस्कच्या तहाच्या तरतुदीनंतर रशियाच्या ताब्यातील पूर्व पोलंड, लिथुएनिया, लाटविया, एस्टोनिया, कार्स, आर्दाहान आणि बाटूम या प्रदेशावरील अधिकार रशियाला सोडावा लागला. फिनलंडवरील अधिकार रशियाने पूर्वीच सोडून दिला होता. १९१४ सालापासून सुरू झालेल्या महायुद्धात रशियाची प्रचंड जीवित आणि वित्तहानी झाली होती. या तहाने रशियाला ६ कोटी ६० लाख लोकसंख्या आणि ५ लक्ष चौरस मैलचा विस्तार असलेला प्रचंड मोठा भूभाग गमवावा लागला. जो प्रदेश रशियाला या तहात गमवावा लागला तो रशियातील बऱ्यापैकी विकसित प्रदेश होता. रशियामधील एकूण लागवडीखालील शेतजमिनीपैकी २७% जमीन, २६% लोहमार्ग, ७३% लोहउद्योग, ७५% कोळशाच्या खाणी या करारामुळे रशियाच्या ताब्यातून जर्मनीकडे गेल्या. याशिवाय ४२००० रेल्वे बोगी भरून गहू आणि १२५ डॉलर्स इतका युद्धदंड जर्मनीला देण्याचे रशियाला मान्य करावे लागले. ब्रेस्टलिटोव्हस्कच्या तहामुळे रशियाचे प्रचंड नुकसान झाले असले तरी रशिया समोर अन्य कोणताही मार्ग उपलब्ध नव्हता. रशियातील अस्थैर्य, आर्थिक हलाखी आणि अंतर्गत अशांतता यावर मात करण्यासाठी बोल्शेविकांना हा तह स्वीकारावा लागला.

## स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न - २

### (अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.

१) सन १९१८ च्या घटनेने कोणाची हुकुमशाही प्रस्थापित झाल्याची घोषणा केली?

२) सोव्हियत संघाने ब्रेस्ट लिटोव्हस्क येथे शांतता करार कशासाठी केला?

३) कोणाच्या नेतृत्वाखाली लाल सैन्याने श्वेत सैन्याचा संपूर्ण पराभव करून यादवी युद्ध संपुष्टात आणले?

४) यादवी युद्ध चालू असताना रशियाचा प्रदेश आपल्या वर्चस्वाखाली आणण्याचा प्रयत्न कोणत्या राष्ट्राने केला?

५) सोव्हियत संघ आणि पोलंड यांच्यात कोणत्या दोन प्रदेशांची विभागणी झाली?

**(ब) योग्य पर्याय निवडा.**

१) सन १९१८ च्या घटनेने रशियातील .................. रशियाचा सत्ताधारी वर्ग म्हणून घोषित केले.

*अ) सैनिकांना ब) सरंजामदारांना क) मध्यमवर्गास ड) श्रमिकांना.*

२) रशियातील .................... हे जगातील पहिले राज्यघटनात्मक समाजवादी शासन म्हणून ओळखले जाते.

*अ) सोव्हियत संघ ब) फिनलंड क) उझबेकिस्तान ड) कझाकस्थान.*

३) सोव्हियत संघाच्या लाल सैन्यविरोधात लढणाऱ्या झार समर्थकाना .................. म्हणून ओळखले जाऊ लागले.

*अ) हरित सैन्य ब) श्वेत सैन्य क) सर्वहारा ड) ब्लॅक सैन्य.*

४) श्वेत सैन्याला जवळ जवळ आठ ................... राष्ट्रांची रसद मिळत होती.

*अ) राजेशाही ब) समाजवादी क) हुकूमशाही ड) भांडवलशाही.*

५) यादवी युद्धादरम्यान ..................... ला मोठ्या प्रमाणात जनतेचा पाठींबा मिळाला.

*अ) लाल सैन्य ब) श्वेत सैन्य क) हरित सैन्य ड) झार सेना.*

## ३.२.३ युद्धकालीन साम्यवाद आणि नवे आर्थिक धोरण (NEP)

ऑक्टोबर १९१७ च्या क्रांतीनंतर यादवी युद्ध आणि परकीय राष्ट्रांच्या लष्करी हस्तक्षेपांच्या आणि मोडकळीस आलेल्या व्यवस्थेच्या पृष्ठभूमीवर नव्याने सत्ता काबीज केलेल्या सोव्हियत शासनाला गंभीर आर्थिक संकटांना सामोरे जावे लागले. पहिले महायुद्ध आणि अंतर्गत अराजकता यामुळे राष्ट्राची अर्थव्यवस्था पूर्ण कोलमडली होती. बेसुमार महागाई, काळा बाजार, सट्टेबाजी सर्वत्र वाढली होती. उद्योगधंदे आणि उत्पादन थंडावले होते. दळणवळण विस्कळीत झाले होते. कच्च्या मालाचे साठे संपुष्टात आले होते. दररोजच्या गंभीर संकटांना तोंड देणाऱ्या जनसामान्यांचा आत्मविश्वास मोडकळीस येऊन त्यांची नैतिक पातळी घसरली होती. अन्नधान्याच्या तीव्र टंचाईमुळे उपासमारीचे संकट सोव्हियत संघासमोर उभे ठाकले होते. अशा परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी सोव्हियत शासनाने प्रथमतः युद्धकालीन साम्यवादाचे धोरण

आणि नंतरच्या काळात लेनिनच्या आग्रहामुळे नवे आर्थिक धोरण राबवले आणि सोव्हियत संघाला आर्थिक संकटातून बाहेर काढून स्थैर्य प्राप्त करून दिले.

### ३.२.३.१ युद्धकालीन साम्यवाद

सोव्हियत शासनासमोर उभ्या राहिलेल्या आर्थिक संकटाचे गांभीर्य लक्षात घेऊन स्थैर्य आणि उत्पादन वाढीसाठी सरकार व भांडवलदार यांच्यामध्ये काही काळ सहकार्य प्रस्थापित करावे असे एप्रिल १९१८ मध्ये लेनिनने सुचविले होते. पण, तसे केल्यास समाजवाद आणि क्रांतीची उद्दिष्टे धोक्यात येतील असे वाटून साम्यवादी पक्षाने (तोपर्यंत बोल्शेविक पक्षाचे साम्यवादी पक्ष असे नामकरण झाले होते.) लेनिनची सूचना फेटाळून लावली. शेवटी, सन १९१८ मध्ये तत्कालीन आर्थिक संकटाला तोंड देण्याकरिता सोवियत सरकारने अत्याग्रही समाजवादचे धोरण अंगिकारले. या धोरणानुसार सर्व उद्योगधंद्याचे राष्ट्रीयकरण करण्यात आले. थंडावलेले उत्पादन वाढवण्यासाठी राष्ट्रातील सर्व श्रमशक्तीला उत्पादन कार्यासाठी जुंपण्यात आले. उपासमारीचे संकट टाळण्यासाठी शेतकऱ्यांकडील अन्नधान्य सक्तीने ताब्यात घेण्यात येऊ लागले. **'अत्याग्रही समाजवाद'** म्हणून ओळखले जाणारे हे धोरण सोव्हियत संघाने यादवी युद्धाच्या काळात राबवले.

२८ जून १९१८ च्या कायद्याने बहुसंख्य मोठ्या उद्योगधंद्याचे राष्ट्रीयकरण करण्यात आले. या कायद्यानुसार सर्व महत्त्वाचे कारखाने, गिरण्या, खाणी इत्यादी सोवियत सरकारची मालमत्ता असल्याचे घोषित करण्यात आले. सर्वोच्च राष्ट्रीय अर्थव्यवस्था समितीद्वारा (Supreme Council of National Economy) या उद्योगांवर नियंत्रण प्रस्थापित करण्यात आले. कारखान्याच्या कारभारात कामगारांना सहभागी करून घेण्यात आले. त्याचवेळी सर्व प्रकारचे संप बेकायदेशीर ठरवण्यात आले. सर्व शासकीय अधिकाऱ्यांना आपापल्या क्षेत्रात कामाला वाहून घ्यावे असे आवाहन करण्यात आले. शासकीय अधिकारी अनुपस्थित राहिले अथवा त्यांनी कामात कुचराई केल्यास त्यांना कडक कारवाईचा बडगा दाखवण्यात आला. राष्ट्रीय उत्पादन व वितरण यांच्यातसमन्वय साधण्याचे कार्य सर्वोच्च राष्ट्रीय अर्थव्यवस्था समितीकडे सोपविण्यात आले.

अन्नधान्य व कृषीखात्याकडे अन्नधान्य किंवा जीवनावश्यक वस्तूंच्या वितरणाचे काम सोपवण्यात आले. अन्नधान्याच्या तीव्र तुटवड्यामुळे सरकारद्वारा नियंत्रित धान्यवाटप पध्दती सुरु करण्यात आली. विशेष शारीरिक कष्टाची कामे करणारे, कमी शारीरिक श्रमाची कामे करणारे, बुद्धिवादी व शारीरिक कष्ट न करणारे अशा चार गटात उपभोक्त्यांची वर्गवारी करण्यात आली आणि त्याप्रमाणात दररोज धान्य वाटप केले जावू लागले. काम न करणाऱ्यांना सर्वात कमी धान्य देण्यात येऊ लागले.

सोव्हियत शासनाच्या ८ नोहेंबर १९१७ रोजीच्या हुकुमानुसार जमिनीच्या खाजगी मालमत्तेचा हक्क रद्द करण्यात आला. सर्व जमीन, भूगर्भातील सर्व संपत्ती, जंगले, पाणी हे सर्व राष्ट्रीय संपत्ती म्हणून घोषित करण्यात आले. शेतकरी कुटुंबातील माणसांची संख्या, त्यांची श्रमशक्ती, गरज आणि स्थानिक परिस्थिती लक्षात घेवून शेतकऱ्यांत जमिनीचे वाटप करण्यात आले होते. शेतकऱ्यांनी त्या जमिनीतून भरघोस उत्पादन काढावे आणि एक वर्ष कुटुंबाच्या भरण पोषणासाठी आणि बी-बियाणाला लागेल इतकेच धान्य स्वत:

जवळ ठेवावे. या व्यतिरिक्त आपल्याजवळ राहिलेले सर्व अतिरिक्त धान्य शेतकऱ्यांनी औद्यौगिक क्षेत्रात काम करणाऱ्या शहरवासीयांसाठी सरकारच्या स्वाधीन करावे. या धान्याच्या मोबदल्यात शासनाद्वारे ग्रामीण जनतेला कारखान्यातील जीवनावश्यक पक्का मालपुरवला जाईल अशी योजना होती.

सोव्हियत शासना पुढील आव्हाने आणि संकटे यांचे भान शेतकऱ्यांना येणे शक्य नव्हते. शतकानुशतके दु:ख आणि दारिद्राने पिडलेल्या शेतकऱ्याला जमीन मिळाली होती. शेतावर राबणाऱ्या शेतकऱ्यांना जमीन मिळाली पाहिजे ही बोल्शेविकांची नीती शेतकऱ्यांच्या परिचयाची होती आणि त्यासाठीच त्यांनी पक्षाला पाठिंबा दिला होता. त्यामुळे त्यांच्याकडे असलेली जमीन व त्यातून कष्टाने निघालेले पीक यावर केवळ त्यांचाच हक्क आहे एवढेच त्यांना समजत होते. शहरातील औद्योगिक उत्पादन थंडावल्यामुळे धान्याच्या पक्का माल पुरविणे सरकारलाही शक्य होत नव्हते. बेसुमार महागाईमुळे रुबलची खूप घसरण झाली होती आणि त्या कागदी चलनाला काहीही किंमत उरली नव्हती. शहरी जनतेला अन्नधान्य पुरवण्यासाठी सरकार शेतकऱ्याकडून जबरीने धान्यवसुली करू लागले. त्याचा परिणाम होत नाही असे दिसताच सरकारने सशस्त्र स्वयंसेवकाच्या तुकड्या ग्रामीण विभागात पाठवण्यात आल्या. त्यामुळे शेतकरी वर्गात असंतोष वाढू लागला. शेतकरी धान्याचे साठे करून ते लपवून ठेवू लागले परंतु तेही सरकारच्या नजरेतून सुटत नाही असे दिसताच, स्वतःच्या गरजेपुरते उत्पादन करू लागले. मात्र त्यामुळे रशियाचे कृषी उत्पादन एकदम घटले.

या सर्व परिस्थितीचे परिणाम सरकारच्या आणि राष्ट्राच्या दृष्टीने घातक ठरले. शहरांची उपासमार होवू लागली, धान्याचा काळाबाजार मोठ्या प्रमाणात सुरु झाला. शहरातील बाजार ओस पडले. घरातील पुस्तके, कपडे व अन्य वस्तू घेऊन त्या मोबदल्यात धान्य मिळवण्याच्या आशेने शहरवासी लोकांचा ओघ खेड्यांकडे वळू लागला. हा बेकायदेशीर धान्य व्यापार बंद करण्याकरिता लाल सैनिक त्यांना अडवू लागले. राष्ट्राची उपासमार होवू लागली. अशा संकटमय परिस्थितीत १९२०-२१ मध्ये भयावह दुष्काळ पडला आणि शेतकरीच दुष्काळाच्या भोवऱ्यात सापडले व मदतीकरिता सरकारला आवाहन करू लागले. यादरम्यान रशियात आलेल्या मलेरिया आणि कॉलरा साथीने परिस्थिती आणखी चिघळली. रशियातील त्या भयानक दुष्काळात व रोगराईत सुमारे पाच दशलक्ष माणसे मृत्युमुखी पडली.

रशियाला त्या संकटकाळी परदेशातून अन्नधान्याची मदत मिळणे निकडीचे झाले. पाश्चात्य राष्ट्रांकडून मदत मागणे म्हणजे क्रांतीला धोका निर्माण करणे अशी सोव्हियत नेत्यांना वाटत असे. पाश्चात्य राष्ट्रे मदतीच्या नावाखाली आपले हेतू साध्य करतील अशी त्यांना शंका वाटे. मात्र, अन्नधान्यासाठी मदत घेणे अत्यंत आवश्यक बनले अन्यथा लक्षावधी लोकांचा मृत्यू होण्याचा संभव होता. वाढत्या असंतोषामुळे सोव्हियत शासनाला देखील धोका निर्माण झाला होता. शेवटी २० ऑगस्ट १९२१ रोजी अमेरिकन रिलीफ ॲडमिनिस्ट्रेशनशी करार होऊन सप्टेंबरमध्ये अमेरिकेची मदत रशियात येऊ लागली. रेड क्रॉस या संस्थेकडून देखील थोडीफार मदत मिळाली. दुष्काळग्रस्त जनतेपैकी सुमारे १/५ लोकांना त्या मदतीचा फायदा मिळू शकला.

महायुद्ध व यादवी युद्धामुळे डबघाईला आलेली अर्थव्यवस्था, युद्धात बेचिराख झालेला प्रदेश, सक्तीच्या धान्यवसुलीमुळे पसरलेली नाराजी, दुष्काळ आणि त्यामुळे झालेल्या हालअपेष्टा इत्यादींमुळे

शेतकरी वर्गात, शहरी कामगारांत व सामान्य नागरिकांत तीव्र असंतोष पसरला. यादवी युद्धाच्या काळात झारची-जमीनदार-भांडवलदारांची सत्ता पुन्हा येईल या भीतीमुळे इतका असंतोष असून देखील सोव्हियत शासनाविरुद्ध जनतेने उठाव केला नाही. मात्र, यादवी युद्ध संपताच या असंतोषाचा भडका उडाला. ठिकठिकाणी सोव्हियत शासनाविरुद्ध उठाव होऊ लागले. धान्यवसुली पथकांवर शेतकऱ्यांचे हल्ले होऊ लागले. अनियंत्रित धान्य वसुली करण्याऐवजी कृषी उत्पादनावर ठराविक कर आकारण्यात यावा अशी मागणी शेतकरी सरकारकडे करू लागले. शहरातही कामगार उद्योगधंद्याच्या राष्ट्रीयीकारणाच्या नीती चा फारसा फायदा झाला नाही. कारण तिथेही उत्पादन वृद्धी न होता उलट उद्योगधंदे व दळणवळण ठप्प झाले होते. त्यामुळे कामगारांची उपासमार होऊ लागली. कामगारांच्या असंतोषामुळे औद्योगिक क्षेत्रात वारंवार कामगारांचे संप होऊ लागले. पेट्रोग्राड येथील कामगारांच्या संपाला सहानुभूती म्हणून क्रोन्स्तात या नाविक तळावरील खलाशांनी उठाव केला.

यादवी युद्धात विजयी झालेल्या सोव्हियत शासनाने विविध ठिकाणी झालेले शेतकऱ्यांचे, कामगारांचे आणि नाविकांचे उठाव शस्त्रसामर्थ्याच्या जोरावर दडपून टाकले. जनतेचे उठाव शस्त्राच्या जोरावर फक्त काही काळच दडपून टाकता येतात याची जाणीव लेनिनला होती. सोव्हियत शासनाच्या स्थैर्यासाठी आणि अस्तित्वासाठी काही काळासाठी सैद्धांतिक निष्ठा बाजूला ठेऊन उपाय योजना करणे आवश्यक असल्याचे लेनिनच्या लक्षात आले. रशियामधील अशा प्रकारच्या परिस्थितीवर मात करण्यासाठी लेनिनने नवे-आर्थिक धोरणाची संकल्पना मांडली.

### ३.२.३.२ नवे आर्थिक धोरण (New Economic Policy)

सोव्हियत शासनाविरूद्धच्या असंतोषाचे मूळ कारण नष्ट करण्याच्या हेतूने १५ मार्च १९२१ मध्ये कम्युनिस्ट पक्षाच्या दहाव्या परिषदेत लेनिनने नव्या आर्थिक धोरणाचा कार्यक्रम मांडला आणि त्याला मंजुरी मिळवली. लेनिनची नवी आर्थिक नीति म्हणजे समाजवादी आणि खाजगी अर्थव्यवस्था यांत घडवून आणलेली तडजोड होती. शेतकरी, कामगार व मध्यमवर्गीय यांच्यासंबंधी सोव्हियत शासनाने आखलेल्या धोरणात नव्या आर्थिक धोरणामुळे मोठ्या प्रमाणात बदल होणार होते. नव्या आर्थिक धोरणामुळे भांडवलशाही अर्थव्यवस्थेपुढे शरणागती पत्करल्या प्रमाणे होईल असे वाटून पोथीनिष्ठ जहाल डाव्या सदस्यांनी त्याला विरोध करण्याचा प्रयत्न केला. मात्र, लेनिनने आपल्या प्रभावी मांडणीने त्यांना वास्तववादाचे भान देऊन त्यांचा विरोध मोडून काढला. रशियातील तत्कालीन परिस्थिती विचारात घेता काही काळाकरिता सीमीत भांडवलशाही अर्थव्यवस्था मान्य करण्याशिवाय गत्यंतर नसल्याचे लेनिनने पक्षाच्या दहाव्या परिषदेच्या लक्षात आणून दिले. नवे आर्थिक धोरण म्हणजे क्रांतीशी द्रोह नसून संक्रमणाची अवस्था असल्याची मांडणी लेनिनने केली.

लेनिनच्या नव्या आर्थिक धोरणानुसार संपूर्ण धान्य वसुलीची पद्धत रद्दबातल करण्यात येऊन त्याऐवजी सरकारने शेतकऱ्यांवर ठराविक कर बसविला. हा कर शेतकऱ्याने सरकारला रोख पैशाच्या स्वरूपात अथवा धान्याच्या स्वरुपात द्यायचा होता. हा कर चुकता करून राहिलेले उत्पादन हे शेतकरी खुल्या बाजारात विकू

शकतो अशी तरतूद करण्यात आली. जमिनीची मालकी ही सरकारची राहिली आणि जमीन फक्त कसण्याकरिता शेतकऱ्यांना देण्यात आली.

औद्योगिक क्षेत्रात देखील नव्या आर्थिक धोरणांमुळे बरेच बदल घडून आले. साम्यवादी तत्वानुसार मोठे आणि आवश्यक उद्योग हे सरकारच्या मालकीखाली ठेवण्यात आले. या उद्योगांचे एकूण उद्योगधंद्यातील प्रमाण ८.५ टक्के इतके होते. त्याचप्रमाणे एकूण कामगारांपैकी ८० टक्के कामगार हे याच मोठ्या उद्योगधंद्यात काम करत होते. या मोठ्या उद्योगधंद्यांच्या व्यवस्थापनासाठी विश्वस्त संघ नेमण्यात ज्यात सरकारनियुक्त अनुशासक मंडळ आणि प्रबंधक काम पाहतील, अशी व्यवस्था करण्यात आली. वीस किंवा त्यापेक्षा कमी कामगार असलेल्या छोट्या उद्योगांचे राष्ट्रीयकरण रद्द करण्यात येऊन ते खाजगीरित्या किंवा सहकारीसंस्थांच्या माध्यमातून चालवण्याची मोकळीक देण्यात आली. उद्योगांना लागणारा कच्चा माल हा खुल्या बाजारातून विकत घ्यावा आणि कामगारांना त्यांच्या कामानुसार वेतन देण्यात यावे असे निश्चित करण्यात आले.

खुल्या बाजारातील खरेदी विक्रीमुळे चलनाची आवश्यकता भासू लागली. कृषी, उद्योग व व्यापार यांच्या विकासाकरिता नोव्हेंबर १९२१ मध्ये स्टेट बँक उघडण्यात आली. जुने चलन रद्द करून स्टेट बँकेला चलन काढण्याचे अधिकार देण्यात आले. अल्पकालीन आणि दीर्घकालीन भांडवल पुरवण्याचे अधिकार देखील या बँकेला मिळाले. या बँकेच्या शंभरच्यावर शाखा वर्षभरात उघडल्या गेल्या.

खुल्या बाजारपेठा सुरु झाल्याने व उपभोक्त्यांनी त्या बाजारातून माल विकत घ्यावयाचा असल्याने सरकारी वितरण पद्धती बंद करण्यात आली. सहकारी संस्थाना मोठ्या प्रमाणात प्रोत्साहन देण्यात आल्यामुळे लक्षावधी शेतकरी कृषी सहकारी संस्थांमध्ये सामील झाले. सहकारी संस्थांमुळे खाजगी व्यापारावर व त्यामुळे होणाऱ्या भाववाढीवर नियंत्रण राहून उपभोक्त्यांना संरक्षण मिळेल अशी अपेक्षा होती.

अंतर्गत व्यापार खुला केला असला तरी परदेशी व्यापार मात्र सरकारने स्वतःच्या ताब्यात ठेवला. या बाबतची कोणतीही तडजोड लेनिन आणि त्याच्या सहकाऱ्यांना मान्य नव्हती. सोव्हियत संघाच्या आर्थिक नियोजनासाठी परराष्ट्र व्यापार ही सरकारी मक्तेदारी असणे गरजेचे होते. रशियातील उद्योगधंद्यांना संरक्षण देण्याकरिता आयातीवर सरकारने कर लावले तरी भांडवलशाही राष्ट्रे त्यांच्या निर्यातीला खास सवलती देऊन रशियन आयात करांचे अडथळे ओलांडतील. भांडवलशाही राष्ट्रांचा माल रशियात मोठ्या प्रमाणात आल्यास रशियातील उद्योगधंदे बुडतील आणि सोव्हियत संघाचे अर्थनियोजन बिघडेल अशी शक्यता होती. परराष्ट्र व्यापार सरकारच्या हाती राहिल्यास सोव्हियत संघाच्या अर्थकारणाला धक्का न लागता आर्थिक पुनर्रचनेचे कार्य यशस्वीपणे करता येईल आणि परराष्ट्र संबंधात व्यापाराचा एक शस्त्र म्हणून वापर करता येईल असे लेनिनला वाटत होते.

कमीत कमी काळात जास्तीतजास्त उत्पादन वृद्धी करून देशाला आर्थिक स्थैर्य व सुदृढता प्रदान करणे हे नव्या आर्थिक धोरणाचे महत्त्वाचे व निकडीचे उद्दिष्ट होते. भांडवलशाही पद्धतीशिवाय ते साध्य करणे अशक्य होते. त्यामुळे काही काळाकरिता लेनिन आणि त्याच्या सहकाऱ्यांनी भांडवलशाहीशी तडजोड केली.

सोव्हियत संघासमोर उभे ठाकलेले तत्कालीन आर्थिक संकट, त्यामुळे उद्भवलेला असंतोष, राजकीय अस्थिरता यावर नव्या आर्थिक धोरणाद्वारे मात करण्याचे लेनिनचे उद्दिष्ट १९२६-२७ या वर्षापर्यंत मोठ्या प्रमाणात साध्य झाले होते. कृषी आणि औद्योगिक क्षेत्रात प्रचंड वाढ आणि प्रगती झाल्याचे दिसून आले. मध्यंतरी घट होऊन निम्म्यावर आलेले कृषी उत्पादनात मोठ्या प्रमाणात वाढ होऊन त्याने पूर्वीची पातळीला देखील ओलांडली. गुरा-ढोरांच्या संख्येत देखील प्रचंड वाढ झाली. औद्योगिक उत्पादन हे सहा ते सात पटीने वाढले.

लेनिनच्या नव्या आर्थिक धोरणामुळे सोव्हियत संघाची आर्थिक प्रगती तर साधली गेलीच, पण त्याचबरोबर जनतेतील असंतोष कमी होऊन सोव्हियत शासनाला निर्माण झालेला धोका नाहीसा झाला. नव्या आर्थिक धोरणामुळे सोव्हियत संघाला आर्थिक-राजकीय स्थैर्य आणि सुदृढता प्राप्त झाली.

## स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न - ३

### (अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.

१) सन १९१८ मध्ये तत्कालीन आर्थिक संकटाला तोंड देण्याकरिता सोवियत सरकारने कोणते धोरण अंगिकारले?

२) सर्वोच्च राष्ट्रीय अर्थव्यवस्था समितीकडे कोणते कार्य सोपविण्यात आले?

३) नव्या आर्थिक धोरणाला कोणी विरोध करण्याचा प्रयत्न केला?

४) खुल्या बाजारातील खरेदी विक्रीमुळे कशाची आवश्यकता भासू लागली?

५) नव्या आर्थिक धोरणामुळे सोव्हियत संघाला काय प्राप्त झाले?

### (ब) योग्य पर्याय निवडा.

१) अत्याग्रही समाजवादाच्या धोरणानुसार सर्व उद्योगधंद्याचे ............... करण्यात आले.

*अ) राष्ट्रीयकरण* *ब) खाजगीकरण* *क) नूतनीकरण* *ड) शिथिलीकरण.*

२) ................ येथील कामगारांच्या संपाला सहानुभूती म्हणून क्रोन्स्तात या नाविक तळावरील खलाशांनी उठाव केला.

*अ) मॉस्को* *ब) पेट्रोग्राड* *क) पोलंड* *ड) वार्सावा.*

३) लेनिनच्या ............... नुसार संपूर्ण धान्यवसुलीची पद्धत रद्दबातल करण्यात येऊन त्याऐवजी सरकारने शेतकऱ्यांवर ठराविक कर बसविला.

*अ) जुन्या आर्थिक धोरणा* *क) खरेदी धोरणा*

*ब) क्रांतिवादी विचारा* *ड) नव्या आर्थिक धोरणा.*

४) कृषी, उद्योग व व्यापार यांच्या विकासाकरिता नोव्हेंबर १९२१ मध्ये .............. उघडण्यात आली.

*अ) रशियन बँक   ब) मॉस्को बँक   क) स्टेट बँक   ड) डॉईश बँक.*

५) सोव्हियत संघाच्या आर्थिक नियोजनासाठी .......... ही सरकारी मक्तेदारी असणे गरजेचे होते.

*अ) अंतर्गत व्यापार   ब) परराष्ट्र व्यापार   क) मुक्त व्यापार   ड) आर्थिक व्यापार.*

## ३.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

- **सोव्हियत :** कामगारांची समिती.
- **अत्याग्रही साम्यवाद :** साम्यवादी मूल्यांचा अति आग्रह धरणे.
- **पोथीनिष्ठ :** वैचारिक सुधारणांना विरोध करणारे.
- **बोल्शेविक :** बहुमतातील गट.
- **मेन्शेविक :** अल्पमतातील गट.
- **सर्वहारा :** उत्पादन साधनावर मालकी नसणारा वर्ग.

## ३.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

### स्वयं-अध्ययन प्रश्न-१ ची उत्तरे

### अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.

१) *बहुमत असणारे.*

२) *कार्ल मार्क्सच्या.*

३) *पेट्रोग्राड आणि मॉस्को.*

४) *पक्षाचे सदस्यत्व फक्त पूर्णवेळ क्रांतिकारकांनाच द्यावे.*

५) *तातडीच्या शांततेची आणि कामगारांच्या समित्या किंवा सोव्हियत यांनी सत्ता हाती घ्यावी.*

### ब) योग्य पर्याय निवडा.

१) *क) रशियन सोशालिस्ट डेमोक्रॅटिक वर्कर्स पार्टी.*

२) *अ) मेन्शेविक.*

३) *ड) बोल्शेविक.*

४) *ब) लेनिन.*

५) *क) डाव्या समाजवादी.*

**❋ स्वयं-अध्ययन प्रश्न-२ ची उत्तरे**

**अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) *सर्वहाराची.*

२) *महायुद्धातून बाहेर पडण्यासाठी.*

३) *लिओन ट्रोट्स्कीच्या.*

४) *पोलंडने.*

५) *बेलारूस आणि युक्रेन.*

**ब) योग्य पर्याय निवडा.**

१) *ड) श्रमिकांना.*

२) *अ) सोव्हियत संघ.*

३) *ब) श्वेत सैन्य.*

४) *ड) भांडवलशाही.*

५) *अ) लाल सैन्य.*

**❋ स्वयं-अध्ययन प्रश्न-३ ची उत्तरे**

**अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) *अत्याग्रही समाजवादचे.*

२) *राष्ट्रीय उत्पादन व वितरण यांच्यात समन्वय साधण्याचे.*

३) *पोथीनिष्ठ जहाल डाव्या सदस्यांनी.*

४) *चलनाची.*

५) *आर्थिक-राजकीय स्थैर्य आणि सुदृढता.*

**ब) योग्य पर्याय निवडा.**

१) *अ) राष्ट्रीयकरण.*

२) *ब) पेट्रोग्राड.*

३) *ड) नव्या आर्थिक धोरणा.*

४) *क) स्टेट बँक.*

५) *ब) परराष्ट्र व्यापार.*

## ३.५ सारांश

ऑक्टोबर १९१७ च्या क्रांतीमध्ये लेनिनच्या नेतृत्वाखालील बोल्शेविक गटाने रशियाच्या सत्तेवर कब्जा करून सर्वहाराच्या सत्तेचे घोषणा केली. रशियन सोशालिस्ट डेमोक्रॅटिक वर्कर्स पार्टीमधील वैचारिक आणि डावपेचात्मक मतभेदातून बोल्शेविक गट निर्माण झाला. या गटाने लेनिनच्या नेतृत्वाखाली रशियाची सत्ता मिळवून जगातील पहिले घटनात्मक समाजवादी राष्ट्र स्थापन केले. क्रांतीनंतर उद्‌भवलेले यादवी युद्ध, महायुद्धात अडकलेला रशिया, या दरम्यान कोलमडलेली रशियन अर्थव्यवस्था, त्यामुळे निर्माण झालेला शेतकऱ्यांचा असंतोष आणि उठाव यातून सोव्हियत संघाने यश अपयश पचवत मार्ग काढला. सन १९१८-२१ मधील सोव्हियत शासनाच्या धोरणामुळे सोव्हियत संघाला आर्थिक आणि राजकीय आघाड्यांवर स्थैर्य प्राप्त होऊन सोव्हियत संघाची सत्ता दृढ झाली. सोव्हियत शासनाच्या धोरणामधील अत्याग्रही साम्यवादाच्या धोरणामुळे देशभरात प्रचंड असंतोष निर्माण झाला. या असंतोषावर आणि बिकट आर्थिक परिस्थितीवर मात करण्यासाठी लेनिनने नव्या आर्थिक धोरणची मांडणी केली. नव्या आर्थिक धोरणामुळे सोव्हियत अर्थव्यवस्थेला स्थैर्य प्राप्त होऊन त्यांची सत्ता दृढ झाली.

## ३.६ सरावासाठी स्वाध्याय

❋ **(अ)खालील प्रश्नांची उत्तरे लिहा. (दीर्घोत्तरी प्रश्न)**

१) बोल्शेविक पक्षाच्या विचारसरणीचा आणि विकासाचा आढावा घ्या.

२) सन १९१८-२१ दरम्यानच्या सोव्हियत शासनाच्या धोरणाची चिकित्सा करा.

३) अत्याग्रही साम्यवादाचे मूल्यमापन करा.

४) नव्या आर्थिक धोरणाने सोव्हियत संघाला दिलेले योगदान स्पष्ट करा.

५) ऑक्टोबर क्रांतीनंतरच्या रशियातील आर्थिक घडामोडींची माहिती द्या.

❋ **(ब) टिपा लिहा. (लघुत्तरी प्रश्न)**

१) बोल्शेविक पक्षातील लेनिनची भूमिका.

२) सोव्हियत शासनाचे महायुद्धाबाबतचे धोरण.

३) अत्याग्रही साम्यवादाविरोधात शेतकरी असंतोष.

४) अत्याग्रही साम्यवादाचे अपयश.

५) नव्या आर्थिक धोरणाचे यश.

## ३.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

१. Michael Kort, The Soviet Colossus: History and Aftermath,M.E. Sharpe, 2001.

२. Edward Hallett Carr, The Bolshevik Revolution : 1917-1923, W.W. Norton, 1985.

३. सुमन वैद्य, रशियाचा इतिहास (१८६०-१९६४), महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ, आशय प्रकाशन, नागपूर, १९८०.

४. सुमन वैद्य, आधुनिक जग (१८७१-१९४५), महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ, नागपूर, १९८८.

५. पी. जी. जोशी, विसाव्या शतकाचा इतिहास, विद्या प्रकाशन, नागपूर, २००३.

६. य. ना. कदम, आधुनिक जग, फडके प्रकाशन, कोल्हापूर, २०१०.

७. गोविंद तळवलकर, सोव्हियत साम्राज्याचा उदय आणि अस्त : खंड १ व २, मौज प्रकाशन, १९९८.

❋ ❋ ❋

घटक–४

# स्टॅलिन आणि सोव्हिएत रशियाचा जागतिक महासत्ता म्हणून उदय

## ( Stalin and Emergence of USSR as World Power )

---

अनुक्रमणिका


४.० उद्दिष्टे

४.१ प्रास्तविक

४.२ विषय विवेचन

    ४.२.१ सामाजिक बदल व राजकीय बदल

    ४.२.२ पंचवार्षिक योजना

    ४.२.३ दुसरे महायुध्द व सोव्हिएत रशिया

    ४.२.४ जोसेफ स्टॅलिन

४.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

४.४ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

४.५ सारांश

४.६ सरावासाठी स्वाध्याय

४.७ संदर्भ ग्रंथ


## ४.० उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यासानंतर आपणास –

१. जोसेफ स्टॅलिन याचे कार्य समजण्यास मदत होईल

२. रशियात घडून आलेल्या सामाजिक व राजकीय जीवनातील बदलांची माहिती होईल

३. पंचवार्षिक योजनांची उपयुक्तता लक्षात येईल.

४. द्वितीय महायुध्दातील रशियाची परस्थितीबद्दल माहिती सांगता येईल

५. द्वितीय महायुध्दानंतर रशियाने पुनर्वसनासाठी आखलेल्या योजनांची ओळख होईल.

## ४.१ प्रास्ताविक

२० व्या शतकाच्या प्रारंभी सोव्हिएत रशियात वाङ्मय, कला, विज्ञान या क्षेत्रात प्रगती घडून आली. परंतु पहिले महायुध्द, रशियन राज्यक्रांती व त्यानंतरचे यादवी युध्द यामुळे त्या प्रगतीला चांगलाच हादरा बसला होता. यातूनही रशियन लोकांचे चिवट व्यक्तिमत्व, सांस्कृतिक संस्थांना मदत प्रोत्साहन देण्याचे नव्या सरकारचे धोरण यामुळे लवकरच परिस्थिती बदलत गेली. देशातील शिक्षण, विज्ञान व कलाक्षेत्रे, प्रयोगशाळा, पदार्थ संग्रहालय इ. कायम टिकून त्यांच्या विकासाकडे लक्ष पुरवणे आवश्यक होते, राष्ट्राची सांस्कृतिक पातळी उंचावण्यासाठी आर्थिक स्थैर्य व सुस्थिती आवश्यक होती. त्यासाठी केवळ आर्थिक स्थैर्य यावर जास्त भर देणे हे योग्य नाही हे रशियन नेत्यांना माहित होते. म्हणूनच रशियन राज्यक्रांती यशस्वी झाल्यानंतर राजकीय व आर्थिक क्षेत्रात परिवर्तन जसे घडवून आणण्यात आले. त्याच पध्दतीने सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक क्षेत्रातही काही बदल घडवून आणण्यात आले. नव्या रशियाची जडणघडण होत गेली. स्टॅलिनचा कालखंड या दृष्टीने महत्वाचा ठरला.

## ४.२ विषय विवेचन

### ४.२.१ सामाजिक बदल

#### १. धर्म

साम्यवादी तत्त्वज्ञानाप्रमाणे धर्म म्हणजे बुध्दी व सारासार विचारशक्ती नष्ट करणारी अफु आहे.' म्हणजेच 'धर्म म्हणजे अफूची गोळी' होय अशी साम्यवाद्यांची पक्की धारणा होती. रशियन राज्यक्रांतीनंतर यादवी युध्द सुरू असताना बोल्शविकांची राजवट उलथवून टाकण्यामागे प्रतिक्रांतीवाद्यानी चालविलेल्या प्रयत्नात चर्चही आघाडीवर होते. त्यामुळे साम्यवाद्यांचा चर्चवर रोष होता. याचबरोबर साम्यवाद्यांना असे वाटत होते की चर्च सामान्य लोकांच्या धर्म भोळेपणाचा व अंधश्रध्देचा फायदा घेऊन त्याची पिळवणूक करते. त्यामुळे चर्चचे सर्व अधिकार व प्रभाव नाहीसा केला पाहीजे. सन १९१६ मध्ये सोव्हिएत रशियातील **रोमन व कॅथलिक चर्चची** संख्या १५०० एवढी होती. जानेवारी २३, १९१८ रोजी एक वटहुकूम काढून रशियन शासनाने शासन व चर्च याच्यात फारकत केली. चर्चची सर्व मालमत्ता जप्त करण्यात आल्या. चर्चचे शैक्षणिक अधिकार काढून घेण्यात आले. त्यांचा मतदानाचा हक्क काढून घेण्यात आला. खाजगी जीवनात धर्म स्वीकारण्यास व पाळण्यात परवानगी देण्यात आली. सार्वजनिक जीवनातून धर्माची पूर्णपणे हकालपट्टी करण्यात आली. सन १९२५ मध्ये **लढाऊ निरीश्वरवादी संघ स्थापन करण्यात आला**. धर्मभोळेपणा, अंधश्रध्दा, मद्यपान याविरुध्द या संघाने जोमाने प्रचार चालविला. सन १९२५ पासून प्रार्थना पुस्तकाच्या प्रकाशनावर बंदी घालण्यात आली. सन १९२९ च्या घटनादुरुस्तीनुसार धर्मप्रसार बेकायदेशीर ठरविण्यात आला.

या सर्व उपाययोजनांचा परिणाम सन १९३० नंतरच्या तरुण पिढीत निरीश्वरवादी दृष्टिकोन वाढून

चर्चनिष्ठ लोकांची संख्या कमी झाली. सन १९३६ नंतर युरोपमध्ये हिटलरचा प्रभाव वाढण्यास सुरुवात झाली, दुसऱ्या महायुध्दाचे सावट जवळ दिसू लागताच समाजातील अंतस्थ कलह व असंतोष नाहीसा होऊन राष्ट्रीय एकता दृढ व्हावी याची नितांत आवश्यकता होती. यासाठी स्टॅलिनने चर्च वरील निर्बंध थोडे शिथिल केले होते.

जानेवारी १९३९ मध्ये 'प्रत्यक्ष कारवाई' व धर्मविरोधी प्रचार बंद करण्यात आला. याचा चांगला परिणाम दुसऱ्या महायुध्दात नाझी हल्ल्याच्या काळात दिसून आला. रशियन परंपरावादी किंवा सनातनी चर्चप्रमुख **सर्जीयस** यांनी एक पत्रक काढून सर्व चर्च अनुयायांनी व लोकांनी मातृभूमीच्या संरक्षणाकरीता रशियन सरकारला सर्वतोपरी मदत करावी असे आवाहन केले. स्टॅलिनने सप्टेंबर १९४३ मध्ये बिशपांच्या संमेलनाला व चर्च प्रमुखाच्या निवडीला परवानगी दिली. एक राष्ट्रीय संस्था म्हणून रशियन सनातनी, परंपरावादी चर्चला मान्यता देण्यात आली.

## २. शिक्षण

सन १९१७ साली बोल्शेविकांच्या हाती सत्ता आली तेव्हा सोव्हिएत रशियातील ७२ टक्के लोक निरक्षर होते. त्यांना लिहिता वाचता येत नव्हते. सोव्हिएत रशियाच्या मागासलेल्या भागात निरक्षरतेचे प्रमाण ९९ टक्के एवढे होते. याचे कारण म्हणजे पहिले महायुध्द, रशियन राज्यक्रांती व यादवी युध्द या काळातील अराजकतेमुळे सोव्हिएत रशियाच्या शैक्षणिक क्षेत्रावर वाईट परिणाम झाला होता. या काळात हजारो शाळांच्या इमारतींची मोडतोड झाली होती. युध्दात २० ते ३० वर्षे वयाचे साक्षर तरुण मोठ्या संख्येने मारले गेले होते. यादवी युध्दाच्या काळात बोल्शेविकांच्या रोषाला भिवून सुमारे १० लक्ष उच्च व मध्यम वर्गीयांनी रशिया सोडून पलायन केले होते. हाच सोव्हिएत रशियाचा प्रामुख्याने शिक्षित वर्ग होता. वरील कारणांमुळे शैक्षणिक क्षेत्रातही रशियन नेत्यांपुढे कठीण समस्या होती. पुढचे पन्नास वर्षे तरी सोव्हिएत रशियाच्या शिक्षण पध्दतीत स्थैर्य व जोम निर्माण होऊ शकणार नाही असा निरीक्षकांचा अंदाज होता. ही निरक्षरता नाहीशी होऊन शिक्षणाचा अत्यल्प काळात प्रसार व्हावा हे लेनिनचे महत्त्वाचे उद्दिष्ट होते; कारण त्यावर समाजवादाचे यश अवलंबून होते.

प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाची हजारो केंद्रे सोव्हिएत रशियात सुरु करण्यात आली. या काळात रशियात ५०,००० शाळा होत्या. प्रौढांसाठी संध्याकाळचे वर्ग चालू करण्यात आले. प्राथमिक व माध्यमिक शिक्षण सक्तीचे करण्यात आले. सन १९२६ मध्ये साक्षरतेचे प्रमाण ५१ टक्क्यांपर्यंत गेले. सन १९३४ पर्यंत सार्वत्रिक प्राथमिक शिक्षणाचे ध्येय गाठण्यास सरकारला शंभर टक्के यश मिळाले. सन १९१४ मध्ये सोव्हिएत रशियाच्या सुमारे १०४,६१० प्राथमिक शाळांमध्ये ७ लाख २३ हजार ६०० विद्यार्थी शिक्षण घेत होते. तर सन १९३६ मध्ये दोन कोटी पेक्षा अधिक विद्यार्थी संख्या असलेल्या एकूण ७ लाख ६४ हजार ८१ प्राथमिक शाळा सोव्हिएत रशियात होत्या. सन १९३६ या काळात १० हजार प्राथमिक शाळा उघडल्या गेल्या. त्यातील विद्यार्थी संख्या २.५ कोटीवर गेली होती. याचा परिणाम असा झाला की १९४० पर्यंत ९० टक्के सोव्हिएत रशिया साक्षर झाला होता.

सरकारने माध्यमिक, उच्च तांत्रिक शिक्षणावर विशेष भर दिला.सन १९१७ मध्ये सोव्हिएत रशियात ७१ विद्यापीठ व तांत्रिक विद्यालये होती. ज्यात ८५०० विद्यार्थी शिक्षण घेत होते. सन १९४० मध्ये ही संख्या ४५० एवढी झाली ज्यातून ३ लाख ७१ हजार विद्यार्थी शिक्षण घेत होते. संपूर्ण राष्ट्रात शेकडो विद्यालये उघडून ती विशाल औद्योगिक प्रकल्पांना संलग्न करण्यात आली होती. सन १९४० मध्ये सर्व उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची राहण्याची सोय सरकारकडून विनामूल्य करण्यात आली. एवढेच नव्हे तर बऱ्याच क्षेत्रात शिष्यवृत्ती व वेतनवृत्ती देण्यात आली होती.

सन १९४० मध्ये एकूण ७५ भाषेतून शिक्षण दिले जात होते. यापैकी बऱ्याच भाषांना क्रांतीपूर्व काळात स्वतंत्र लिपी नव्हती. मात्र राष्ट्रीय ऐक्य साधण्याकरीता भाषिक ऐक्य आवश्यक असल्याने प्रादेशिक भाषांबरोबरच रशियन भाषा सक्तीची करण्याकडे शासनाचा कल होता.

शिक्षणाच्या प्रसाराचा व प्रगतीचा परिणाम सामान्य जनतेच्या मनोभूमिकेवर होणे स्वाभाविक होते. क्रांतीपूर्वकाळात कल्पनाही केली नव्हती इतक्या मोठ्या प्रमाणावर सरकारने उपलब्ध करून दिलेल्या तांत्रिक व उच्च शिक्षणाच्या सोयीचा फायदा तरून पिढीने करून घेतला. थोड्याच काळात यंत्रप्रधान व उद्योगप्रधान समाजवादी राष्ट्राला आवश्यक असलेले हजारो वैज्ञानिक, तंत्रज्ञ, डॉक्टर, स्थापत्यविशारद सोव्हिएत रशियात तयार झाले होते. सोव्हिएत रशियातील नवीन पिढी समाजवादी विचारसरणी खोलवर रुजली व ते समाजवादी राष्ट्राचे उत्तम नागरिक बनावे हे सोव्हिएत राजवटीच्या स्थैर्य व यश याकरीता आवश्यक होते.

## ३. स्त्रियांचे स्थान आणि कुटुंबसंस्था बळकट करण्यासाठी प्रयत्न

राष्ट्रीय जीवनात स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने स्थान मिळाल्याशिवाय समाजवाद व लोकशाही रुजणे शक्य नाही असे कार्ल मार्क्सचे मत होते. लेनिन हा मार्क्सवादाचा कट्टर पुरस्कर्ता असल्याने सोव्हिएत रशियाच्या सत्तेची सर्व सूत्रे हाती घेताच स्त्रियांचे स्वातंत्र्य, स्त्री-पुरुष समानता व स्त्रियांच्या स्थितीत सुधारणा याकडे लक्ष दिले. शतकानुशतकांच्या रूढी-परंपरांमुळे रशियन स्त्रीला गुलामाची अवस्था प्राप्त झाली होती. रशियातील एकूण लोकसंख्येपैकी स्त्रियांची लोकसंख्या निम्मी होती. अशा प्रकारे देशातील निम्मी जनता गुलामगिरीने, जखडून असेल त्या राष्ट्राला खऱ्या अर्थाने स्वातंत्र्याची ग्वाही देता येणार नाही असे लेनिनचे मत होते. घरकामातून स्त्रियांची मुक्तता करून राष्ट्र उध्दाराच्या कार्यास पुरुषांच्या बरोबरीने स्त्रीला स्थान मिळाले पाहिजे यासाठी लेनिन आग्रही होता. या विचारसरणीला मूर्त रूप देण्यासाठी १९१७ नंतर सोव्हिएत सरकारने पावले उचलायला सुरुवात केली.

सोव्हिएत रशियाच्या राज्यघटनेत राजकीय, आर्थिक व सामाजिक क्षेत्रात स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने सर्वाधिकार दिले. मतदानाचा, उमेदवार म्हणून निवडणूक लढण्याचा, क्षमतेनुसार कोणत्याही पदावर नियुक्त होण्याचा स्त्रियांचा हक्क मान्य करण्यात आला. शिक्षणाची दारे स्त्रियांसाठी खुली करण्यात आली. रशियन सरकारने उपलब्ध करून दिलेल्या या संधीमुळे रशियन स्त्रियांनी पुरुषांच्या बरोबरीने स्थान निर्माण केले.

सन १९४० मध्ये सोव्हिएत रशियाच्या सुप्रिम सोविएत मध्ये १८९ महिला प्रतिनिधी म्हणून निवडून आल्या. त्याचबरोबर महत्त्वाच्या समित्या, यांच्या अध्यक्ष, न्यायाधीश, डॉक्टर, तंत्रज्ञ, परराष्ट्र वकील म्हणून

त्या सोव्हिएत रशियाच्या राष्ट्रीय जीवनात कार्यरत झाल्या. एकाच दर्जाच्या पदावर स्त्री-पुरुषांना समान वेतन मान्य करण्यात आले होते. शारीरिक मेहनतीची व धोक्याची कामे वगळता अन्य सर्व क्षेत्रे स्त्रियांसाठी खुली करण्यात आली होती. याचा परिणाम म्हणून सन १९४० मध्ये सोव्हिएत रशियात एकूण १ लाख ५२ हजार डॉक्टर होते. त्यापैकी अर्धी संख्या स्त्रियांची होती. १० हजार पेक्षा अधिक स्त्रिया इंजिनियर व तंत्रज्ञ म्हणून कार्यरत होत्या. कारखान्यातील स्त्री कामगारांची संख्या ३५ टक्के, विज्ञान क्षेत्रात ३० टक्के, उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात ३५% स्त्रियांची संख्या होती. यादवी युध्दाच्या काळात व नंतर दुसऱ्या महायुध्दाच्या काळात रशियन स्त्रियांनी सर्व प्रकारची कामे जबाबदारीने व क्षमतेने पार पाडली. स्त्रियांना सवलती देण्यात आल्या.

रशियन स्त्रियांना मुलाच्या जन्मापूर्वी व नंतर पूर्ण पगारी रजा देण्याची आणि तत्संबंधी खर्चाची तरतूदही शासनाद्वारा करण्यात आली होती. मोठ्या कुटुंबांना प्रोत्साहन देण्यासाठी शासनाकडून जास्तीची मदत देण्यात येत होती. सातव्या, आठव्या व नवव्या मुलाच्या जन्मानंतर प्रत्येक वेळी पाच वर्षापर्यंत त्या कुटुंबाला जास्तीचे दोन हजार रुबल्स देण्याची तरतूद करण्यात आली होती. दहाव्या अपत्याच्या जन्मानंतर पहिल्या वर्षी पाच हजार रुबल्स तर नंतरच्या चार वर्षात एकूण बारा हजार रुबल्स त्या कुटुंबाला दिले जात होते. दहापेक्षा जास्त मुलं असलेल्या मातेला सन्मानदर्शक पदव्या देवून सन्मानित करण्यात येऊ लागले. प्रत्येक कारखान्यात व प्रत्येक सामूहिक शेती गटाचा एक अविभाज्य घटक म्हणून एक शिशू संगोपन गृह चालवले जात होते. या शिशु संगोपनगृहात मुलांची शास्त्रशुध्द पध्दतीने काळजी घेतली जात होती.लहान मुलांना पाजण्याकरीता मातेला दर तीन तासांनी अर्धा तास सुट्टी दिली जात होती.

क्रांतीनंतर प्रारंभीच्या काळात कुटुंब संस्थेबद्दल फारशी आस्था रशियन सरकारच्या नितीधोरणात दिसून येत नव्हती. परंतु सामाजिक स्थैर्य व कल्याण या दृष्टीने सामाजिक जीवनातील कुटुंब संस्थेचे महत्त्व लवकरच रशियन पुढाऱ्यांनी जाणवले. त्यानुसार प्रकृती संबंधित कारणे वगळता गर्भपात बेकायदेशीर घोषित करण्यात आला. सन १९१८ च्या घटनेनुसार घटस्फोटाचा कायदा अगदीच शिथिल होता. मुले नसल्यास किंवा पती-पत्नी यापैकी कोणीही सहजीवनाची स्वतःची अनिच्छा व्यक्त केल्यास घटस्फोट मिळू शकत असे. परंतु त्यामुळे मुलांच्या संगोपनाबाबत उद्भवणाऱ्या समस्या व अन्य अनिष्ट परिणाम लक्षात घेऊन सन १९३६ च्या घटनेत बदल घडवून आणण्यात आला. घटस्फोटाचा कायदा कडक करण्यात आला. याचा परिणाम १९४० पर्यंत सोव्हिएत रशियातील घटस्फोटाच्या प्रमाणात घट झाली.

### ४. आरोग्य

सोव्हिएत रशियातील यादवी युध्दाच्या काळात वैद्यकीय क्षेत्रावर विपरीत परिणाम झाला. यानंतर जनतेला वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देण्याचे प्रयत्न करण्यात आले. झार काळातील सोव्हिएत रशियात झेमस्तरद्वारा लागू करण्यात आलेली व त्या काळात संपूर्ण युरोपात उत्कृष्ट म्हणून मान्यता पावलेली वैद्यकीय पध्दती रशियनांनी ताब्यात घेतली. प्रत्येक शहरात, ग्रामीण भागात, कारखान्यात, उद्योग केंद्रात, आरोग्य केंद्रे सुरू करण्यात आली. सन १९४० पर्यंत अनेक औद्योगिक केंद्रात ७००० आरोग्य केंद्र स्थापन

झाली होती. क्रांतीपूर्वकाळात १९१३ मध्ये सोव्हिएत रशियाच्या शहर विभागात एकूण ९० हजार रुग्णांना दवाखान्यात उपचारार्थ भरती करून घेण्याची सोय होती. हीच संख्या १९३७ मध्ये शहरी विभागात पाच पटीने तर ग्रामीण भागात तीन पटीने वाढली. स्त्रिया व लहान मुलांच्या आरोग्य सेवेकडे तर सरकारने विशेष लक्ष पुरविले. लेनिनचे असे मत होते की राष्ट्रात सर्वोत्कृष्ट जे असेल ते प्रथम मुलांना मिळाले पाहिजे.

संसर्गजन्य रोगांना आळा घालून त्यांचे निर्मूलन करण्याकरिता खास फिरत्या प्रयोगशाळा सुरू केल्या. मानवाला भेडसावणाऱ्या सर्व संसर्गजन्य रोगांचे निर्मूलन होण्यास मदत झाली. सन १९१४ मधील सोव्हिएत रशियातील प्रशिक्षित डॉक्टरांची संख्या ३० हजार होती. सन १९४० मध्ये १ लाख २० हजारावर गेली. यावरून असे दिसून येते की सोव्हिएत राजवटीतील वैद्यकीय सेवा पध्दतीच्या यशाला ते डॉक्टर आधारभूत ठरले.

## ५. विज्ञान

विज्ञानाच्या प्रगतीला सोव्हिएत सरकारने विशेष प्रोत्साहन दिले. बुध्दिवादी दृष्टिकोणात वाढ होवून अंधश्रध्दा दूर होण्यास मदत होईल असा सोव्हिएत नेत्यांचा विश्वास होता. सोव्हिएत राजवटीच्या पहिल्या काही वर्षात इतर क्षेत्राप्रमाणे विज्ञानावरही राजकीय नियंत्रणाचा परिणाम दिसत होता. परंतु क्रांतीनंतर विज्ञानावर कोणतेही राजकीय व सैध्दांतिक निर्बंध न घालता विज्ञानाच्या प्रगतीला प्रोत्साहन देण्यात आले. क्रांतीपूर्व काळात स्थापन झालेले विज्ञानाची विद्यापीठ व अकादमी ऑफ सायन्स यासारख्या संस्थांच्या जपणुकीकडे व विकासाकडे सरकारने विशेष लक्ष दिले. ऑल युनियन अकादमी ऑफ सायन्सच्या मार्गदर्शनाखाली अनेक विज्ञान व संशोधन संस्था युक्रेन,व्हाईट रशिया, जॉर्जिया अशा प्रदेशात प्रस्थापित करण्यात आल्या होत्या. सन १९३५ पर्यंत अवजड उद्योगाच्या मंत्रालयाद्वारा सुमारे शंभर विज्ञान संस्था स्थापन करण्यात आल्या. या संस्थेमुळे सुमारे १० हजार तंत्रज्ञ, स्थापत्यविशारद व प्रयोगशाळा सहाय्यक, १२००० वैज्ञानिक संशोधक संशोधन कार्यात गुंतले होते. हे सर्व औद्योगिक, वैज्ञानिक, वैद्यकीय व लष्करी प्रगतीला पोषक ठरले. इतिहास, पुरातत्व, प्राच्यविद्या अभ्यासक अशा अनुत्पादक विषयाच्या अध्यापनाला सरकारी प्रोत्साहन मिळाले.

## ६. वाङ्मय व कला क्षेत्र

रशियन राज्यक्रांती व साम्यवादाच्या तत्वज्ञानाचा प्रभाव प्रारंभीच्या काळात रशियाच्या वाङ्मय व कला या क्षेत्रावरही दिसून आला. लिओ टॉल्स्टॉय, तुर्गेनेव, दोस्तोव्हस्की यासारख्या क्रांतीच्या पूर्वी नावाजलेल्या तत्त्वज्ञांची, साहित्यिकांची परंपरा म्हणजे रशियन साहित्याचा गौरव होता. परंतु सन १९१८ नंतर साम्यवादी संस्कृतीच्या नवीन मूल्यांच्या जपणुकीकरीता वाङ्मय, नाट्य कला, संगीत, चित्रकला यांचा उपयोग व्हावा अशी नीती रशियन सरकारची होती. निरक्षरता, रोगराई, प्रतिक्रांती इत्यादींच्या निर्मूलनाकरीता प्रचाराचे साधन म्हणून साहित्य व कला यांचा उपयोग केला जाऊ लागला. याचा परिणाम साहित्याच्या क्षेत्रातील कलात्मकता, कल्पकता, सौंदर्य यावर झाला त्यामुळे या पुढील काही वर्षात निर्मित झालेले साहित्य काहीसे रटाळ व निरस झालेली दिसून येते.

साम्यवादाच्या प्रसाराकरीता उपयोग झाला नाही असे एकमेव क्षेत्र म्हणजे सोव्हिएत रशियाचे सुप्रसिध्द बॅले नृत्य होय. यादवी युध्दाच्या काळात बॅले नृत्य कलाविशारदांना सोडून सर्वांना लष्कर भरतीच्या कायदा लागू करण्यात आला होता. सोव्हिएत रशियाचे खास गुण वैशिष्ट्य असलेल्या या बॅले नृत्याची रशियन सरकारने जपणूक केली. नृत्याच्या विकासाला उत्तेजन देण्यात आले. एवढेच नव्हे तर रशियन सरकारच्या निरनिराळ्या वंश गटाच्या कलागुणांना प्रोत्साहन देण्याच्या नीतीमुळे रशियन बॅले अधिकच समृध्द व सौंदर्यशाली बनले. क्रांतीनंतरच्या काळात बॅले नृत्य प्रकारा बरोबरच युक्रेनियन, जॉर्जियन, ताजीकन, मोल्दावियन व व्हाईट रशियन येथील लोकनृत्ये प्रसिध्दीस आली.

### ❀ राजकीय बदल :–

रशियात सोव्हिएत सरकारची स्थापना झाली हे कामगारांचे व शेतकऱ्यांचे राज्य होते, पण व्यक्तीच्या स्वरूपात त्या ठिकाणी जी हुकूमशाही शासन प्रणाली निर्माण झाली होती तिचे स्वरूप स्टॅलिनच्या काळात अगदी विलक्षण होते. या काळात कम्युनिस्ट पक्षा व्यतिरिक्त कोणताही दुसरा राजकीय पक्ष नव्हता. अन्य कोणत्याही संघटना नव्हत्या. पक्षाचा प्रमुख स्टॅलिन, सैन्य पोलीस प्रचार यंत्रणा व पक्षाचे सदस्यत्व हे सर्व त्यांच्या हाती केंद्रित झाले होते. सोव्हिएत रशियातील सर्वेसर्वा म्हणजे स्टॅलिन, 'स्टॅलिन म्हणजे शासन आणि तो ठरवील तेच अंतिम.' असे तत्कालीन सोव्हिएत रशियातील शासन प्रणालीचे स्वरूप होते.

पाश्चिमात्य राष्ट्रांचे विचार सोव्हिएत सरकारबाबत सुरुवातीपासूनच अविश्वास, द्वेष, धास्ती अशा. प्रकारचे होते. सोव्हिएत सरकारमुळे भांडवलशाही राष्ट्रांना धोका निर्माण झाला आहे, अशी खात्री पाश्चिमात्य राष्ट्रांची होती. तर सोव्हिएत रशियाला यादवी युध्दाच्या काळातील परकीय हस्तक्षेप व या हस्तक्षेपामुळे सोव्हिएत रशियाला सोसावी लागलेली अपार हानी व हाल–अपेष्टा यामुळे रशियन नेत्यांच्या मनात पाश्चिमात्य राष्ट्रांत बद्दल अविश्वास रुजला होता. या द्वेषाचा व अविश्वासाचा परिणाम राजकीय परिस्थितीवर झाला यातूनच रशियन सरकारने आपले पुढील निर्णय फार कठोरपणे अमलात आणले.

### १. सोव्हिएत संघराज्याची घोषणा (RSFSR- Russian Socialist Federated Soviet Republic)

१० जुलै १९१८ रोजीची राज्यघटना यादवी युध्दाच्या धुमश्चक्रीत घाईघाईने मान्य करण्यात आली होती. सन १९१८ च्या घटनेनुसार 'रशियन सोशालिस्ट फेडरेटेड सोव्हिएत रिपब्लिक' (RSFSR) प्रस्थापित झाले. यात युक्रेन व बायलोरशिया (जुलै १९१८ पर्यंत) त्यानंतर घडून आलेल्या करारांनी निर्धारित झाले होते; तर एस्टोनिया, लाटविया व लिथुआनिया ही स्वतंत्र राष्ट्र ती घटना मान्य झाल्यानंतर उदयास आली होती. त्यामुळे यादवी युध्दाच्या समाप्तीनंतर उरलेल्या गणराज्याचे संघ स्वरूप व राज्यघटना निर्माण होणे आवश्यक होते.

### २. युनियन ऑफ सोशलिस्ट सोव्हिएत रिपब्लिक (USSR) ची निर्मिती

सोव्हिएत रशियातील सर्वच गणराज्य ६ जुलै १९२३ रोजी एकत्रित करून 'युनियन ऑफ सोशलिस्ट

रिपब्लिक' (USSR) ची नविन घटना तयार करण्यात आली. या विस्तृत संघराज्यात १७ स्वायत्त गणराज्य आणि अल्पसंख्यांक राष्ट्रिक गटांचा अंतर्भाव होता. या संघराज्यात– युक्रेन, व्हाईट रशिया, ट्रान्सकॉकेशिया, जॉर्जिया, अर्मिनिया व अझरबैजान इ. गणराज्याचा समावेश होता.

या संघात एक वर्षानंतर मध्य आशियातील उजबेकिस्तान, तुर्कमेनिया, तजाकिस्थान, कझाकिस्थान व किर्गिझिया ही राष्ट्रे समाविष्ट झाली. परंतु ट्रान्स कॉकेशिया मधील जॉर्जिया, अर्मेनिया, अझरबैजान ही गणराज्य वेगळी करण्यात आली. ही सर्व ११ गणराज मिळून 'युनियन ऑफ सोशलिस्ट सोव्हिएत रिपब्लिक'ची स्थापना झाली.

## ३. संसद

'ऑल युनियन काँग्रेस ऑफ सोव्हिएत' ही सोव्हिएत संघाची सर्वोच्य सार्वभौम संस्था होती. या संस्थेची सदस्य संख्या सुमारे २००० इतकी होती. हे सर्व सदस्य आपल्यातून 'ऑल युनियन एक्झिक्युटिव्ह कमिटी' करिता प्रतिनिधी निवडत असत. 'युनियन सोव्हिएत' व 'सोव्हिएत ऑफ नेशनालिटी' अशी त्या संस्थेची दोन सभागृहे होती.

### सदस्य संख्या

'युनियन सोव्हिएत' या सभागृहात निराळ्या घटक राज्याचे, त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात निवडण्यात आलेले एकूण ४५० सदस्य असत. 'सोव्हिएत ऑफ नॅशनॅलिटीज' मध्ये प्रत्येक स्वायत्त सोव्हिएत गणराज्याचे व प्रत्येक सहवर्ती गणराज्याचे पाच प्रतिनिधी, स्वायत्त प्रदेशांचा प्रत्येकी एक प्रतिनिधी असे एकूण १३६ सदस्य असत.

### प्रतिनिधित्व

कामगार वर्गाची हुकूमशाही या तत्वावर मतदानाचा हक्क प्रदान करण्यात आला होता. एकूण लोकसंख्येच्या १५ टक्के लोकसंख्या असलेल्या कामगार वर्गाला पंचवीस हजार लोकसंख्येमागे एक प्रतिनिधी तर एकूण मतदारांच्या संख्येच्या ७० टक्के लोकसंख्या असलेल्या शेतकरी वर्गाला मात्र १२५००० लोकसंख्येला एक प्रतिनिधी देण्यात आला होता.

### मतदान

झारकालीन अधिकारी वर्गाला व मध्यमवर्गीयांना मतदानाचा हक्क देण्यात आलेला नव्हता. मतदान गुप्त मतदान पध्दतीने नव्हते तर हात उंचावून केले जात होते. यामुळे विरोध करणे कठीण होते.

### सभा

'ऑल युनियन एक्झिक्युटिव्ह कमिटीच्या' सभा वर्षातून तीन वेळा होत. मध्यंतरीच्या काळात महत्त्वाची व खात्रीचे कायदे करणे आवश्यक वाटल्यास खास सभा बोलविण्याचा अधिकार 'प्रेसिडीयम'ला असे. कोणत्याही विधेयकाला कायद्याचे स्वरूप दोन्ही सभागृहाच्या मंजुरीनंतर येत असे.

## प्रेसिडियम (अध्यक्ष मंडळ)

'प्रेसिडियम'यात दोन्ही सभागृहातून निवडलेल्या २७ सदस्यांचा समावेश असे. एक्झिक्युटिव्ह कमिटीचे अधिवेशन चालू असताना सर्वोच्च अधिकार प्रेसिडीयमकडे असत. केंद्रीय मंत्रिमंडळात (युनियन सोवोणोकोर्मो) १० मंत्री असत. पूर्वीच्या चेकाची पुनर्रचना करण्यात येऊन त्याचे युनायटेड डिपार्टमेंट ऑफ पॉलिटिकल अँड ऍडमिनिस्ट्रेशन असे नामकरण करण्यात आले. या डिपार्टमेंटच्या कामकाजावर 'ॲटर्नी जनरल'चे नियंत्रण असे.

## ४. साम्यवादी पक्षामुळे सोव्हिएत रशियाच्या राजकीय जीवनातील बदल

रशियातील सोव्हिएत पक्ष हा सर्व शासकीय व राजकीय यंत्रणेचा केंद्रबिंदू होता.सोव्हिएत रशियात कायदेशीरपणे मान्यताप्राप्त साम्यवादी पक्ष असा एकच पक्ष होता. सोव्हिएत सरकारच्या धोरणाला दिशा देण्याचे व मार्गदर्शन करण्याचे काम साम्यवादी पक्ष करत असे. पक्ष निर्णयांना कायद्याचे स्वरुप सरकारद्वारा दिले जात होते. पक्षाशी निगडित तरुणांची महत्त्वपूर्ण संघटना म्हणजे 'कॉमसोमोल' होय. साम्यवादी तत्वप्रणालीला व पक्षाला एकनिष्ठ असणारे शिस्तबध्द कार्यकर्ते तयार करण्याची जबाबदारी या संघटनेकडे होती. ते सदस्य पक्षाला व पक्ष तत्वज्ञानाला सर्वस्वी वाहून घेतलेले क्रियाशील, प्रामाणिक, सृजनशील व उत्साही कार्यकर्ते असावेत अशी अपेक्षा केली जात.

दहा ते सोळा वर्षे वयोगटातील मुलांच्या संघटनांना 'पायोनियर' म्हटले जात. या पायोनियर संघटनेतील १६ ते २३ वयोगटातील तरुण कार्यकर्त्यांना 'कम्युनिस्ट युथ' या संघटनेत प्रवेश मिळत. साम्यवादी तत्त्वज्ञानाची शिकवणूक मिळालेल्या अनेक सदस्यांपैकी फारच थोड्या तरुणांना 'कम्युनिस्ट युथ' यात सदस्य म्हणून प्रवेश मिळत असे. पक्षात निष्क्रीय, अप्रामाणिक किंवा पक्ष मताच्याविरुध्द जाणाऱ्या सदस्यांचा भरणा होऊ नये, अशांच्या वागणुकीमुळे पक्षाची शिस्त, ऐक्य व प्रतिष्ठा यावर अनिष्ट परिणाम होऊ नये, यासाठी आवश्यकतेनुसार पक्षशुध्दी करण्यात येत असे. अशी पक्षशुध्दी प्रथम १९२१ मध्ये केली गेली. त्यात सात लाख पक्ष सदस्यांपैकी एक लाख ऐंशी हजार सदस्यांची पक्षातून हकालपट्टी करण्यात आली होती.

'ऑल युनियन काँग्रेस ऑफ द कम्युनिस्ट पार्टी' ही साम्यवादी पक्षाच्या श्रेणीबध्द संघटनेची सर्वोच्च संघटक संस्था होय. यात ७० सदस्यांच्या केंद्रीय समिती सदस्यांची निवड करीत होती. पक्षकार्य चालविण्याकरिता केंद्रीय समिती तीन घटक संस्थांच्या सदस्यांची निवड करते. एक घटक संस्था म्हणजे 'सचिवालय', त्याचा प्रमुख हा पक्षाचा सरचिटणीस असे. त्याचे काम सदस्यांना मार्गदर्शन करणे, पदाधिकाऱ्यांची नियुक्ती, बडतर्फी, बदली इत्यादी अधिकार सरचिटणीसास असत. दुसरी संघटना म्हणजे 'पॉलिटब्युरो'. संघ राज्याच्या निती निर्धारणाचे व सर्व महत्त्वाच्या बाबी संबंधित निर्णय घेण्याचे अधिकार यास होते. त्यामुळे 'पॉलीट ब्यूरो' संस्था राष्ट्रातील सर्वाधिक शक्तीशाली संस्था होती. पॉलिटब्युरोच्या सदस्यांची निवड अत्यंत काळजीपूर्वक व चोखंदळपणे केली जात असे. त्या संस्थेचे सदस्य असणे हा मोठा

बहुमान समजला जात होता. तिसरी घटक संस्था म्हणजे 'ऑर्गनायझेशन ब्युरो' या घटक संस्थेत एकूण दहा सदस्य राहत होते. अनेकदा काही पक्ष नेते त्या तीनही घटक संस्थांचे सदस्य असत. परंतु पक्ष संघटना, पक्षाची शिस्त, नीती, कार्यपध्दती या सर्व दृष्टींनी सरचिटणीसाचे पद अत्यंत प्रभावी मानल्या जात.

## ५. १९३४–१९३७ या काळातील पक्षशुध्दी करण्याची मोहीम

सोव्हिएत रशियातील सन १९३४–१९३७ या काळातील सोव्हिएत सरकारने केलेली पक्षशुध्दी ही त्या दशकातील महत्त्वपूर्ण घटनांपैकी एक महत्त्वाची मानली जाते. या पक्षशुध्दी मोहिमेची कारणे तत्कालीन आंतरराष्ट्रीय परिस्थिती व त्यामुळे सोव्हिएत रशियाला भेडसावणारे संकटे या सर्व गोष्टींचा संबंध पक्षशुध्दी घटनेशी होता.

### 'पक्षशुध्दी'ची पार्श्वभूमी

सामुदायिक शेती, त्यानंतरचा दुष्काळ आणि अशात लाखो लोकांचा गेलेला बळी यामुळे कम्युनिस्ट पक्षात निरनिराळ्या प्रतिक्रिया निर्माण झाल्या. त्यापैकी स्टॅलिन, मालोटॉंव इत्यादीना रशियात लष्करी शिस्त आणण्याची घाई होती. ठिक–ठिकाणी शत्रू असून त्यांना परकीयांची मदत होत असल्याचा प्रचार त्यांनी चालविला होता. अशा शत्रूंना देशातून हद्दपार करण्यासाठी अत्यंत निर्घृण उपाय केले पाहिजेत ही त्यांची भूमिका होती. यासाठी स्टॅलिनला त्याच्या पदावरून पदच्युत करण्याची हाक रिउतीन याने दिली. यामुळेच स्टॅलिनने आपला सहकारी कीरावच्या मदतीने रिउतीन याला पक्षातून बाहेर काढले. यावरून पक्षात शुध्दीकरणाची आवश्यकता असल्याचे केंद्रीय समितीने मान्य केले. सन १९३३–१९३४ या दोन वर्षात ११ लक्ष ४० हजार सदस्य पक्षातून बाहेर काढण्यात आले.

सन १९२१ मध्ये लेनिनच्या हयातीतच नव्या आर्थिक नीतीच्या (NEP) प्रश्नावरून उद्भवलेल्या मतभेदामुळे साम्यवादी पक्षाच्या ऐक्याला तडा जाणार की काय? अशीच परिस्थिती निर्माण झाली होती. ही परिस्थिती हाताळण्यासाठी साम्यवादी पक्षाने फुटीर किंवा विरोधी गट व पक्षाच्या निर्णयाविरुध्द प्रचार करणाऱ्यांना बेकायदेशीर ठरवले. पक्षात राहून ट्रॉटास्की, कोमोनेव, झिनोविव यांच्या कारवाया या पक्षाचा विरोधी आहे असे पक्षाच्या निदर्शनात आल्याने पुढील विरोधांना सामोरे जाण्यासाठीही पक्षशुध्दी करण्यात आली होती.

सन १९२८ नंतर केवळ अमूर्त सिध्दांता ऐवजी शासनाच्या व्यवहारिक बाजू वर भर दिला गेला पाहिजे असा एक नवा गट साम्यवादी पक्षातच उदयास आला होता. या गटाचा प्रमुख स्टॅलिनचा मित्र व पॉलिटब्युरोचे सदस्य एस. किरोव होता. सोव्हिएत घटनेत दिसणारा वर्ग भेद नाहीसा करून सोव्हिएतची राज्यघटना अधिक लोकशाही स्वरूपाची करावी असे त्याचे मत होते.

लोकशाही स्वरूपाच्या या नव्या विचार प्रवाहाला सोव्हिएत रशियाच्या राजकीय वर्तुळातील दोन गटाचा विरोध होता. त्यातील एक गट म्हणजे ट्रॉटास्की व त्याचे अनुयायी असलेला डाव्यांचा होय. या

गटाच्या मते किरोवने प्रतिपादित केलेल्या सुधारणा म्हणजे कामगार हुकूमशाही आदर्शाचा पराभव आहे. दुसरा गट रिकोवच्या नेतृत्वाखालील उजव्यांचा होता. त्यांचा आरोप म्हणजे सोव्हिएत राष्ट्रजीवनात सामान्य परिस्थिती पुन्हा प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने किरोवाच्या लोकशाही सुधारणा अगदी तोकड्या स्वरूपाच्या आहे असे त्यांचे मत होते.

सन १९३४ पर्यंत वरील दोन्ही गटांचा सरकारी नीतीला असलेला विरोध प्रत्यक्ष कृतीत उतरायला सुरुवात झालेली होती. कारण अनेक कारखान्यात यंत्रसामुग्रीची मोडतोड व अनेक घातकी कृत्य व उत्पादनाला खीळ घालून सरकारी योजना हाणून पाडण्याचे प्रयत्न सुरू झाले होते. याचा संबंध परकीय हेरगिरीशी जोडला जात असला तरी या पाठीमागे देशातीलच विरोधकांचा हात असावा असा दाट संशय स्टॅलिनला होता.

यासाठी विरोधकांनी कट रचला होता. यानुसार,

१) स्टॅलिनची राजवट उलथून पाडणे,

२) पहिल्या पंचवार्षिक योजनांच्या अंतर्गत औद्योगीकरण व 'कलखोज' पध्दती हाणून पाडणे,

३) ग्रामीण क्षेत्रात शेतकऱ्यांना खाजगी मालमत्तेचा अधिकार देणे,

४) औद्योगीकरण व व्यापारी क्षेत्रात काही प्रमाणात भांडवलशाही प्रस्थापित करणे,

५) स्टॅलिनच्या पाडावानंतर नवीन सरकारला जर्मनी व जपान या राष्ट्रांनी पाठिंबा द्यावा,

६) या मोबदल्यात सोव्हिएत रशियातील नवीन सरकार युक्रेनचा ताबा जर्मनी व पूर्वेकडील समुद्र किनारपट्टी व साखलीन बेटांचा ताबा जपानकडे देईल.

या षड्यंत्राची सुरुवात सन १९३४ मध्ये 'कम्युनिस्ट युथ' संघटनेचा सदस्य असलेला लीनोविद निकोत्सेव याने १ डिसेंबर १९३४ रोजी किरोवची हत्या केली. यापूर्वीही अनेक साम्यवादी नेत्यांचा मृत्यू संशयास्पद स्थितीत घडून आला होता. किरोवच्या हत्येशी अन्य कोणाचाही संबंध नाही असे ज्यूरी समोर लिनोविद याने सांगितले असले तरी वरील सर्व हत्यांमागे विरोधकांचा योजनाबध्द कट असल्याचे चौकशी अंती स्पष्ट झाले. स्टॅलिन नीती विरुध्द साम्यवादी पक्षातील डावे व उजवे गट एकत्र आले. जर्मनी व जपान यांच्याशी हातमिळवणी केली होती असे आरोपींच्या जबाबातून स्पष्ट झाले होते.

या आरोपांची चौकशी सुमारे दोन वर्षे चालली. ऑगस्ट १९३६ मध्ये झिनोविव, कोमेनेव व कटाचे आणखी ११ नेते यांचे खटले सुप्रीम कोर्टाच्या लष्करी कोर्टापुढे ठेवण्यात आले. या विरोधकांनी किरोव शिवाय स्टॅलिनच्या हत्येचाही कट रचला होता हे उघड झाले होते.

जगातील सर्व वृत्तपत्रात या खटल्याच्या चौकशीचे वृत्त तपशिलासह प्रकाशित करण्यात आले. या षडयंत्रात सर्व आरोपी दोषी असल्याचा निर्णय न्यायाधीशांनी दिला. झिनोविव, कोमेनेवसह अनेकांना

देशद्रोहाच्या आरोपाखाली मृत्युदंडाच्या शिक्षा ठोठावण्यात आल्या, याचबरोबर परकीय सत्तांशी हातमिळवणी करून लष्करी व महत्वाच्या गुप्त बातम्या परकीयांना पुरविण्याच्या आरोपावरून मार्शल तुखाचवस्की व लाल लष्करातील सात अधिकाऱ्यांना कठोर शिक्षा दिल्या गेल्या.

या पक्षशुध्दी मध्ये १०३ जनरल व ८१ अॅडमिरल यांना मृत्यूदंड देण्यात आला. साम्यवादाला विरोध करणाऱ्या ३० लाख लोकांना सैबेरियातील गुलाग प्रांतात पाठवण्यात आले. त्यातील साडेसात लाख लोकांना मारण्यात आले. पक्षाच्या उच्च अधिकारीय मध्यवर्ती समितीत सन १९३४ मध्ये सभासदांची संख्या ७१ होती. सन १९३९ मध्ये ती २६ राहिली. त्यापैकी पक्षाविरुध्द कारवाया केल्याच्या आरोपांखाली नऊ सदस्यांना उघड फासी व बारा सदस्यांना पक्षातून बाहेर काढण्यात आले, तर २४ सदस्य कुठेतरी हरवले म्हणून सांगण्यात आले. हजारो लोकांची झालेली धरपकड, हद्दपारी आणि शिक्षा यावर अमेरिकेत टीकेची झोड उठली होती. विरोधकांची न्यायालयीन चौकशी हा स्टॅलिनला होत असलेला विरोध चिरडून टाकण्यासाठी त्यांने उभे केलेले एक ढोंग आहे, असे भाष्य अनेक परदेशी वृत्तपत्रांनी, अमेरिकेतील समाजवाद्यांनी, ट्रॉटस्की व त्यांच्या अनुयायींनी केले. या दडपशाहीचा विरोध केला. विरोधकांपैकी कुणी प्रमुख व्यक्ती पकडली गेली की त्या व्यक्तीचे आप्तस्वकीय, मित्र व त्याचे सहकारी या सर्वांवर सरकारी दडपशाही चालत असे.

अशाप्रकारे सोव्हिएत रशियातील अनेक राजकीय घराणी नाहीशी केली गेली. हजारो लोकांना केवळ संशयावरून पकडले गेले. त्यांना हद्दपारीच्या कारावासाची शिक्षा सुनावण्यात आल्या. या काळात अनेक निरपराध लोकांचा बळी गेला. विरोधकांचे निर्दालन करून सर्व सत्ता निर्वेधपणे स्वतःच्या हाती केंद्रित करून घेण्याची स्टॅलिनची क्रूर महत्वकांक्षा याला कारणीभूत ठरली.

**पक्षशुध्दी काळातील महत्वपूर्ण घटना आणि स्टॅलिनची दडपशाही :-**

१. सन १९३३ व ३४ या दोन वर्षात ११ लक्ष ४०,००० सदस्यांना पक्षाच्या बाहेर काढण्यात आले, त्यातील अनेकांना कारावासात टाकण्यात आले.

२. एक जुना बोल्शेव्हिक नेता स्मिर्नोव्ह यानेही सन १९३३ च्या जानेवारी महिन्यात स्टॅलिनला अधिकार पदावरून दूर करण्यासाठी काही पुढाऱ्यांशी व कार्यकर्त्यांची संबंध प्रस्थापित केला होता. हे उघड झाल्याने स्मिर्नोव्हला फाशी द्यावी अशी मागणी स्टॅलिनने केली.

३. केंद्रीय समितीत मतदानाचा अधिकार असलेले १३९ सभासद निवडले गेले. त्यातील पुढील पाच वर्षांच्या आत त्यातील ९० जण हत्या करण्यात आली. त्यानंतरच्या काळात बाकीच्या सभासदांपैकी आणखी १८ जणांचा शेवट असाच झाला पॉलिटब्युरोच्या सभासदांपैकी ५० टक्के सभासदांची चार वर्षात हत्या करण्यात आली.

४. स्टॅलिनने किरोवच्या खुनाचे धागेदोरे उकलून काढण्याच्या निमित्ताने अटकसत्र सुरू केले. देशभर अनेक लोकांना अटक करून तुरुंगात घालण्यात आले. आणि लगेच ठार मारण्यात आले. स्टॅलिनग्राड मधील लष्करी विद्यालयातील ३७ जणांना फाशी देण्यात आली. मॉस्कोत हा आकडा ३३ होता. किएव मेये या कट्टर स्टॅलिनवादी न्यायाधीशास उलरीख येथे पाठविण्यात आले. त्याने युक्रेनमधील २८ जणांना गोळ्या घालण्याच्या शिक्षा दिल्या. यातील अनेक जण लेखक होते. यांच्यावर सोव्हिएत सरकार विरुध्द परदेशात जाऊन कट केल्याचा आरोप होता.

५. किरोवच्या खुनानंतर केंद्रीय समितीतर्फे एक परिपत्रक पक्षाच्या सर्व शाखांना पाठवण्यात आले. त्यात पक्षात सरकार विरोधी लोक असून त्यांना हाकलून लावण्याचा आणि त्यांच्या निषेध करणाऱ्या सभा घेण्याचा आदेश या परिपत्रकात देण्यात आला होता.

६. शुध्दीकरणाच्या सत्रातून लष्करही सुटू शकले नाही. सन १९३५ मध्ये पाच जणांना मार्शल करण्यात आले पण तीन वर्षाच्या आत त्यातील तीन अधिकाऱ्यांना जनतेचे शत्रू म्हणून ठार करण्यात आले. पहिल्या व दुसऱ्या वर्गाच्या सोळा सेनापती पैकी १५ जण बळी पडले. सेना विभागाच्या एकूण ७० प्रमुख अधिकाऱ्यांपैकी ६०, १९९ डिव्हिजनल कमांडर पैकी १३६, ३९७ ब्रिगेडियर पैकी २३१, नौदलाच्या बोटीचे ४ प्रमुख, ६ नौदल प्रमुख, १५ उपप्रमुखपैकी ९, २५ कोअर कमिसार, ९७ डिव्हिजनल कमिसार, ३६ ब्रिगेडियर कमीसार यांना मारण्यात आले. अनेकांना तुरुंगात डांबण्यात आले.

## ६. सन १९३६ ची स्टॅलिनची राज्यघटना

स्टॅलिनची राज्यघटना किरोव याने प्रतिपादित केलेल्या सुधारणांवर आधारित होती. शासकीय व राजकीय यंत्रणेवर अप्रत्यक्षपणे नियंत्रण असावे या दृष्टीने ६ फेब्रुवारी १९३६ रोजी सोव्हिएत रशियाचा पंतप्रधान मोलोटोव याने सोव्हिएत रशियासाठी नवीन राज्यघटनेचा मसुदा तयार होत असल्याबद्दलची घोषणा केली. यासाठी घटना दुरुस्तीचे स्वरूप निश्चित करण्याकरिता स्टॅलिनच्या अध्यक्षतेखाली एक घटना समितीची नियुक्ती केंद्रीय कार्यकारी मंडळाने केली. घटनेत आवश्यकतेनुसार बदल करण्याची अनुमती 'ऑल रशियन ऑफ सोव्हिएत' यांच्याकडे फेब्रुवारी १९३६ रोजी दिली. सन २५ नोव्हेंबर १९३६ रोजी ही घटना संमत करण्यात आली.

घटनेचा मसुदा कसा असावा यावर चर्चा व सूचना करण्याकरिता पक्ष सदस्य, कारखान्यातील कामगार व सामूहिक शेतीचे सदस्य यांच्यापुढे घटनेचा मसुदा ठेवण्यात आला. त्यांच्याकडून आलेल्या सूचना विचारात घेतल्यानंतर या मसुद्यात आवश्यक तो बदल करून डिसेंबर १९३६ मध्ये राज्यघटनेचा मसुदा अधिकृतपणे मान्य करण्यात आला. सोव्हिएत रशियाच्या घटनात्मक कायद्यात खालील महत्वाचे बदल घडवून आणण्यात आले ते असे -

## १) समान हक्क व समान प्रतिनिधित्व

साम्यवादी सरकारने सोव्हिएत रशियात कामगारांची लोकशाही स्थापित व्हावी म्हणून १९१८ व १९२४ च्या राज्यघटनांमध्ये सोव्हिएत रशियातील पूर्वीचे राज्यसत्तावादी, सामंत, चर्चशी संबंधीत लोकं, भांडवलदार व मध्यमवर्गीयांना मतदानाचा हक्क नाकारला होता. शेतकऱ्यांच्या तुलनेत अल्पसंख्यांक असलेल्या कामगार वर्गाला मात्र सर्वाधिक प्रतिनिधित्व दिले गेले होते. परंतु पहिल्या पंचवार्षिक योजना काळात घडून आलेल्या कृषी सामाजीकीकरणांमुळे 'कुलाक'व मध्यमवर्गीयांचे समाजातून उच्चाटन झाले. यातून सोव्हिएत रशियात नवा वर्ग विरहित समाज निर्माण झाल्याची सोव्हिएत नेत्यांची खात्री पटली होती. त्यामुळेच पूर्वीच्या घटना कायद्यात वर्गभेदावर आधारित असलेली मतदानाच्या पात्रतेची तरतूद रद्द करून राष्ट्रातील संपूर्ण जनतेला समान हक्क व समान प्रतिनिधित्व देण्यास राज्यघटनेने मान्यता दिली.

## २) सर्वोच्च कायदेमंडळाची निर्मिती

सन १९३६ च्या स्टॅलिनच्या घटनेनुसार पूर्वीचे 'ऑल युनियन काँग्रेस ऑफ सोव्हिएत' रद्द केले व नागरिकांनी निवडून दिलेल्या प्रतिनिधींचे 'सुप्रीम सोव्हिएत'- सर्वोच्च कायदेमंडळाची निर्मिती करण्यात आली. या कायदेमंडळाची 'सोव्हिएत ऑफ द युनियन' व दुसरे 'सोव्हिएत ऑफ नॅशनॅलिटी' अशी दोन सभागृह होती.

## ३) प्रतिनिधित्व

सन १९२४ च्या राज्यघटनेत जी लोकसंख्येमागील प्रतिनिधीत्व होते, ते रद्द करून सन १९३६ च्या घटनेत दर तीन लक्ष नागरिकांमागे एक प्रतिनिधी असे ग्रामीण व शहरी विभागांना सारखेच प्रतिनिधित्व देण्यात आले. निवडणूक गुप्त मतदान पध्दतीने करण्याची तरतूद करण्यात आली. वय १८ वर्षे पूर्ण करणाऱ्या स्त्री-पुरुषाला मतदान करण्याचा अधिकार देण्यात आला.

## ४) सुप्रीम ऑफ सोव्हिएत

सुप्रीम सोव्हिएतचे प्रतिनिधी चार वर्षाकरीता निवडले जात.सुप्रीम सोव्हिएतच्या सभा वर्षातून दोन वेळा आयोजित केल्या जात. विशेष कारणाकरीता सुप्रीम सोव्हिएतचे विशेष अधिवेशन बोलविण्याचा अधिकार प्रेसिडियमला असे, कोणत्याही विधेयाकाला कायद्याचे स्वरूप देण्याकरिता सुप्रीम सोव्हिएतच्या दोन्ही सभागृहाच्या बहुसंख्येची मंजुरी आवश्यक असे. सुप्रीम सोव्हिएतचे अधिवेशन सुरू असताना सर्व सत्ता प्रेसिडियमच्या हाती राहत. सुप्रीम सोव्हिएतच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांच्या संयुक्त बैठकीत प्रेसिडियम व मंत्रिमंडळाची निवड करत. प्रेसिडियम हे सोव्हिएत संघाचे सामुहिकपणे अध्यक्ष राहत असे म्हणता येईल. ते सुप्रीम सोव्हिएतला जबाबदार असे. कायदे करण्याचे अधिकार सर्वोच्य कार्यकारी व शासकीय अधिकारी 'कौन्सिल ऑफ मिनिस्टर' यांच्या हाती होते. घटना दुरुस्ती करिता सुप्रीम सोव्हिएतच्या दोन तृतीयांश बहुमताची मंजुरी आवश्यक असे.

## ५) सोव्हिएत ऑफ नॅशनॅलिटी

देशातील निरनिराळ्या प्रदेशातील नागरीक या सभागृहाच्या सदस्यांची निवड करीत या सभागृहातील प्रतिनिधीत्वाचे प्रमाण, प्रत्येक संघराज्याचे २५ सभासद, स्वायत्त गणराज्याचे ११ सभासद, स्वायत्त प्रदेशाचे ५ सभासद व राष्ट्रीक क्षेत्राचा १ असे होते. २३ वर्षावरील कोणत्याही व्यक्तीला उमेदवार म्हणून निवडणुकीला उभे राहण्याचा अधिकार होता.

## ६) स्टॅलिनच्या राज्यघटनेची वैशिष्ट्ये

१) सोव्हिएत रशियातील सर्व नागरिकांना समानतेचा अधिकार दिला गेला.

२) निवडणूक लढविण्याचा अधिकार नागरिकांना बहाल करण्यात आला. (राजकीय हक्क बहाल)

३) मुद्रण, संभाषण स्वातंत्र्याची हमी देण्यात आली.

४) प्रत्येक व्यक्तीला मालकी हक्काचा अधिकार देण्यात आला.

५) स्वतःच्या श्रमावर उत्पन्न प्राप्त करण्याची घटनेनुसार परवानगी देण्यात आली.

६) शिक्षणाची समान संधी, पात्रतेनुसार नोकरीचा हक्क देण्यात आला.

७) कामाच्या दर्जानुसार वेतन देण्याचे मान्य करण्यात आले.

## ❑ स्टॅलिनच्या राज्यघटनेचे दोष

१) पाश्चात्त्य लोकशाहीच्या कल्पनांच्या चौकटीत बसणारी लोकशाही नव्हती.

२) निवडणूक लढण्याचा अधिकार सर्व नागरिकांना असला तरी साम्यवादी पक्ष हा एकमेव पक्ष रशियात अस्तित्वात होता.

## ७. राज्यघटनेतील महत्त्वपूर्ण बदल

१. 'ऑल रशियन कॉंग्रेस ऑफ सोव्हिएत' या संस्थेचे विसर्जन करून त्याऐवजी सोव्हिएत रशियाचे सर्वोच्च कायदेमंडळ म्हणून 'सुप्रीम सोव्हिएतची' निर्मिती करण्यात आली.

२. कौन्सिल ऑफ युनियन व कौन्सिल ऑफ नॅशनल असे द्विग्रही कायदेमंडळ तयार करण्यात आले.

३. विधेयकाला कायद्याचे स्वरूप देण्याकरिता दोन्ही सभागृहाची संमती आवश्यक असे. यात प्रत्येक युनियन गणराज्याचे २५, स्वायत्त गणराज्याचे ११, स्वायत्त प्रांताचे ५, प्रादेशिक क्षेत्राचा एक असे प्रतिनिधी कौन्सिल ऑफ नॅशनलिटीमध्ये असत. राष्ट्रीय अल्पसंख्यांक गटाचा हितसंबंधाचे संरक्षण व्हावे हा या पध्दतीचा मूळ हेतू होता.

४. कौन्सिल ऑफ युनियनच्या प्रतिनिधित्वाच्या प्रमाणात व मतदानाच्या पध्दतीत महत्वाचे बदल करण्यात आले.

५. १८ वर्षे वयावरील सर्व स्त्री-पुरुषांना मतदानाचा अधिकार देण्यात आला. पूर्वीच्या घटनेनुसार ज्यांचा मतदानाचा अधिकार नाकारण्यात आला होता. त्यांनाही मतदानाचा अधिकार बहाल करण्यात आला.

६. उमेदवार म्हणून निवडणूक लढण्याचा अधिकार देण्यात आले.

७. धर्म, पंथ किंवा आर्थिक दर्जा या कारणाकरीता कोणताही भेदभाव न ठेवता घटनेनुसार सर्वांना समान अधिकाराची हमी देण्यात आली.

८. नागरिकांचे आर्थिक व राजकीय हक्क आणि कर्तव्य नमूद करण्यात आले.

९. मुद्रण, भाषण व सभा स्वातंत्र्य एवढेच नव्हे तर घटक राज्याच्या संघराज्यातून फुटून निघण्याचा अधिकार तत्वतः मान्य करण्यात आला.

१०. मात्र हे स्वातंत्र्य पाश्चिमात्त्य लोकशाही राष्ट्राप्रमाणे अनिर्बंध नव्हते. या अधिकाराची अंमलबजावणी करीत असताना सरकारी रोषाचा विचार बाजूला ठेवणे नागरिकांना शक्य होत नसे.

११. समाजवादी तत्वज्ञानानुसार उत्पादनाच्या सर्व साधनांवर राष्ट्रांची मालकी घोषित करण्यात आली. या घटनेने खाजगी उद्योगधंदे व खाजगी शेती याबाबत काही सवलती देण्यात आलेल्या.

१२. शेतकऱ्यांना स्वकष्टाने जमीन कसण्याचा अधिकार देण्यात आला असला तरी या स्थितीपर्यंत शेतकऱ्यांना सामुहिक शेतीचे फायदे पटले असल्याने व त्याकरिता आवश्यक ती मनोवृत्ती तयार झालेली असल्याने या सवलतीचा अनिष्ट परिणाम होणार नाही याची सोव्हिएत सरकारला खात्री होती.

१३. नागरिकांचे राहते घर व त्यातील साहित्य अशा खाजगी मालमत्तेच्या सुरक्षिततेची व तत्संबंधी वारसा हक्काची हमी देण्यात आली.

१४. घटक राज्यांना समतेचे व स्वायत्ततेचे आश्वासन दिले गेले. मात्र परराष्ट्रसंबंध, संरक्षण, चलन व्यवस्था, दळण-वळण, आंतरराष्ट्रीय व्यापार, नियोजन इत्यादी अनेक महत्त्वाची खाती व तत्संबंधीचे सर्व अधिकार केंद्र सरकारकडे होते.

## ❊ स्वयं-अध्ययन प्रश्न भाग - १

१. रशियातील बोल्शेविक राजवट उलथवून टाकण्यामागे ............. आघाडीवर होते.

*अ) चर्च* *ब) मेन्शविक* *क) कुलाक* *ड) सवखोज.*

२. रशियात प्रादेशिक भाषांबरोबर ............. या भाषेची सक्ती करण्यात आली.

*अ) फ्रेंच ब) जर्मन क) इंग्रजी ड) रशियन.*

३. यादवी युध्दाच्या काळात ............. या नृत्य प्रकारातील कलाकारांना वगळून सर्वांना लष्कर भरती सक्तीची होती.

*अ) पोलो नृत्य ब) बँले नृत्य क) डिस्को नृत्य ड) रशियन नृत्य.*

४. 'USSR' ची नवी राज्यघटना ............. या वर्षी तयार करण्यात आली .

*अ) ५ जून १९४१ ब) ६ जून १९४१ क) ६ जुलै १९४१ ड) ७ जुलै १९४१.*

५. .................... या पक्षाला सोव्हिएत रशियातील शासकीय यंत्रेनेचा कणा मानल्या गेले.

*अ) बोल्शेविक पक्ष ब) मेंशाविक पक्ष क) प्रतीक्रांतीवादी ड) राष्ट्रीय पक्ष.*

## ४.२.२ पंचवार्षिक योजना

❑ **प्रस्तावना :-**

क्रांतीपूर्व रशिया हा युरोपातील सर्वात मागासलेला कृषिप्रधान देश होता. पहिल्या महायुध्दामुळे येथील औद्योगिक व कृषी व्यवस्थेवर ताण पडून अर्थव्यवस्था पूर्णपणे डबघाईस आली होती. निर्धन, अशिक्षित जनतेला उपासमारी व रोगराईने ग्रासले होते. युरोपीय राष्ट्रांत उपलब्ध असलेल्या सुखसोयींची मागमूसही विसाव्या शतकाच्या प्रारंभी रशियन जनतेच्या जीवनात आढळून येत नव्हता. अशा देशाचे रूपांतर उद्योगप्रधान, प्रगत व संपन्न राष्ट्रात अल्पावधीत करणे सोपे नव्हते. विशेषत: नवीन अर्थव्यवस्था कृषी क्षेत्रात स्थिर करणे अत्यंत चिकाटीचे व कष्टाचे कार्य होते. स्टॅलिनच्या एकतंत्री, कठोर व सर्वकष राजवटीत ते पूर्ण झाले. कमकुवत व अप्रगत रशियाचे उद्योगप्रधान व सामर्थ्यशाली अशा आधुनिक राष्ट्रात परिवर्तन झाले. आंतरराष्ट्रीय क्षेत्रात रशियाला पहिल्या दर्जाचे स्थान प्राप्त करून देण्यात बहुतांश श्रेय नियोजनबध्द पंचवार्षिक योजना व त्याच्या यशाला द्यावे लागेल.

❑ **रशियात नियोजित अर्थव्यवस्था लागू करण्याची कारणे :-**

रशिया या देशात नियोजित अर्थव्यवस्था लागू करण्याची कारणे खालीलप्रमाणे सांगता येईल.

१. नविन आर्थिक धोरणानुसार स्वीकारलेला मार्ग अनेक बोल्शेव्हिक नेत्यांना योग्य वाटत नव्हता. यातून रशियाची कोलमडलेली अर्थव्यवस्था सावरली होती. त्याबरोबर सोव्हिएत सरकारच्या अस्तित्वाला निर्माण झालेल्या धोका कमी झाला असला तरी ह्या व्यवस्थेमुळे देशातील उत्पादन विशिष्ट मर्यादेपलीकडे वाढण्याची शक्यता दिसत नव्हती. औद्योगिकीकरणामुळे शहरी लोकसंख्येत वाढ होणार, त्यामुळे अन्नधान्याचा पुरवठा करणे व निर्याती करिता जास्तीत जास्त उत्पादन वाढविणे आवश्यक होते. यासाठी कृषी उत्पादन झपाट्याने वाढविणे याशिवाय दुसरा पर्याय नव्हता.

२. नविन आर्थिक नीतीचा परिणाम म्हणून कृषी क्षेत्रात सदन शेतकऱ्यांचा व शहर विभागात छोट्या व्यापाऱ्यांचा उदय झाला. या गटांना रशियाच्या समाजजीवनात पाय रोवू दिले तर नंतर अशांचे उच्चाटन करणे कठीण होईल, कारण त्यातून सुदृढ समाजवादी अर्थव्यवस्थेची निर्मिती करता येणार नाही. यासाठीच नवीन आर्थिक नीती रद्द करून नियोजित अर्थव्यवस्थेला प्रारंभ करणे समाजवादी नेत्यांना आवश्यक वाटत होते.

३. भांडवलशाही राष्ट्रांना रशियाच्या समाजवादी राष्ट्राविरुध्द संधी सापडली तर ते एकत्र येऊन रशियावर लष्करी कारवाई करणारच हे उघड होते. यामुळे संरक्षणात्मक युध्दाकरिता अत्यल्प काळात रशियाला शस्त्रास्त्र संपन्न बनविणे, मोठ्या प्रमाणावर शस्त्रांची निर्मिती करणे, कृषी उत्पादनात स्वयंपूर्णता, राष्ट्रांचे झपाट्याने औद्योगीकरण घडवून आणणे आवश्यक होते.

ट्रॉटस्कीची आंतरराष्ट्रीय क्रांतीची कल्पना बाजूला ठेवून 'एका राष्ट्रात समाजवाद' या धोरणावर शिक्कामोर्तब करणाऱ्या १५ व्या पक्ष परिषदेने नियोजित अर्थव्यवस्थेला मान्यता दिली. व पहिल्या पंचवार्षिक योजनेचा कार्यक्रम स्वीकृत केला. योजना तयार करण्याचे कार्य राष्ट्रीय नियोजन मंडळाकडे (Gosplan) सोपवण्यात आले. अशा प्रकारचा प्रथम प्रयत्न सन १९२० मध्ये करण्यात आला होता. रशियात विद्युतीकरण करण्यासाठी लेनिनच्या आदेशानुसार योजना आखण्यात आली होती. परंतु १९२१ मध्ये रशियात संकटकालीन परिस्थितीमुळे ती योजना बारगळली.

क्रांतीपूर्व काळातील प्रसिध्द इंजिनियर ग्रीनेवत्सकी यांच्या १९१९ मध्ये प्रसिध्द झालेल्या 'रशियन उद्योगधंद्यांचे युध्दोत्तर भविष्य' या ग्रंथात मांडण्यात आलेल्या सूचना पहिल्या पंचवार्षिक योजनेला आधारभूत ठरल्या. ग्रीनेवत्सकीने खालील सुचना केल्या होत्या.

१. रशियातील नैसर्गिक साधन सामुग्री व कच्चामाल याच्या उपलब्धतेनुसार त्या क्षेत्रात कारखाने उभारण्यात यावे.

२. उरल व पश्चिम सैबेरिया या क्षेत्राच्या औद्योगिक विकासावर भर द्यावा.

याचा फायदा खालील प्रमाणे होणार होता -

१. दळणवळणावर होणारा अपव्यय वाचणार होता.

२. औद्योगिक क्षेत्रे परकीय आक्रमणापासून दूर व सुरक्षित राहणार होती.

## १. पहिली पंचवार्षिक योजना (१९२८ -१९३२)

सन १९२८ च्या सुरुवातीला राष्ट्रीय नियोजन मंडळाने (Gosplan) पहिली पंचवार्षिक योजना सादर केली. १ ऑक्टोबर १९२८ रोजी पहिल्या पंचवार्षिक योजनेला मूर्त स्वरूप देण्याच्या कार्याला प्रारंभ झाला. राष्ट्रीय नियोजन मंडळातील अर्थतज्ज्ञांनी ही योजना तयार केली होती. पहिल्या पंचवार्षिक योजनेची उद्दिष्टे खालीलप्रमाणे होती.-

## (I) उद्दिष्टे :-

१. भांडवलशाहीचे समुळ उच्चाटन.

२. उद्योगधंदे व उत्पादनाच्या साधनांचे राष्ट्रीयकरण.

३. कृषीप्रधान अर्थव्यवस्थेऐवजी शक्तिशाली औद्योगिकरणावर राष्ट्राच्या अर्थव्यवस्थेची उभारणी.

४. उद्योगधंदे, दळणवळण, कृषी विकास व संरक्षणात्मक युध्दाकरिता शस्त्रसामुग्री इत्यादीच्या निर्मितीकरिता अवजड उद्योग धंद्यावर भर देणे,

५. विद्युत-रासायनिक-धातू संशोधन उद्योगसंघ निर्माण करणे,

६. खासगी कृषी पध्दतीऐवजी सामूहिक शेती पध्दती अमलात आणून कृषी उत्पादनात वेगाने वाढ करणे,

७. राष्ट्रातील निरक्षरता, बेकारी इत्यादीचे उच्चाटन करून शाळा, मजूरांकरिता सिनेमागृहे, दवाखाने सुरू करणे.

८. औद्योगिकरणात अमेरिकेला मागे टाकणे.

## (II) पहिल्या पंचवार्षिक योजनेची कार्यवाही :-

पंचवार्षिक योजनेबद्दल जनतेला माहिती मिळावी यासाठी सरकारने मोठ्या कारखान्यातून मजुरांच्या सभा आयोजित करून पंचवार्षिक योजनेबद्दल त्यांना माहिती देण्यासाठी व घालून दिलेल्या उद्दिष्टांवर व पध्दतीवर चर्चा करण्यासाठी आमंत्रित केले. अशा सभा शाळातून, क्रीडा केंद्रातून व अन्य संस्थामधून आयोजित करण्यात आल्या. त्यात मान्य झालेल्या सुधारणा व सूचना मॉस्को सरकारकडे पाठवण्यात आल्या. या योजनेत सहभागी झालेल्यांची भावना व ती यशस्वी करण्याचीसाठीची जिद्द जनतेत निर्माण झाली. पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या यशस्वीतेकरिता रशियन सरकारने जनतेला मोठ्या कौशल्याने व परिणामकारकरित्या बौध्दिक व भावनात्मक आव्हान केले. भाषणे, वृत्तपत्रे, सिनेमा, रेडिओ अशा माध्यमाद्वारे जनतेत उत्साह, जिद्द व आत्मविश्वास मोठ्या प्रमाणात वाढविण्यात आला. नवीन राष्ट्राच्या निर्मितीकरिता रशियन जनतेने या योजनेचे स्वागत केले. पंचवार्षिक योजनेच्या यशाकरिता करावयाचे काबाडकष्ट म्हणजेच स्वतःच्या कल्याणाकरीता आहे ही जाणीव जनतेमध्ये निर्माण झाली.

## (III) निधी :-

सरकारी उद्योगातून येणारा नफा, विक्रीकर व अन्य करातून उभारलेला पैसा व सरकारने जनतेकडून उभारलेले कर्ज यातून निधी जमा झाला. पाश्चिमात्य राष्ट्रांनी निर्धन रशियाला या कामात थोडीसुध्दा आर्थिक मदत केली नाही. रशियाच्या कर्जफेडीबाबत पाश्चिमात्य राष्ट्रांना अजिबात विश्वास नव्हता. त्याचबरोबर साम्यवादी रशियाला अर्थसहाय्य देऊन भांडवलशाही पाश्चिमात्य राष्ट्रे रशियाच्या प्रगतीला हातभार लावू इच्छीत नव्हती.

पहिल्या पंचवार्षिक योजनेतकरिता ५१०० कोटी रुबल्स रशियाने खर्च केले. पंचवार्षिक योजना सिध्दीस नेण्याकरिता आवश्यक असलेले तंत्रज्ञ व यंत्रशास्त्रज्ञ पाश्चिमात्य राष्ट्रातून बोलवावे लागले. रशियाने या पाश्चिमात्य तंत्रज्ञांना भरगच्च, पगार दिला होता. हा पगार मात्र रशियन रुबल्समध्ये देण्यात येई. त्यामुळे हा पगार रशियातच खर्च करावा लागत. राष्ट्रीय संपत्ती बाहेर जाऊ नये यासाठी रशियन सरकारने अशा प्रकारे काळजी घेतली होती.

## (IV) उद्योगाची विभागणी :-

रशियातील प्रत्येक उद्योगांना स्वतंत्रपणे उत्पादनाचे लक्ष्य ठरवून देण्यात आले होते. त्याप्रमाणे त्या उद्योगाची विभागणी करण्यात आली होती -

१) **मूलभूत उद्योग -** कोळसा, लोखंड-पोलाद, खनिज तेल या उद्योगधंद्याच्या उत्पादनात तीन पटीने वाढ करणे,

२) **उपभोग्य वस्तू -** धान्य इ. दुपटीने वाढ करणे,

सरकारने उद्योगधंद्यांच्या सर्व क्षेत्रात (कारखान्यात) तीनपाळी पध्दतीने दिवसाचे चोवीस तास काम सुरू ठेवले. उत्पादन वाढविण्यासाठी कामगारांना प्रोत्साहन मिळावे म्हणून लाभांश, कार्यानुसार वेतन या गोष्टी सुरू करण्यात आल्या. कोणत्याही कारणाकरिता काम बंद ठेवणे हा गुन्हा समजण्यात येऊन त्याकरिता शिक्षा ठोठावण्यात आल्या.

## (V) रशियाची स्वयंपूर्णता :-

पंचवार्षिक योजना यशस्वी व्हावी याकरिता लागणारी सर्व साधन सामुग्री एक रबर वगळता रशियात उपलब्ध होती. रशिया हा नैसर्गिक साधनसंपत्तीने परिपूर्ण होता.

१) जगाच्या एकूण खनिज तेलाच्या ज्ञात साठ्यापैकी १/३ साठा रशियात उपलब्ध होता,

२) २१ टक्के लोखंड साठा उपलब्ध होता,

३) ४८ टक्के जंगल संपत्ती उपलब्ध होती,

४) मॅगनीज, शिसे, तांबे, झिंक इत्यादी खनिजे भरपूर प्रमाणात होती,

५) सोन्याच्या उत्पादनात जगात रशियाचा दुसरा नंबर होता,

## (VI) पहिल्या पंचवार्षिक योजनेतील प्रारंभिक अडथळे :-

### १. करवृध्दी

पाश्चात्त्य राष्ट्राकडून पहिल्या पंचवार्षिक योजनेसाठी कोणतीही आर्थिक मदत न मिळाल्यामुळे रशियन सरकारने पंचवार्षिक योजनेसाठी निधी उभारण्यासाठी मोठ्या प्रमाणात जनतेवर कराच्या माध्यमातून आर्थिक बोजा टाकला.

### २. उपभोग्य वस्तूंचा तुटवडा

परदेशातून यंत्रसामग्री व अन्य काही आवश्यक वस्तूंची आयात करण्याकरिता मोठ्या प्रमाणावर कच्च्या मालाची व अन्नधान्याची निर्यात करणे भाग पडल्याने रशियात उपभोग्य वस्तूंचा तुटवडा निर्माण झाला.

### ३. जनतेच्या हालअपेष्टा

नव्या उद्योग केंद्रात कामगारांकरिता घरे व अन्य आवश्यक सुविधांचा अभाव आणि योजना पूर्ण करण्यासाठी करावे लागणारे अपार कष्ट या सर्व कारणांमुळे जनतेला या योजना काळात विलक्षण हाल-अपेष्टा सोसाव्या लागल्या.

### ४. नियोजित उद्दिष्ट गाठताना त्रास झाला

नियोजन मंडळाने ठरवून दिलेल्या उद्दिष्टांइतके उत्पादन काही उद्योगात झाले नाही, तर काही क्षेत्रात उत्पादन ठरवून दिलेल्या उद्दिष्टाइतके झाले असते तरी मालाचा दर्जा मात्र इतका निकृष्ट होता की तो उत्पादित माल सरकारला त्याज्य ठरवणे भाग पडले तर पक्क्या मालाचे उत्पादन मूल्य अवास्तव होते.

### ५. अयोग्य संचालन

कसबी, अनुभवी कामगार, तंत्रज्ञाच्या उणिवेमुळे कच्च्या मालाची नासधूस व अयोग्य संचालन याही गोष्टी काही उद्योगात दिसून आल्या. क्रांतीनंतर युध्दपूर्व काळात देशातील बरेचशे प्रशिक्षित तंत्रज्ञ देश सोडून निघून गेले होते. याचा फटका पहिल्या पंचवार्षिक योजनेला बसला.

## (VII) कृषी क्रांती :-

पहिल्या पंचवार्षिक योजनेनुसार सन १९३२ पर्यंत रशियात फार मोठ्या प्रमाणात उद्योगधंद्यांचा विकास घडून आला. त्याचबरोबर कृषी क्षेत्रातही क्रांती घडून आली. शतकानुशतके ग्रामीण जीवनात खोलपर्यंत रूजलेल्या पध्दती व सवयी मोडून त्या जागी नवीन कार्यपध्दती व नव्या कल्पना देण्याचे कार्य औद्योगिक विस्तारापेक्षा जिकरीचे होते.

नव्या आर्थिक धोरणानुसार रशियात शेतकरी शेती करत होते. त्यामुळे सामूहिक शेतीच्या योजनेला शेतकऱ्यांकडून विरोध होण्याची शक्यता होती. शेतकऱ्यांवर सक्ती न करता क्रमाक्रमाने त्यांची मने वळवून तो कार्यक्रम राबविण्यात यावा असे मत काही तज्ञांचे होते. त्या संबंधित काही विचार विनिमय व प्रयोगही करण्यात आले होते. शेतीचे सामूहिककरण यशस्वी करून घेण्यासाठी सरकारी संस्थांपासून, तर सामुहिक शेतीक्षेत्र (कलखोज पध्दती) पर्यंत वेगवेगळ्या सूचना करण्यात आल्या होत्या.

शेतकऱ्यांना सामुहीकिकरणाचे फायदे पटवून देण्यात आले. जे सधन शेतकरी आहे अशांवर वाढत्या प्रमाणात कर लादून त्यांना कृषी सामुहीकिकरणासाठी प्रवृत्त करावे अशी कल्पना होती. परंतु सधन शेतकरी,

कुलाक वर्गाने व त्याच्या चिथावणीने सामान्य शेतकऱ्यांनी सरकारी कार्यक्रमाला सहकार्य करण्याऐवजी इतका प्रखर विरोध केला की कृषी सामूहिककरणाकरिता सरकारला कारवाई करण्याशिवाय दुसरा पर्याय नव्हता. कॉलनिन टॉमसकी, रिकोव, बुखारिन अशा साम्यवादी पक्षाच्या उजव्या गटाच्या प्रमुख नेत्याचा सामूहिकीकरणाच्या कार्यक्रमाला सक्त विरोध होता.

स्टॅलिनने कुलाकांचा विरोध मोडून काढून प्रसंगी त्याकरीता उघड लढा देण्याची तयारी ठेवून, कृषी उत्पादनाची साधने त्यांच्या हातातून काढून घेऊन सामूहिकीकरण घडवून आणले.

## (VIII) कृषी सामूहिकीकरण :–

पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या अंतर्गत कृषी क्षेत्रात दोन पध्दती कार्यान्वित करण्यात आल्या त्यामध्ये सामूहिक प्रक्षेत्र 'कलखोज' व सरकारी प्रक्षेत्र 'सवखोज' हे होय.

रशियातील शेतकरी स्वतःच्या इच्छेने सामूहिकीकरणात सहभागी होत नाही असे दिसताच ६, जानेवारी, १९३० रोजी कृषी सामूहिकीकरणाचा कार्यक्रम अंमलात आणण्याचा निर्णय घेण्यात आला. त्या दिशेने कारवाईला ताबडतोब सुरुवात झाली त्यासाठी खालील कार्यक्रम राबवण्यात आला–

१. कृषी सामूहीकीकरणासाठी २५००० सोव्हिएत पक्षाचे व कामगार पक्षाचे कार्यकर्ते पाठविण्यात आले.

२. सन १९२८ – २९ या वर्षात २४ लक्ष हेक्टर जमिनीची ५५ सरकारी प्रक्षेत्रे अस्तित्वात होती. सामूहीकीकरण कार्यक्रमानुसार १९३१ च्या प्रारंभापर्यंत ५० लक्ष हेक्टर जमिनीची एकूण १२० सरकारी प्रक्षेत्रे *'सवखोज'* अस्तित्वात यायची होती. तर सामूहिक प्रक्षेत्राच्या *'कलखोज'*चा विस्तार त्या पेक्षाही अधिक व्हायचा होता. १९२८ –२९ मध्ये ३०००० सामूहिक प्रक्षेत्राखाली ४० लक्ष हेक्टर जमीन होती.

३. सन १९३१ च्या प्रारंभापर्यंत 'कलखोज'ची संख्या १ लाखपर्यंत जावी व त्या अंतर्गत एकूण १ कोटी ६० लाख हेक्टर जमीन लागवडीखाली यावी अशी योजना होती. नव्या योजनेनुसार निर्माण झालेल्या काही सामुहिक प्रक्षेत्रात ४ ते ५ हजार शेतकऱ्यांच्या जमिनी एकत्र करण्यात आल्या.

४. शेतकऱ्यांची जास्तीची जमीन भाडेपट्टीने घेण्याचा किंवा शेतावर मजूर कामावर लावण्याचा अधिकार रद्द करण्यात आला.

५. सामूहिक धोरणाला विरोध करणाऱ्या 'कुलकाच्या' जमिनी जप्त करून त्यांना गावातून हाकलून लावण्यात यावे, परंतु जे शेतकरी सामूहिक शेतकरी योजनेत सामील होतील त्यांना स्वतंत्रपणे शेती करणाऱ्यांना उपलब्ध होऊ शकणारी कृषी यंत्रे, सुधारित बी–बियाणे, उपकरणे व अन्य सवलती देण्यात येत होत्या.

### कृषी सामूहीकीकरणाची प्रक्रिया –

सामूहिक शेती क्षेत्र 'कलखोज' व सरकारी प्रक्षेत्र 'सवखोज' अशा दोन मार्गांनी कृषी सामुहीकीकरणाची प्रक्रिया चालू होती. शेतकरी कुटुंबे एकत्रित येऊन सामूहिक प्रक्षेत्र तयार होत असे. तर 'सवखोज'म्हणजे प्रत्यक्ष सरकारद्वारा चालवण्यात येत असलेले प्रक्षेत्र होय.

१. **सामूहिक शेती क्षेत्र *'कलखोज'*–** कापूस, बीट, उस अशी ठराविक पिके काढण्याचे ठरविण्यात आले.

२. **'सवखोज' क्षेत्रात –** सुधारित बी–बियाणे व कृषी पध्दती सुधारित गुरांची पैदास, जमिनीचा कस वाढवण्याच्या पध्दती यांचे प्रयोग क्षेत्र म्हणून सवखोजचा उपयोग व्हावा अशी कल्पना होती.

शहरी विभागात ज्याप्रमाणे कारखाने प्रत्यक्षपणे सरकारच्या नियंत्रणाखाली सरकारी कर्मचाऱ्याद्वारा चालवले जातात. त्याचप्रमाणे सरकारी नोकरीतील माणसाकडून विशाल 'सवखोज' प्रक्षेत्राचे कामकाज चालविण्याची कल्पना होती. म्हणूनच या क्षेत्रांना कृषी विभागातील कारखाने सुध्दा म्हटले जात होते.

### कृषी सामुहीकीकरणाला विरोध –

१. रशियन सरकारच्या कृषी सामुहीकीकरण्याच्या नीतीला शेतकऱ्यांनी इतका सक्रिय व कडवा विरोध केला की रशियाच्या ग्रामीण क्षेत्रात यादवी युध्दाची परिस्थिती निर्माण झाली होती. 'कलखोज' शेतकी क्षेत्रात शेतकरी हा त्याची स्वतःच्या ताब्यातील जमिन समाविष्ट करण्याची अनेक शेतकऱ्यांची तयारी नव्हती.

२. खाजगी शेतीच्या मार्गात सरकारने कितीही अडचणी निर्माण केल्या आणि सामूहिक शेतीत सामील होणाऱ्यांना कितीही सवलती दिल्या तरीही मोठे शेतकरी आपल्या शेताचे अस्तित्व टिकवून धरण्याकरिता धडपडत होते. त्याकरिता हिंसक मार्गाचा अवलंब करण्याची त्यांची तयारी होती.

३. शेतकऱ्यांनी आपली गणना 'कुलकाच्या' वर्गात होऊ नये यासाठी सरकारचा निषेध म्हणून हेतूपुरस्पर उत्पादनात कपात, मालमत्तेची विल्हेवाट, चांगल्या प्रतीची गुरे–ढोरे मारून टाकली व मरतुकडी गुरे जिवंत ठेवली.

४. सरकारचा सामुहिक शेतीचा कार्यक्रम शक्य तेवढ्या मार्गाने हाणून पाडणे हा उद्देश शेतकऱ्यांचा होता. या कृषी सामुहीकीकरणात सामील होणाऱ्या शेतकऱ्यांच्या उत्पादनाला आगी लावणे, शेतकऱ्याचे खून करणे, अशाप्रकारे शेतकऱ्यांनी विरोध दर्शविला.

### शेतकऱ्यांच्या विरोधावर सरकारची उपाय योजना –

१. सरकारने कुलकाची जमीन व मालमत्ता जप्त केली.

२. विरोध करणाऱ्यांना त्याच्या मालमत्तेवरून व शेतीवरून हाकलून लावण्यात आले.

३. खून, जाळपोळ करणाऱ्यांना मृत्युदंडाच्या शिक्षा सुनावण्यात आल्या.

४. हजारो विरोधकांची त्यांच्या कुटुंबियासमवेत रवानगी उत्तरेतील प्रदेशात करण्यात आली. तेथे अशांना जंगल कटाई, कालवे बनवणे, रेल्वेमार्ग बांधणी अशा कामास लावण्यात आले.

**शेतीच्या सामूहिकीकरणाचा फेरविचार –**

आंतरराष्ट्रीय स्तरावर जर्मनीच्या राजकारणात हिटलरचा उदयाची लक्षणे स्पष्ट दिसत होती. रशियात शेतीच्या सामूहीकीकरणाची मोहीम जोरात सुरू होती. हिटलरच्या उदयाच्या धोक्याचे गांभीर्य स्टॅलिन चांगलाच ओळखून होता. रशियाच्या ग्रामीण क्षेत्रात शेतीच्या सामूहीकीकरणामुळे निर्माण झालेला तीव्र असंतोष यामुळे स्टॅलिन अस्वस्थ होऊ लागला होता.

रशियातील अनेक सामान्य व सधन शेतकऱ्यांची मुले रशियाच्या लाल लष्करात नोकरीला होती. शेती सामूहिकिकरणामुळे शेतकऱ्यांचा असंतोष असाच भटकत राहिला व त्याच वेळी जर परकीय आक्रमण झाले तर मातृभूमीच्या संरक्षणार्थ लाल सेनेने तयार असावे. या स्टॅलिनच्या आव्हानाला असंतुष्ट शेतकऱ्यांची मुलं किती प्रतिसाद देतील याबद्दल स्टॅलिनला साशंकता वाटत होती. त्यामुळेच सन १९३० नंतर शेतीच्या सामूहीकीकरणाच्या नीतीचा फेरविचार करणे आवश्यक वाटू लागले. यामुळेच स्टॅलिनने सक्तीच्या सामूहीकीकरणात थोडी शिथिलता आणली.

सामूहिक प्रक्षेत्रात सामील होण्यास शेतकऱ्यांना प्रेरित करा, सक्ती करू नका असे स्टॅलिनने आदेश काढले (स्टॅलिन कोड). कृषी उत्पादनाच्या दृष्टीने सरकारी प्रक्षेत्रापेक्षा सामूहिक प्रक्षेत्रे महत्त्वाची होती. उत्पादनाच्यादृष्टीनेही सवखोज अपेक्षे इतके यशस्वी ठरले नाही. सन १९३६–३७ मध्ये बरेच सरकारी प्रक्षेत्रे रद्द करण्यात येऊन ती जमीन सवलतीच्या अटीवर सामूहिक प्रक्षेत्राकडे देण्यात आले.

सन १९३२ च्या अखेरपर्यंत सामूहिक कृषी योजनेच्या प्रश्नावरून सरकार व शेतकरी यात उद्‌भवलेला विरोध संपला. त्यानंतर बहुसंख्यक शेतकऱ्यांनी सामूहिक प्रक्षेत्र योजना स्वीकृत केली. परंतु पूर्णपणे यशस्वी झाली असे म्हणता येणार नाही. पहिल्या पंचवार्षिक योजना काळात राष्ट्राच्या कृषी क्षेत्रात सामूहीकीकरणाचा पाया निश्चितपणे घातला गेला.

**(IX) पहिली पंचवार्षिक योजनात पूर्ण झालेली उद्दीष्टे –**

सन ३१ डिसेंबर, १९३२ रोजी पहिल्या पंचवार्षिक योजनेची पाच वर्ष संपण्याच्या आठ महिने पूर्वीच योजना पूर्ण झाल्याची घोषणा सरकारने केली. पहिल्या पंचवार्षिक योजनेत ठरविलेली उद्दिष्टे जवळपास पूर्ण झाली होती. काही क्षेत्रात थोड्या प्रमाणात तफावत राहिली असली तरी योजना कल्पनेपलीकडे यशस्वी ठरली.

१. १९३३ मध्ये मॅग्निटोगोरस्क येथे विशाल पोलाद कारखाना उभारण्यात येऊन पोलाद उत्पादनाला प्रारंभ झाला. उरल व पश्चिम सैबेरियातील स्वयंपूर्ण ठरणाऱ्या उद्योगधंद्याचा पाया या कारखान्याने घातला गेला.

२. कारंगदा व कुझनेस्त येथे फार मोठ्या प्रमाणावर कोळसा खान कामाला प्रारंभ झाला.

३. खार्कोव व स्टॅलिनग्राड येथे मोठ-मोठे ट्रॅक्टर्स, गोर्की, रोस्त्व, चेलीयाविन्स, स्तलीन्सक येथे कृषी क्षेत्राला लागणारी आवशक सामग्री, मॉस्को येथे बॉलबेअरिंग व रबर कारखाने सुरू झाले.

४. पंचवार्षिक योजनेच्या काळातला सर्वात महत्त्वपूर्ण व पूर्णत्वास गेलेला व रशियन जनतेला अभिमानास्पद वाटणारा एक मोठा प्रकल्प म्हणजे सन १९३२ मध्ये निपर नदीवरील प्रचंड धरण होय. हे धरण २५०० फूट लांब, १७० फूट उंच होते. यावर ९ लक्ष अश्वशक्तीचे जल विद्युत उत्पादक केंद्राच्या उभारण्याचे कार्य ऑक्टोबर १९३२ मध्ये पूर्ण झाले. या धरणाच्या बांधकामाच्या देखरेखीची जबाबदारी अमेरिकन इंजिनिअर कूपर यांचेकडे होती.

५. रशियातील बेकारीचे उच्चाटन झाले.

६. उत्तर कोलेशिअरमधील ग्रोन्जी पासून काळ्या समुद्रावरील तुआप्सेपर्यंत करण्यात आलेला खनिज तेल पाईपलाईन मार्ग तयार झाला.

७. सन १९३० मध्ये ११०० मैल लांबीचा तुर्कस्थान - सैबेरिया रेल्वे मार्ग तयार करण्यात आला.

### (X) पहिल्या पंचवार्षिक योजनेची वैशिष्ट्ये -

१. कृषी व औद्योगिक विकासाचा भक्कम पाया पहिल्या पंचवार्षिक योजनेने घालून दिला.

२. कृषि प्रधान अर्थव्यवस्थेकडून उद्योगप्रधान अर्थव्यवस्थेकडे राष्ट्राची वाटचाल सुरु झाली.

३. व्यापार व उद्योग क्षेत्रातून भांडवलदाराचे पूर्णपणे निर्मूलन झाले.

४. रशियातील बेकारी नाहीशी झाली.

५. राष्ट्रीय उत्पन्न (१९२६-२७ ची मूल्य पातळी) चार वर्षात २७ दशकोटी रुबल्स पासून ४५ कोटी रुबल्स झाले.

६. उद्योगधंद्यात गुंतलेले भांडवल दोन दशकोटी रुबल्सपासून ९ कोटी रुबल्स झाले.

### (XI) पहिल्या पंचवार्षिक योजनेचे सामाजिक परिणाम -

१. या पंचवार्षिक योजनेने कोट्यावधी सामान्य नागरिकांना त्यांच्या अज्ञानातून, निष्क्रियतेतून, निराशावादातून बाहेर काढून त्यांच्यात प्रेरक शक्ती निर्माण केली.

२. लोकांमध्ये असणाऱ्या सुप्त कार्यक्षमतेची व गुणवत्तेची जाणीव झाली.

३. सरकारच्या या प्रयत्नामुळे राष्ट्राच्या उज्वल भवितव्याचा पाया घातला गेला.

## २. दुसरी पंचवार्षिक योजना (१९३३-१९३७) -

दुसरी पंचवार्षिक योजना १ जानेवारी १९३३ रोजी घोषित करण्यात आली.या योजनेसाठी १४०० कोटी रुबल्स निधी उभारण्यात आला होता. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेचे उद्देश खालीलप्रमाणे ठरविण्यात आले होते -

### (I) उद्देश -

१. रशियातील औद्योगिक उत्पादन ४३ दशकोटी रुबल्स वरून ९३ दशकोटी रुबल्स पर्यंत वाढविणे,

२. नव्याने उभारण्यात आलेल्या उद्योगधंद्याचे दृढीकरण करणे,

३. उद्योगांच्या दळणवळणाचा भार सोसण्याची क्षमता असणारे रेल्वेमार्ग बांधणे,

४. सामान्य जनतेच्या दैनंदिन उपयोगाच्या वस्तू निर्मितीवर विशेष भर देणे,

५. शहरी कामगारांच्या संख्येत वाढ झाल्याने त्यांच्याकरिता घरे, उद्याने, क्रीडांगणे, नाट्यगृह, सिनेमागृह अशा इमारती बांधणे,

### (II) आंतरराष्ट्रीय परिस्थितीचा प्रभाव -

सन १९३३ मध्ये दुसऱ्या योजनेची सुरुवात होत असताना आंतरराष्ट्रीय परिस्थितीमुळे पंचवार्षिक योजनेत मोठ्या प्रमाणात बदल करण्यात आले. जर्मनीत हिटलरचा उदय म्हणजे रशियासाठी भावी सूचनांची नांदी होती. हिटलरची वक्रदृष्टी रशियावर होती. त्यामुळे रशियन सरकारने या पूर्व सूचनेचा सारासार विचार करून दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत बदल केला. त्यानुसार दुसऱ्या योजनाकाळात शस्त्रास्त्र निर्मिती व लष्करी सामर्थ्यवृध्दी याकडे विशेष लक्ष दिले. याशिवाय नवीन उद्योगधंदे शत्रूच्या किमान हल्ल्याच्या टप्प्यापासून दूर असावेत असे ठरविण्यात आले.

### (III) औद्योगिक क्षेत्रातील प्रगतीची वाटचाल -

### १. औद्योगिक संकुलाची (Combine) निर्मिती

दक्षिण युक्रेनमधून होणाऱ्या कोळसा व लोखंड यांच्या पुरवठ्यावर आंतरराष्ट्रीय परिस्थितीत व युध्द काळात विसंबून राहणे धोक्याचे होईल म्हणून रशियन तज्ञांनी या योजना काळात कुझनेत्स व सैबेरिया येथे उपलब्ध असलेल्या कोळसा आणि उरल विभागात असलेली खनिज द्रव्ये यांचा लोखंड-पोलाद उत्पादनाचा एक संकुल तयार केला. दक्षिण युक्रेनच्या दोनेत्स क्षेत्राच्या खालोखाल कुझनेत्सचे क्षेत्र कोळसा उत्पादनात समृध्द झाले. कोळसा संशोधनाची मोहीम यशस्वी ठरून उरल पोलादकेंद्रा जवळ कजाकस्थान, कारंगदा येथे येथे कोळशाचे समृध्द साठे सापडले.

## २. यंत्रसामुग्री कारखान्याच्या उत्पादनात वाढ

कुझनेत्स क्षेत्रात धातुशोधनाचे कारखाने उभारण्यात आले. अशाच प्रकारे ट्रॅक्टर, मोटारी, रेल्वे इंजिन, टर्बोजनरेटर व अन्य यंत्रसामग्री निर्माण करण्याचे कारखाने-मॉस्को, खार्कोव, स्टॅलिनग्राड, गोर्की, उफा, स्वर्दलोव अशा शहरातून सुरू झाले.

## ३. आर्टिक प्रदेशात वसाहतींचे निर्माण

आर्टिक प्रदेशात उपलब्ध असलेल्या नैसर्गिक साधन-सामुग्रीचा रशियातील औद्योगिक विकासाकरिता उपयोग व्हावा म्हणून या काळात योजना आखण्यात आली. यासाठी उत्तरेला मोठ्या वसाहती निर्माण करण्यात आल्या. मार्मन्स्क्सपासून सुमारे ८०० मैलावर असलेली पेचोरा कोळसा क्षेत्रातील वकृत्ता येथील वसाहत आर्टिक वर्तुळाच्या ७० मैल उत्तरेला होती. या ठिकाणी जाणाऱ्या लोकांसाठी घरे व इतर सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी एक बांधकाम समूह येथे पाठवण्यात आला. यासाठी राजकीय किंवा अन्य कारणाने हद्दपार करण्यात आलेल्यांना येथे कामास जुंपण्यात आले.

## ४. लांब पल्ल्याच्या रेल्वे मार्गाची निर्मिती

१. मॉस्को येथील सुप्रसिध्द भुयारी मार्ग बांधण्यात आला.

२. रशियाची पूर्व-पश्चिम टोके जोडणारा ट्रान्स - सैबेरियन रेल्वे मार्गाला समांतर एक नवा लोहमार्ग पूर्ण केला गेला.

३. तुर्कस्थानहून दक्षिणेकडे कोळसा घेऊन जाणाऱ्या ७०० मैल लांबीच्या रेल्वे मार्गाच्या कामाला सुरुवात झाली.

## (IV) कृषी क्षेत्रातील प्रगती

सन १९३३ पर्यंत सामूहिक शेती 'कलखोज' आता रशियात स्थिरावली होती. पहिल्या पंचवार्षिक योजनेने कृषी क्षेत्रात निर्माण झालेली संकटमय परिस्थिती आता ओसरली होती. पहिल्या योजनेत करण्यात आलेल्या प्रयत्नांचे फळ दुसऱ्या योजना काळात शासनाच्या व जनतेच्या पदरात पडू लागले होते.

## १. स्टॅलिन कोड

स्टॅलिनने रशियातील शेतकऱ्यांना सामूहिक शेतीत सामील करून घेण्यासाठी काही नियम शिथिल केले. याची सुरुवात स्टॅलिनने सन १९३५ मध्ये केली. यास 'स्टॅलिन कोड' म्हणून ओळखल्या जाते. यानुसार-

१. सामूहिक शेतीसाठी ठरविण्यात आलेले कृषी क्षेत्र घटता कामा नये, उलट जास्तीची जमीन लागवडीखाली आणावी,

२. जमिनीची मालकी सरकारकडे असली तरी त्या जमिनीचा ताबा नेहमीसाठी 'कलखोजकडे' राहणार,

३. कलखोजच्या ताब्यामुळे सामूहिक श्रमशक्तीचा फायदा कलखोजलाच मिळणार,

४. १/४ ते १ हेक्टर जमीन कलखोज मधील शेतकऱ्यांना खाजगी जमीन मिळवून देण्यात येईल,

५. खाजगी जमिनीवर मजूर न लावता स्वकष्टाने स्व-इच्छित पिक काढावे व ते खुल्या बाजारात विकण्यास परवानगी देण्यात आली,.

६. शेतकऱ्यांना स्वत:साठी एक-दोन गाय, ठराविक संख्येने डुक्करे, मेंढ्या, कोंबड्या इत्यादी पालन करण्याची अनुमती देण्यात आली.

## २. स्टॅलिनकोड चा परिणाम

**१. गुराढोरांच्या संख्येत वाढ :** सन १९१३ मध्ये रशियात डुकरांची संख्या २ कोटी होती. सन १९३८ मध्ये ३ कोटी पर्यंत गेली. मेंढ्या व बोकडांच्या संख्येतही अशीच वृध्दी झाली. घोड्यांच्या संख्येत वृध्दी झाली नसली तरी घटही झाली नाही.

**२. कृषी उत्पादनात वाढ :** दुसऱ्या पंचवार्षिक योजना काळात राष्ट्राचे एकूण कृषी उत्पादन वर्षाला सरासरी ३.४ कोटी मेट्रिक टन होते. तर १९४० मध्ये ते १२ कोटी मेट्रिक टनापर्यंत गेले. १९३२ मध्ये कापसाचे १.२ दशलक्ष टन उत्पादन, १९३८ मध्ये २.६ दशलक्ष टन, तर शुगर बीट ६.५ दशलक्ष टनांवरून, १६.६ दशलक्ष टन झाले. अन्नधान्याच्या उत्पादनात चांगली सुधारणा झाल्याने पक्क्या मालाची नियंत्रित वितरण पध्दती, धान्य वितरण पध्दती रद्द करण्यात आली. त्यामुळे सरकारी दुकानातून रशियन नागरिकांना हवे तेवढे धान्य मिळू लागले. शेतीचे पूर्णपणे यांत्रिकीकरण झाल्याने शेतीत राबणारे हात शहरी विभागात काम करण्यास मोकळे झाले. सामुहिक शेती पध्दती भक्कमपणे रुजली.

## (V) दुसऱ्या पंचवार्षिक योजनेचे यश

या योजनेच्या पहिल्या दोन वर्षाच्या काळात योजनेसाठी ठरवीलेले उद्दिष्ट पूर्ण होताना दिसू लागले होते.

१) अवजड उत्पादन कारखाना, ट्रॅक्टर कारखाना इत्यादी मोठ्या कारखाण्याच्या उभारणीचे कार्य पूर्ण होऊन त्या कारखान्यातून उत्पादनाला सुरुवात झाली होती.

२) सन १९३३ च्या तुलनेत १९३४ मध्ये रेल्वे दळणवळण व मालाची ने-आण यात दहा टक्के वृध्दी झाली होती. दोनेत्स कोळसा क्षेत्राला जोडणारा रेल्वेमार्ग, तुर्कस्तानची महत्त्वाची.उद्योग केंद्र उरल क्षेत्राला जोडणारा तुर्कस्थान सैबेरिया रेल्वेमार्ग पहिल्या दोन वर्षातच तयार झाला.

३) श्वेत समुद्र कालव्यांने बाल्टिक समुद्राला जोडणारी योजना सन १९३३ या वर्षीच पूर्ण झाली होती. दोन वर्षांनी ८० मैल लांबीच्या मॉस्को-वोल्गा कालव्याचे काम पूर्ण झाले. यामुळे मॉस्को या बंदराचा उपयोग सुरू झाला. हा जलमार्ग प्रवासी व माल यांच्या वाहतुकीच्या दृष्टीने फायदेशीर ठरला.

## ३. तिसरी पंचवार्षिक योजना (१९३८–१९४१)

तिसरी पंचवार्षिक योजना सन १९३८ मध्ये घोषित करण्यात आली. या योजनेसाठी १९२०० रुबल्स निधी उभारण्यात आला होता. यावेळेची आंतरराष्ट्रीय परिस्थिती अधिकाधिक चिंताजनक होत चालली होती. त्यामुळे संरक्षणाच्या प्रश्नावर प्रामुख्याने लक्ष केंद्रित करणे, औद्योगिक विकास योजना जर्मन सीमेपासून दूर उरलच्या पूर्वेला उभी करणे, एवढेच नव्हे तर पश्चिम रशियातील मोठमोठे कारखाने सैबेरियन क्षेत्रात घेऊन जाणे अत्यावश्यक होते.

तिसऱ्या योजनाकाळात रशियातील कारखाने उरल पलीकडे उभारण्यात आले. रशियाच्या सीमेत खनिज तेल व अन्य खनिजांचे संशोधन करण्यासाठी विज्ञान व श्रमशक्ती याकडे वळविण्यात आली. याचा परिणाम पश्चिम क्षेत्रात नव्याने स्थापन झालेल्या तेल विहिरीतून खनिज तेलाचे उत्पादन होऊ लागले. सर्वात समृध्द खनिज तेल क्षेत्र इराणच्या सीमेलगत बादुम, तुर्कस्थानच्या सीमेलगत असल्याने या क्षेत्रावर युध्दकाळात आक्रमणे होणे हे उघडच होते.

रशियन सरकारने आपले लक्ष अवजड उद्योगांकडे वळवले. युरोपात शस्त्रास्त्र निर्मितीची स्पर्धा वाढली होती. युध्दसदृश परिस्थितीमुळे प्रत्येक राष्ट्राला युध्दाच्या तयारीसाठी व शास्त्रासाठी अधिक निधी खर्च करावा लागत होता. यामुळे लष्करी शिक्षणाला या योजनेत अधिक प्राधान्य देण्यात आले. देशभर लष्करी प्रशिक्षण केंद्रे उघडण्यात आली. याशिवाय लष्करी भरती होण्यासाठी २१ वर्ष वयोमर्यादे ऐवजी १८ वर्षे करण्यात आली. लष्कराचे यांत्रिकीकरण करण्यात आले. सन१९४१ पर्यंत रशिया मनुष्यबळ, नेतृत्व, लष्करी साहित्य आणि इतर साहित्यामुळे परकीय आक्रमणाविरुध्द स्वतःचे संरक्षण करण्यास सज्ज झाला होता.

लष्करी प्रशिक्षणाच्या दृष्टिकोनातून सैनिकांना ६३ केंद्रातून तर वायुदलातील लोकांना एकूण ३२ केंद्रातून प्रशिक्षण दिले जात होते. सन१९२७ ते १९४१ या काळात सुमारे एक कोटी दहा लक्ष लोकांना शिस्तबध्द लष्करी प्रशिक्षण देण्यात आले.

### सन १९२८ ते १९४१ पर्यंत रशियाच्या पंचवार्षिक योजनांची फलश्रुती

१. पंचवार्षिक योजनांनी सोव्हिएत संघाच्या अर्थव्यवस्थेचा मजबूत पाया घातला.

२. रशियाचे राष्ट्रीय उत्पन्न मोठ्या प्रमाणात वाढले व उपभोग्य वस्तूंच्या उत्पादनात भरमसाठ वाढ झाली.

३. सन १९४० पर्यंत झालेल्या या प्रगतीमुळे रशिया जगातील दुसऱ्या क्रमांकाचे औद्योगिक राष्ट्र गणले जाऊ लागले.

४. रेल्वे इंजिन व डबे, मालवाहतूक, मोटारी, ट्रॅक्टर्स, शेतीची यांत्रिक उपकरणे यात रशियाने युरोपीय राष्ट्रांवर मात केली होती.

५. एकट्या रशियाचे सर्व युरोपीय राष्ट्रांच्या एकूण खनिज तेल उत्पादन जास्त होते.

६. जर्मनी वगळता फास्फेट, तांबे, लोखंड यांच्या उत्पादनात व पोलाद उत्पादनात रशियाचा पहिला क्रमांक लागत होता.

७. कृषिप्रधान अर्थव्यवस्थेएवजी उद्योगप्रधान अर्थव्यवस्था दृढमूल करण्याचे कार्य फार मोठ्या प्रमाणात साध्य झाले होते.

८. शेतकरी व कामगार यांच्या जीवनातील तफावत जवळजवळ नाहीशी झाली.

## ४. चौथी पंचवार्षिक योजना १९४६–१९५१ (औद्योगिक पुनर्रचना)

दुसऱ्या महायुध्दाच्या काळात झालेली हानी भरून काढून पुढील प्रगतीचा मार्ग आक्रमण्याकरिता आवश्यक आर्थिक कार्यक्रम हाती घेणे गरजेचे होते. औद्योगिक पुनर्रचना महत्त्वाची होती. युध्दकाळात रशियाची कल्पनातीत हानी झाली होती. ती सर्व हानी अल्पकाळात भरून काढावी लागणार होती. यासाठी ऑगस्ट १९४५ मध्ये राष्ट्रीय नियोजन मंडळाने (Gosplan) चौथ्या पंचवार्षिक योजनेची रूपरेषा आखण्यास प्रारंभ केला.

### (I) उद्देश

१. राष्ट्राचे लष्करी व औद्योगिक सामर्थ्य वाढविणे.

२. उपभोग्य वस्तूंच्या उत्पादनापेक्षा अवजड उद्योगावर विशेष भर देणे.

३. दळणवळणाच्या साधनांच्या वृध्दीवर विशेष भर देणे.

४. नष्ट झालेल्या उद्योगांची परत उभारणी करणे,

५. जागतिक महासत्ता म्हणून रशियाला महत्त्वाची जबाबदारी बजावता यावी,

एकूण ३२६.५ दशकोटी रुबल्स या योजनेत खर्च करण्यात आले होते. चार वर्ष तीन महिन्यात योजना पूर्णत्वास आली.

### (II) योजनचे यश

### १. उद्योग :–

१. सहा हजार जुन्या-नव्या मोठ्या कारखान्यातून उत्पादनाला सुरुवात झाली.

२. कच्चे लोखंड पोलाद व विद्युतशक्ती याचे उत्पादन दुपटीपेक्षाही अधिक वाढले.

३. कोळसा उत्पादनात भरीव वाढ झाली.

### २. कृषी क्षेत्र :–

दुसऱ्या महायुध्दामुळे रशियाच्या कृषिक्षेत्रावर जबरदस्त आघात झाला होता. रशियाच्या कृषी

क्षेत्राच्या १/३ प्रदेश युध्दभूमीने व्यापल्याने या क्षेत्रातील इमारती, गुरेढोरे यंत्रसामग्रीची बेसुमार हानी झाली. रशियाचे १९४५ पर्यंत कृषी उत्पादन एकूण उत्पादनाच्या ६० टक्के उरले होते. सामूहिक कृषी क्षेत्र मागे पडले होते. या सर्व दोषांचे निर्मूलन होऊन कृषी उत्पादनात वृध्दी व्हावी या दृष्टीने प्रयत्न करण्यात आले.

१. सन १९४६ मध्ये पॉलिटब्युरोचे सदस्य व मंत्री मंडळाचे उपाध्यक्ष आन्द्रेयेव यांच्या अध्यक्षतेखाली सामूहिक प्रक्षेत्राकरीता नवी समिती स्थापन करण्यात आली. या समितीचे कार्य -

   (अ) आळशी, चोर, परोपजीवी, भ्रष्टाचारी लोकांसाठी शिक्षेची तरतूद करणे,

   (ब) सामूहिक प्रक्षेत्रातील सरकारी मालमत्तेची नासधूस करणाऱ्यांना शिक्षा करणे,

   (क) सर्व सामूहिक प्रक्षेत्रावर देखरेख ठेवणे, उत्पादन वृध्दीकरीता मार्गदर्शन करणे हे होते.

२. सन १९४७ मध्ये सामूहिक प्रक्षेत्र यांची संख्या २ लक्ष २२००० होती. ती १९५० पर्यंत २ लक्ष ५४००० झाली.

३. सामूहिक प्रक्षेत्रातील धान्य जमा करण्याकरता आता 'इंपेकटोरेट ऑफ हार्वेस्ट इल्ड' या नव्या शासकीय संस्थेची स्थापना करण्यात आली.

४. सन १९५० पर्यंत कृषी उत्पादनात अपेक्षित वृध्दि न झाल्याने क्रुशेवच्या सल्ल्यावरून लहान-लहान प्रक्षेत्राचे एकत्रीकरण करण्यात येऊन मोठमोठी प्रक्षेत्र निर्माण करण्यात आली. परंतु यात अपेक्षित प्रमाणात यश येवू शकले नाही.

सन १९४० ते १९५२ या काळात औद्योगिक उत्पादनात २.३ पटीने व कृषी उत्पादनात १० पटीने वाढ झाली. उद्योग उत्पादन वृध्दीच्या लोकसंख्या वृध्दीच्या प्रमाणात कृषी उत्पादन वृध्दी असमाधानकारक असल्यामुळे योजना अयशस्वी झाली. असा अहवाल सप्टेंबर १९५३ मध्ये कृषी पक्षाच्या केंद्रीय समितीला सादर केला गेला.

## * स्वयं-अध्ययन प्रश्न भाग - २

१. पहिल्या पंचवार्षिक योजनेत रशियाने .................... रुबल्स खर्ची केले.

   *अ) ५४०० कोटी    ब) ५३०० कोटी    क) ५२०० कोटी    ड) ५१०० कोटी.*

२. सवखोज व कलखोज .............. यांच्याशी संबंधित आहे..

   *अ) उद्योग    ब) शेती    क) युध्द    ड) लष्कर.*

३. १९३५ रशियातील शेतकऱ्यांना सामुहिक शेतीत समाविष्ट करून घेण्यासाठी ................. कोड लावण्यात आला.

   *अ) स्टॅलिन    ब) लेनिन    क) मॉस्को    ड) रशियन.*

४. तुर्कस्थान सैबेरिया याना जोडणारा रेल्वे मार्ग ............. या पंचवार्षिक योजनेत तयार झाला.

*अ) पहिली पंचवार्षिक योजना* *ब) दुसरी पंचवार्षिक योजना*

*क) तिसरी पंचवार्षिक योजना* *ड) चवथी पंचवार्षिक योजना.*

५. शस्त्रास्त्र सज्जतेकडे ...................... या पंचवार्षिक योजनेत भर देण्यात आला.

*अ) पहिली पंचवार्षिक योजना* *ब) दुसरी पंचवार्षिक योजना*

*क) तिसरी पंचवार्षिक योजना* *ड) चवथी पंचवार्षिक योजना.*

## ४.२.३ दुसरे महायुध्द व सोव्हिएत रशिया

**❀ प्रस्तावना**

सन १९३८-३९ या वर्षात युरोपियन राष्ट्रात दुसऱ्या महायुध्दाचे ढग दाटू लागले होते. दुसऱ्या महायुध्दाची टांगती तलवार ही म्युनिक कराराने पूर्वेकडील राष्ट्रांकडे वळेल अशी युरोपीय राष्ट्रांची समजूत होती, परंतु पोलंडच्या विजयानंतर हिटलर युरोपकडे वळला. सन १९३९ च्या ऑगस्ट मध्ये सोव्हिएत रशिया व जर्मनी या दोन देशात अनाक्रमणाचा करार होऊन सोव्हिएत रशियाने आपल्यावर होणाऱ्या संभाव्य हल्ल्याला थोपवून धरण्यात यश मिळवले. या काळात सोव्हिएत रशियाने युध्दाला सामोरे जाण्यासाठी तयारी सुरू केली होती. अनाक्रमणाच्या करारामुळे पश्चिम युरोपीय राष्ट्र व सोव्हिएत रशिया यांच्यात अधिकच कटुता निर्माण झाली.

सोव्हिएत रशियाने जर्मनीशी केलेला अनाक्रमणाचा करार म्हणजे शत्रुत्वाच्या पायावर निर्माण झालेली मैत्री होती. ही दोन्ही राष्ट्रे परस्परांच्या हालचालीवर बारीक नजर ठेवून होती. आपल्यावर एक दिवस जर्मनीचा नाझी हल्ला होईल, याची जाणीव सोव्हिएत नेत्यांना होती. त्यामुळे युध्दाला तोंड लागताच सोव्हिएत रशियाने आपल्या लष्करी सज्जतेला व सीमेवरील तटबंदीला बळकटी देण्यास प्रारंभ केला. रशियाने जर्मनीचा हुकूमशहा हिटलरचे पश्चिमेकडील युध्दतंत्र अभ्यासून त्या युध्दतंत्राविरुध्द उपाययोजनांचा विचार करायला सुरुवात केली.

## १. सोव्हिएत रशियाची स्थिती

सन १९३९ मध्ये दुसऱ्या महायुध्दाला सुरुवात झाली. त्यावेळी सोव्हिएत रशियाची पश्चिम सीमा संरक्षणाच्या दृष्टीने कमकुवत होती. पहिल्या महायुध्दानंतर दोस्त राष्ट्रांच्या अंतिम निर्णयानुसार ही सीमा निर्धारित करण्यात आली होती. मॉस्को या शहरासारखेच महत्त्वपूर्ण असलेले स्टॅलिनग्राड हे शहर रशिया-फिनलंड व रशिया सीमेपासून जेमतेम २० मैलावर होते. फिनलंड युरोपीय राष्ट्रांच्या प्रभावाखाली असल्याने पाश्चिमात्य राष्ट्र फिनलंडचा रशियावर हल्ला करण्याकरीता उपयोग करण्याची धास्ती सोव्हिएत रशियाला होती. याशिवाय एस्टोनिया, लाटविया, लिथुआनिया या राष्ट्राद्वारा बाल्टिक समुद्र किनाऱ्यावरून सोव्हिएत रशियावर हल्ला करणे सहज शक्य होते.

सन १९१९ च्या 'रीगच्या' कराराने श्वेत सोव्हिएत रशिया व युक्रेन यांच्या पश्चिमेचा प्रदेश पोलंडने बळकावला होता. तर १९१९ मध्ये सोव्हिएत रशियाच्या दुर्बलतेचा फायदा घेऊन रुमानियाने बेसअरेबीया हा प्रदेश आपल्या वर्चस्वाखाली आणला होता. एकूणच फिनलंडच्या आखातापासून ते दक्षिणेपर्यंत सोव्हिएत रशियाविरुध्द अनेक राष्ट्र उभी होती. त्यामुळेच युरोपात दुसऱ्या महायुध्दाचे ढग जसजसेदाटू लागले तसतसे सोव्हिएत रशियाने संरक्षणाच्या दृष्टीने बाल्टिक समुद्रावरील लष्करी स्थिती मजबूत करणे सोव्हिएत रशियाला आवश्यक वाटू लागले.

## २. सोव्हिएत रशियाच्या सीमांचे मजबुतीकरण

### अ) सोव्हिएत रशियाचे पोलंडवर आक्रमण

नाझी आक्रमणास पोलंड तोंड देईल हे शक्य नव्हते. नाझी आक्रमणापुढे पोलंडचा प्रतिकार अल्पावधीतच मावळला. परंतु सन १९२०-१९२१ साली पोलंडने जबरीने सोव्हिएत रशियाचा काही प्रदेश गिळंकृत केला होता. या प्रदेशात लक्षावधी श्वेत रशियन व युक्रेनियन लोकांची वस्ती होती. त्यामुळे सोव्हिएत रशियाला आपल्या रशियन बांधवांसाठी स्वस्थ बसून चालणे शक्य नव्हते. रशियाने १७ फेब्रुवारी १९३९ रोजी आपल्या दूतामार्फत पोलिश सरकारला निर्वाणीचा खलिता पाठविला. पोलंडमध्ये असलेल्या श्वेत रशियन, युक्रेनियन व बायलो रशियन बांधवांच्या संरक्षणासाठी सोव्हिएत रशियाची लाल सेना पूर्वेकडून पोलंडमध्ये शिरल्या. सोव्हिएत रशियातील पोलंडमधील लाल सैन्य व जर्मनी नाझी सेना यांच्यात संघर्ष होऊ नये असे हिटलरला वाटत असल्याने हिटलर व स्टॅलिन यांच्यात 'सीमा मैत्री करार'२९ सप्टेंबर १९३९ रोजी करण्यात आला. सन १९२० मध्ये इंग्लंडने सुचविलेली 'कर्झन रेषा' सीमारेषा म्हणून घोषित केली होती. सोव्हिएत रशियाकडे या कराराने ३९% पोलीश लोकसंख्या होती. तर ५६ टक्के युक्रेनियन, बायलो रशियन असलेला प्रदेश रशियास मिळाला. उरलेले ५ टक्के ज्यू, लिथुआनियन व जर्मन होते. हे प्रदेश सोव्हिएत रशियाच्या युक्रेन व श्वेत रशियन घटक राज्यात समाविष्ट करण्यात आले.

### ब) एस्टोनिया, लाटविया, लिथुआनिया इ. संबंधी सोव्हिएत रशियाचे धोरण

सप्टेंबर १९३९ अखेर सोव्हिएत रशियाने बाल्टिक क्षेत्राच्या संबंधी आपल्या कारवाईला प्रारंभ केला. रशिया सरकारने एस्टोनिया, लाटविया, लिथुआनियाया बाल्टिक राष्ट्रांना मॉस्को येथे परस्पर संबधाचे स्वरूप निश्चित करण्यासाठी आमंत्रित केले. याचा विरोध वार्सा येथे ठाण मांडून बसलेल्या नाझी जर्मनीने केला नाही. हा सोव्हिएत रशियाचा एक विजयच होता. दुसऱ्या महायुध्दाच्या भडक्यात आपल्या सारख्या छोट्या राष्ट्रांचे अस्तित्व टिकणार नाही, म्हणून २८ सप्टेंबर, ५ ऑक्टोबर, ९ व १० ऑक्टोंबर रोजी अनुक्रमे एस्टोनिया, लाटविया, लिथुआनिया यांनी सोव्हिएत रशियासोबत परस्पर मदतीचे करार केले. या करारामुळे बाल्टिक क्षेत्रावर सोव्हिएत रशियाचे वर्चस्व प्रस्थापित झाले. पश्चिमेकडे फ्रान्सचा पराभव झाल्यावर ऑगस्ट १९४० मध्ये एस्टोनिया, लाटविया, लिथुआनिया ही राष्ट्रे सोव्हिएत रशियाची घटक राज्य म्हणून समाविष्ट झाली.

## क) बेसअरेबिया व ब्रूकोविना

सोव्हिएत रशियाच्या दक्षिण दिशेला असलेला बेसअरेबिया हा प्रांत सोव्हिएत रशियाच्या दक्षिण सीमेच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने महत्त्वाचा होता. सन १९१७ मध्ये हा प्रांत सोव्हिएत रशियामधील युध्दजन्य परिस्थितीचा फायदा घेऊन रुमानियाने हस्तगत केला होता. बेसअरेबियाचा प्रदेश रशियन वर्चस्वाखाली असला पाहिजे अशी आग्रही भूमिका लेनिन व नंतर स्टॅलिनची होती. फ्रान्सच्या पाडावानंतर जर्मनीच्या आक्रमणाचा धोका सोव्हिएत रशियाला वाटू लागल्याने सोव्हिएत रशियाने रुमानियाच्या अधिपत्याखाली असलेल्या बेसअरेबियाबाबत निर्वाणीचा खलिता पाठवला. त्याचबरोबर बहुसंख्येने युक्रेनियन लोकवस्ती असलेल्या उत्तर ब्रूकोविना प्रदेशाची मागणी केली. रुमानियाने सोव्हिएत रशियाविरुध्द जर्मनीचा पाठिंबा मिळण्यासाठीचे सर्व प्रयत्न सुरु केले ते फसल्यावर शेवटी रुमानीयाने नमते घेतले. २८ जून, १९४० रोजी सोव्हिएत.रशियाच्या फौजांनी बेसअरेबिया व ब्रूकोवीनाच्या प्रदेशात सैन्य कारवाई करून हा प्रदेश आपल्या देशात संमिलीत.केला.

## ड) रशिया फिनलंड युध्द

सोव्हिएत रशियाने पश्चिम सीमेची डागडुजी केल्यानंतर रशियाची नजर फिनलंडकडे वळली. रशिया पासून फिनलंडची सीमा अवघ्या २० मैलावर होती. सोव्हिएत रशियाच्या आक्रमणाचा अंदाज ओळखून फिनलंडने सुध्दा या सीमेवर भक्कम तटबंदी उभारली होती. पाश्चिमात्य राष्ट्रांच्या मुख्यतः जर्मनीच्या दृष्टीने फिनलंड हे राष्ट्र रशियात घुसण्याचे प्रवेशद्वार होते. एकदा फिनलंड जर्मनीच्या ताब्यात आले तर स्टॅलिनग्राड मार्ग मॉस्को पर्यंत पोहोचणे कठीण नव्हते. हा धोका सोव्हिएत रशियाला सुध्दा जाणवत होता.

वरील परिस्थिती पाहता सोव्हिएत रशियाने फिनलंड समोर ऑक्टोबर१९३९ पासून आपल्या मागण्या मांडल्या -

१) हांगो आखाती प्रदेश सोव्हिएत रशियाला ३० वर्षाच्या भाडेतत्त्वावर द्यावा,

२) विबॉर्ग समोरची चार बेटे व कारेलीयनया प्रदेशाचा भाग द्यावा,

या प्रदेशाच्या मोबदल्यात सोव्हिएत रशियाचा फिनलंडला वरील प्रदेशाच्या दुप्पटीपेक्षाही अधिक क्षेत्रफळ असलेला लेक लगोदा व मध्यम कारेलीयाच्या उत्तरेकडील प्रदेश देईल. असे झाल्यास जर्मन हल्ल्यांविरुध्द सोव्हिएत रशियाची उत्तर सीमेवरील संरक्षणात्मक स्थिती मजबूत होणार होती.

रशियाची वरील बोलणी फिनलंडने फेटाळली. ३० नोव्हेंबर १९३९ रोजी रशियन फौजा फिनलंडमध्ये घुसाविल्या. फिनलंड सरकारने ३ डिसेंबर रोजी राष्ट्रसंघाकडे मदतीकरिता धाव घेतली. सन १४ डिसेंबर १९३९ रोजी राष्ट्रसंघाने सोव्हिएत रशियाची राष्ट्रसंघातून हकालपट्टी केली याचा रशियाला फायदाच झाला.

सोव्हिएत रशियाविरुध्दचा द्वेष म्हणून दोस्त राष्ट्रांनी मोठ्या प्रमाणात फिनलंडला शस्त्रास्त्र, सैनिकांची

भरीव मदत केली. जर्मनीने प्रत्यक्ष मदत केली नसती तरी या युध्दात रशियाचा पराभव व्हावा किंवा फिनलंड प्रश्नावरून सोव्हिएत रशिया व ब्रिटेन यांच्यात युध्द भडकावे असे जर्मनीला वाटत होते. या युध्दात फिनिश लोकांनी सोव्हिएत रशियाच्या आक्रमणाचा कडवा प्रतिकार केला. परंतु बलाढ्य सोव्हिएत रशियाविरुध्द आपला इलाज चालत नाही याची जाणीव फिनलंडला झाली. फिनलंडने लगेच तहाची बोलणी सुरू केली. व १२ मार्च १९४० रोजी रशिया-फिनलंड याच्यात तह घडून आला. या तहानुसार-

१. फिनलंडने विबोर्गचा प्रदेश, लेक-लगोदचा पश्चिम व उत्तर किनार्याचा प्रदेश सोव्हिएत रशियाला दिला.

२. हांगो बेटाचा प्रदेश ३० वर्षांच्या भाडेपट्टीवर सोव्हिएत रशियाला देण्यात आला.

३. सोव्हिएत रशियाने वार्षिक ३० हजार डॉलर्सची रक्कम फिनलंडला देण्याचे ठरविण्यात आले.

या तहातून सोव्हिएत रशियाला पेत्सेनोया प्रदेशातून स्वीडन व नार्वेकडे जाणारा मार्ग खुला झाला.

## ३. जर्मनी-सोव्हिएत रशिया शत्रुत्वाला सुरुवात

परस्परविरोधी सैद्धांतिक भूमिका हे रशिया-जर्मनी शत्रुत्वाचे कारण होते. ११ जून, १९४० रोजी इटलीच्या मुसोलिनीने फ्रान्सवर आक्रमण केले. २२ जून, १९४० रोजी फ्रान्सचा सेनापती मार्शल पेताँने जर्मनीच्या हिटलर समोर शरणागती पत्करली. या घटनांमुळे युरोपचे राजकीय चित्र बदलायला सुरुवात झाली. २७ सप्टेंबर, १९४० रोजी जर्मनी-इटली-जपान या अक्ष राष्ट्रांच्या परस्पर मदतीचा दहा वर्षासाठीचा करार झाला. या करारामुळे दोस्त राष्ट्रांना संभाव्य स्वरूपाचा धोका निर्माण झाला हे स्वाभाविकच होते. यातूनच फ्रान्सच्या पाडावानंतर हिटलर सोव्हिएत रशियाकडे वळला. सोव्हिएत रशियाच्या दुर्बलतेचा काळात रशियाच्या पश्चिमेकडील प्रदेश अनेक देशांनी बळकावले होते. आता रशिया सामर्थ्यसंपन्न राष्ट्र झाले होते. सोव्हिएत रशियाने पश्चिमेकडील गमावलेले सर्व प्रदेश आपल्या अधिकार क्षेत्रात जोडले होते. या कारणामुळे हिटलर अत्यंत अस्वस्थ होता. बळकट सोव्हिएत रशिया जर्मनीला नको होता.

इटलीच्या ग्रीसवरील हल्ल्यात, त्याला येत असलेल्या अपयशाने हिटलर समोर बाल्कन प्रदेशासंबंधीचा प्रश्न निर्माण झाला होता. हिटलर जर मुसोलिनीच्या मदतीला गेला तर ग्रीसकडील मार्ग खुला होणे अगत्याचे होते. त्यासाठी हिटलर हंगेरी व रुमानियाकडे वळला. रुमानियाकडून सोव्हिएत रशियाने उत्तर बृकोविना हा प्रदेश यापूर्वीच मिळवला होता ते हिटलरला आवडले नव्हते. म्हणूनच हिटलरने सोव्हिएत रशियाव्याप्त प्रदेश वगळता उरलेला रुमानियाच्या प्रदेशावर ऑक्टोबर १९४० रोजी आपला अधिकार प्रस्थापित केला. यामुळे हिटलरचा सोव्हिएत रशियावर आक्रमण करण्याचा मार्ग मोकळा झाला. सन १९४१ पर्यंत काळ्या समुद्रावर सोव्हिएत रशियाच्या रोखाने जर्मन फौजा व तोफा रोखून ठेवण्यात आल्या या सर्व पार्श्वभूमीवर व हिटलरच्या हालचालीवर स्टॅलिनचे बारीक लक्ष होते. त्याने ६ मे १९४१ रोजी सोव्हिएत रशियाचे पंतप्रधान पद स्वतःकडे घेतले.

## ४. सोव्हिएत रशिया-जपान करार (१३ एप्रिल, १९४१)

जर्मनी-इटली-जपान या अक्ष राष्ट्रांच्या संयुक्त आक्रमणाला एकाच वेळी तोंड देणे रशियाला शक्य नव्हते. जर्मनी तर सोव्हिएत रशियाला आपल्या प्रभावाखाली आणण्याच्याच इराद्याने सोव्हिएत रशियाकडे रोख करून बसला होता. यावेळी पॅसिफिक महासागराच्या वर्चस्व स्थापन करण्याच्या इच्छेमुळे जपान-अमेरिका संघर्षाची स्पष्टता दिसत होती. यामुळे जपानची पश्चिम आघाडी शांत रहावी असे जपानलाही वाटत होते. यातूनच १३ एप्रिल १९४१ रोजी जपान व सोव्हिएत रशिया या देशांत करार घडून आला. या करारात खालील तरतुदीचा समावेश होता.

१) सोव्हिएत रशिया-जपान संबंध मैत्रीचे व शांततेचे असावे,

२) परस्परांच्या प्रादेशिक अबाधीत्वाचा सन्मान राखला जावा,

३) दोन्हीपैकी कोणतेही राष्ट्र तिसऱ्या राष्ट्रसोबत युध्दात गुंतले तर या संपूर्ण काळात मित्रराष्ट्रांनी तटस्थता बाळगावी,

४) उत्तर साखलीन बेटातील जपानच्या सर्व सवलती सहा महिन्याच्या आत रद्द व्हाव्यात,

५) सर्व खनिज तेलाच्या विहिरी उपकरणे व साहित्यसह युध्दानंतर जपानने सोव्हिएत रशियाच्या स्वाधीन करावे,

६) सोव्हिएत रशियाने मोबदला म्हणून जपानला दरवर्षी ५०,००० टन खनिज तेल व पाच दशलक्ष रुबल्सची रक्कम द्यावी.

या करारावर ३१ मे १९४१ रोजी सोव्हिएत रशिया व जपान तर्फे शिक्कामोर्तब झाले. हा करार म्हणजे रशियन राजनीतीचा एक विजय मानला गेला. या कराराने सोव्हिएत रशिया व जपान या राष्ट्रांनी आपापल्या एक आघाड्या शांत करून दुसऱ्या आघाड्यांवर लक्षकेंद्रित करण्यासाठी मुक्त झाले.

## ५. जर्मनीचे सोव्हिएत रशियावर आक्रमण (ऑपरेशन बारबॅरोसा)

ऑपरेशन बारबॅरोसा हे दुसऱ्या महायुध्दात जर्मनीने सोवियेत संघावर केलेल्या आक्रमण-मोहिमेचे सांकेतिक नाव होते. सुरवातीला हिटलरने फ्रान्सला हरविले. आता ब्रिटनला नमवणे सहज शक्य आहे असे हिटलरला वाटत होते. परंतु ही त्याची अपेक्षा यशस्वी होवू शकली नाही. ब्रिटन सहजासहजी आपल्या हाती येणार नाही हे पाहून जर्मनीने आपली मोहीम सोव्हिएत रशियाकडे वळवली. परंतु याच काळात सोव्हिएत रशियाने हिटलरच्या आक्रमणाचा अंदाज घेऊन आपले सामर्थ्य वाढविणे सुरूच ठेवले होते.

हिटलरने ब्रिटनसोबत तडजोडीचे धोरण सुरू करण्यासाठी १० मे १९४०रोजी आपला खास दूत रुडॉल्फ हेस यास ब्रिटनला पाठवले. यात त्याने ब्रिटन समोर एक प्रस्ताव ठेवला यामध्ये,

१) जर्मनीने युरोपात जिंकलेले प्रदेश जर्मनीकडे असू द्यावे,

२) पूर्व युरोपात जर्मनीला आक्रमण करण्याची मोकळीक द्यावी.

३) जर्मनी ब्रिटिश साम्राज्यातील प्रदेशांना धक्का लावणार नाही. या तरतूदी होत्या.

जर्मनीचा या प्रस्तावावर कितपत विश्वास ठेवावा याबद्दल ब्रिटनला धास्ती होती. ब्रिटिश लोकमत सुध्दा या प्रस्तावाच्या विरोधी होते. त्यामुळे ब्रिटनची अनिश्चितता लक्षात घेऊन हिटलर सोव्हिएत रशियाकडे वळला. युरोपवर प्रभुत्व प्रस्थापित करण्यासाठी सोव्हिएत रशियाला नेस्तनाबूत करणे आवश्यक आहे असे हिटलरचे मत होते. फिनलंड-रशिया युध्दामुळे सोव्हिएत रशियाची लष्करी यंत्रणा निकृष्ट दर्जाची आहे व ती जर्मनीच्या उच्च, आधुनिक लष्करासमोर टिकाव धरू शकणार नाही अशी हिटलरची समजूत होती. यातून रशियाची व्यवस्था कोलमडून सोव्हिएत रशियाचे विघटन घडून येईल अशी त्यास खात्री होती.

२२ जून १९४१ रोजी जर्मनीने सोव्हिएत रशियावर आकस्मिक हल्ला केला. या हल्ल्यासाठी सोव्हिएत रशियाच्या सीमेवर असलेल्या हंगेरी, स्लोव्हाकिया, रुमानिया, फिनलंड, इटली या राष्ट्रासोबत जर्मनीचे लष्करी मदतीचे करार झालेले असल्याने याच बरोबर नव्यानेच जिंकलेल्या फ्रान्सची ही साधनसामुग्री, लष्करी सामर्थ्य सोव्हिएत रशियाविरुध्द जर्मनीने युध्दात वापरले.

## १. सोव्हिएत रशिया-ब्रिटन (सामंजस्य) करार

ब्रिटनच्या अखंड साम्राज्याचे संरक्षण जर व्हायचे असेल तर सोव्हिएत रशिया विरुध्दच्या युध्दात जर्मनीचा पराभव होणे आवश्यक होते हे ब्रिटनला कळून होते. म्हणूनच सोव्हिएत रशियाच्या साम्यवादाला ब्रिटनचा कडाडून विरोध असला तरी स्वतःच्या राष्ट्राच्या संरक्षणासाठी सोव्हिएत रशियाला जर्मनी विरुध्द इंग्लंड सर्वोतपरी मदत करील अशी घोषणा २२ जुलै १९४१ रोजी आकाशवाणीवरून ब्रिटनचे पंतप्रधान विस्टन चर्चिल यांनी केली. ब्रिटन पाठोपाठ भांडवलशाही अमेरिकेनेही साम्यवादी सोव्हिएत रशियाला २४ जून १९४१ रोजी मदतीचे वचन देण्याची घोषणा केली. लंडन व मॉस्को यांच्यात १२ जुलै १९४१ रोजी जर्मनीविरुध्द परस्पर मदतीचा प्राथमिक स्वरूपाचा करार झाला. अमेरिकेचा हंगामी सचिव सम्नर वेल्स याने २ ऑगस्ट १९४१ रोजी जर्मनीविरुध्द सोव्हिएत रशियाला अमेरिका सर्व प्रकारची मदत देईल असे रशियन वकिलाला कळविले. याच पार्श्वभूमीवर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष फ्रँनक्लीन रुझवेल्टचा खास दूत हॅरी हॉपकिन्सयाने युध्दपरिस्थितीत सोव्हिएत रशियाच्या गरजा जाणून घेण्यासाठी प्रथम लंडनला जावून तिथून मॉस्कोला भेट दिली. अमेरिकेने रशियाला ३० ऑक्टोबर १९४१ रोजी 'लेंडलीज' म्हणजे उधार उसनवार योजने अंतर्गत एक अब्ज डॉलरची लष्करी साहित्याची मदत पाठवली.

## २. सोव्हिएत रशिया-जर्मनी युध्दास सुरुवात

नाझी जर्मनीचे आक्रमण २१ व २२ जुलै १९४१ रोजी होणार अशी बातमी रशियन हेरांकडून सोव्हिएत रशियाला १५ जूनलाच मिळाली होती. परंतु सोव्हिएत रशिया सरकारची नाझी आक्रमणाला तोंड देण्याची तयारी त्यावेळी झालेली नव्हती. हिटलरने आपल्या सर्व प्रकारच्या अद्ययावत लष्करी शस्त्रास्त्रांसह रशियावर तीन दिशांनी आक्रमण केले.

१. दक्षिण दिशेकडून-सोव्हिएत रशियावर आक्रमण केलेल्या जर्मन सैन्याचा रोख काळ्या समुद्राच्या दिशेने होता.

२. उत्तर दिशेकडून-नाझी जर्मनी सैन्य बाल्टिक समुद्र प्रदेशातून स्टॅलिनग्राडच्या दिशेने आले.

३. मध्य विभागातील-नाझी सैन्य जनरल वाँन बॉकच्या नेतृत्वाखाली सरळ मास्कोच्या रोखाने.निघाले.

## ३. नाझी लष्कराचा उद्देश

१) सोव्हिएत रशियाची मुख्य कृषीक्षेत्र (सवखोज) व प्रमुख औद्योगिक केंद्रे यांना वेढा देऊन लाल लष्करास पूर्णपणे नामोहरम करणे,

२) आर्केजलपासून आस्त्राखानपर्यंत जर्मन नियंत्रण रेषा प्रस्थापित करून हिवाळ्याच्या आत सोव्हिएत रशिया बरोबरच्या युध्दाची यशस्वी अखेर करणे,

## ४. युध्दाची वाटचाल

सुरुवातीला सोव्हिएत रशियावरील जर्मनीच्या आक्रमणाची वाटचाल प्रचंड वेगाने झाली. परंतु ही परिस्थिती फार काळ सोव्हिएत रशियाच्या प्रतिउत्तरासमोर टिकाव धरू शकली नाही. जर्मनीच्या हिटलरचे युरोपमधील राष्ट्रांवर यशस्वी ठरलेले युध्दतंत्र सोव्हिएत रशियाच्या भूमीवर परिणामकारक ठरणार नाही याची जाणीव सोव्हिएत रशिया आघाडीवर असलेल्या नाझी प्रमुखांना झाली. रशियाची युध्दनिती निर्धारित करण्याचे कार्य रशियन लष्कराचा सरसेनापती मार्शल जोसेफ स्टॅलिन यांच्या अध्यक्षतेखाली सर्वोच्च संरक्षण समितीकडे सोपवण्यात आले होते.

## ५. सोव्हिएत रशियाची व्यूहरचना :-

नाझी आक्रमणाचा पहिला जोम रशियन भूमीवर शांत होऊ द्यावा, शत्रूला काही अंतरात आत येऊ द्यावे, शत्रूच्या दळणवळण पुरवठ्याचा मार्ग लांबू द्यावा, रशियन लष्कराच्या लहान-लहान तुकड्यांनी गनिमीकावा युध्दनीतीने शत्रूची अधिकाधिक हानी करावी, या सर्व गोष्टी करताना रशियन लष्कराने प्रतीहल्लयासाठी सिध्द व्हावे. अशा योजना आखण्यात आल्या. याखेरीज दुसरा पर्याय त्यांच्याकडे नव्हता.

या गोष्टी साध्य करण्यासाठी रशियाला शत्रूचा प्रतिकार करताना माघार घेण्याच्या नीतीमुळे सोव्हिएत रशियाला आर्थिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचे असलेले पश्चिमेकडील प्रदेश सोडून देणे भाग पडले, वैज्ञानिक, कुशल कामगार, यंत्रे, यांत्रिक उपकरणे, या सोबत त्या क्षेत्रातील सर्व कारखाने खाली करण्यात आले, त्या प्रदेशातील लक्षावधी नागरिकांना दूर सैबेरियात हलविण्यात आले. या ठिकाणी कारखाने पुन्हा उभारण्यात येऊन युध्द कार्यात आवश्यक असणारे उत्पादनास सुरुवात करण्यात आली.

सोव्हिएत रशियाने या क्षेत्रातून माघार घेताना या क्षेत्रातील रेल्वे, रस्ते, पूल, कच्चा मालाचे व पाण्याचे साठे या सर्व गोष्टी शत्रूच्या हाती सापडणार नाही याची काळजी घेतली.

## ६. मॉस्कोचा लढा

सन१९४१ च्या शेवटी मध्य विभागात महत्त्वपूर्ण युध्द झाले. तेथे शत्रू राष्ट्रांचे लक्ष मॉस्को शहरावर होते. सोव्हिएत रशियाची राजधानी व देशाचे एक मोठे औद्योगिक व दळणवळणाचे केंद्र म्हणून मॉस्को शहर प्रसिध्द होते. मॉस्को शहरास वेढा देण्यासाठी जर्मन लष्कर दोन दिशांनी आले होते. जर्मन सैन्याने २ ऑक्टोंबर रोजी मॉस्को विरुध्द हल्यास प्रारंभ केला. हिटलरला असा विश्वास होता की थोड्याच दिवसात मॉस्को शहर नाझी फौजांच्या वर्चस्वाखाली असेल. जर्मन सैन्य आता क्रेमलिन या शहरापासून केवळ पाच मैल दूर होते. स्टॅलिनने मॉस्को पूर्णपणे जर्मनी फौजेच्या वेड्यात सापडलेले आहे अशी घोषणा १९ ऑक्टोबरला केली. मॉस्कोला पडलेल्या वेढ्यामुळे मॉस्को येथील सरकार क्युबिशेव येथे हलवण्यात आले. परंतु सर्वोच्च समितीचा प्रमुख म्हणून स्टॅलिन क्रेमलिन येथेच राहिला. या ठिकाणी आता मॉस्कोला वाचविण्यासाठी सोव्हिएत लष्कराचा निर्धार, शौर्य व त्यांनी दिलेला निकराचा लढा, केवळ यामुळेच रशियाचे रक्षण झाले. एवढेच नव्हे तर नाझी सैन्याला सोव्हिएत रशियाच्या लष्करी सामर्थ्याचा पहिला प्रत्यय मॉस्को संघर्षातच आला.

यादवी युध्दाच्या वेळेतील भरवशाचे व जुन्या पध्दतीच्या युध्दतंत्रात निष्णांत असलेले सेनापती बोरोशिलव, बुधोनी,तिमोशेन्को हे तिघेही जर्मनीच्या आक्रमणाविरुध्द अपयशी ठरत होते. स्टॅलिनने यांच्याऐवजी सेनापती म्हणून तरुण सेनानायकांची नियुक्ती केली. मॉस्कोच्या संरक्षणाची जबाबदारी जॉजी झुकोव याच्यावर देण्यात आली. त्याच्या मदतीसाठी जपानच्या आघाडीवर असलेले पूर्वेकडील ताज्या दमाचे सैन्य देण्यात आले व सर्व सिध्दता झाल्यावर ७ डिसेंबर रोजी झुकोवने जर्मनीवरील प्रतिहल्ल्यास प्रारंभ केला.

रशियन सेनेने या आक्रमणासाठी टी-३४ या रणगाड्याचा प्रथमच मारा जर्मन तोफांवर सुरू केला. याचवेळी हात पायांना बधिर करणारा रशियन हिवाळा रशियन लष्करास वरदान व जर्मनांसाठी शाप ठरला. जर्मन लष्करास हिवाळ्यात आवश्यक असलेली गरम कपडे व बूट पुरवण्याची आवश्यकता हिटलरला वाटली नाही. त्यामुळे जर्मन सैनिकांच्या दुर्दशेला पारावार उरला नव्हता.

अशा परिस्थितीत रशियन लष्कराने चढविलेला प्रतिहल्ला पूर्णपणे यशस्वी ठरला. सोव्हिएत रशियाच्या मरणप्राय हिवाळ्यात व रशियन सैनिकांच्या प्रतीहल्ल्यात १/४ जर्मन सैनिक मृत्युमुखी पडले. क्लीन व कालिनीन ही शहरे १६ डिसेंबर १९४१ पर्यंत रशियन लष्कराने परत जिंकून घेतले. मध्य आघाडीवरील जर्मन सैन्य ५० ते २०० मैल मागे घेण्यात रेटण्यात रशियन सैन्याला यश आले व अशा पध्दतीने रशियन लष्कराने मॉस्को शहरास वाचविले.

## ७. जर्मनीची सोव्हिएत रशियातील आगेकूच

डिसेंबर १९४१ मध्ये मॉस्को शहर सोव्हिएत रशियाच्या ताब्यात आले असले तरी नाझी संकटाची शृंखला अजूनही सोव्हिएत रशियावर सुरू होती. नाझी सैनिकांनी सोव्हिएत रशियाच्या आर्थिक दृष्ट्या महत्त्वाचा व समृध्द असा प्रगत प्रदेश आपल्या अधिपत्याखाली आणला होता. यावेळी हिटलरचे लक्ष सोव्हिएत रशियाच्या कॉंकेशस या खनिज तेलाने समृध्द असलेल्या प्रदेशावर केंद्रित झाले होते. जर्मनांच्या

प्रखर आक्रमणामुळे सोव्हिएत रशियाच्या भूमीपासून जवळजवळ संपर्क तुटलेल्या क्रीमियाच्या प्रदेशात रशियाला जर्मनीचा प्रतिकार करणे कठीण होते.

सेवास्तोपोलच्या संरक्षणासाठी रशियन फौजांचा प्रखर प्रतिकार २५० दिवसांपासून प्राणपणाने चालला होता. परंतु ३ जुलै १९४२रोजी सेवास्तोपोल जर्मनीच्या हाती सापडले. या विजयानंतर लगेच जर्मन सेनेने उत्तर कॉकेशस प्रांतावर हल्ला केला व ९ ऑगस्ट १९४२ रोजी खनिज तेलासाठी प्रसिध्द असलेले मायकोप जर्मनांनी काबीज केले. या विजयामुळे नाझी फौजा कॅस्पियन समुद्राच्या शंभर मैलावर येऊन पोहोचल्या होत्या.

## ८. स्टॅलिनग्राडचा लढा आणि विजय

नाझी जर्मनी व सोव्हिएत रशिया या दोन्ही राष्ट्रांचे भवितव्य ठरविणारा निर्णायक व घनघोर लढा म्हणजे स्टॅलिनग्राडचा संघर्ष होय. स्टॅलिनग्राड हे शहर वोल्गा नदीवर वसलेले आहे. जर्मन लष्कराच्या सहाव्या तुकडीचा सेनापती फिल्ड मार्शल फेड्रिक पोलस याने १४ सप्टेंबर १९४२ पासून आक्रमणास सुरुवात केली. दररोज जर्मन लष्कर दोन हजार पेक्षा जास्त बॉम्बफेकी विमानांनी त्या शहरावर बॉम्बफेक करत होती. या शहराचे रूपांतरण दगड मातीच्या ढिगाऱ्यात झाले होते. सप्टेंबर महिन्याच्या अखेरपर्यंत स्टॅलिनग्राडचा मोठा भाग जर्मनांच्या हाती आला होता.

रशियन लष्कर व स्टॅलिनग्राड येथील जनता आपल्या शहरासाठी व मातृभूमीसाठी प्राणपणाने लढत होती. मशिनगन्स, बंदुका, खंजीर, चाकू अशा मिळेल त्या शस्त्रांनी रशियन सैनिक व जनता अखेरच्या श्वासापर्यंत जर्मनांशी लढा देत होती.

रशियन सैन्याने जर्मनांचे दळणवळणाचे सर्व मार्ग बंद केले. अन्नधान्य व इतर साधन सामुग्रीचा पुरवठा करण्यासाठी जर्मन केवळ विमानांवर अवलंबून होते. परंतु सोव्हिएत विमानभेदी तोफांमुळे जर्मनांची विमाने रोज पाडली जात होती. त्यामुळे जर्मन सैनिकांना हवाईमार्गाने सुध्दा पुरवठा होऊ शकत नव्हता. जर्मन सैन्याने अनेक वेळा रशियन लष्कराने घातलेला वेढा फोडण्याचा प्रयत्न केला परंतु त्यात त्यांना यश आले नाही.

जानेवारी १९४३ पर्यंत फिल्ड मार्शल पॉलसच्या सहाव्या जर्मन सैनिक तुकडीची अवस्था अत्यंत बिकट व दयनीय झाली होती. हिटलर माघार घेण्यास तयार नव्हता. शेवटी ३१ जानेवारी १९४३ रोजी फिल्डमार्शल पॉलसने रशियन फौजेसमोर शरणागती पत्करली. जर्मनीचे सहावे लष्कर रशियाचे युध्दकैदी बनले होते. यामध्ये सेनापतींचाही समावेश होता. या स्टॅलिनग्राडच्या लढ्यात सोव्हिएत रशियाला जर्मनीकडून २४ जर्मन जनरल, २५०० लष्करी अधिकारी, एकूण साडेतीन लक्ष जर्मन लष्करापैकी शेवटी उरलेले, जिवंत राहिले दीड लक्ष जखमी लष्करी सैनिक, ६७ हजार तोफा, १४४२ लहान तोफा, १५५० रणगाडे, ९०,००० बंदुका, ६११०२ ट्रक्स, ७५० विमाने इत्यादी युध्द साहित्य मिळाले.

## ९. स्टॅलिनग्राडच्या विजयाचा परिणाम

१. नाझी लष्कराच्या अजिंक्यत्वाचा डोलारा कोसळला,

२. सोव्हिएत रशिया सोबतच संपूर्ण युरोपला आत्मविश्वास वाढू लागला. रशियन सैनिकांच्या शौर्याचा, अपार सहनशक्तीचा व राष्ट्रनिष्ठेचा पूर्णपणे प्रत्यय या लढ्यात आला,

३. रशियन लष्कराबरोबर जनतेचेही नीतिधैर्य उंचावले,

४. लष्कराचे यापुढील आघाडीवरील जर्मन लष्करावरील आक्रमणे अधिक प्रखर झाले, रशियन फौजांनी फेब्रुवारी अखेरीस-१९४२ च्या मोहिमात जर्मनीने व्यापलेला संपूर्ण प्रदेश आपल्या ताब्यात घेतला. सन १९४२ -१९४३ च्या लष्करी मोहीममुळे व तेथील विजयामुळे एकूण १८५००० चौरस मैलाचा रशियन प्रदेश शत्रूच्या ताब्यातून मुक्त करण्यात आला. ३ लक्ष ४० हजार जर्मन सैनिक युध्दकैदी बनले. ८ लक्ष ५० हजार जर्मन सैनिक मारले गेले. सोव्हिएत संघाची हानी यापेक्षाही भयंकर होती. अधिकृत अहवालानुसार जवळपास ४२ लक्ष रशियन मारले गेले होते.

## १०. दुसऱ्या महायुध्दाचा उत्तरार्ध व सोव्हिएत रशिया

### १) फिनलंड :-

सोव्हिएत रशियाच्या युध्द समाप्तीच्या मोहिमांची सुरुवात सोव्हिएत रशियाच्या फिनलंड वरील आक्रमणाने सन १९४४ च्या उत्तरार्धात झाली. सोव्हिएत रशियाच्या आक्रमणासमोर फिनलंडचा टिकाव धरणे शक्य नव्हते. शेवटी अक्ष राष्ट्रांशी संबंध तोडून फिनलंडने १९ सप्टेंबर १९४४ रोजी सोव्हिएत रशियासोबतच्या युध्दबंदी करारावर सह्या केल्या. या करारात सोव्हिएत रशियाला फिनलंडकडून निकेलच्या खाणी, पेस्तेमोचा प्रदेश मिळाला. त्याऐवजी फिनलंडला सोव्हिएत रशियाकडून १९४० मध्ये सोव्हिएत रशियाने काबीज केलेला हान्गो प्रदेश व पन्नास वर्षाकरिता पोरक्क्ल उद बंदराचा प्रदेश फिनलंडला दिला.

### २) रुमानिया :-

रुमानियाचा राजा मायकलने युध्दकाळात अक्ष राष्ट्रांशी मैत्री केली होती. परंतु सोव्हिएत रशियाची वाढती शक्ती पाहून २३ ऑगस्ट १९९४ रोजी सोव्हिएत रशियाविरोधी युध्द बंद करून रुमानियाचे युध्दकाळातील मित्रराष्ट्र जर्मनी व हंगेरी यांच्याविरुध्द युध्द घोषणा केली. रुमानिया-रशिया यांच्यात १२ सप्टेंबर १९४४ रोजी अनाक्रमणाचा करार झाला. त्यात २८ जून १९४० रोजी प्रस्थापित झालेल्या उभय राष्ट्रांतील सीमारेषेवर शिक्कामोर्तब करण्यात आली. याचबरोबर आठ वर्षाच्या काळात ३०० दशलक्ष डॉलरची नुकसान भरपाई रुमानियाने रशियाला द्यावी असे निश्चित झाले.

### ३) बल्गेरिया :-

रुमानियानंतर रशियन फौजा बल्गेरियाकडे वळल्या. ऑक्टोंबरच्या शेवटी बल्गेरियाने सुध्दा जर्मनांची साथ सोडून संयुक्त राष्ट्र संघाच्या पक्षात सामील झाले.

### ४) बेलग्रेड :-

रशियन लष्कराने २० ऑक्टोबर रोजी बेलग्रेड काबीज केले व युस्लोव्हाकियातून नाझींची हकालपट्टी केली.

### ५) हंगेरी :-

जानेवारी १९४५ मध्ये हंगेरी सरकारने सोव्हिएत रशियाविरुध्द युध्दबंदी करून जर्मनीविरुध्द युध्द घोषणा केली.

अशाप्रकारे १९४५ च्या सुरुवातीला फिनलंड, रुमानिया, बल्गेरिया, हंगेरी, युस्लोव्हाकिया ही पूर्व युरोपची सर्वराष्ट्र नाझींच्या नियंत्रणातून मुक्त झाली.

## ११. याल्टा परिषद (क्रीमिया परिषद) (४ ते ११ फेब्रुवारी १९४५)

सन १९४५ च्या प्रारंभी दुसऱ्या महायुध्दाचा निकाल कसा लागणार याविषयी लोकांमध्ये पुसटशी कल्पना होती. त्याच दृष्टीने जर्मनीच्या अखेरच्या मोहिमा, त्या राष्ट्राचे भवितव्य, युध्दसमाप्तीनंतरचे सहकार्य व शांतता याबद्दल निश्चित योजना आखण्यासाठी फेब्रुवारी १९४५ मध्ये अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष फ्रँकलिन रुझवेल्ट, सोव्हिएत रशियाचे राष्ट्रप्रमुख जोसेफ स्टॅलिन व इंग्लंडचे पंतप्रधान विस्टन चर्चिल या तीन राष्ट्र प्रमुखांची बैठक जर्मनीच्या आक्रमणांनी उध्द्वस्त झालेल्या याल्टा या शहरात (क्रिमियाजवळ) ४ ते ११ फेब्रुवारी १९४५रोजी आयोजित करण्यात आली होती.

या तीन राष्ट्रप्रमुखांबरोबरच त्यांचे परराष्ट्रमंत्री, स्टेटीनियस, मालोतोव व एडन होते. क्लर्क-केर, हॅरी होप्किंस,जेम्स बिर्नेस, ॲबरेल हॅरिमन असे नावाजलेले नेते व त्या राष्ट्राचे लष्करी खात्याचे अधिकारी असे याल्टा शहरात हजर होते. युध्दकाळातील सर्व परिषदांमध्ये ही परिषद सर्वात महत्त्वाची व वादग्रस्त ठरली.

या परिषदेत खालील निर्णय घेण्यात आले.

१. जर्मनीने बिनशर्त शरणागती पत्करावी,

२. जर्मनीचे सोव्हिएत रशिया, इंग्लंड व अमेरिका या तीन राष्ट्रात प्रादेशिक विभाजन व्हावे,

३. फ्रान्सला जर्मनीच्या प्रदेशात हिस्सा द्यायचा की नाही याबद्दल या नेत्यात एकमत नव्हते,

४. दोस्त राष्ट्रांच्या झालेल्या हानीची भरपाई जर्मनीने करावी.

५. सर्वात जास्त हानी सोव्हिएत रशियाची झाली, म्हणजे भरपाईची निम्मी रक्कम रशियाला मिळावी अशी मागणी सोव्हिएत रशियाने केली. रशियाच्या या मागणीस चर्चिलचा विरोध होता. परंतु शेवटी मागणी विचारात घेण्यात आली.

६. पोलंडचा सीमाप्रश्न विशेषत: जिकरीचा ठरला, कारण कर्झन रेषा ही रशिया पोलंड यातील सीमा रेषा ठरावी असे रशियाचे म्हणणे होते. पोलंडचा जो प्रदेश सोव्हिएत रशियाकडे येईल

त्याची भरपाई जर्मनीचा काही प्रदेश पोलंडला देण्यात यावा. या भूमिकेला चर्चिलचा विरोध होता. परंतु तो निष्फळ ठरला. स्टॅलिनच्या उपरोक्त सुचनेला मान्यता देणे रूजवेल्ट, चर्चिलला भाग पडले.

ह्या महत्त्वपूर्ण मुद्दा सोबतच–

१. जर्मनीच्या नाझी प्रभावापासून मुक्त झालेल्या पूर्व युरोपीय राष्ट्रांना त्याचे राजकीय व आर्थिक प्रश्न लोकशाही मार्गाने सोडवण्यासाठी दोस्त राष्ट्रांनी मदत करावी,

२. जपान विरुध्दच्या लढाईत सोव्हिएत रशियाचे सहकार्य मिळविणे,

३. जगातील शांततेसाठी संयुक्त राष्ट्र संघटना उभारणे.

### याल्टा परिषदेचे वैशिष्ट्ये :–

१. युध्दानंतर निर्माण झालेली राजकीय परिस्थिती विचारात घेऊन पाश्चिमात्य निरीक्षकांनी व नेत्यांनी या परिषदेवर प्रखर टीका केली.

२. याल्टा परिषदेच्या निर्णयात सोव्हिएत रशियाचा वरचष्मा स्पष्टपणे प्रतिबिंबित झाला होता.

३. याल्टा परिषदेच्या निर्णय हा न केवळ तीन राष्ट्र प्रमुखांच्या भावनांचा परिपाक नव्हता तर यात बहुसंख्यांक जनतेची मते प्रतिबिंबित झाली होती.

४. लोकशाहीचे प्रतीक म्हणून दोस्त राष्ट्रातील बहुसंख्य जनतेने या परिषदेच्या निर्णयाचे स्वागत केले.

## १२. जर्मनीची शरणागती :–

सोव्हिएत रशिया, फ्रान्स, इंग्लंड, अमेरिकेच्या जर्मनीविरुध्दच्या अखेरच्या मोहिमांना जानेवारी १९४५ पासून सुरुवात झाली. सोव्हिएत रशियाने १७ जानेवारी १९४५ रोजी वॉर्सा शहर काबीज केले. पोलंडमधून नाझी सैन्याची पूर्णपणे माघार झाली होती. पश्चिमेकडून दोस्त राष्ट्रांच्या फौजा जर्मनीच्या दिशेने वाटचाल करीत होत्या. दोस्त राष्ट्रांच्या संयुक्त फौजा २७ एप्रिल १९४५ रोजी एल्ब नदीच्या किनाऱ्यावर एकत्र आल्या. या कारवाहीमुळे संपूर्ण पूर्व जर्मनी सोव्हिएत रशियाच्या प्रभावाखाली आला. तर पश्चिम जर्मनी अन्य दोस्त राष्ट्रांच्या प्रभावाखाली आला. रशियन फौजांनी बर्लिन सभोवताली आपला लष्करी पाश आवळला. यामुळे बर्लिनमधील जर्मनीची लष्करी कोंडी झाली. यावेळी मार्शल झुकोवाच्या तोफा बर्लिन वर आग ओकत होत्या. मृत्यू किंवा शरणागती याशिवाय अन्य पर्याय जर्मनीसमोर उरला नव्हता.

१ मे १९४५ रोजी जर्मनीच्या चान्सलरच्या कार्यालयात हिटलरने आत्महत्या केली. जर्मन ग्रँड ऍडमिन क्लार्ल डोनित्सयाने त्याच्या मृत्यूची घोषणा नभोवाणीवरून केली. सन २ मे १९४५ रोजी पहाटे बर्लिन येथील १ लाख ३० हजार जर्मन सैनिकांनी सोव्हिएत रशिया समोर शरणागती पत्करली. संपूर्ण बर्लिन आता सोव्हिएत रशियाच्या आधिपत्याखाली होते. जर्मनीच्या चॅन्सलर कार्यालयावर सोव्हिएत रशियाचा झेंडा

मानाने फडकू लागला होता. ५ मे १९४५ रोजी फील्डमार्शल मॉण्टगोमेरी यांच्याशी क्लार्ल डोनित्सने शरणागतीची बोलणे केले. ८ मे रोजी रशियन सेनापती मार्शल झुकोव, अमेरिकन जनरल स्पाट्झ, ब्रिटीश वायुदल प्रमुख सर आर्थर टेडर यांच्या उपस्थितीत बर्लिन येथे शरणागतीच्या करारावर जर्मनीने स्वाक्षऱ्या केल्यानंतर जर्मनी विरुध्दचा लढा संपुष्टात आला.

## १३. पॉट्सडॅम परिषद (१७ जुलै १९४५)

जर्मनीच्या पुढील भवितव्याची रूपरेषा निश्चित करण्यासाठी १७ जुलै १९४५ रोजी बर्लिन नजीक असलेल्या पॉट्सडॅम येथे ब्रिटन, सोव्हिएत रशिया व अमेरिका यांच्या प्रतिनिधींची बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीस याल्टा परिषद येथील उपस्थित असलेल्या राष्ट्रप्रमुखापैकी फक्त स्टॅलिन उपस्थित होता. जुलै महिन्यात इंग्लंडमध्ये झालेल्या सार्वत्रिक निवडणुकांत इंग्लंडचा तत्कालीन पंतप्रधान विस्टन चर्चिल यांचा पक्षाचा पराभव झाल्याने त्याच्या ऐवजी इंग्लंडचा नवा प्रधानमंत्री क्लेमेंट ॲटली तर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष रुझवेल्टच्या निधनानंतर राष्ट्राध्यक्ष बनलेला हेन्री ट्रुमन या परिषदेला उपस्थित होते. जर्मनीमुळे जागतिक शांततेला धोका निर्माण होऊ नये म्हणून या राष्ट्रप्रमुखांनी काही महत्त्वपूर्ण निर्णय घेतले. ते खालील प्रमाणे :-

१. जर्मनीतील नाझीवाद, लष्करवाद व युध्द उपयोगी उद्योगधंद्ये पूर्ण नष्ट करावे.

२. जर्मनीला लोकशाही तत्वांची शिकवण दिली जावी,

३. या महायुध्दात सर्वात जास्त हानी सोव्हिएत रशियाची झाल्याने जर्मनीकडून सोव्हिएत रशियास युध्द भरपाई म्हणून बाकी राष्ट्रांपेक्षा मोठा वाटा द्यावा,

४. सोव्हिएत रशियाची नुकसान भरपाई म्हणून रशिया व्याप्त जर्मन प्रदेशातून औद्योगिक यंत्रसामुग्री व अन्य साहित्य (शांतताकालीन गरजांना आवश्यक ती साधनसामुग्री सोडून) युध्द भरपाई म्हणून घ्यावे.

५. फिनलंड, बल्गेरिया, हंगेरी, रूमानिया व पूर्व ऑस्ट्रिया या प्रदेशातील जर्मन मालमत्तेवर सोव्हिएत रशियाचा अधिकार असावा,

६. याल्टा परिषदेतील निर्णयावर या परिषदेत शिक्कामोर्तब करण्यात आले.

## १४. जपानची शरणागती-दुसऱ्या महायुध्दाचा शेवट

जर्मनीने शरणागती पत्करली तरी जपान अजूनही दोस्त राष्ट्राविरुध्द आगेकूच करीत होते. जोपर्यंत जपान शरण येत नाही तोपर्यंत दुसऱ्या महायुध्दाचा शेवट होणे शक्य नव्हते. याल्टा परिषदेत ठरल्याप्रमाणे जर्मनीच्या शरणागतीनंतर ९० दिवसाच्या नंतर ८ ऑगस्ट रोजी सोव्हिएत रशिया-जपान विरुध्द युध्दात उतरले. सोव्हिएत रशिया मांचुरियात तीन दिशांनी रशियाची लाल सेना जपान विरुध्द आगेकूच करू लागली. याचवेळी रशियन नौदल व लष्कर यांनी संयुक्तरित्या जपानच्या दक्षिण साखलिन बंदरावर आक्रमण केले. सोव्हिएत रशियाच्या युध्द प्रवेशानंतर चार-पाच दिवसातच जपानच्या लष्करी सामर्थ्याचा कणा

मानल्या गेलेल्या मांचुरियातील जपानचे क्वाटुंग लष्कर नामोहरम झाले. शेवटी सोव्हिएत रशिया समोर जपानी लष्करास शरण येणे भाग पडले.

या वेळेपर्यंत जपानवर अमेरिकेने ६ ऑगस्ट १९४५ रोजी हिरोशिमा व ९ ऑगस्ट १९४५ रोजी नागासाकीवर अणुबाँब टाकला. शेवटी अणुबाँबच्या भयंकर संहारशक्तीने हादरून जाऊन जपानने १४ ऑगस्ट १९४५ रोजी बिनशर्त शरणागती मान्य केली. अमेरिकेच्या 'मिसूरी' या युध्दनौकेवर जपानच्या शरणागती करारावर स्वाक्षऱ्या झाल्या. यावेळी सोव्हिएत रशियाच्या वतीने लेफ्टनंट जनरल कुझामा देरेवेन्को यांनी स्वाक्षरी केली. अशाप्रकारे दुसऱ्या महायुध्दाचा शेवट झाला.

## १५. युध्दोत्तर सोव्हिएत रशिया-समस्या व उपाययोजना

### १) मनुष्यहानी :-

दुसऱ्या जागतिक युध्दात सर्वात जास्त हानी सोव्हिएत रशियाची झाली होती. युध्दकाळात सोव्हिएत रशियाचा ८ लक्ष चौरस मैलाचा प्रदेश जर्मनांनी बेचिराख केला होता. सोव्हिएत रशियाच्या प्रभावाखालील १७१० शहरे, ७० हजार गावे, ३५००० कारखाने, ६० लक्ष इमारती व ४० हजार दवाखाने नष्ट झाले होते. एकूण २ कोटी लोक प्राणाला मुकले होते. त्यातील सोव्हिएत रशियातील लष्करातील तीस लाख सैनिक होते. अडीच कोटी रशियन लोक बेघर झाले होते. एकट्या स्टॅलिनग्राडच्या लढ्यातील मनुष्य हानी ही एवढी होती की संपूर्ण दुसऱ्या महायुध्दाच्या काळात कामी आलेल्या अमेरिकनांपेक्षा जास्त होती.

### २) आर्थिक हानी :-

दुसऱ्या महायुध्दाचा सोव्हिएत रशियाच्या मनुष्यहानी बरोबरच आर्थिक हानी सुध्दा मोठ्या प्रमाणात झाली होती. सोव्हिएत रशियाचे जर्मनी व जपान विरुध्दच्या युध्दात ४८५ कोटी रुबल्स खर्ची पडले होते. ही रक्कम सोव्हिएत रशियाच्या सहा वर्षाच्या एकूण राष्ट्रीय उत्पन्नापेक्षा जास्त होती. दुसऱ्या महायुध्दाच्या औद्योगिक उत्पादनावर मात्र अत्यंत विपरीत परिणाम झाला होता. लागवडीखालील असलेली ६०% कृषी जमीन प्रभावित झाली होती. शेतीच्या गुराढोरांचा फार मोठ्या प्रमाणात नाश झाला होता.

### ३) सैनिकांचे पुनर्वसन :-

दुसऱ्या महायुध्दात सोव्हिएत रशियातील पूर्ण विजयानंतर तर युरोप व पूर्वेकडील विविध आघाडीवर लढत होती. या सैनिकांची संख्या वीस लाख होती. सतत चार वर्षाच्या युध्द संघर्षानंतर या सैनिकांची स्वगृही पुनर्वसन आवश्यक होते. लष्करी मोहिमा चालू असताना पश्चिम युरोपात राहून आलेले रशियन सैनिक सोव्हिएत रशियात परतले तेव्हा त्यांची कसून तपासणी करण्यात आली. ज्या सैनिकांची सोव्हिएत निष्ठा अभंग व दृढ आहे अशांनाच त्यांच्या घरी जाण्याची परवानगी देण्यात आली. ज्यांच्या निष्ठेबद्दल साशंकता होती त्यांना सोव्हिएत रशियाच्या पुनर्रचनेच्या कार्यात जुंपण्यात आले. सैनिक युध्दावरून परतत असताना त्यांना दिलासा देणे, त्यांच्या राहण्याची सोय करणे व त्यांना राष्ट्राच्या अर्थ जीवनात सामावून घेणे ही

पहिली गरज होती. यासाठी उपाय म्हणून रशियन सरकारने सर्वात मोठ्या वयोगटातील सैनिकांची पथके विसर्जित केली. युध्दकाळात महत्त्वपूर्ण कामगिरी बजावणाऱ्यांना सन्मानदर्शक पदव्या व पदके देऊन गौरवण्यात आले. अधिकारी वर्गाला, जखमींना, व धारातीर्थी पडलेल्या सैनिकांच्या कुटुंबांना खास सवलती व मदत घोषित करण्यात आली.

## ४) महागाईवर नियंत्रण :-

दुसऱ्या महायुध्दाच्या काळात रशियावरील जर्मनीच्या आक्रमणामुळे व सोव्हिएत रशियाच्या युध्द व्यस्ततेमुळे उपभोग्य वस्तूंचे उत्पादन मोठ्या प्रमाणात घटले. त्यामुळे उपभोग्य वस्तूंचे किंमतीत भरमसाठ वाढ झाली होती. यावर रशियन सरकारला नियंत्रण आणणे आवश्यक होते. यादृष्टीने युध्दकाळात आकारण्यात आलेले कर १९४५ च्या अखेरीस रद्द करण्यात आले.

१९४७ मध्ये रशियन सरकारने नवीन चलन सुरू केले. नव्या एक रुबलला जूने १० रुबल्स या प्रमाणात जुनी मुद्रा मागे घेण्यात आली. बँकातील लोकांच्या ठेवी वर रोख्यांचे मूल्यही कमी करण्यात आले. अन्नधान्याच्या व अन्य जीवनावश्यक वस्तूंच्या किमती कमी करण्यात आल्या. सरकारतर्फे होणाऱ्या धान्य वितरणाच्या प्रमाणात वृध्दी करण्यात आली.

## ५) शासकीय धोरणात बदल :-

युध्द समाप्तीनंतर पाश्चिमात्य राष्ट्रांशी वाटाघाटी करणे सुलभ व्हावे या हेतूने शासकीय संरचनेत काही महत्त्वपूर्ण बदल करण्यात आले. सन १९४५ मध्ये युध्दकाळात स्थापित झालेली 'राष्ट्रीय संरक्षण समिती विसर्जित करण्यात आली. या समितीचे कार्य शासनाच्या संबंधित विभागाकडे सोपवण्यात आले. सन१९३९ नंतर सोव्हिएत रशियाकडे आलेले प्रदेश वगळून अन्य सर्व भागात लागू करण्यात आलेला लष्करी कायदा रद्द करण्यात आला. 'कौन्सिल ऑफ पीपल्स कमीसार्स', चे 'कौन्सिल ऑफ मिनिस्टर्स' असे नामांतर करण्यात आले.

## ६) चर्चशी सुसंवाद :-

स्टॅलिनने आपल्या धोरणांमध्ये चर्चशी फारकत घेतली असती तरी, दुसऱ्या महायुध्दाच्या काळात समान शत्रूशी लढा देताना चर्च व सरकार यांच्यात सुसंवाद निर्माण झाला होता. सन १९४५ मध्ये सोव्हिएत रशियात १६०००चर्च होते. दुसऱ्या महायुध्दाच्या संकटकाळात चर्चचे अनुयायी लष्करी गणवेश घालून युध्दभूमीवरील सैनिकांचे मनोधैर्य वाढविण्याचे काम करत होते. स्फूर्ती देत होते. त्यांना सहकार्य करत होते. या संकट काळात केलेल्या सहकार्याची जाणीव स्टॅलिनला होती. त्यामुळे युध्दसमाप्तीनंतर चर्चच्या बाबतीत सरकारी भूमिका सुसंवादाची व सलोख्याची राहील असे आश्वासन स्टॅलिनने दिले. त्यातूनच १९४५ नंतर सोव्हिएत रशियात सुमारे ७० चर्च व मठांची स्थापना करण्यात आली होती. या मठांना सरकारकडून देणग्या देण्यात आल्या. सोव्हिएत रशियातील कीव, कझान, मॉस्को या शहरात सरकारी संमतीने

धर्मशास्त्रविषयक शाळा सुरू करण्यात आल्या. स्टॅलिनने यातून चर्चशी सुसंवाद साधून धार्मिक क्षेत्राला आपल्या सोबत घेतले.

## ७) सोव्हिएत रशियातील सार्वत्रिक निवडणुका (१९४६) :-

सन १९३७ मध्ये झालेल्या निवडणुकांनंतर सोव्हिएत संघात दुसऱ्या महायुध्दामुळे निवडणुका घेण्यात आलेल्या नव्हत्या. दुसऱ्या महायुध्दाच्या समाप्तीनंतर १९४६ मध्ये संपूर्ण सोव्हिएत संघात निवडणुका घेण्यात आल्या. युध्दानंतर सोव्हिएत रशियाच्या प्रदेशात वाढ झाल्याने नवमतदारांची संख्या वाढली होती. या निवडणुकीत प्रत्येक क्षेत्रात पक्षाचा, कामगार संघटना, सहकारी संस्था, अशा पक्षेत्तर सामाजिक संघटनांचा एकच उमेदवार उभा करण्यात आला. निवडणुकांमुळे नेतृत्वात कोणताही बदल करण्यात आला नाही. फक्त एकच बदल झाला तो म्हणजे वयोवृध्द 'कालीनीन' ऐवजी 'सुप्रीम सोव्हिएत', 'प्रेसिडीयमचा' अध्यक्ष म्हणून निकोलस श्वेर्निक यांची नियुक्ती करण्यात आली. सोव्हिएत रशियाच्या प्रशासन व्यवस्थेत प्रमुख म्हणून स्टॅलिन व्यतिरिक्त लावारेन्ति, बेरिया जॉर्जी, मालेन्कोव हे प्रमुख नेते होते.

## ८) पक्ष शुध्दी/साम्यवादी पक्षाच्या संरचनेत बदल :-

दुसऱ्या महायुध्दाच्या काळात साम्यवादी पक्ष प्रवेशाच्या अटी काही अंशी शिथिल करण्यात आल्या होत्या. त्यामुळे ज्यांना साम्यवादी तत्त्वज्ञानाची शिकवण नाही अशांचा भरणा मोठ्या प्रमाणात साम्यवादी पक्षात झाला होता. स्टॅलिनने युध्दसमाप्तीनंतर १९४६ पासून पक्ष शुध्दीची कारवाई सुरू केली. ज्या लोकांची साम्यवादी तत्वज्ञानाबद्दलची निष्ठा संशयास्पद होती अशांची हकालपट्टी करण्यात आली. सदस्य प्रवेशाच्या अटी परत कडक करण्यात आल्या. साम्यवादी तत्वज्ञानाच्या शिक्षणावर भर देण्यात आला. यासाठी 'अकादमी ऑफ सोशल सायन्सेस' मध्ये अभ्यासक्रम आयोजित करण्यात आला.

## ९) लोकशाही तत्त्वांना प्रतिबंध :-

युध्दकाळात अनेक रशियन अधिकारी व सैनिक पश्चिमेतील लोकशाही सरकारच्या संपर्कात आले होते. हे सर्व राष्ट्र भांडवलशाही, लोकशाही असे होते ते समाजवादी तत्वज्ञानाच्याविरोधी होते. भांडवलशाही व लोकशाही यांच्या संपर्क व प्रचार यांचा संसर्गामुळे सोव्हिएत रशियातील जनता सुध्दा त्यांच्या प्रभावाखाली येऊ नये यांचा प्रतिबंध करण्याची आवश्यकता सोव्हिएत रशियाला वाटली. यासाठी रशियन सरकारने खालील उपाय योजना केली. -

१) सोव्हिएत रशियातील केवळ साम्यवादी पक्षाच्या कुशल नेतृत्वामुळेच रशियन जनतेच्या अतुलनीय शौर्य व राष्ट्रभक्तीमुळे नाझी जर्मनीचा नि:पात करणे शक्य झाले असा प्रखर प्रचार करण्यात आला.

२) सन १९४० मध्ये पश्चिमेकडील भांडवलशाही लोकशाही राष्ट्रांशी रशियन जनतेचा जास्त संपर्क येऊ नये यासाठी रशियातून बाहेर जाणाऱ्या बातम्यांवर, रेडिओवरील परकियांच्या भाषणांवर, सोव्हिएत रशियातील विदेशींच्या प्रवासावर अनेक नियंत्रणे आणण्यात आली.

३) रशियन स्त्री-पुरुषांनी परकीयांशी विवाह करू नये, त्याचबरोबर कामकाजाबाबत सल्लामसलत करू नये असे नियम केले गेले.

अशा या नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांना चार ते वीस वर्षांपर्यंत सश्रम कारावासाची किंवा हेरगिरी, घातपात इत्यादी राष्ट्रद्रोही कृत्य करणाऱ्यांना मृत्युदंडाची शिक्षा जाहीर करण्यात आली. सोव्हिएत रशियातील लोकांच्या परकीयांशी शक्यतो संपर्क येऊ नयेत अशी नीती या वेळेस रशियन सरकारने अवलंबली होती.

### ❊ स्वयं-अध्ययन प्रश्न भाग - ३

१. फ्रान्स या देशाने हिटलर समोर .................... रोजी शरणागती पत्करली.

*अ) २२ जून १९४०* *क) २४ जून १९४०*

*ब) २३ जून १९४०* *ड) २५ जून १९४०.*

२. जर्मनीचे रशियावरील आक्रमण ........... या सांकेतांकाने ओळखल्या जाते.

*अ) ऑपरेशन रशिया* *ब) ऑपरेशन रशियन कोड*

*क) मिसुरी* *ड) ऑपरेशन बारबँरोसा.*

३. अमेरिकेने रशियास ............ या योजनेखाली १ अब्ज डॉलरची मदत केली.

*अ) याल्टा* *ब) क्रीमिया* *क) लँडलीज* *ड) बार्बोसा.*

४. मॉस्को शहराच्या संरक्षणाची जबाबदारी ........... याच्यावर देण्यात आली होती.

*अ) जॉर्जी झुकाव* *ब) बोरेशिलाव* *क) बुधोनी* *ड) तिमोशेन्को.*

५. क्रीमिया परिषद ............ या या नावाने सुध्दा ओळखल्या जाते.

*अ) बेलग्रेड परिषद* *ब) फिनलंड परिषद* *क) याल्टा परिषद* *ड) झारीस्तीन परिषद.*

### ४.२.४ जोसेफ स्टॅलिन (१८७९ ते १९५३)

स्टॅलिन याचा जन्म जॉर्जिया प्रांतातील 'गोरी' या गावी एका परंपरावादी सामान्य कुटुंबात १८ डिसेंबर, १८७८ साली झाला. सोव्हिएत संघास जागतिक महासत्ता म्हणून घडविणारे स्टॅलिन यांचे वडील व्यवसायाने चांभार होते. तर आई एकातेरिना जॉर्जियायेव्हाना या गृहिणी होत्या. स्टॅलिन याचे पूर्ण नाव 'जोसेफ व्हीसारीओनोविक जुगाश्विली जोसेफ स्टॅलिन' असे होते. स्टॅलिन या शब्दाचा अर्थ 'पोलाद' असा होतो. त्याला चार भावंडे होती. त्यापैकी तीन भावंडे दारिद्र्य व रोगराईमुळे लहानपणीच दगावली. त्याची आई जोसेफच्या भविष्याबाबत मोठ्या आकांक्षा बाळगून होती. त्याने धर्मसंस्थेत शिक्षण घ्यावे, धर्मोपदेशक बनावे, या हेतूने तो नऊ वर्षाचा होताच तिने त्याला चर्च नियंत्रित शिक्षण केंद्रात पाठविले. त्याला वयाच्या सहा वर्षानंतर 'तिफ्लीस' येथील धर्मशास्त्रीय उच्च शिक्षण केंद्रात पाठविण्यात आले. या ठिकाणी स्टॅलिनने पाच वर्ष शिक्षण घेतले. या काळात जोसेफ स्टॅलिन यांने हुशार व चाणाक्ष विद्यार्थी म्हणून नावलौकिक

मिळवला. या काळात त्याचा ओढा हा क्रांतिकारक घटनांकडे जास्त होता, असे त्याचा ब्रिटिश चरित्रकार जँक मर्फी म्हणतो. या काळातच स्टॅलिनमध्ये बंडखोर प्रवृत्ती उपजली, अभ्यासक्रम सोडून क्रांतिकारी संघटनेशी त्याचे संबंध आहे असे संस्थाचालकाच्या लक्षात येताचसन १८९८ मध्ये परीक्षेत न बसल्याच्या गुन्ह्याकरिता स्टॅलिनला या संस्थेतून बाहेर हाकलण्यात आले.

अर्थशास्त्र, इतिहास, मार्क्सवाद, अशा विषयावर त्यांने केलेल्या सखोल वाचनामुळे सन १९०० पर्यंत स्टॅलिन मार्क्सवादाचा कट्टर समर्थक बनला होता. सन १९०२ मध्ये एका संपात सहभागी झाल्याचा आरोपवरून त्यास अटक झाली. अठरा महिन्यांचा कारावासाची शिक्षा भोगण्याकरिता त्यास सैबेरियात हद्दपार करण्यात आले होते. स्टॅलिनने 'रशियन सोशल डेमोक्रॅटिक लेबर पक्षाचे' सभासदत्व पत्करून सन १९०३ मध्ये बोल्शेविक गटात सामील झाला.सन १९०४ नंतरच्या दशकातील त्याचे जीवन म्हणजे निरनिराळ्या नावाखाली अविरत चाललेले भूमिगत क्रांतिकार्य होते. अशाच एका प्रसंगी त्यांने स्वीकारलेल्या 'स्टॅलिन' या नावाने तो त्यानंतर ओळखला जाऊ लागला. याच काळात सुमारे दहा वर्षे भूमिगत राहून आपले नाव व वेश बदलून आपले क्रांतिकार्य सुरूच ठेवले. त्याच्या या क्रांतीकार्याबद्दल त्यास एकूण आठ वेळा पकडण्यात आले. त्यापैकी सात वेळा त्यास हद्दपारीची शिक्षा ठोठावण्यात आली.

सन १९०५ साली पहिल्यांदा स्टॅलिन हा लेनिनला भेटला. मार्क्सवादावरील लेनिनच्या लिखाणामुळे स्टॅलिन अत्यंत प्रभावी झाला होता.सन १९१२ मध्ये स्टॅलिनला बोल्शविक पक्षाच्या केंद्रीय समितीचा सदस्य म्हणून पक्षात महत्त्वाचे स्थान देण्यात आले. सन १९१३ पर्यंत लेनिनचा सहकारी म्हणून ट्रान्स कॉकेशिया या भागात क्रांतिकारकांच्या गुप्त संघटनेचे कार्य त्याने केले. मार्क्सवाद व राष्ट्रीय समस्या या ग्रंथाच्या निर्मितीत लेनिनचे सहकार्य स्टॅलिनला लाभले. सन १९१३ मध्ये त्या ग्रंथामुळे बोल्शविक पक्षाचा एक सामान्य नेता व परिपक्व मार्क्सवादी म्हणून त्याची गणना होऊ लागली. सन १९१७ मध्ये रशियात झालेल्या क्रांतीच्या वेळी स्टॅलिन हद्दपारीची शिक्षा भोगत होता. समाजवादाच्या दबावापुढे सैबेरियात असलेल्या कैद्यांची सुटका करण्यात आली होती. सन १९१७ मध्ये प्रथमच अनौपचारिकपणे प्रस्थापित झालेल्या पक्षाच्या पॉलिटब्युरोचा स्टॅलिन सदस्य झाला. सन १९१७ मध्ये 'प्रावदा' या पक्षाच्या मुखपत्रात संपादक म्हणून काम करण्यास त्याने सुरुवात केली.

नोव्हेंबर १९१७ मध्ये रशियात सोव्हिएत सरकारची स्थापना झाली. त्यावेळी मंत्रिमंडळात 'Council of People's Commissars-Sovnarkom' अल्पसंख्याक राष्ट्रिक गटाचा मंत्री म्हणून स्टॅलिनची नेमणूक करण्यात आली होती. सन १९१८ मध्ये सोव्हिएत रशियात यादवी युद्ध व परकीय हस्तक्षेप प्रारंभ झाला होता. तेव्हा स्टॅलिनला संरक्षण समितीचा व मंत्रीमंडळाच्या कार्यकारी समितीचा सदस्य म्हणून नियुक्त करण्यात आले होते. श्वेत व परकीय सैन्याच्या विरुद्ध झारीस्तीन भागाचा बचाव करण्याची जबाबदारी स्टॅलिनवर सोपवण्यात आली होती. त्यांनी या जबाबदारीत झारीस्तीनवर मिळविलेल्या विजयाचा गौरव म्हणून या शहराचे नाव 'स्टॅलिनग्राड' असे नामकरण करण्यात आले होते.

सन १९१९ मध्ये स्थापन झालेल्या थर्ड इंटरनॅशनलच्या 'कोमिन्टर्न' या पक्षाच्या संस्थापक सदस्यांपैकी

स्टॅलिन हा एक सदस्य होता. सन १९१९ मध्ये कामगार शेतकरी निरीक्षक मंत्री म्हणून स्टॅलिनची नेमणूक करण्यात आली. हे पद जबाबदारीचे होते. या पदाधिकाऱ्यांना राष्ट्रातील कर्मचाऱ्यांची निष्ठा, कार्यक्षमता व कामकाज याच्यावर देखरीखीचे व निर्णय घेण्याचे अधिकार याची जबाबदारी होती.

स्टॅलिनचा त्याच्या पक्षातील एक प्रतिस्पर्धी म्हणजे ट्रॉटस्की होय. ट्रॉटस्की हा अमोघ वक्तृत्व असलेला नेता होता. स्टॅलिनजवळ तसे कर्तृत्व नव्हते. परंतु स्टॅलिन हा एक उत्तम प्रशासक, संयोजक व चिकाटीचा निष्ठावान कार्यकर्ता होता. त्याचे संघटन चातुर्य उच्च दर्जाचे होते. म्हणूनच १९२२ मध्ये स्टॅलिनला सोव्हिएत युनियनच्या कम्युनिस्ट पक्षाचे महासचिव पद देण्यात आले होते. अंतर्गत राजकारणात व पक्ष नेत्यात त्याचे स्थान महत्त्वाचे व मानाचे होते ते उघडच होते.

लेनिननंतर सोव्हिएत संघाचे नेतृत्व ट्रॉटस्की किंवा स्टॅलिन यांच्यापैकी कोणाकडे द्यावे असा प्रश्न उपस्थित झाला होता. स्टॅलिन व ट्रॉटस्की यांच्यात सुरुवातीपासूनच व्यक्तिमत्वाचे व मतांचे भिन्नत्व होते. लेनिनचा एक हस्तक यापेक्षा जास्त किंमत ट्रॉटस्की स्टॅलिन देत नव्हता. स्टॅलिनला हीन लेखण्याची त्याची प्रवृत्ती होती. स्टॅलिन हा उग्र व कठोर व्यक्तिमत्त्वाचा, असहिष्णू होता. त्याच्या निर्दयीपणा पाहून शेवटच्या आजारापूर्वी लेनिनने स्टॅलिन यास अधिकारापासून दूर करण्याची योजना केली होती असे असले तरी स्टॅलिनचे एक महत्त्वाचे स्वभाव वैशिष्ट्य मात्र ट्रॉटस्कीने जाणले नाही, ते म्हणजे साम्यवादावरील स्टॅलिनची अढळ निष्ठा. सत्ता हाती ठेवण्यामागील त्याचा उद्देश व त्या अनुषंगाने त्यांनी आखलेल्या योजना त्याच्या साम्यवादावरील निष्ठेतून साकार होत होत्या. लेनिनच्या मृत्यूच्या काळात स्टॅलिनने पक्षावर आपली भक्कम पकड बसवली होती. त्याला सामान्य पक्ष कार्यकर्त्यांचा पाठिंबा होता. म्हणूनच लेनिनच्या मृत्यूनंतर स्टॅलिनच सोव्हिएत संघाचे नवे राष्ट्राध्यक्ष झाले.

सन १९२८ ते १९५३ पर्यंत सोवियेत संघाचे नेतृत्व स्टॅलिनकडे होते. स्टॅलिनने अवघ्या २५वर्षाच्या काळात राष्ट्राची पुन: उभारणी केली. सोव्हिएत रशिया जागतिक महासत्ता म्हणून स्टॅलिनच्याच काळात उदयास आले. स्टॅलिनच्या पुढाकाराने सोव्हिएत संघाची घटना तयार करण्यात आली. त्याप्रमाणे सोव्हिएत संघात समावेश झालेल्या प्रत्येक वांशिक व राष्ट्रीय गटाचे वैविध्य टिकविण्याची महत्वाची जबाबदरी स्वतः स्टॅलिनने स्वीकारली होती. यातूनच घटनेप्रमाणे संपूर्ण देशावर बोल्शेविक पक्ष व केंद्र सरकारचे थेट नियंत्रण ठेवण्यात स्टॅलिनला यश आले. रशियन जीवनाची सर्व अंगे अगदी शिक्षण-संशोधन-कला साहित्य त्याने आपल्या नियंत्रणाखाली आणली. स्वत:ची एकाधिकारशाही जपण्यासाठी त्याने पक्ष, शासन, न्यायखाते याचा मनमानी वापर केला. रशिया जरी त्यांच्या काळात महासत्ता बनली तरी त्याची जबरदस्त किंमत तेथील जनतेला चुकवावी लागली.

स्टॅलिनवर असेही आरोप करण्यात येते कि त्याने हजारो विरोधकांना निर्दयतेने ठार केले. दुसऱ्या जागतिक महायुद्धात सोव्हिएत रशियाची जी हानी झाली त्याचे कारण सुद्धा त्याचे नेतृत्व होते असे मानले जाते. सोव्हिएत रशियावर स्टॅलिन याने एकछत्री हुकूमशाही राजवट स्थापन केली होती. ५ मार्च १९५३ रोजी मेंदूतील रक्तस्त्रावामुळे स्टॅलिनचे निधन झाले.

## ४.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

१. **थर्ड इंटरनॅशनल** - एक आंतरराष्ट्रीय साम्यवादी संघटन.

२. **झारीस्तीन** - रशियातील व्होल्गा नदीवरील प्रमुख बंदर.

३. **NEP** - New Economic Policy.

४. **NKVD** - People's Commissariat for Internal affairs.

५. **कूलक** - सधन शेतकऱ्यांचा वर्ग.

६. **Gosplan** - The State Planning Committee.

७. **ऑपरेशन बारबॅरोसा** - हे दुसऱ्या महायुध्दात जर्मनीने सोवियेत संघावर केलेल्या आक्रमण-मोहिमेचे सांकेतिक नाव होते.

## ४.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

❋ **स्वयं-अध्ययन प्रश्न भाग - १ ची उत्तरे**

१. *अ) चर्च.*

२. *ड) रशियन.*

३. *ब) बॅले नृत्य.*

४. *क) ६ जुलै १९४१.*

५. *अ) बोल्शेविक पक्ष.*

❋ **स्वयं-अध्ययन प्रश्न भाग - २ ची उत्तरे**

१. *अ) ५४०० कोटी.*

२. *ब) शेती.*

३. *अ) स्टॅलिन.*

४. *ब) दुसरी पंचवार्षिक योजना.*

५. *क) तिसरी पंचवार्षिक योजना.*

❋ **स्वयं-अध्ययन प्रश्न भाग - ३ ची उत्तरे**

१. *अ) २२ जून १९४०.*

२. *ड) ऑपरेशन बारबॅरोसा.*

३. *क) लँडलीज.*

४. *अ) जॉर्जी झुकाव.*

५. *क) याल्टा परिषद.*

## ४.५ सारांश

१९१७ च्या रशियन राज्यक्रांतीनंतर बोल्शाविकांच्या हाती सत्ता आली. क्रांतीपूर्व रशिया युरोपीन राष्ट्रांपेक्षा अनेक क्षेत्रात मागासलेला होता. क्रांतीनंतर लेनिनने साम्यवादी तत्वज्ञानावर आधारित रशियाचा पाया घालण्याचा प्रयत्न केला. हा पाया मजबूत करून त्यास सुदृढ करण्याचे काम जोसेफ स्टॅलिनच्या काळात झाले. रशियातील सोव्हिएत सरकार जरी कामगार, शेतकरी व कष्टकऱ्यांचे असले तरी एकप्रकारे व्यक्तीच्या स्वरूपात हुकूमशाहीच होती. स्टॅलिनच्या हातात केंद्रित झालेल्या सत्तेचा कठोरपणे उपयोग रशियास जागतिक महासत्ता म्हणून निर्माण करण्यात केला. अन्नधान्य, युद्धसामुग्री, शिक्षण, आरोग्य, उद्योग या क्षेत्रात युरोपियन देशावर अवलंबून न राहता रशियाला युरोपियन राष्ट्रांच्या पंक्तीत प्रथम क्रमांकावर बसविण्यासाठी त्याने राजकीय, सामाजिक, आर्थिक क्षेत्रात महत्त्वपूर्ण बदल घडवून आणले. निरंकुश सत्ता स्थापन करत स्टॅलिनने आपल्या विरोधकांना यमसदनी धाडले. पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून रशियाचे प्रत्येक क्षेत्रातील परावलंबित्व दूर केले. युरोपात उदयास आलेल्या इटलीचा मुसोलिनी व जर्मनीचा हिटलरशी सुरवातीस सख्य राखून रशियातील साम्यवादाला यांच्यापासून सुरक्षित ठेवण्याचा आणि रशियाच्या सभोवताल शेजारील राष्ट्रांसोबत तह करून संरक्षण कवच निर्माण करण्याचा प्रयत्न फसल्यावर रशियाने जर्मनीविरुध्द दुसऱ्या महायुद्धात उडी घेतली. तडजोड करत साम्यवादी विचारांच्या विरोधी असलेल्या इंग्लंड व अमेरिकेची मदत घेतली. या युद्धात अपरिमित नुकसान उचलूनसुद्धा जर्मनीशी प्रत्येक आघाडीवर मात करीत हिटलरचा आपल्या कुशल नियोजन बद्धतेने पराभव केला. जर्मनीसोबत झालेल्या तहात रशियाने आपली झालेली हानी भरून काढताना आपला वरचष्मा कायम ठेवला. अशा प्रकारची कणखर भूमिका व नियोजनबद्धता सोव्हिएत रशियाला जागतिक महासत्ता बनण्यासाठी उपयुक्त ठरली.

## ४.६ सरावासाठी स्वाध्याय

❋ **दिर्घोत्तरी प्रश्न.**

१. स्त्रियांच्या स्थितीत सुधारणा करण्यासठी रशियन सरकारने कोणत्या उपाय योजना केल्या?

२. रशियातील दुसऱ्या महायुध्दा पूर्वीच्या पक्षशुध्दीची माहिती सविस्तर लिहा.

३. स्टॅलिनच्या राज्यघटनेची वैशिष्टये लिहा.

४. पहिल्या पंचवार्षिक योजनेचे महत्व विषद करा.

५. कृषी सामुहीकीकरणावर सविस्तर चर्चा करा.

६. चौथ्या पंचवार्षिक योजनेचे महत्व सांगा.

७. ऑपरेशन बारबँरोसाचे रशियावरील परिणाम काय झाले?

८. याल्टा परिषदेचे महत्व विषद करा.

९. रशिया समोरील दुसऱ्या महायुध्दानंतरच्या समस्यांची सोडवणूक रशियाने कशी केली सविस्तर माहिती द्या.

❋ **टिपा लिहा.**

१. रशियातील शिक्षणाची प्रगती.

२. USSR ची निर्मिती.

३. स्टॅलिनच्या राज्यघटनेतील महत्वपूर्ण बदल.

४. रशियातील कृषी क्रांती.

५. स्टॅलिन कोड.

६. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेचे यश.

७. रशिया जपान कराराचे महत्व.

८. मॉस्कोचा लढा.

९. स्टॅलिनग्राडचा लढा.

१०. पॉटस्‌डॅम परिषदेचे महत्व.

## ४.७ संदर्भ ग्रंथ


१. **कदम, य. ना.** : 'आधुनिक जग : भाग-२', फडके प्रकाशन, कोल्हापूर, २०१०.

२. **कदम, य. ना.** : 'द्वितीय महायुध्दानंतरचे जग : १९४० ते १९९७', श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, १९९७.

३. **गायकवाड, आर. डी., कदम, य. ना., थोरात, डी. डी.** : 'आधुनिक जगाचा इतिहास : भाग-२, १९२०-१९७५', श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, १९९७.

४. **जोशी, पी. जी.** : 'विसाव्या शतकाचा इतिहास', विद्या प्रकाशन नागपूर, २००३.

५. **तळवलकर, गोविंद** : 'सोव्हिएत साम्राज्याचा उदय व अस्त खंड-१ व २', मौज प्रकाशन गृह, पुणे, १९९८.

६. **राजदेकर, सुहास** : 'आधुनिक जगाचा इतिहास : इ. स. १७८९ ते १९६२', प्रकाशक विद्या प्रकाशन, नागपूर-२, १९९६.

७. **वैद्य, सुमन** : 'आधुनिक जग : १८७१ ते १९४५', महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ, नागपूर, १९८८.

८. **वैद्य, सुमन** : 'आधुनिक जग : भाग-१', श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती, १९९७.

९. **वैद्य, सुमन** : 'रशियाचा इतिहास : इ.स.१८६० ते १९६४', प्रकाशक - महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळासाठी सौ. कविता पटवर्धन, आशय प्रकाशन, टिळकनगर, नागपूर, १०, प्रथमावृत्ती १९८८.

१०. **सांस्कृत्यान, राहुल** : 'स्टॅलिन : एक जीवनी', पीपुल्स पब्लिशिंग हाउस लिमिटेड, मुंबई-४, १९५३.

११. **Fisher, Louis** : 'Russia's Road from Peace to War : Soviet Foreign Relations', 1917-1941, Greenwood Press, 1979.

१२. **Kahn, Hans** : 'Basic History of Modern Russia', Eurasia Publication, New Delhi, 1957.

❋ ❋ ❋